३४१ निबंध

॥ जय जय रघुवीर समर्थ ॥

शनिमाहात्म्य


अर्थात

ग्रहदशेच्या फेऱ्याचा उलगडा.

—लेखक—

केशव सीताराम ठाकरे

संपादक ' प्रबोधन ' आणि ' लोकहितवादी '



३५६१

—प्रकाशक—

बाळ आणि कंपनी.

मुंबई नं. १४

किंमत दीड रुपया.

All Rights Reserved by Author.

Printed by

M. C. Lele B. A. at Vikram P. Press. Girgaon, Bombay. No

Published for

Messrs, **Bal & Co.** by Prabhakar Gopal Chitre,

10 Miranda's Chawl. Dadar, Bombav No. 14.

पुस्तकें मागविण्याचा पत्ताः—

बाळ आणि कंपनी

१० मिरांडाची चाळ, दादर, मुंबई नं. १४.

सच्चिदानंद–विलीन श्रीराममारुती महाराज.



वृत्ती हनुमंताची शक्तीनें भीम भक्ति रामाची ।
प्रीती हरिनामाची कीर्ती श्रीराममारुती यांची ॥
ज्यांच्या कृपाप्रसादें वदलो हे चार बोबडे बोल ।
अर्पण त्यांचे त्याना, गुरुमहिम्याचे कसे करू मोल ॥

प्रबोधनकार ठाकर कृत

शनिमाहात्म्याला शनिग्रहाचा आशीर्वाद.

माझ्या सत्य स्वरूपाचा इतिहास । तूं श्रुत करावा महाराष्ट्रास ।
नैराश्याचा सोडवावा फास । म्हणोनि आलो तव राशीं ॥ १ ॥

आजवरी छळिले पुष्कळ । परंतु सगळे अजागळ ।
कल्पना करिती बाष्कळ । माझ्या चरित्राची ॥ २ ॥

ज्योतिषी वर्तविता साडेसाती । यांच्या विझती ज्ञानज्योती ।
निष्क्रिय निर्बल होऊनि जाती । आत्महत्यारी करंटे ॥ ३ ॥

नाही ज्ञान ना विश्वास । नाही स्वाध्यायाचा हव्यास ।
पारखे जे विचारास । आचार कैसा घडेल त्या ? ॥ ४ ॥

प्रारब्ध भोगणे संचितापरी । क्रियमाणाची नवलपरी ।
पुरुषार्थाची लिखट सुरी । संचितासहि खंडिते ॥ ५ ॥

तुलाहि नव्हते हे ज्ञान । वाढलासि प्रचंड पाषाण ।
म्हणोनि हाणिला क्लेश-घण । प्रबोधावया तुजलागी ॥ ६ ॥

संकटांची ठिणगी पडता । ज्ञानदीप पेटला तत्त्वता ।
संक्रांतिला क्रान्ति घडता । जन-प्रबोधनीं फुरफुरशी ॥ ७ ॥

चिकित्सेला लाऊन धार । केला चिंतनाचा विस्तार ।
विचारांसवे प्रत्यक्ष आचार । क्लेश-घर्षणीं पाजळिला ॥ ८ ॥

टाकिता समर्थ-चरणी भार । हनुमंत करी बुभुःकार ।
त्याने केला ग्रंथविस्तार । अभिनव शनिमाहात्म्य ॥ ९ ॥

आत्मराज जैसा बोले । तैशी तुझी लेखणी हाले ।
साडेसातीचे सार्थक झाले । जनता जनार्दन पूजिला ॥ १० ॥

मुख्य भगवंताचे अधिष्ठान । उपासना हनुमंत-भजन ।
मार्ग दाविलि हा ग्रंथ जाण । निश्चये करोनि सर्वांसी ॥ ११ ॥

॥ बजरंग बली की जय ॥

थोड्यात फार अथवा ग्रंथाचे सार.

(१) आकाशस्थ नवग्रहांचे वरे वाईट परिणाम मनुष्यांवर त्यांच्या त्यांच्या कुंडलीतील ग्रहमाना प्रमाणे होतात. त्यातल्या त्यात शनीचे परिणाम विशेष दृश्य आणि तापदायक होतात.

(२) ते टाळण्याचा किंवा सहननीय करण्याचा उपाय म्हणजे तात्याजी महिपतिकृत ३८८ ओव्यांचे ' शनिमाहात्म्य ' चोपडे खास नव्हे. या चोपड्याच्या पारायणाने मनुष्य निराशावादी आणि आत्मद्रोही बनतो. कारण त्यात आशावादाचा किंवा आत्मचैतन्याचा एक शब्दसुद्धा नाही.

(३) आपत्ति संकटे क्लेश इत्यादि परिस्थितींचे विपरित किंवा प्रतिकूळ प्रसंग म्हणजे ईश्वरी क्षोभ मानणे, किंवा त्यामुळे ईश्वरी न्यायाला दोष देणे, अविचाराचे आहे. अशा परिस्थितीतच मनुष्याच्या सत्वाची खरी पारख होऊन, त्याची माणुसकी कसाला लागते, जो सत्वाला पारखा झाला, तो जिवंत असूनहि मेला. जो निश्चयाने, धैर्याने व शांत वृत्तीने त्याना तोंड देत गेला, तोच मर्द आणि तोच खरा वीर.

(४) परिस्थितीला कंटाळून जो आत्महत्त्येसारखा भ्याड मार्ग पत्करतो, त्याची किंमत तितकीच. लोकसंख्येची असली भरताड कमी झाल्याबद्दल आनंद मानावा. ' जबरदस्ताचा टिकाव ' हा सृष्टीच्या कारभाराचा दण्डकच आहे.

(५) जसे पूर्वजन्मार्जित बरे वाईट संचित असेल, तसे भोक्तृत्व या जन्मी भोगल्याशिवाय सुटकाच नाही. पण त्यामुळे क्रीयमाणाचा अथवा पुरुषार्थाचा मार्ग डागळला जात नाही. तो मोकळाच असतो.

(६) केवळ एकांडा प्रयत्नवाद यशस्वी होतोच, असा सिद्धांत नाही. प्रयत्नवादाच्याहि पलीकडे देववाद म्हणून आहेच. दैववाद फोल असला, तरी देववादाकडे पाठ फिरवून एकांडा प्रयत्नवाद तडीला जात नाही. ' जो जो प्रयत्न रामाविण । तो तो दुःखासी कारण.'

(७) प्रत्येक प्रयत्नाला 'भगंवताचे अधिष्ठान' पाहिजे. भक्ती-शिवाय ज्ञान नाही, ज्ञानाशिवाय कर्म यशस्वी होणार नाही.

(८) बाह्य परिस्थिति भडकली, तरी ' अंतरिचा ज्ञानदिवा मालवूं नकोरे.' ग्रहदशेच्या परिणामांशी प्रतिकाराची टक्कर देण्यासाठी आत्म-शक्तीचे चैतन्य दसपट शतपट वाढविले पाहिजे.

(९) आत्मशक्ती वाढविण्यासाठी समर्थ श्रीरामदासानी सिद्ध करून दाखविलेली श्रीमारुती-उपासना हीच सर्वतोपरी समर्थ आहे. भीमरूपी बजरंगबली मारुतीरायाचे 'धक्काधिंग' चारित्र्य उपासकाचा आत्म-विश्वास आत्मशक्ती व आत्मचैतन्य वृद्धिंगत करून, त्याच्या हृदयात 'राम' उत्पन्न करील.

(१०) सत्व आणि रज गुणांच्या फाजील प्रमाणाने हिंदुस्थानाचा आणि विशेषतः महाराष्ट्राचा घात झालेला आहे. आता तामसी प्रवृत्तीचा विकास झाल्याशिवाय, 'जगावे का मरावे' हा प्रश्न सुटणे कठीण आहे.

(११) शोकें शोक वाढे । ।हिमतचि धीर गाढे ॥ १ ॥ येथें केले नव्हे काई । लंडीपण खोटे भाई ॥२॥ करिती होया होय । परि नव्हे कोणी साह्य ॥ ३ ॥ तुका म्हणे घडी । साधिलिया एक थोडी ॥ ४ ॥

स. चि.
3-3-32

थोडेसे आत्मनिवेदन.

प्रिय वाचक !

प्रस्तुतच्या " शनिमाहात्म्य " पुस्तकात कै. गुरुवर्य आगरकरांची नितांत नास्तिक वृत्ति, ज्योतिषी लोकांची आंधळी आणि भेदरेंडे प्रकृति, किंवा सात्याजी महिपतीची नैराश्यवाद-प्रवर्तक पौराणिक फलश्रुति, यांपैकी एकाहि मार्गाचा अवलंब मी केलेला नाही. केवळ एक संसारी, या नात्याने माझ्या प्रत्यक्ष अनुभवाला जे जे आले आणि स्वाध्याय चिंतनाने मी त्यांचा जसा जितका विचार केला, तोच विचारांचा शब्दपट वाचकांपुढे प्रणिपातपूर्वक मी उघडून ठेवीत आहे. प्रत्येक प्रकरण म्हणजे माझ्या विचार व आचार-क्रान्तीची एकेक चढती पायरी असल्यामुळे, ' ग्रहदशेच्या फेऱ्याचा उलगडा ' मी कोणत्या रीतीने केला, याची वाचकाना स्पष्ट कल्पना येईल. शनिमाहात्म्या-वर मी विचार करू लागल्या दिवसापासून तों हे पुस्तक लिहून हालावेगळे होईपर्यंत, माझ्या बावरलेल्या चित्तवृत्तीला असामान्य शांति स्थैर्य व धैर्य प्राप्त झाले. माझ्या परिस्थितीतल्या प्रत्येक वाचकास, या पुस्तकाच्या मननपूर्वक वाचनाने, तोच अनुभव येईल, अशी माझी खात्री आहे. केवळ काहीतरी वाचायचे म्हणून हे पुस्तक वाचणाराना, त्यातली आत्मियत्वाची तिडीक उमगणे शक्य नाही. ज्याला जन्मात कधी ओरखड्याचा अनुभव नाही, त्याने दुसऱ्याच्या जखमेची टायली खुशाल करावी !

प्रस्तुत पुस्तकाचे मुद्रण अनेक अडचणींतून ताऊन सुलाखून झालेले आहे. ' शनिमाहात्म्याला ' ला ' विक्रम ' छापखानाच भेटावा, हा योग सुद्धा विचार करण्यासारखाच आहे. आजपर्यंतच्या माझ्या पुस्तकांची छपाई व उठाव यांच्या मानाने, हे पुस्तक बरेच गबाळ दिसेल. पण त्याला माझा नाइलाज

आहे. जेथे परिस्थितीने माझी व घरच्या अपत्यांचीहि सर्व बाजूनी हेळसांड व आबाळ केली, तेथे हे पुस्तकरूपी अपत्य सुद्धा गबाळ अवस्थेत बाहेर कां पडू नये ? माझ्या आश्रयदात्यांचे मजवरील अकृत्रिम प्रेम आणि वाढता विश्वास, प्रतिकुळ परिस्थितीच्या अज्ञातवासात जन्मलेल्या या माझ्या अपत्याचा योग्य तो सत्कार करतील, अशी मला आशा आहे.

नाठाळ अपकारकर्त्यांपेक्षा स्नेहाळ उपकारकर्त्यांची संख्या मला फार मोठी लाभलेली आहे, हा श्रीहरीचा मजवर मोठा प्रसादच होय. प्रस्तुत पुस्तकाची कल्पना निघाल्यापासून तों ते आज प्रसिद्ध होईपर्यंत अनेक मित्रांनी मला अनेक प्रकारचे सहाय्य दिले. त्या सर्वांच्या चरणी मी आदरपूर्वक माथा ठेवून, माझ्या हृदयस्थ कृतज्ञ भावनाना व्यक्त करीत आहे. विशेषतः गेल्या नऊ महिन्याच्या माझ्या अज्ञातवासाच्या काळ्याकुट्ट काळात, प्रबोधनाच्या हजारो आश्रयदात्यानी मुद्दाम क्षेमसमाचार पुसला, मला उत्तेजनाचे संदेश व भेटी दिल्या, आणि कित्येकानी सांपत्तिक मदत पाठविली, ही जनता-जनार्दनाची कृपादृष्टी माझ्या नेत्रातून आनंदाश्रूंची अखंड वृष्टी पाडीत आहे. देवाची सेवा मजकडून आमरण अव्यंग व अभंग घडो !

अनंतचतुर्दशी, शके १८५०.
दादर, ता. २८ सप्टेंबर १९२८

महाराष्ट्राचा दासानुदास
केशव सीताराम ठाकरे.

शनिमाहात्म्य

अथवा

शनैश्चराचा फेऱ्याचा उलगडा.

सं. शि.
३५८१

प्रकरण १ लें.

प्रास्ताविक विचार.

हिंदुस्थानाचा पिंड काव्यमय किंवा काव्यप्रिय आहे. काव्याशिवाय त्याला पूर्वी काही स्फुरले नाही आणि आताहि काही सुचत नाही. काव्य म्हटले की हिंदुस्थानाला एक प्रकारची फुरफुरी येते. तत्वज्ञान, इतिहास, चरित्र, उपदेश काहीहि असो, त्याची काव्याच्या मधुर साच्यात मूस ओतल्या शिवाय पूर्वी हिंदुस्थानाला हायसे वाटले नाही, आजहि वाटत नाही. हर्ष असो, शोक असो, विषाद असो, अगर शृंगार वीर करुणादि नवरसांपैकी हवा तो रस असो, तो काव्यानेच आजपर्यंत रंगत आलेला आहे. फार काय, पण रोजच्या व्यवहारातला साधा पत्रव्यवहार सुद्धा कविताबद्ध केल्या-शिवाय लेखक वाचकाचे समाधान होत नसे, आणि परस्परांच्या भावनांची किंवा विद्वत्तेची परस्परांस साक्ष पटत नसे. यामुळे हिंदुस्थानातले सर्व प्राचीन व अगदी अलीकडे शंभर वर्षां पूर्वी पर्यंतचे अर्वाचीन वाङ्मय एकजात कविताबद्ध. प्रोज ऊर्फ गद्य भाग जवळ जवळ नाहीच. त्याला बहिष्कार पडलेला होता, असे नव्हे; तर लेखकांच्या पद्यमय भावनेच्या

शेतांत गद्याचे बीच मुळी थरारणे शक्य नसे. हासायचे तरी पद्यात आणि रडायचेहि पद्यात. उपदेशाला कविता आणि शिव्याशापालाहि कविता. विषय शास्त्रीय असो, नटव्या शृंगाराचा असो, नाहीतर टाळकुट्या भक्तीचा असो, जिकडे पहाल तिकडे कविता कविता कविता.

पद्यमय भाव पद्यमय वाणी ।
गद्याची कहाणी कोण ऐके ॥

असाच तो मनु होता. या मुळे हिंदुस्थानचा प्राचीन इतिहास शोधणाराला काव्यांच्या भरंसाट ताटव्यात भटक भटक भटकावे लागते. शंभर ताटव्यांतल्या हजार फुलांचा परामर्ष तो घेईल, तेव्हा कोठे एखाद्या तत्वाचा बिंदु सिद्धांत रूपाने त्याला गवसायचा. बोलून चालून ती काव्यसृष्टी. न देखे रवि ते देखे कवि. असल्या पद्याळ ब्रह्मदेवांच्या विशाळ विश्वात कोणीहि गद्याळ संशोधक भटकू लागला तर तेथील काव्यपरिमळातच मधुकरा प्रमाणे गुंगून जायचा. मग कसले संशोधन न् कसले निरीक्षण ! विशेषतः एक गोष्ट नीट ध्यानात धरली पाहिजे की काव्य भरल्या पोटी निपजते. गद्य म्हणजे घोड्याची भरधाव. पोट भरले असो नाहीतर उपाशी असो, घोड्याची भरधाव केव्हाहि सुरू. काव्य सुचायला मात्र पोटापाण्याची ददात तिळमात्र खपायची नाही. पूर्वी हिंदुस्थान म्हणजे समृद्धीची कामधेनू असल्यामुळे येथे गद्यापेक्षा पद्याची पैदास मुबलक झाली. सध्या हिंदुस्थानात पोटाचेच बण्ड भयंकर उद्भवल्यामुळे, पद्याची रुणझुणती नेपुरे अजीबात माजी पडून, सडक सीताराम अशा स्पष्टवाची गद्याचा नगारा सर्वत्र दणदणाट करीत आहे. हाण टिपरी का काढ दणका. त्याला काव्याचा चटकदार नखरा, तालदार गति, डौलदार भाषा आणि पैलुदार विचार वगैरे दारांची अटक खटक मुळीच मानवत नाही.

उघाडे नयन रम्य उषा हसत हसत आली

या काव्यमय वाणीपेक्षा " उजाडले. उठा. " ही सडेतोड भाषा गद्याला मानवते. त्यामुळे वाचकाला किंवा श्रोत्याला अर्थबोधासाठी अन्वयाची यातायात, शब्दकोशाशी मायेफोड आणि उत्प्रेक्षा अलंकाराच्या सराट्यातली पायपिटी—नव्हे विचारपिटी करण्याचा प्रसंग येत नाही.

आमचे पूर्वीचे सर्व वाङ्मय काव्यमय असल्यामुळे, टीचभर सिद्धांत त्यावर चार हात उत्प्रेक्षा अलंकारांची भरगच्च सजावट, असा प्रकार फार. सांगायचे असते एक आणि कवीच्या कल्पना अनेक. " राजा निजून उठला " ही एक जरी गोष्ट सांगायची असली, तरी उपमेसाठी विश्वातल्या साऱ्या ग्रहाना आणि चंद्र सूर्याला खाली उतरून, कल्पनेच्या रंगभूमीवर त्यांचे एकादे साग्रसंगीत नाटक नटविल्याशिवाय कवीच्या काव्यवेदनांची खाज कधीच जिरायची नाही. आणि, कविराज एकदा का उपमांच्या आणि अलंकाराच्या ओघांत घसरणीला लागले कीं इकडे राजा निजून उठून ठसका लागून मेला, तरी यांचे " तो कसा निजून उठला " यावरचे प्रवचन बेफाम चालूच. निरंकुशः कवयः ! कवीला कशाची अटक नाही. जंगमाला स्थावर बनवून स्थावराला आकाशात गिरक्या मारायला लावणे कवीच्या हातचा मळ. कल्पनेच्या कसरतीने आकाशाला सुद्धा जे चहाची बशी बनविणारे, त्या कवीनी माणसाच्या धडावर हत्तीचे मुंडके बसवून, चार हाताचा गणपति निर्माण केला, तर त्यात आश्चर्य कशाचे ? तत्वज्ञानाचा साधा का सिद्धांत असे ना, किंवा आयुर्वेदातला सर्पदंशावरचा सोपा का उपाय असे ना, त्यावर द्राविडी प्राणायामी कवित्वाची जरताली झूल चढाविल्याशिवाय कवीना चैनच पडायचे नाही. पुराणादि ग्रंथात आपणास ज्या अशक्य गोष्टी पदोपदी आढळतात, त्याचे कारण हेच. याचा परिणाम मात्र असा होऊन बसला आहे की ते ग्रंथ खरडताना कवीच्या काव्य-वेदनांचे जरी

समाधान झाले, तरी आजच्या चिकित्साखोर वाचकांच्या निर्भिड भावनेला यातला काव्यमय विस्तार शुद्ध शिमगा वाटू लागला आहे. म्हणजे तत्वा-परी तत्व गेले आणि गद्य प्रवृत्तीला पद्य पाचकळ ठरले. हां गेले हूं गेले आणि हाती धुपाटणे आले. पुराणात किंवा माहात्म्य ग्रंथात त्या त्या कवीला एकाद्या मुद्यावर आपल्या श्रोत्या वाचकांचे आत्मप्रबोधन करावयाचे होते कीं निवळ कवित्वाची कंडू शमविण्यासाठी काहीतरी जाडजूड बाड प्रस-वायचे होते, याचा आज तरी थांग लागत नाही. त्यामुळे अडाणी लोक पुराणातील अक्षर न् अक्षर वाजवी सत्य म्हणून शिरसावंद्य मानतात, तर शिक्षित विवेकवादी त्याचा भरंसाट म्हणून धिःकार करतात. अशी आजची स्थिति आहे. या स्थितीत काहीं निश्चित सत्यशोधन करावे, निदान त्याचा नमुनेदार मार्ग दाखवावा अशी फार दिवस माझी इच्छा होती आणि त्या दिशेने माझे विचारयंत्र कामहि करीत होते. त्याचा परिणाम आज शनि-माहात्म्य-निरूपणांत होत आहे.





प्रकरण २ रे.

शनिमाहात्म्यच कां घेतले ?

मी शनिमाहात्म्यच हाती कां घेतले ? प्रश्न व्यक्तीच्या निवडीचा असला, तरी त्याला काही भरीव कारणेहि असली पाहिजेत. ग्रंथकाराने किंवा वक्त्याने आपल्या जवळ कसला तरी नवविचार असल्याशिवाय लेखणी उचलू नये, आणि तोंड उघडू नये, असे माझे मत आहे. शनिमाहात्म्याची पारायणे करणारे लक्षावधि लोक या महाराष्ट्रात आहेत. तितकेच कदाचित टीकाकारहि (निंदक) असतील. या निंदक वंदकांच्या विचारात क्रांति घडवून आणण्याजोगा काहीतरी नवविचार माझ्या जवळ असल्या शिवाय मी या लेखनास प्रवृत्त झालो नाही खास. मी शनिमाहात्म्याचा आंधळा वंदक नव्हे आणि आंधळा निंदकहि नव्हे. मात्र प्रस्तुत ग्रंथातील विचार-सरणीला माझी सध्याची परिस्थिति मूळ कारण झालेली आहे आणि तिच्या कठोर घर्षणातलि एका चमकदार ठिणगीने शनिमाहात्म्या विषयी नव-विचाराचा प्रफुल्ल दीप माझ्या मनोमंदीरात उजळला. ही गोष्ट प्रथमच सांगून टाकलेली बरी. या दिव्याच्या उजेडाने मला जे जे दिसले व अनुभवाला पटले ते ते प्रिय वाचकांच्या विचारक्रांतीसाठी नमूद करीत आहे.

मी कट्टा दैववादी (फेटॅलिस्ट) नव्हे आणि कच्चा प्रयत्नवादीहि नव्हे. मला ज्योतिष्यशास्त्र अवगत नाही आणि त्यात डोके खुपसण्याचा मी कधी यत्नहि केला नाही. पण ज्योतिष्यशास्त्रात प्रवीण आणि स्वाध्यायशील असे माझे अनेक स्नेही आहेत आणि ते आपलेपणाच्या शुद्ध कळवळ्याने माझ्या कुंडलीचा अभ्यास करून, माझ्या चळवळींच्या भरती ओहोटीचे ठोकताळे अजमावीत असतात. कधी एकाद्या संकटाची आगामी सूचना देतात, तर

कधी देत नाहीत, नुसते आडाखेच अजमावतात. या मित्रांच्या मताप्रमाणे सध्या माझ्यावर शनीची साडेसाती चालू असून, गेल्या चार साडेचार वर्षात माझ्या चरित्रात घडलेल्या क्रांत्या तिचेच परिणाम होत. प्रयत्नांची कितीहि शिकस्त केली, धोरणांचे कितीहि व्यावहारीक पाचपेच लढविले आणि सवझूट मानून कर्तव्याच्या दिशेने कितीहि डुक्करमुसंड्या मारल्या, तरी साडेसातीची मुदत पूर्ण भरल्याशिवाय, कोणत्याहि कार्याला यश येणार नाही, ते तडीला जाणार नाही, हवे ते उत्पात घडतील, नसतील ती संकटे उद्भवतील, मित्र शत्रू बनतील, काय वाटेल ते होईल. आलेल्या किंवा येणाऱ्या संकटांच्या उत्पत्ति स्थिति लयाला व्यावहारीक काहीहि कारणे घडली, तरी तो सारा साडेसातीचाच परिणाम. हातात सोने धरले तरी त्याची हटकून माती व्हायची. शनीच्या या साडेसातीच्या चक्रातून एकहि माणूस आजपर्यंत निसटू शकला नाही. माणसेच काय, पण संस्था गावे राष्ट्रे यानाहि राहू शनि मंगळादिकांची ग्रहदशा यथाक्रम यथाकाळ भोवल्याशिवाय चुकत नाही आणि त्यानी ती भोगल्याशिवाय सुटका नाही, असे माझे ज्योतिषी मित्रच म्हणतात असे नव्हे, तर सर्व घंदेबाज ज्योतिष्यांचेहि असेच म्हणणे आहे. म्हणजे याचा असा सरळ अर्थ निघतो कीं आम्ही माणसे आणि आमची ही पृथ्वी या आकाशस्थ डझनभर ग्रहांचे खाद्य, अथवा या ग्रहरूपी मांजरांच्या तडाक्यात सापडलेले उंदीरच होत. उंदराचा जीव घेण्यापूर्वी मांजर जसे त्याच्याशी खेळते बागडते, त्याला थोडे मोकळे सोडून पळू देते आणि चटकन् पुन्हा पंजा मारून पकडते व उलट सुलट आदळते, तेवढेच आणि तितकेच स्वातंत्र्य आम्हा मानवाना आहे. या पलीकडे आमच्या हातात काही सत्ता नाही, शक्ति नाही, बुद्धि नाही, पुरुषार्थ नाही, काही नाही ! केवळ शेणामेणाचे गोळे ! आकाशस्थ ग्रह त्या गोळ्यांचा देव बनवोत वा माकड करोत, आमच्या हातात प्रतिकाराची कसलीहि शक्ति नाही !

असल्या कल्पनेचा अगर भावनेचा प्लेग आज हिंदुस्थानात जितका जास्त फैलावलेला आहे, तितका जगाच्या पाठीवर इरतत्र दिसून येत नाही. या भावनेमुळे कोट्यवधि हिंदी लोकांचे संघ बडवलेल्या बैलाप्रमाणे हव्या त्या परिस्थितीच्या जोकडाखाली विनतक्कार मान देण्याइतके निष्क्रिय आणि अचेतन होऊन बसले आहेत. प्रतिकाराची धमकच ठार मेल्यामुळे, हिंदुस्थानाचे स्वातंत्र्य भस्मसात् होऊन, आज हा अफाट भरतखंड परक्यांचा अक्षरशः गुलाम होऊन पडला आहे. परार्थ तर राहूद्याच, पण स्वार्थासाठी सुद्धा स्वतःचे अंग खरचटून घ्यायला जेथे कोणी तयार नाही, तेथे समाजासाठी, घर्मासाठी किंवा देशासाठी प्राण द्यायला कोण तयार होणार ? वाटेल त्या बेमाणुसकीच्या परिस्थितीपुढे अथवा अपमानापुढे हिंदी लोक बिनशर्त मान वाकवितात, याचे कारण प्रचलित ज्योतिष शास्त्राने अगर ज्योतिष्यांनी फैलावलेल्या उपरोक्त भावनेतच आढळते.

बरे, ज्योतिष्यांना टकेच्या रिंगणावर घरावे तर ते म्हणतात की " आमच्या हाती शास्त्राशिवाय दुसरा आधार नाही. आम्ही भविष्य वर्तवतो म्हणून आम्ही काही देवदूत किंवा मोठे त्रिकालज्ञ द्रष्टे नव्हत. ज्योतिष हे एक सिद्ध शास्त्र आहे आणि केवळ गणिती आडाख्याने ग्रहांच्या गति विचारात घेऊन, त्यांचे परिणाम ते कथन करते. यांत आश्चर्य नाही, चमत्कार नाही किंवा अनुमान नाही. सारा गणिताचा गणिती प्रकार. १४ आणि ५ जसे १९ च व्हायचे,२० व्हायचे नाहीत का १८ व्हायचे नाहीत, तद्वत या शास्त्राचे ठोकताळे आहेत. प्रत्येक ग्रहाच्या दशेचे गुणधर्म विद्वान संशोधकांनी फार प्राचीन काळी निश्चित शोधनानें आणि अनुभवाने ठरविले आहेत आणि त्यांचे पडताळे दररोज प्रत्यक्ष अनुभवाला येत आहेत. शनिची साडेसाती काय, राहूची महादशा काय, किंवा गुरूची महाकृपा काय, त्यांचे येणे जाणे त्यांच्या किंवा कोणाच्याहि लहरीवर किंवा काही

अपघाता (ॲक्सिडंट) वर अवलंबून नाही. शनिग्रह महाक्रूर असो; नाहीतर महाबावळट असो; गुरु हा 'जन्टलमन ऑफ धी फर्स्ट रँक' असो, नाहितर बाबू चष्मेवाल्याचा दिलदार दोस्त असो; घरी करमत नाही म्हणून हवी तेव्हा हवी ती शाळा तपासण्यास जाणाऱ्या मुंबईच्या सन्मान्य म्युनिसिपल व्हिजिटरांप्रमाणे, बाराग्रहांपैकी एकाहि महात्म्याला, हवी तेव्हा 'सर्प्राईज व्हिजिट' (अचंबा भेट) देता येत नाही. त्यांच्याहि भेटीगाठी गणिती एटकावर जखडलेल्या आहेत. प्रत्येक मनुष्याच्या जन्मकाळी आकाशात जी ग्रहस्थिति असेल, ती कागदावर खगोलज्ञ ज्योतिषी मांडतात. ती ग्रहस्थिति म्हणजे त्या मनुष्याचा पिंड; आणि जन्मकाळापासून तो मरणकाळापर्यंत ब्रह्माडात सर्व ग्रहांची जसजशी गति होत जाते, तसतशी त्या मनुष्याच्या पिंडावर त्यांची बरी वाईट स्थिति उमटत असते. **ग्रहदशेचा फेरा** यांत कसलाहि वाईट अर्थ नसून, ग्रह जसजसे सूर्याभोवती आपापल्या ठरावीक मार्गाने व ठरावीक गतीने फिरत असतात, त्या गतीची उर्फ फेऱ्याची दशा, म्हणजे परिणाम. Influence of the Planets while on their orbits. ब्रम्हांडात सर्व ग्रहांचे परिभ्रमण—घड्याळातील यंत्ररचने प्रमाणे अखंड चालूच आहे आणि प्रत्येक मनुष्याच्या जन्मकुंडलीतील ग्रहस्थिति प्रमाणे त्या प्रारिभ्रमणाचे परिणाम त्याच्यावर ठरावीक काळी घडत असतात, घडलेच पाहिजेत; त्यांत अणूरेणू इतकीहि तफावत पडायची नाही. सगळा गणिती ठोकताळा. ”

मनुष्य जन्माला आला कीं त्या क्षणी निरनिराळे ग्रह आपापल्या परिभ्रमणात कोठकोठे असतात, त्यांचा ज्योतिषीलोक एक नकाशा काढतात. हा नकाशा म्हणजे त्या मनुष्याची कुंडली. कुंडलीत ग्रह ज्या ज्या ठिकाणी असतील, त्या त्या स्थानमाहात्म्या प्रमाणे त्या मनुष्याची जन्मप्रकृति अथवा त्याचा पिंड बनतो. पुढे त्याच्या सर्व आयुष्यक्रमात, अखिल विश्वातल्या

परिभ्रमणा प्रमाणे ग्रहांच्या ज्या हालचाली होतात, त्यांचा त्यां पिंडावर बरा वाईट परिणाम आपोआप घडत असतो. याला आपण असे एक उदाहरण घेऊ. एका खोलीत रामा कृष्णा आणि गोविंदा असे तिघे जण अनुक्रमे पांढरा निळा आणि पिवळा अशा तीन रंगाचे सदरे घालून बसले आहेत. खोलीला एकच खिडकी असून, बाहेर कडक सूर्यप्रकाश पडला आहे. जोंवर निर्भेळ सूर्यप्रकाश खोलीत येतो तोंवर तिघांचे कपडे पांढरे निळे आणि पिवळेच दिसतात. इतक्यात खिडकीवर तांबडे तावदान धरले, तर काय होइल ! तोच पूर्वीचा पांढरा स्वच्छ सूर्य प्रकाश तांबड्या काचेंतून खोलीत आल्यामुळे, रामा तांबडा, कृष्णा जांभळा आणि गोविंदा नारिंगी कपड्याचे दिसतील. निळी काच लाविली तर कृष्णाच्या निळ्या कपड्यावर काही परिणाम होणार नाही, पण पांढऱ्या कपड्याचा रामा निळा दिसेल, आणि पिवळा गोविंदा हिरवा चार पडेल. पिवळी काच आड धरली, तर गोविंदा मात्र पिवळ्याच्या पिवळा राहून, पांढरा रामा पिवळा बनेल आणि निळा कृष्णा हिरवा होईल. तद्वत् सूर्याचा प्रकाश सर्व विश्वाला जरी चैतन्य देत असला, तरी त्या प्रकाशाच्या मार्गात निरनिराळ्या ग्रहांचे येणे जाणे अखंड चालू असल्यामुळे, त्या त्या ग्रहांच्या दशा (Influences) निरनिराळ्या कुंडल्यांच्या व्यक्तीवर यथाक्रम यथाकाळ बराबाईट परिणाम करीत असतात.

ज्योतिष्यांचे हे म्हणणे खरे मानले, तरीहि त्यावर आक्षेप असा येतो कीं मांडलेल्या कुंडल्या खऱ्या कशावरून ? एका गृहांतला ग्रह दुसऱ्या गृहात चुकून मांडला, तर त्या मनुष्याच्या प्रकृतीच्या तपशीलात भयंकर तफावत पडणे शक्य आहे; आणि जोंवर मनुष्य चुकीला पात्रच असतो, साध्या हिशोबांत सुद्धा 'हातचा आला एक ' धरायला विसरतो आणि जोंवर ज्योतिषी हे मनुष्यच आहेत, तोंवर त्यानी तयार केलेल्या कागदी कुंडल्यावर आम्ही विश्वास कां ठेवावा ? मुळींच ठेऊ नये. मला वाटते विश्वविधात्याला या आमच्या आक्षेपाची

आगाऊच अटकळ असल्यामुळे, त्याने आमच्या तळहातावर आमची कुंडली आधीच खोदून ठेवलेली असते. कागदी कुंडली तपशीलात चुकेल, पण ही तळहाती कुंडली कधीच चुकायाची नाही. या मुळे ज्योतिषशास्त्राच्या जोडी-नेच हस्तरेषाशास्त्राचीहि बरीच प्रगति झालेली आहे. गेल्या फेब्रुवारी महिन्यात अवचित एके दिवशी मला अगदीच अपरिचित व कधीहि न भेटलेले असे ठाण्याचे श्री. वसंत जयवंत चित्रे नावाचे एक तरुण पामिस्ट (हस्तरेषा परीक्षक) भेटले. त्यानी माझा हात पाहून आयुष्यातील ठळक ठळक प्रसंग तर मुदत-शीर सांगितलेच, पण विशेष आश्चर्याची गोष्ट कीं, माझे वय, जन्म-तिथि, जन्मवार, सायन व निरयण कुंडल्यांतील ग्रहस्थाने, राशी, वगैरे तपशील बिनचुक फटाफट अवघ्या नऊ दहा मिनिटात सांगितला. ज्या कित्येक गोष्टी फक्त माझ्या मलाच माहीत, त्यासुद्धा त्यानी सूचनांच्या रूपाने दर्शविल्यामुळे, मी या तरुणाच्या हस्तरेषापरीक्षण प्राविण्याने अगदी चकित झालो.

या प्रसंगामुळे माझी बरीच वर्षांची एक शंका आपोआप सुटली. आचार्य होऊन शुद्ध वैदिक विधीने मी विवाहविधी चालवीत असतो, हे लोकविश्रुतच आहे. त्या विधीतील **पाणिग्रहण विधि** प्रथम मी जेव्हा अभ्यासला, तेव्हा **शेकहॅन्डची** पद्धत वरवर विचार करणाराना जरी युरोपि-यन वाटली, तरी ती वेदकाळाइतकी प्राचीन आणि खास आर्यन आहे, हा एक सिद्धांत सुटला. या नंतर शंका आली कीं परस्पर-वंदनाचे काम जर दुरून जोडलेल्या दोन हाताच्या नमस्काराने भागते, तर त्यासाठी हा शेक-हॅण्डचा घसळामुसळी मामला कशाला पत्करावा ? त्यात विशेष काय आहे ? दुसरी एक शंका अशी कीं

जोशी पंचांग पाहाता । मग कां बालविधवा होती ? ॥

वधु वरांची लग्ने जुळविताना, त्यांच्या परस्पर संमतिपेक्षा आणि मने जुळ-विण्यापेक्षा, त्यांच्या कुंडल्यांच्या जुळवाजुळवीचा आणि खुलवाखुलवीचा

एवढा द्राविडी प्राणायामी धुडघुस चालतो तो कां ? आणि ' कुंडल्या जुळ-वितात ' म्हणजे हे धुडघुश्ये करतात काय ? पण प्रत्येक व्यक्तीची कुंडली, प्रकृति, अथवा पिंड त्याच्या तळहातावरच परमेश्वराने खोदून ठेवलेला असल्यामुळे ज्या वेळी वधू आणि वर पाणिग्रहणासाठी अग्निसाक्षिक आपा-पले हात एकमेकात, तळहाताला तळहात चिकटवून, घट्ट धरतात, त्याच वेळी त्यांच्या परस्पर प्रकृतीचे, ग्रहदशेचे आणि पिंडाचे खरे सम्मीलन उर्फ एकीकरण होत असते. दोन मित्र परस्परांशी शेकहॅण्ड करतात, तेव्हाहि हीच भावना त्यात प्रधान असते. नुसत्या कागदी कुंडल्यांची जुळवाजुळव हा याच भावनेचा भ्रष्ट असा एक आंधळ्या रूढीचा प्रकार शिल्लक राहि-लेला दिसतो. " परस्परांच्या प्रकृत्या आणि ग्रहास्थिति कशाहि असोत, एक-मेकांच्या आकर्षणाने अथवा परिस्थितीच्या प्रवाहाने ज्या अर्थी आपण एकमेकांशी वर-वधूच्या नात्याने संयुक्त होण्यासाठी सिद्ध झालो आहो, त्या अर्थी या पाणिग्रहणाने आपले परस्पर पिंड, प्रकृति ग्रहदशेसह एक जिनसी एकापिंडी होवोत " हाच पाणिग्रहणविधीचा मुख्य हेतू आहे; आणि दोन मित्रांच्या शेकहॅन्ड मध्ये सुद्धा हेच अविच्छिन्न एकीकरणाचे रहस्य आहे. परंतु शेकडा ९८-९९ लोक परमेश्वरालिखित तळहात-कुंडलीचा मुळीच विचार न करता कागदी कुंडल्यांवर डोकी फोडीत बसतात. याचेच नाव हिंदू लोकांचा हिंदुपणा.

कुंडल्या कागदी असोत, नाही तर तळहाती असोत, त्यात चितार-लेल्या प्रारब्ध-मर्यादे बाहेर मनुष्याला केव्हाहि जाता येणार नाही, त्यांतील भोक्तृत्व भोगल्याशिवाय सुटका नाही, हा प्रवाद जर खरा मानला तर मनु-ष्याच्या पुरुषार्थाला वाव तरी राहिला कोठे ? सगळाच जर दैववाद, तर यत्नवाद हा शब्द जन्मला तरी कधी ? आणि कां ? आणि कोणाच्या पोटी ? बरे, प्रत्येकाचे दैव आणि सुख दुःखाचे फेरे हे जर घड्याळातल्या यंत्रा-

प्रमाणे ठाकठीक ठरलेले आणि यथाकाळ यथाक्रम घडणारे, तर त्यासाठी माणसाने आपले हातपाय तरी कां हालवावे ? दुःख येणार तर ते अगत्य येणारच्च येणार आणि सुखाचा मुसळधार पाऊस अमूक वेळी कोसळणार म्हणजे घो घो कोसळणारच. असेल माझा हरी तर देइल खाटल्यावरी ! मला हातपाय हालविण्याची जरूर काय ? दैववाद्यांचे विचार जवळ जवळ असेच असतात. नवल वाटते ते हेच कीं या कपाळवाद्याना सुद्धा आळ्याला तंगड्या लाऊन स्वस्थ मात्र वसवत नाही. त्यांची काही ना काही धडपड चाललेलीच असते. ज्योतिषीबुवाने शनीची साडेसाती वर्तवली कीं या कपाळ-वाद्यानी दर शनिवारी मारुतीला शेंदूर शापून तात्याजी महिपति कृत शनि-माहात्म्याचे पारायण नेटाने चालविलेच. मग हे प्राणी आजूबाजूच्या परिस्थि-तीचा, स्वतःच्या प्रवृत्तीचा, अंतस्थ धमकीचा, कार्यकुशलतेचा, कार्यकारण-संबंधाचा, हातातील विहित कर्तव्याचा, कशाचाहि कधी विचार करायचे नाहीत. मारुती शेंदूर प्रदक्षिणा तैलाभिषेक भटपूजा आणि शनिमाहात्म्य यातच साऱ्या अकलेचा आणि हिंमतीचा होम. आज शेकडो वर्षे लक्षा-वधि दैववादी हिंदु या शनिमाहात्म्याच्या पारायणाने शनीच्या साडेसातीला तोंड देण्याचा चंग बांधीत असतात. असा हा ग्रंथ तरी काय आहे, याचे सत्यशोधन करण्यासाठी, पुढील प्रकरणाच्या उंबरठ्यात वाचकानी पाऊल ठेवावे.

प्रकरण २ रे.

विक्रमाच्या साडेसातीची कहाणी (पूर्वार्ध)

शनि आणि साडेसाती या भानगडी काय आहेत, याचा विवेकवादाला धरून विचार करण्यापूर्वी, केवळ महाराष्ट्रात प्रचलित असलेल्या मराठी ओवीबद्ध शनिमाहात्म्याचा संशोधन पूर्वक विचार करू. सुप्रसिद्ध संतचरित्रकार तात्याजी महिपति यानी ' गुर्जर भाषेची कथा ' ' अर्थाविषयी न्यूनता ' न ठेविता, महाराष्ट्र भाषेत ' यथामति वर्णिली तत्वता ' अशी आहे. या माहात्म्य ग्रंथाला कसल्याहि प्राचीन संस्कृत ग्रंथाचा पाया अगर आधार तर नाहीच, पण विशेष आश्चर्याची गोष्ट म्हणजे हीच की गुजराती भाषेत शनिमाहात्म्याचा पत्ता नाही. तात्याजी महिपति आत्मविश्वासाने म्हणतो की " हा ग्रंथ करिता श्रवण । सकळ विघ्ने जाती निरसून । ग्रहपीडा अति दारुण । न बाधे कदा कल्पान्ती ॥ " असल्या या पराक्रमी ओवीबद्ध ग्रंथात उज्जनीच्या विक्रमाची कथा काय वर्णन केलेली आहे, ती थोडक्यात येथे नमूद करतो.

कोणे एके काळी (प्रत्येक कथेची सुरवात याच पालुपदाने करण्याचा संप्रदाय दिसतो.) कोणे एके काळी उज्जनीचा विक्रमराजा* एका सकाळी आपल्या दरबारात बसला होता. पंडीतांची चर्चा चालू असता

---

* विक्रमादित्य ही ' केसर-इ-हिंद ' पदवी प्रमाणे उज्जनीच्या चक्रवर्ति राजांची पदवी असे. चार पाच विक्रमादित्य इतिहासात दिसतात. त्यात शनीच्या तडाक्यात सापडलेला विक्रम कोणता, हा वादग्रस्त प्रश्न आहे. विक्रमशक नावाचा एक शक चालू आहे, पण त्याच्याहि कुळामुळाचा पत्ता लागलेला नाही.

' नवग्रहांत श्रेष्ठ कोण ? ' याचा वाद माजला. प्रत्येक पंडीताने आपापल्या परीने रवि चंद्र मंगळ बुध गुरू शुक्र राहू केतू या आठ ग्रहांचे बरे वाईट पराक्रम वर्णन केले. नवव्या पंडिताने शनीचे पराक्रम येणे प्रमाणे सांगितले:-

ज्यावर तो कोपासि चढे । तयावरी नाना विघ्न ये रोकडे ।
तयाचा संसार बिघडे । न राहे कल्पांतीं ॥
शनिदेव महाक्रोधी । ज्याचा पराजय नोहे युद्धीं ।
देवदानवा त्रिशुद्धी । दुःखदाता शनिदेव ॥
त्याची दृष्टी पडे जयावर । करी तयाचा चक्काचूर ।
अथवा कृपा करी जयावर । तयासि सर्व आनंद प्राप्त होय ॥

शनीच्या या पराक्रमाचा दाखला म्हणून या पंडीताने तीन उदाहरणे दिली. शनि जन्माला आला तेव्हा (१) पित्यावर म्हणजे सूर्यावर नजर पडताच त्याच्या सर्वांगावर कुष्ट भरले; (२) सूर्याचा सारथि अरुण पांगळा झाला; आणि (३) त्याच्या रथाच्या घोड्यांचे डोळे फुटले. पुष्कळ उपाय केले, पण गुण येईना. अखेर शनीनेच जेव्हा मेहेरबानी केली, तेव्हा हे तीनहि प्रकार नष्ट झाले.*

हे शनीचे वर्णन ऐकून विक्रम राजा खदखदा हासून म्हणाला कीं असला कसला हा बापाच्या बोकांडी बसणारा पोरगा ! ज्याने जन्म घेताच एवढा पराक्रम केला, तो पुढे काय दिवे लावणार ! ' झाले. राजाने केलेली ही टवाळी शनीला चटकन कळली आणि तो ताडकन् विमानात बसून त्याच दरबारात आला. शनिदेव आले, शनिदेव आले, म्हणून मोठी घांदल उडाली. राजा विक्रमाने उठून शनीला साष्टांग प्रणिपात घातला, पण शनीने त्याचा धिःकार केला. शनि म्हणजे त्यावेळी भडकलेली प्रायमस स्टव ! त्याने टवाळीबद्दल राजा विक्रमाला सज्जड दम भरला कीं " शहाण्या,

---

* तरीहि सूर्यस्तोत्रांत " असे सारथी पांगुळा ज्या रथासी । नमस्कार त्या सूर्यनारायणासी ॥ " हा सिद्धांत मात्र कायमच आहे.

माझी थट्टा करतोस काय ? थांब. मीच आता तुझ्या कन्याराशीच्या साडे-सातीला * येतो. पहा मग या शनीचा इंगा !" विक्रमराजाने पुष्कळ विनवण्या केल्या, पण शनि ऐके ना. तो साडेसातीची धमकी देऊन, आला तसा तडक घरी परत गेला. विक्रमहि भेदरला. "जे जे पुढे होणार । बुद्धी सुचे तदनुसार । जे असेल लिखिताक्षर । तैसे आता होईल ॥" एवढ्या वेदांताचर तोहि चिंतामग्न अवस्थेत 'पुढे काय होणार' याची मार्गप्रतिक्षा करीत बसला. तुमच्या आमच्या सारख्या साध्यासुध्या माणसाला कुडबुड्या जोशाने वर्तवलेली साडेसातीची पाळी आळ्याचा घाम मळ्याला नेते; आणि ही तर खुद्द शनीने समक्ष येऊन दिलेली खास धमकी ! तेव्हा विक्रमराजाची काय तिरपीट उडाली असेल, याची कल्पनाच करावी.

राजे लोकांवर आपत्तीचा फास पडला कीं त्याना पोखरून खाण्यासाठी मदतनिसांचा, हितचिंतकांचा, सल्लागारांचा, ज्योतिषांचा, मांत्रिकांचा मोठा अफाट घोळका सभोवती जमत असतो. त्यात पहिला नंबर भटा ब्राम्ह-णांचा. साडेसाती वर्तविणारे त्रिकालज्ञ भटच आणि तिचा फेरा परतविणारे तांत्रिक मांत्रिकहि भटच. अगदी प्राचीन काळच्या अयोध्येच्या दशरथ राजापासून तों थेट चालू काळच्या रंगेला रसूल तुकोजीराव होळ-करापर्यंत, कोणाचाही दरबार घ्या, छावणी घ्या, नाहीतर अंतःपुर घ्या, सर्वत्र भटांचा सुळसुळाट. बऱ्याला भट, वाईटालाहि भट. उलट सल्ला भटाचा आणि सुलट डल्लाहि भटाचाच. शनीची साडेसाती जरी साडेसात वर्षांची असते, तरी ही भटांची पावणेआठी हिंदुस्थानातल्या प्रत्येक हिंदु राजाच्या सिंहासनाच्या पिंडाला जी एकदा अतिप्राचीन काळी झोंबली आहे, ती

---

* अनेक विक्रमादित्यांपैकीं कन्यारासवाला विक्रम कोणता, हे जरी इति-हास-संशोधकांनीं हुडकून काढले, तरी साडेसातीवरल्या शनिनिंदक विक्रम-राजाचा पत्ता लागणे शक्य दिसते. का, सारेच विक्रमराजे कन्यारासवाले ?

काही केल्या सुटतां सुटत नाही. हिंदु राज्याचे सिंहासन म्हणजे भटाळलेल्या पावणेआठ प्राण्यांचा वारसा, असे म्हटले तरी चालेल. आपत्तीत सापडलेल्या राजाला ही भटसेना एकदा का उपायावर उपाय सुचवू लागली, कीं प्रत्येकाचा कानमंत्र निराळा. एक म्हणतो असे करावे, दुसरा म्हणतो तसे करावे. शंभरांचे शंभर सल्ले. सर्वांचे सल्ले एकदा का त्या संकटग्रस्त राजावर हल्ले चढवून स्वार्थाचे डल्ले हबकू लागले कीं वैतागून जाऊन तो 'अडला नारायण' अखेर 'गाढवाचे पाय धरतो.' याची उदाहरणे आज आपल्या नजरे समोर प्रत्यक्ष घडत आहेत. ब्राम्हणी भटांच्या किंवा ब्राम्हणेतरी भटांच्या पायांवर कपाळे घासून आपल्या फुटक्या दैवाचे सांधे सांधले न जाता उलट तणावतात आणि त्यांच्या 'पवित्र' मसलतीने आजपर्यंत अनेक शहाणे राजे नरांतले नारायण असताहि अखेर या गाढवांचे पाय धरून प्रत्यक्ष गाढव बनतात, तरीहि भटांची पायचाटी करण्याचा गाढवपणा बऱ्याच पदधारी व पदच्युत हिंदु राजांना अझून सुटत नाही, या भटी पावणेआठीचे माहात्म्य लिहिणारा तात्याजी महिपति कधी अवतरणार कोण जाणे !

विक्रमाँच्या कन्याराशीला शनीच्या साडेसातचे ग्रहण लागणार, म्हणून सर्व भटपंडीत अपायावर उपाय सुचवू लागले. जपजाप्या पलीकडे भटांची अक्कल थोडीच जाणार ! त्यांच्या सर्वस्वाचे मूळ तेथेच. त्यांनी ताबडतोब शनीच्या महापूजेचा आणि जपजाप्याचा एक लोकमान्य तोडगा सुचविला आणि विशेष आग्रहाने सांगितले कीं,

मग जपकर्त्या ब्राम्हणाशी । शनैश्चररूप मानूनि त्यासी ।
दक्षिणा देऊनि पुजोसि । प्रसन्नचि करावे ॥

पण या उपायाने फार झाले तर जपकर्त्या रामभटाची एकट्याची तुंबडी भरेल. सर्व वेदशास्त्रसंपन्नांची पोळी पिकणार नाही. म्हणून

मग करावे ब्राह्मणभोजन । यथाशक्ती द्यावे दान ।
ब्राम्हण तृप्त होतां पूर्ण । संतोष पावे शनिदेव ॥

अशी पुरवणी जोडण्यांत आली. ब्राम्हण पूर्ण तृप्त झाला कीं शनीचा कोप वितळलाच पाहिजे, असे हे खटकेबाज एटक विक्रमापुढे ब्राम्हणांनी मांडले. ' पंडित म्हणती राया समर्था । गोष्टी एवढी ऐकावी. ' पण विक्रमराजा फारसा भटाळलेला नव्हता. तो सध्या जरी दैवाळला होता, तरी देवा-विषयीचा त्याचा विवेक मुळीच लंजूर नव्हता.

राजा म्हणे पंडितांला । शनी न मानीच आम्हाला ।
माता पिता वहिला । रक्षि तोचि पैं जाणा ॥

" अहो ब्राम्हण हो; या तुमच्या जपजाप्याने काय होणार ? शनिदेव मला छळल्याशिवाय सोडणार नाही. तो थोडाच तुम्हा आम्हाला मानणार आहे ? तोच देव, तोच आमची माता्न् पिता, तोच आमची परीक्षा पाहणार आणि रक्षण करणार. तेव्हा मी म्हणतो—

..... । तुम्ही जावे आपुल्या गृहासी ।
जें होणार तें निश्चयेसी । घडूनि येईल न टळेचि ॥ "

राहूची महादशा काय किंवा शनीची साडेसाती काय, प्रवाहपतित यच्चावत् सर्व मानवांना यथाकाळ यथाक्रम भोगण प्राप्तच आहे आणि त्या भोक्तृत्वातच परमेश्वरी लीलेचा महिमा विचारवंतांनी प्रत्यक्ष अनुभवून, या सृष्टीच्या रहस्याचा ठाव काढावयाचा असतो. अशा स्थितीत " देह जावो अथवा राहो । पांडुरंगीं माझा भावो " या भावनेने परमेश्वर माऊलीच्याच पायी मिठी घालणे श्रेयस्कर, या विवेकाने विक्रमाने भटजींच्या जपजाप्याचा धिःकार केला आणि वाटेल तो प्रसंग आला तरी आपण आपल्या सत्वापासून रेसभर सुद्धा पराङ्मुख व्हायचे नाही, या कडव्या पोलादी निश्चयाने त्याने आपली आचार-विचारशक्ति मढवून काढली.

पुढे यथाकाळ विक्रमाच्या कन्याराशीला शनीची साडेसाती सुरू झाली. तिचा स्पर्श होताच चमत्कार घडला ! एके दिवशी दुपारी सौदागराचा

वेष घेऊन शनि विक्रमाच्या राजवाड्यात काही उत्तमोत्तम घोडे विकण्यासाठी घेऊन आला. राजाच्या चावूकस्वाराने प्रथम एक दोन घोडे रिंगणावर पळवून पाहिले आणि ते उत्तम असल्याचे सर्टिफिकीट दिले. शनि–सौदागराने तिसरा एक खास उमदा अवलादी घोडा दाखवून, याची परीक्षा खुद्द हुजूर सरकारने करावी, अशी शिफारस केली. विक्रम त्या घोड्यावर स्वार झाला, त्याला दोन तीन रिंगणे फिरविला आणि ' वाः फार छान घोडा आहे ' म्हणून वाहवा केली. त्यावर सौदागराने म्हटले " सरकार, या घोड्याची परीक्षा नुसत्या रिंगणदौडीने व्हावयाची नाही. आपण त्यावर फेर-फटका–दौड करून पहा, म्हणजे या जनावराचे खरे तेज दिसून येईल. " राजाला ही सूचना पटली. त्याने घोड्याला दोन फटके लगावून दौडीवर धरताच तो जो तडाड वर उडाला तों थेट अंतराळांत वाऱ्यासारखा भरधाव उडत चालला. सर्व कारभारी व तमासगीर घाबरले. अखेर राजा आणि तो उडता घोडा दोघेहि दिसेनासे झाले. सर्व राज्यात हाहाःकार उडाला. सौदागरहि इतरां प्रमाणेच आश्चर्याचे नाटक नटवू लागला. "राजाने माझा घोडा नेला तरी कुठे ? मी किती वेळ वाट पाहणार ? घोडा तरी द्या, नाहीतर पैसे तरी द्या. " असा त्याने वाजवी आग्रह धरला. शेवटी दिवाणाने घोड्याची किंमत सौदागराला देऊन त्याची बोळवण केली.

' सौदागर गेलिया पाठी । मागे काय वर्तली गोष्टी ' ती आता श्रवण करावीः—

दूरदेश अति उजाडी । जेथे घोर वन महा झाडी ।
तेथे नदीच्या पैलथडी । घोडा जाऊनि उतरला ॥
तेथे राव उतरला खाली । तंव नवलपरी वर्तली ।
वारू नाही नदी गुप्त झाली । झाडांझुडां सहित ॥

सारी रात्र थंडया फराळावर त्याच जंगलात विक्रमाने काढून, सकाळ होताच तो अंदाजाने एकाद्या नगराचा शोध करीत चालू लागला. चालता

चालता त्याला एक तामलिंदा नावाची नगरी दिसली. व्यापारी पेठेत प्रवेश केला आणि सहज एका वैश्य व्यापारी सावकाराच्या पेढीजवळ थांबला.

सावकाराचे दुकानीं । विक्री होतसे द्विगुणी ।
त्याणें भला माणुस जाणोनी । आदर केला तयाचा ॥

व्यापाऱ्याने जातगोत विचारली, तेव्हा

राजा म्हणे तया वैश्याशी । आम्ही क्षत्रिय असो पारियेसी ।
आमुचा मुलूख दूरदेशी । क्षण एक येथे उतरलो ॥

व्यापाऱ्याने विक्रम राजाचा सर्व प्रकारे आदर केला आणि मोठी 'अति उत्तम पड्रस' पूर्ण मेजवानी दिली. भोजनोत्तर संभाषणात व्यापाऱ्याच्या आग्रहावरून विक्रम राजाने घडला सारा प्रकार यथातथ्य सत्य सांगितला. त्यावरून त्या वैश्य सावकाराचीहि खात्री पटली कीं प्रस्तुत प्रकारात कांही कल्पनातीत चमत्कार असला, तरी उज्जनीचा विक्रम राजा म्हणतात तो हाच. ज्याची नुसती दुरून भेट होण्याची पंचाईत, तोच आज माझ्या घरी कामधेनू प्रमाणे आपण होऊन चालत आला. वैश्याचा आनंद काय विचारावा ! पण बोलून चालून तो वैश्य, व्यापारी, सावकार, 'तोलमे मख्खी आई तो उसकू भी नही छोडने' वाला. मग हा तर काय, प्रत्यक्ष विक्रमराजा आपल्या घरी चालून आलेला ! काहीतरी अचाट स्वार्थ साधल्या शिवाय तो ही संधी फुकट थोडीच वाया जाऊ देणार ? ही संधी कोणती ?

त्या सावकाराची कन्यका । नाम तिचे अलोलिका ।
तिचा पण हाचि देखा । इच्छिला वर वरावा ॥ *

---

* मोठी आडदांड मुमताजंच म्हणायची ! या २०व्या शतकांत—सुधारणेच्या युगांत—ती जरी कितीहि सुशिक्षित किंवा पदवीधर म्हणून असती, तरी निदान बापाच्या गळ्याचा फास सोडविण्यासाठी, तो दावे बांधून देईल त्याच्या गळ्यात तिला माळ घालणे भागच पडले असते.

परि तिस न मिळे इच्छावर । वैश्य शोध करी निरंतर ।
तंव हा विक्रमराजा राजा परिकर । म्हणे यासि द्यावी कुमारिका॥

लग्नाळू मुलीच्या बापाची दृष्टी अशीच असते. भेटीस येणाऱ्या प्रत्येक तरुणाकडे तो 'कर्तव्य' दृष्टीनेच प्रथम पाहतो आणि साधारणतः 'कर्तव्य नाही' कळेपर्यंत त्याचा उघड गुत पिच्छा पुरवितो. वैश्याने विक्रमाकडे याच 'कर्तव्य।' ची दृष्टी रोखली, आणि आपल्या मुलीला इकूच जाऊन विनविले कीं

..... । बाई उत्तम वर आणिला तुजशी ।
आतां तूं माळी घाली याशी । न करी अनमान ॥
हा स्वरूपें आहे सुंदर । बत्तीस लक्षणी परिकर ।
हा भाग्यवंत जाण वर । यासी वरी कुमारिके ॥

पण ती अलोलिका म्हणजे एक नंबरची ढालगज, इच्छावर शोधणारी. ती आपल्या बापाची व्यापारी पॉलिसी थोडीच चालू देणार !

तेव्हां कुमारी बोले पित्यासी । तुम्ही बहुत वर्णिता यासी ।
परी न भरता मम मानसीं । तंवरी न वरी निर्धारें ॥
आज पाहिन याचें लक्षण । कैसे चातुर्य काय ज्ञान ।
भाषणावरूनि प्रमाण । सर्व कळो येईल ॥

मुलीची इतकी संमति मिळताच, त्या काळच्या रूढी प्रमाणे वैश्याने रंगमहालाची सिद्धता केली. आपण काय करीत आहो, याची मात्र त्याने विक्रमाला दाद लागू दिली नाही. रात्री भोजनोत्तर—

वैश्य म्हणे क्षत्रियासी । जावे निद्रा करावयासी ।
अतिरम्य चित्रशाळेसी । तेथें सर्व विदित होईल ॥

बिचारा विक्रम रंगमहालात गेला. महिपतीने तेथचा वर्णिलेला शृंगारथाट येथे पुन्हा उतरून जागा आडवण्यात अर्थ नाही. विक्रमाच्या जीवनांत कल्पना महिरून जाईल इतक्या वेगाने आणि अचंब्याने अवघ्या ४८ तासांत घडून आलेल्या आणि येणाऱ्या परिस्थितीच्या पालटाने तो सुद्धा अगदी हतबुद्ध

झाला. काल कोठे होतो, रात्री काय झाले आणि आज हा येथे काय प्रकार ? असे हे फटाफट ट्रान्सफर सीन (बदल देखावे) कोण घडवीत आहे !

कर्माच्या गति असती गहना । जें जें होणार तें कदा चुकेना ।
तें तें भोगिल्याविण सुटेना । देवादिकां सर्वांसी ॥
तरी हें शनिदेवाचें छळण । त्याणें ही माया रचिली जाण ।

आता काय व्हायचे असेल ते होवो, बितली खरी. आता आंगचुकारपणा करून काय फायदा ! ते नामर्दाचे काम. असा विवेक करून विक्रमराजा पलंगावर जाऊन, पासोड्याचा बोथाडा मारून, झोपेचे ढोंग करून पडला. अशा परिस्थितीच्या माणसाला झोप ती कशी काय लागणार ! इतक्यात ठरल्या प्रमाणे ती रूपसंपन्न तरुणी अलोलिका रंगमहालात मरगच्च शृंगार करून आली. पाहते तों हे राजेश्री बोथाडा मारून निजलेले. विक्रमाला जागृत करण्याचे सर्व नाजूक शृंगारी प्रयोग तिने केले, पण काही केल्या स्वारी जागीच होई ना ! निद्रिताला कोणीहि जागृत करील, पण झोपेचे ढोंग करून पडणाराला कोण जागे करणार ! अखेर बिचारी थकली आणि खिन्न मनाने गळ्यातील मोत्याचा हार खुंटीवर ठेवून एका बाजूला तोंड फिरवून झोपी गेली. विक्रमाच्या ऐवजी एकादा साधा अविक्रमी तरुण असता तर ही आयती चालून आलेली घरजावईपणाची संधी तो कधीच फुकट दवडता ना. शेकडा शंभर लोक असल्या संधीची सुखस्वप्ने नेहमी पहात असतात. त्याना हे स्वप्न आज प्रत्यक्ष सृष्टीत घडून येत असता, विक्रमा प्रमाणे विवेक साधला असता काय ? मुळीच नाही. पण हा उज्जनीचा विक्रम. तो—

विचार करी मानसी । मी सत्वधीर म्हणावितो ॥
परोपकारी माझें मन । पापास भीतो रात्रंदिन ।
ही तंव कन्या असे जाण । कैसे भाषण करावे ॥

यच्चावत् सर्व प्रजेला पुत्रकन्यावत् मानणारा मी चक्रवर्ति. मीच जर लौकिकी लोकांप्रमाणे अशा विकट प्रसंगी विवेकाला पारखा झालो, मोहाला बळी पडलो, आणि सत्वापासून च्युत झालो, तर मी चक्रवर्ति विक्रम कशाचा ? छे छे ! ही तरुणी हव्या त्या उद्देशाने जरी मज़कडे आली, तरी मी तिला कन्येप्रमाणेच लेखणार. विक्रमी पुरुषानी आपल्या सत्वाला प्राणापेक्षाहि अधिक सांभाळले पाहिजे.

विक्रमाने विवेकाच्या जोरावर कुमारी अलोलिके पुरते आपले सत्व सांभाळले. व्यवहाराची शक्य ती वाजू त्याने राखली. पण ग्रहदशा प्रतिकूल झाली कीं ती इतके काही अचंव्याचे विरोधी प्रकार घडविते का त्याना चमत्कार म्हणावे, का कार्य नाव द्यावे, हेच समजत नाही. कुमारी अलोलिका गाढ निजलेली पाहून विक्रम उठला. झोप लागत नाही तर या रंगमहालातलि चित्रे पाहून तरी रात्र कंठू या, म्हणून एकेक चित्र पाहू लागला. तों काय चमत्कार ! ज्या भिंतीच्या खुंटीवर अलोलिकेने मोत्यांचा हार टांगून ठेवला होता, त्या भिंतीवर एक हंसाचे चित्र रंगविलेले होते. आश्चर्याची गोष्ट कीं हा 'भिंतीचा निर्जीव हंस' सजीव हंसा प्रमाण त्या हाराची मोत्ये मटामट मटकाऊ लागला. अरेच्चा ! एकेक मोती मटकावता मटकवता सगळा हार खलास झाला, तर करायचे काय ? घडत आहे हा चमत्कार अखेर आपल्यावर काहीतरी भयंकर गण्डांतर आणणार खास !

जरा हार घ्यावा काढुनी । तरी विरुद्द जातसे निरसुनी ।
परांसि दुःख न द्यावे म्हणोनि । बिरुद असे माझें हें ॥

आता ब्रीद सांभाळू, व्यवहार पाहू, का या घडघडीत अशक्य परंतु या क्षणाला शक्य होत असलेल्या चमत्काराला थोपवू ? मानवी कल्पनेला थांग लागणार नाही अशा होत्याच्या नव्हत्या आणि नव्हत्याच्या भलत्या चमत्कारीक घटना घडू लागल्या, तर मनुष्य कितीहि शहाणा आणि धोरणी

असला तरी त्याला अखेर मूर्खपणा पदरात घेऊन, येईल त्या प्रसंगाला साधेल तसे तोंड देणेच भाग पडते. असो, जे काय व्हायचे असेल ते होवो, असा विचार करून विक्रमराजा पलंगावर झोपी गेला.

संकाळ होताच अलोलिका खडबडून जागी झाली आणि " म्हणे पित्यानें हा वर आणिला जाण । अति मूर्ख नपूंसक ॥ " तिला मोठा संताप आला आणि वस्त्रे वगैरे सावरून, मोत्यांच्या हारासाठी खुंटीकडे तिने पाहिले, तों हार नाहीसा झालेला !.

हार न देखे कुमारिका । ती म्हणे पांथिका अविवेका ।
हार घेउनी महाठका । निद्रा केली सुखरूप ॥
तरी हार देई माझा झडकरी । तुज पचणार नाही चोरी ।
ऐसिया गोष्टीनें तुझी थोरी । राहणार नाहीं तत्वता ॥
तरी हार दे माझा मजप्रति । मग त्वां जावे आपुल्या पंथी ।
याची चर्चा झालिया निश्चिती । नाश होइल शरीराचा ॥

विक्रमाला काहीच सुचेना. त्याने सांगितले " बाईसाहेब, मला तुमचा हार माहित नाही. मी तो घेऊ कशाला ? घेऊन ठेवू तरी कोठे ? केवळ आज रात्री मी या ठिकाणी झोपलो. एवड्याच कारणाने माझ्यावर या बालंटाचे बादळ उठवायचे असेल, तर खुशाल उठवा. मी कधी खोटे बोलणारा मनुष्य नव्हे. सत्य सांगतों मी तुमचा हार घेतला नाही. " अलोलिका तेथून जी तणतणत फणफणत निघाली ती थट बापापुढे जाऊन उभी राहिली, आणि तावातवाने हात ओवाळून आणि तोंड वेंगाडून म्हणाली 'आहा हाहा हाहा. म्हणे अलोलिके हा घे तुला इच्छावर आणला. हा तर मेला नपूसक नामर्दच्या नामर्द आणि मेला खापऱ्या चोर.

तुम्ही ठक चोर आणिला घरा । तो तस्कर-विद्येमाजी पुरा ।
तेणें चोरिले माझिया हारा । तरी तो मागूनी घेइ जे ॥

अर्थात् वैश्यालाहि मोठा अचंबा वाटला आणि रागहि आला. त्याने विक्रमाची हवी तशी खरडपट्टी काढली, वाटेल ते दोषारोप केले, अखेर नोकरां कडून खांबाला बांधून हवा तसा जीव जाईसा मार दिला. पण विक्रमाचे एक सत्य वचनः—" मी हार घेतला नाही. " एवढा मरे मरे तो मार खाल्ला तरीहि हा हरामखोर चोरी कबूल करीत नाही, तेव्हा हा मोठा बिलंद ठग दिसतो. यावर आता राजाच्या दरबारात खटलाच दिला पाहिजे. वैश्याने चंद्रसेन राजाकडे आपली फिर्याद दाखल केली. तावडतोब पोलीसांनी विक्रमाला चतुर्भुज करून राजापुढे आणले. राजाने विक्रमाला विचारताच त्याने गुन्हा नाकबूल केला आणि काकुळतीने विनंती केली कीः—

.....। ऐक राया चंद्रसेना ।
हार घेतला नाही जाणा । असत्य न बोले कदाहि ॥
हाराचा सांगावा विचार । तरी वृथा म्हणाल तुम्ही सर्व ।
न घडे तोचि विचार । घडला असे समर्था ॥
आम्हासि ग्रह नाही सानुकूळ । नसती उत्पन्न होते कळ ।
त्याची काय करून हळहळ । होणार तें होतसे ॥

परंतु केवळ कायदेबाजी पलीकडे नजर न फेकणाऱ्या आणि पाच न् पाच दहा एवढीच व्यवहारी अक्कल असणाऱ्या कोणा शहाण्याचा या विधानांवर विश्वास बसणार ? ' मला ग्रह अनुकूळ नाहीत, राहूची महादशा किंवा शनीची साडेसाती सुरू आहे, म्हणून माझ्यावर चोरीचा, पैसे खाल्ल्याचा किंवा खुनाचा आरोप आला आहे ' असल्या बचावाच्या पुराव्यावर कोणता शहाणा जज्ज आरोपीला दोषमुक्त करील ? हा आरोप, हा पुरावा, आणि ही शिक्षा, या पेक्षा चवथी दृष्टीच जगाच्या व्यवहारात नाही. म्हणून विक्रमाने अखेरची विनंती राजाला केली.

यें चोरी न करावी परंतु केली । परि आतां पाहिजे क्षमा केली ।
सर्व अपराध पोटीं घाली । कृपा करी महाराजा ॥

याने तर आगीतच तेल ओतले. गुन्हा कबूल करून उलट बेशरमपणाने क्षमा मागतो, भुरटा चोर ! पुन्हा मुद्दामाल देत नाही तो नाहीच. राजाचा क्रोध अनावर झाला.

सेवकासी म्हणे उठा सत्वर । तोंडा यांचे चरण कर ।
टाकून द्या नगरा वाहेर । अन्न उदक न द्यावे ॥

शिक्षेचा उच्चार होण्याचीच थाथड, लागलीच विक्रमाला नगराबाहेर नेऊन, तेथे त्याचे हातपाय तोडण्यात आले आणि त्याला लांब एका उकीरड्यावर अन्नपाण्याशिवाय तडफडत फेकून देऊन, पोलीस आणि तमासगीर घरोघर परत गेले. साध्या चोरीच्या आरोपावरून इतकी भयंकर शिक्षा ठोठावणाऱ्या दयाळू व न्यायी चंद्रसेन राजाने पोलीसाना " तो मेला किंवा वाचला । त्याचा प्राण कोठे उरला " इतके विचारण्यास मात्र कमी केले नाही.

मग सेवक म्हणती महाराज । सत्वरची प्राण जाईल सहज ।
करचरणांवीण आतमराज । कैसे सुख पावेल ॥

उज्जनीचा विक्रम चक्रवर्ति राजा, केवळ अवघ्या ४८ तासाच्या अवधीत, एका कोठच्या तरी मांडलीक राजाच्या शिक्षेने, हातपाय तुटून, कोठच्या तरी गावाच्या सीमेबाहेर उकीरड्यावर, अन्नपाण्याशिवाय तळमळत तडफडत पडावा, या चमत्काराला दुर्दैव म्हणा किंवा ग्रहदशेचा फेरा म्हणा, पण तो अत्यंत कल्पनातीत आणि हृदयाला आचंब्याने पिळणारा आणि दुःखाने गिळणारा नाही, असे म्हणणारा माणूस माणूसच नव्हे. आजहि शनिमाहात्म्य वाचणारे लक्षावधि भाविक लोक विक्रमाची ही साडेसातीची कहाणी वाचताना डोळ्यांतून आसवांचा धबधबा पाडीत असतात. आश्चर्याची गोष्ट एवढीच कीं कोणीहि या कहाणीतले सत्य शोधण्याचा प्रयत्न करीत नाहीत. भाविक लोक लिहिला

मजकूर अक्षरशः खरा मानतात. ज्ञान आणि अज्ञान याच्या मध्यावर कोठेतरी असलेले, परंतु शिक्षित (एज्यूकेटेड) म्हणून मिरविणारे माध्यमिक लोक काही गोष्टी खऱ्या व काही गोष्टी खोटया मानतात; आणि विशेष ज्ञान्यांकडे पहावे तों ते या दोनहि प्रकारच्या लोकांना मूर्खात ढकलून आपल्या विद्वत्तेच्या हिमालयात थंडगार बसतात; किंवा स्वतःचा अक्कलकाढा ' विशेष रामबाण ' ठरविण्यासाठी, जसा वारा वाहील तशी खंडन मंडनाची पाठ फिरवितात.



प्रकरण ४ थे.

शनिमाहात्म्याकडे पाहण्याची दृष्टी.

शनिमाहात्म्य म्हणजे एक काव्य. त्यांतील तत्वांवर कवीच्या कल्पनेचे चढलेले वारूळ नीट बाजूला काढल्याशिवाय त्यात वसलेला तत्वरहस्याचा वाल्मिक मुनि दिसायचा नाही. विक्रमाच्या साडेसातीची कथा म्हणजे एका जिवंत खऱ्या खुऱ्या राजाच्या हाल आपेष्टांची कहाणी मानली, तर त्यातल्या अनेक अशक्य गोष्टींचे समर्थन कोणालाहि साधणे शक्य नाही; साधले किंवा तसा कोणी प्रयत्नच केला तर तो विवेकाला पटणार नाही. अर्थात हे काव्य कोणत्या तत्वरहस्याचे प्रतिपादन करण्यासाठी कवीने लिहिले, याची बिनचुक दृष्टी आपण ठेवली, तर त्यातील अशक्य गोष्टींतील कल्पनेचेहि वास्तवीक स्वरूप आपणास पटत जाईल. आता विक्रमाच्या दरबाराचीच गोष्ट घ्या. तेथे त्याने शनीची कुचाळी केली नसती, तर शनीची साडेसाती आलीच नसती काय ? गणती अंदाजाने विक्रमाच्या कन्याराशीला शनीची पीडा जर होणारच होती, तर त्यासाठी दरबार कशाला, पंडित कशाला, शनीची कुचाळी कशाला, दरबारात प्रत्यक्ष शनि आला कशाला आणि स्वतः धमकी देऊन गेला कशाला ? कशाला पाहिजे होता हा सारा उपव्याप ? पण कवीचे काव्य त्याशिवाय रंगले नसते. कथेच्या मंगलाचरणाला या दरबारातल्या भानगडीची जरूरच होती. प्रत्येक पुराणग्रंथाची सुरुवात ' नैमिष्यारण्यात सूताने शौनकादिकांना प्रश्न ' विचारल्यावरच केलेली आढळेल. शनिमाहात्म्याच्या बाबतीत मात्र कवि तात्याजी महिपति या सूतशौनकांच्या भानगडीत न पडता, एकदम उज्जनीच्या विक्रम राजाच्या दरबारात घुसला आणि पांडितांच्या वादविवादाने आपल्या काव्यग्रंथाची सुरुवात करता झाला. कोठची तरी राजधानी आणि कोणीतरी राजा घेतल्या शिवाय कथा किंवा कहाणी रंगत नाही. लहान लहान

मुलांच्या गोष्टीसुद्धा ' एक होता राजा ' याच शब्दानी सुरू होतात. त्या प्रमाणे तात्याजी महिपतीने आपल्या कथेसाठी उज्जनीचा **विक्रम**राजा शोधून काढला, यात नवल नाही. नवल नसले, तरी त्यात त्याची शब्द-योजना आणि काव्यचातुर्य अत्यंत वाखाणण्यासारखे, विचार करण्यासारखे आणि विवेकी चिकित्सेलाहि झुलविण्या सारखे दिसून येते.

शनीच्या साडेसातीचा महापराक्रम रंगविण्यासाठी कवीने ' विक्रम ' शब्द फार कुशलतेने योजलेला आहे. या एका शब्दाच्या अर्थावरच त्याने आपल्या काव्याची मनोरंजक इमारत उभारली आहे. हा अर्थ एकदा स्पष्ट उमगला कीं शनिमाहात्म्याचा आत्मा हाती लागला, असे समजावे. **विक्रम** शब्दा-तील अर्थाची खुबी नीट न ओळखता जे कोणी या शनिमाहात्म्याच्या पारायणाने साडेसातीच्या तडाख्यातून निसटण्याची आशा धरतात, त्याना पाठीवर साखरेची गोणी वाहणाऱ्या म्हशीच्या प्राणनाथाचीच उपमा देणे रास्त होईल. शनीची साडेसाती हा शुद्ध गणिती कदरीचा रोखठोक फेरा आहे आणि त्याच्या तडाक्यातून भणंग भिकाऱ्यापासून तों नवकोट नारा यणापर्यंत जर कोणीहि सुटत नाही, तर तात्याजी महिपतीने एकाद्या चंदरसेन इंदरसेन राजाच्या ऐवजी **विक्रम** राजाच कां पसंत केला ? अशी या **विक्रम** शब्दात काय जादु भरलेली आहे ? या जादूचा उलगडा झाला कीं साऱ्या शनिमाहात्म्याचेच कोडे उलगडले !

विक्रम म्हणजे महत्वाकांक्षी मनुष्याचा पराक्रम.

उज्जनीचा विक्रम म्हणजे उच्च जनीचा, लोकसमुदायावर विशेषत्वाने परि-णाम करणारा, महत्वाकांक्षी, पुरुषार्थप्रिय अशा मनुष्याचा पराक्रम. शनीच्या साडेसातीचा ज्वालामुखी पुरुषार्थी आणि पराक्रमी पुरुषावरच विशेष फुट-ताना दिसतो; कारण त्या पुरुषाच्या सुखदुःखांवर अनेक लोकांचे सुख दु.ख बरेच अवलंबून असते. त्यांच्या जीवनक्रांतीने बहुजन समाजाच्या आचार

विचारांत क्रांति घडावयाची असते. एखाद्या भणंग भिकाऱ्याला साडेसाती आली तर त्याला पोटापुरती भीक न मिळता त्याची उपासमार होईल. एखाद्या धोंडोपंताची बायको मरेल, कोंडोपंताची नोकरी जाईल, किंवा तिंबुनानावर पैशाच्या अफरातफरीचा खटला चालू होईल. एखादा कोट्याधीश पारशी सट्टयांत लाखी चट्टा खाईल अथवा लक्षाधीश मारवाड्याच्या पेढीवर दरोडा पडून, जन्माच्या तीन शेंड्या पलीकडे कपर्दीहि त्याच्या हाती उरणार नाही. पण यात **विक्रम** मात्र कोठेहि आढळणार नाही. या असल्या साडेसात्या कितीक येतात आणि कितीक जातात. जगाला त्याची दाद नसते आणि दाद घेण्याची जरूर नसते. फार काय, पण कित्येक माणसे सुद्धा येरे दिवसा भरेरे पोटा अशा मुर्दाड अवस्थेत जिवन कंठीत असतात कीं साडेसाती आली काय आणि गेली काय याची ते दखलहि करीत नाहीत.

साडेसाती फक्त विक्रमाचीच.

पराक्रम असेल तेथेच साडेसातीचा धुमाकूळ मोठा. पुरुषार्थाच्या प्रगतीलाच साडेसातीची डुक्करमुसंडी विशेष लागायची. लोकमान्य टिळक कोट्यधीश नव्हते. पण ते पट्टीचे पुरुषार्थी होते. कट्टे कर्मयोगी होते. राष्ट्राच्या भवितव्यासाठी प्राणाची किंमत कवडी मानणारे विक्रमी होते. स्वतःच्या चिमुकल्या संसाराच्या टीचभर स्वयंपाक घरापेक्षा बहुजन समाजाच्या कोट्यावधि पोटांच्या बंडासाठी बंड उभारणारे पराक्रमी बंडखोर होते. त्यांच्यावर शनीच्या साडेसातीचा ज्वालामुखी फुटला, तेव्हा सारे जग हादरले ! कारण, त्यांच्यापाशी **विक्रम** होता. महात्मा गांधींची हीच स्थिति. शनीची वक्रदृष्टी फिरताच त्याने महात्माजीला इतक्या उंच नेले कीं अखिल भरतखंडाचे एकमेवाद्वितीय एकमुखी राष्ट्रसूत्रधार ! गांधी बोले आणि हिंदुस्थान हाले ! अशी स्थिति. महात्माजीला शनीने इतक्या उच्च शिखरावर कां नेले ? तर गांधींचा विक्रमच एवढा जबरदस्त कीं त्याची कसोटी पाहण्या-

साठी शनीला शक्य तेवढ्या उंचीवर त्याना नेऊन, मग थाडकन् खाली आदळावे लागले. गांधींचा अधःपात म्हणजे साऱ्या जगात धरणीकंपाचा हादरा ! जो तो या अकल्प्य घटनेचा साधेल तसा आजहि विचार करीत आहे. कालचे गांधींचे माहात्म्य काय आणि आजचे काय ! कशास काही मेळ ? होत्याचे नव्हते झाले. मित्र शत्रू बनले. अनुयायी बियरले. सत्त्वाला शिव्या देऊ लागले. चळवळ मेली. काही लिहिले बोलले तर त्याचाहि विपर्यास होऊ लागला. प्रकृति ढासळली. आता व्हायचे काय राहिले ? साडे-सातींच्या खराटा दाबून फिरला. जितका गांधींचा विक्रम थोर, तितकी कठोर शनिग्रहाची दृष्टी ! अशी अनेक उदाहरणे देता येतील. तात्पर्य, **विक्रम म्हणजे पुरुषार्थी पराक्रम**, ही एकच कल्पना समोर ठेऊन, तात्याजी महिपतीने शनिमाहात्म्याची उभारणी केली, इतके ध्यानात ठेऊन सर्व पोथी वाचली, म्हणजे त्यातील निरनिराळ्या प्रसंगांचे मर्म कळू लागते.

विक्रम राजाने [१] शनीची कुचेष्टा केली आणि [२] पांडितांनी जपजाप्याच्या सुचविलेल्या उपायांचा धिःकार केला, या दोन मुद्यांचे आता स्पष्टीकरण करू.

विक्रमशाली पुरुष आपल्या उच्च ध्येयालाच परमेश्वर मानून त्याची अव्यभिचारी एकनिष्ठेनें सेवा करतात. त्याच्या सिद्धींपुढे ते जगात कशा-चीहि पर्वा करीत नाहीत. त्या सिद्धीच्या प्राप्तीसाठी अंतर्बाह्य प्रयत्नांची त्यांची घडपड अखंड चालू असते. बरे वाईट, शुभ अशुभ आणि यश अपयश यांचा ते वाजवीपेक्षा फाजील विचार करीत नाहीत. आत्मसंयम-नाच्या जोरावर त्यानी आत्मविश्वासाची एवढी भरभक्कम कमावणि केलेली असते कीं ध्येयाच्या प्राप्तीपुढे त्यानी आपल्या प्रत्यक्ष प्राणावरहि तुळशीपत्र ठेवलेले असते. मात्र एक मुद्दा वाचकांनी विशेष लक्षात घेणे अगत्याचे आहे कीं विक्रमी पुरुषाचे ध्येयक्षेत्र विशाळ आणि अफाट असते. एकाद्या संसा-

ऱ्याच्या टीचभर संसाराइतके नसते. संसाऱ्याची धडपड स्वार्थासाठी, तर विक्रमशीलाची तळमळ परमार्थासाठी. Greatest happiness of the greatest number–पुष्कळांचे पुष्कळ सुख त्याला साधावयाचे असते. त्यासाठी वाटेल ती दुःखे आणि हवी ती संकटे सोसण्याची विक्रमी पुरुषांची। जेथे मूळची तयारी, तेथे गुरूचा अस्त झाला, हर्शल व्ययस्थानांत पडला, शनी गुरगुरू लागला आणि चंद्र वक्री झाला, तर त्याची त्याना काय पर्वा ? ग्रहगतीच्या परिणामांविषयी विक्रमी पुरूष अज्ञानी असतात, असा प्रश्न नव्हे. ते महाज्ञानी, धोरणी आणि त्रिकालज्ञ असतात. त्याना सर्व कळते. पण ते स्वयंनिर्णयी तडफीचे स्वावलंबनी व विशेषतः स्वार्थत्यागी असल्यामुळे, इतर आडुमाडू प्रवाहपतित संसाऱ्या प्रमाणे व्यवहाराच्या किंवा ग्रहगतीच्या ओघावरोबर ओंडक्याप्रमाणे वहात जाण्याचे साफ नाकारतात. प्रवाह किती का जोराचा असो वा वेगाचा असो, उलटा असो वा सुलटा असो, तो त्याना दिसो वा न दिसो, केवळ ध्येयाच्या सिद्धीची एक ठरावीक दिशा साधण्यासाठी ते त्या प्रतिकूल प्रवाहाला सुद्धा, सत्याग्रही पद्धतीने टक्कर मारायला कमी करीत नाही. पुष्कळांच्या पुष्कळ सुखासाठी जे विक्रमी वीर नानाविध दुःखांच्या आघातानी आपली मनोभूमिका पोलादा इतकी टणक बनवितात; राष्ट्रोद्धारातच आपला आत्मोद्धार शोधण्यासाठी जे आपल्या प्रामाणिक प्रयत्नांचा पिच्छा पुरवितात; आणि स्वतःला अग्निबात विसरून जगाच्या कल्याणासाठी स्वतःचा जीव हव्या त्या संकटांच्या आगीच्या खाईत झुगारण्यास केव्हाहि सिद्ध असतात; त्यांना राहूच्या महादशेचा किंवा शनीच्या साडेसातीचा फेरा कितीसा भेदरवणार ! ' सबसे जी प्यारा. ' प्रत्येक प्राणीमात्राला आपला प्राण प्यारा. त्या प्राणाचीच ज्या विक्रमाला तमा नाही, त्याने शनीच्या साडेसातीच्या धमकीला कवडीचीहि किंमत दिली नाही, हे रास्तच झाले.

टिळक आणि गांधी यांची उदाहरणे घ्या. टिळक तर ज्योतिषशास्त्रात अग्रणी. त्याना काय या राहू शनीच्या आणि केतू मंगळाच्या दशा महादशा समजत नव्हत्या ? परंतु भरतखंडाला गिळून बसलेल्या ब्रिटीश सत्तारूपी जिवंत शनीला ज्यानी उघड उघड प्रतिकाराचे आव्हान देऊन, त्याच्य कायद्याची, कैदेची किंवा काळ्या पाण्याची दिक्कत न बाळगिता, त्याच्य साडेसातीच्या जिवंत डावपेचांना, प्राणावर उदार होऊन, प्रत्यक्ष विरोधाच्या हजारो टकरा दिल्या, तो ज्योतिषज्ञ परंतु विक्रमी टिळक आकाशातील ग्रहांना पायांतील जोड्यां प्रमाणे वागवीत गेला, यात काही आश्चर्य नाही. आकाशातिल शनि पत्करला. त्याचा फेरा ३० वर्षांनी तरी येतो आणि केवळ साडेसात वर्षे छळून जातो. पण ब्रिटीश सत्तेच्या शनीची साडेसाती आज शंभर वर्षांवर जी हिंदुस्थानच्या पावणेआठीच्या (Emasculation) खपाटी बसली आहे, ती उठता उठत नाही आणि सुटता सुटत नाही. टिळकांनी या शनीला त्याच्याच पाचपेचांनी विरोध करून, त्याची दशा त्याच्याच माथी थापली; पण गांधी तर टिळकांच्याहि पुढे गेले ! 'या 'सैतानी' शनीच्या भारतीय अस्तित्वाला मुळांसकट उखडून टाकणे, हेच माझ्या जीवनाचे ध्येय आहे, ' असा त्यानी छातिठोक जाहीरनामा फडकवून, आपल्या असहकारी चळवळीच्या बातेरी माऱ्याने त्याच्या पाऊण अधिक तेजाला कायमचे ग्रहण लावले. जो विक्रमी गांधी शस्त्रास्त्रसंपन्न ब्रिटीश सत्तेला ' निकल जाव बहार ' अशी धमकी देताना, प्राणाची व सर्वस्वनाशाचीहि दिक्कत बाळगीत नाही, तो आकाशस्थ राहू शनीची काय म्हणून पर्वा ठेवील ? राजद्रोहाच्या कायद्याच्या चापात आपली मान हवी तेव्हा अचानक फासावर सुद्धा लटकली जाईल, याचीहि ज्या गांधीच्या विक्रमाला पर्वा नाही, तो कुंडलीतल्या शनीच्या छळणाची किंमत काय करणार ? अर्थातू शनिमाहात्म्यातील विक्रम राजाने शनीच्या पराक्रमाची केलेली टवाळी अगदी रास्त होती, यात संशय नाही.

विक्रमाने ब्राम्हणांच्या जनजाप्यादि उपायांचा कां धिःकार केला ? मी म्हणतो कां करू नये ! येथे ब्राम्हण शब्दाचा अर्थ ' व्यवहारकुशल ज्ञानी ' असाच घेतला पाहिजे. विक्रमी पुरुषांच्या ध्येयसाधनांचे स्वरूप, ते साधण्यासाठी त्यानी निश्चित ठरविलेले मार्ग, आणि त्यांच्या हृदयात अखंड भडकलेली कार्याची तळमळ, याची पुष्कळ शहाण्या व्यवहारपटूंना असावी तशी कल्पना असत नाही; मग आजूबाजूच्या तमासगिरांची आणि अंध अनुयायांची गोष्टच काढायला नको. प्रत्येकजण स्वतःला शहाणा समजून, विक्रमी पुरुषाच्या आचार विचार उच्चारांवर आपल्या अकले प्रमाणे अभिप्राय देत असतो. पण अखेर पर्यंत कोणालाहि विक्रमाच्या खऱ्या स्वरूपाचा थांग लागत नाहीं. थांग लागला तर तो उज्जनीचा, उच्च जनीचा, लोकोत्तर विक्रम कसला ? लोकोत्तर पराक्रमी पुरुषोत्तमांच्या चरित्राचे निरनिराळे टीकाकार निरनिराळ्या दृष्टीकोनाने जे वाभाडे काढतात आणि गणपतीचा मारुती बनवितात, याचे कारण तरी हेच. पुरुष कितीहि लोकोत्तर विक्रमी असला तरी लोकसमुदायाचाच तो एक घटक असल्यामुळे, तो लौकिकी व्यवहारातच राहतो. त्यामुळे बऱ्या वाईट प्रसंगी त्याच्या भोवती हितचिंतकांचा आणि उपदेशकांचा नेहमी गराडा पडलेला असतो. विशेषतः, कार्यात प्रत्यक्ष भाग घेऊन चामडी सोलवटून घेणारांपेक्षा नुसत्या उपदेशाच्या टकळीने जीभ झिजविणारांची संख्या मानव समाजात नेहमीच फार मोठी असते. उपदेशकांचा उपदेश किंवा हितचिंतकांची मसलत ऐकून घ्यायला विक्रमी पुरुष नाखूष नसतात. उलट त्यामुळे त्यांची पुष्कळ वेळा करमणूकहि होते. परंतु त्यांच्या आचार विचारांची भरारी व धमक इतक्या उंचवर गेलेली असते, कीं त्या मानाने लौकिकी उपदेशकांचे उपदेश ताडाच्या कानांत तुळशीने कानगोष्ट सांगण्या इतके बुटबैंगण आणि खुळचट ठरतात. विक्रमाला करावयाचा उपदेश आणि द्यावयाचा सल्ला तितक्याच विक्रमी दर्जाच

असावा लागतो. पण येथे पहावे तों पंडित ज्ञानी म्हणविणारांच्या अकलेची मजल तंत्रमंत्रादि जपजाप्या पलीकडे जाईच ना. तेव्हा विक्रमाने त्यांचा हसत हसतच धिःकार करण्यापेक्षा अधिक काय करावे ? ' करंटे मिळाले सर्वहि । जो तो बुद्धीच सांगतो ' अशा प्रसंगी विक्रमी पुरूष सर्वांची वटवट ऐकून घेऊन, आपल्या आत्मविश्वासाच्या जोरावर, आत्माचिंतनातून निघालेल्या निर्णयावरहुकूम कार्यक्षेत्रात निर्वाणीचा घाव घालीत असतो. चामडी बचावून व्यवहारकुशलतेने साधेल ते कार्य करू पाहाणारे प्राणी निराळे, आणि प्राणाची पर्वा न ठेवता पुष्कळांचे पुष्कळ सुख साधणारे लोकोत्तर विक्रमी पुरूष निराळे. त्यांच्या विक्रमी मनोवृत्तीची घडाडी, त्यांच्या वंशा गेल्याशिवायच आकलन केल्याची शेखी मिरवून, त्याना उपदेश करणाऱ्या शहाण्याना श्रीसमर्थ रामदासानी ' करंटे ' ही पदवी बहाल केली आहे.

विक्रमाच्या कहाणींतील तत्वाचे सत्यशोधन करण्यासाठी, शनिमाहात्म्या-वर कवीने पांघरलेला कवित्वाचा पासोडा तर आपल्याला साफ दूर केलाच पाहिजे; पण त्याच वेळी मानवी संसार आणि व्यवहार यांत नित्य घड-णाऱ्या गोष्टीहि चाणाक्षपणाने विचारात घेतल्या पाहिजेत. सामान्य दर्जाचे आणि विचाराचे लोक—आणि असे लोक शेकडा ९८ असतात ! — रोजच्या दिनचर्येंत घडणाऱ्या गोष्टींचा ' कां ? कसे ? ' या दृष्टीने विचार करून, त्यांच्या कार्यकारणांचा परस्पर–संबंध शोधण्याची मुळीच खटपट करीत नाहीत. असल्या लोकांना विक्रमाची कहाणी म्हणजे केवळ अद्भुत चमत्कार, देवाची करणी किंवा सब झूट यांपैकी काहीतरी एक असावी, असे वाटणे अगदी शक्य आहे. जे विचारी जन आहेत— आणि असा माणूस हजारात एकादाच !—ते आपल्या चरित्रातील हकीक-तींचा कार्यकारणभाव चौकस बुद्धीने नित्य संशोधन करून, त्यात मिळा-

लेल्या अनुभवांचा संशोधनप्रकाश कर्तव्याच्या पुढील क्षेत्रावर पाडून, पुरुषार्थाची शिकस्त करीत असतात. आपल्या रोजच्या दिनचर्येंत घडणाऱ्या लहान मोठ्या, बऱ्यावाईट, सोप्या कठीण, उघड गुप्त आणि साहजिक चमत्कारीक, सर्व हकीकतींच्या उत्पत्ति–स्थिति–लयाची चिकित्सा करूनच माणसाच्या अनुभवाचा खजिना श्रीमंत बनत असतो. अनुभवी आणि बिन अनुभवी माणसाची कसोटी याच चिकित्सेवर अवलंबून असते. 'असे कां झाले ? कां व्हावे ?' अशा चिकित्सेने आपल्या क्रांतिमय चारित्र्याचे शोधन करणाऱ्या विचारवंताला विक्रमाच्या कहाणींत 'अशक्य' असे फारसे काही आढळणार नाहीं.



प्रकरण ५ वे.

आकाशस्थ ग्रह माणसांची सोंगे घेतात काय ?

आकाशस्थ ग्रहताऱ्यांचा परिणाम माणसांवर होतो, ही कल्पना खरी धरून चालले, तरी एकाद्या विक्रम राजासाठी किंवा गुंडोपंतासाठी, शनीचा तारा माणसाचे रूप घेऊन पृथ्वीवर येऊ शकतो, ही कल्पना कोणालाहि पटणार नाही. शनि मंगळ बुध इत्यादि मुख्य नऊ ग्रह आणि इतर तारे पृथ्वी प्रमाणेच अंतराळात सूर्याभोवती ठराविक गतीने परिभ्रमण करणारे तारे आहेत. एकमेकांवरील जीवांच्या बोकांडी बसण्यासाठी, हे तारे किंवा ग्रह माणसांची रूपे घेतात, असे मानण्याला कसलाहि आधार नाही. ही कल्पनाच मुळात खुळचट दिसते, आणि तशी ती आहेहि. शनि जर माणसाचे रूप घेऊन पृथ्वीवरील विक्रमाच्या किंवा गुंडोपंताच्या घरी बिनचूक पत्त्यावर अचूक येऊन भेटतो, तर आमची पृथ्वी सुद्धा असेच काही तरी बाई बुवाचे रूप घेऊन, इतर नऊ ग्रहांवरील रहिवाशांच्या बोकांडी बसायला कशावरून जात नसेल ? शनीची **साडेसाती** जर पृथ्वीवरील लोकांच्या मानगुटीला बसते, तर आमच्या पृथ्वीची **पावणेआठी** शनिग्रहावरील रहिवाश्यांच्या खपाटीला कशावरून बसत नसेल ? अ ला जर ब चे आकर्षण बरे वाईट भोवते, तर ब चे आकर्षण अला बाधलेच पाहिजे. हा निसर्गाचा शास्त्रसिद्ध सिद्धांतच आहे. सर्व ग्रह नक्षत्रादि ताऱ्यांचे विश्वचक्र सूर्याभोवती परस्पराकर्षणाच्या तत्वावरच अखंड परिभ्रमण करीत असते. तेव्हा एकमेकांच्या आकर्षणांच्या दशा एकमेकांवर आदळल्या, किंवा आदळत असल्या, तर त्यात काही चमत्कार नाही. पण, पृथ्वीवरील एकाद्या व्यक्तीची हाडे साडेसातीच्या घणाने चेचण्यासाठी, किंवा महादशेच्या तापल्या तव्यावर त्या व्यक्तीचे थालीपीठ भाजण्यासाठी शनि राहू मंगळ कंपनीचे

सर्व सन्मान्य भागीदार माणसांची रूपे घेऊन येतात, ही कल्पना कवीच्या कवित्वाला शोभली, तरी त्यातहि काही विचार करण्यासारखे रहस्य किंवा तत्व नाही, असे मात्र मुळीच नाही.

शिवाय, आपण असाहि विचार केला पाहिजे कीं एकंदर जगाच्या किंवा एकच राष्ट्रातल्या लोकसंख्येमध्ये एकादी व्यक्ती म्हणजे दर्यामे खस-खस सुद्धा ठरणार नाही. मग, या अनंत विश्वाच्या विस्तारात मनुष्याला कीटकाची तरी किंमत किंवा महति असू शकेल काय ? मनुष्य स्वतःला केवढेहि महत्व देत असला, तरी एकंदर विश्वरचनेत त्याच्या वाट्याला फुटक्या कवडीचीहि किंमत येणार नाहीं. King is but a man, and man is but a worm. (राजा राजा म्हणजे तरी कोण ? केवळ एक माणूस, आणि माणूस म्हणजे एक क्षुद्र किडा.) अशी शेक्सपियरची एक उक्ती आहे. अशा मानवी किड्यानी अंतराळात कोट्यवधि मैलांवर परि-भ्रमण करणाऱ्या ' शनीची माझ्यावर वक्रदृष्टी आहे, राहू माझ्या घनस्थाना-वर पाहात आहे, किंवा मंगळ चंद्री सुंद्रीच्या लग्नस्थानी बसला आहे ' अशी भाषा बोलणें आणि तसल्या कल्पनेत मग्न राहाणे, ही कदाचित माणसांची माणुसकी ठरत असली, तरी कीटकवत् मनुष्याने शनि मंग-ळाची नजर आकर्षण करण्या इतके आपले महत्व तोंडच्या वाफाऱ्याने वाढवून घेणे, हा मनाचा व बुद्धीचा क्षुद्रपणा होय. बरे, पृथ्वीवरील लोकां-कडे पाहिले, तरी त्यांतहि अनेक भेद असल्यामुळे, तेहि एकमेकांची पर्वा करीत नाहीत. राष्ट्राची गोष्ट सोडा, एकादा लहानसा समाज अगर जात घ्या, फार काय पण एकादे कुंटुब घ्या, त्यांतील व्यक्तीसुद्धा फारशी एकमेकांची पर्वा करीत नाहीत. हिंदुस्थानात तर हा देखावा घरोघर पाहावयास मिळतो. मुंबई सारख्या बकाल वस्तीच्या शहरांतील चाळींची खुराडी पहा. दहा खोल्यांची एकच चाळ, पण त्यांतील दहा कुटुंबांची

तोंडे वरि दिशांकडे ! कोणाला कोणाची पर्वा नाही. प्रत्येकाचे गृह निराळे, ग्रह (एकमेकाविषयींच्या समजुती) निराळे, आणि व्यवसायहि निराळे. कोणी कोणाकडे ढुंकूनहि पहात नाही. असल्या माणूसघाण्या माणसांची घाण तेवढी शनि राहूला यावी आणि त्यांनी या फटकळांची बिनचूक अटकळ बांधून ठराविक घटकेला त्यांच्यावर सरळ किंवा वाकडी दृष्टी फेकावी, ही किती मूर्खपणाची कल्पना ! बापाने लेकाला लाथ मारावी, लेकाने बापावर परत आहेराची मात करावी, भावाने भावावर घाव घालावा आणि नव-ऱ्याच्या महादशेला कंटाळून बायकोने तळी विहिरीचा ठाव घ्यावा, हीच ज्या लोकांच्या संसाराची आणि व्यवहाराची तऱ्हा, त्या लोकांच्या साठी राहू शनींनी माणसांची रूपे घेऊन, त्यांच्या बिऱ्हाडांचा पत्ता काढीत काढीत पोष्टमनाप्रमाणे सादर हजर व्हावे, हा कसला पाणचट कोशिंबिरीचा आंधळा खेळ ? ज्याना गावात कोणी पुशीत नाही, आणि आळी चाळीत कोणी विचारीत नाहीं, त्यांची दखल दूरवर अंतराळातल्या राहू शनीने घ्यावी, यात शहाणपणाचा आणि मोठेपणाचा वाटा त्या लोकांकडे जातो का शनि राहूकडे जातो, हे कोणी आणि कसे ठरवावे ?

आजच्या गुलाम हिंदुस्थानात हिंदु आणि मुसलमान असे दोन मोठे प्रमुख समाज आहेत. ज्योतिषशास्त्र आणि तज्जन्य दैववाद हा तर हिंदूंच्या पाचवीलाच पूजलेला. पण महम्मद पैगंबराने ज्योतिषशास्त्र क्षुद्र ठरवून, ज्योतिष्यावर विश्वास न ठेवण्याबद्दल एकजात सर्व मुसलमानाना कडकडीत शासन सांगितले असूनहि, हिंदु ज्योतिष्याच्या जोडीनेच इस्लाम रमलवाला सर्वत्र बेफाम बोकाळलेला दिसतोच. या दोघाहि कुडबुड्या दैवपरीक्षकांनी मनाशी असा विचार केला पाहिजे कीं ज्या हिंदी माणसाला हिंदुस्थाना बाहेरच्या जगात गुलामाइतकाहि मान न देता कोणी त्यांची दाद घेत नाही, त्याच गुलामांकडे आकाशस्थ शनि राहू गुरूना भल्या बुऱ्या दृष्टीची फेक

बिनचुक करण्याची एवढी काय जरूर पडली आहे ? हा सर्व प्रकार ' राजा माझ्याशी बोलला ' या गोष्टीतकाच पोरकट होय, यांत मुळीच शंका नाही.

मग विक्रमाकडे शनि सौदागराचा वेश घेऊन आला, हे जल्पित काव्य का कल्पित कादंबरी ? दोनीहि नव्हत. प्रत्येक अवतारा पूर्वी ' पृथ्वि गाईचे रूप घेऊन क्षीरसागरात श्रीविष्णुकडे गेली ' या कविकल्पनेत जे तत्व आहे तेच यात आहे. वास्तविक, अंतराळात (पृथ्वी प्रमाणेच) सूर्याभोवती प्रदक्षिणा घालणारे कोणतेहि ग्रह तारे अथवा नक्षत्रे माणसाची रूपे घेऊन खंडो गुंडोच्या बोकांडी बसण्यास येतात, ही कल्पना अशक्यातली अशक्य आणि अशास्त्रीय होय. विशेषतः या आकाशस्थ ग्रहांना ' देव ' मानणे, हा तर आमच्या देवभोळेपणाचा कळसची होय. शुक्र गुरु मंगळादि तारे हे जर पुल्लिंगी देव, तर ही आमची पृथ्वि ' देवी ' का नसावी ? कितीजण या देवीची पूजा करतात ? शनिमाहात्म्या प्रमाणे पृथ्विमाहात्म्य आणि तिचे एकादे अनुष्ठान कां नसावे ? अंतराळातले दूरस्थ ग्रहदेव जर आम्हाला बरे वाईट भोवतात, तर ही अगदी निकटची, अगदी घरातली ग्रहदेवी पृथ्वि आमच्या राशीला कां कधी येऊ नये? का, अतिपरिचयादवज्ञा ? निदान हिंदुस्थानातल्या हिंदु लोकांना या दुर्गुणाचे बाळकडूच मिळालेले दिसते. स्वदेशापेक्षा यांना परदेशाची काळजी फार. इहलोकापेक्षा परलोकीच्या ऐश्वर्यांची भूक फार. स्वदेशात स्वदेशबंधु उपाशी मेला तर हे त्याकडे ढुंकून पाहणार नाहीत; पण इंग्लंडातल्या अग्निप्रळयाने किंवा जपानातल्या धरणीकंपाने भिकेला लागलेल्या परक्यांसाठी हे परलोक्ये हिंदु लाखो रुपयांचे फंड पाठवितील. स्वदेशी विद्वानाला किंवा कारागिराला कसलेहि उत्तेजन न देता उपाशी मारतील; पण परदेशच्या हव्या त्या गोऱ्यागोमट्या भुरट्याला देव म्हणून डोक्यावर घेऊन नाचतील आणि ऐहिक मोक्षासाठी त्याची पायतणे चघळतील. स्वकीयांना क्षुद्र किंवा शूद्र लेखून, परक्यांचा

उदो उदो करण्याची उलट्या काळजाची वृत्ति हिंदु लोकांत पिंडप्रधान असल्यामुळेच हिंदुस्थान म्हणजे परक्यांना चरण्याचे एक मुक्तद्वार कुरण होऊन बसलेले आहे. असल्या आत्मद्रोही हिंदूंना पृथ्वीपेक्षा आकाशस्थ ग्रहांचा ऊरफोडी धोसरा कां असू नये ? तात्पर्य, हा सर्व भावना-वश आणि पोटार्थी लोकांच्या कल्पनेचा खेळ असून, ' मानला तर देव नाही तर धोंडा ' एवढ्याच दृष्टीने त्याकडे आपण पाहिले पाहिजे.

जनता भयंकर संकटांनी आणि छळांनी त्रासून गेली, सर्व उपाय हरले, आणि मृत्यूशिवाय दुसरा तरणोपाय उरला नाही, म्हणजे श्रीहरीची प्रार्थना करण्यापेक्षा तिला गत्यंतरच नसते. ' देवा आता धाव ' अशा गरीब गाईप्रमाणे जनतेच्या उघड किंवा गुप्त ज्या हाका आरोळ्या होतात, त्यालाच कवीने ' पृथ्वी गाईचे रूप घेऊन श्रीविष्णू कडे गेली ' या कल्पनेने रंगविले आहे. या बलीकडे त्यात विशेष काही चमत्कार किंवा आश्चर्य नाही. पृथ्वीवरील लौकिकी व्यवहाराच्या सर्व बऱ्या वाईट संघटना किंवा विघटना लोकांनीच घडवून आणावयाच्या असतात. तुफाने वावटळी धरणीकंप विद्युत्प्रहार वगैरे प्रकार निसर्गाचे असले तरी त्यानाहि पायबंद लाऊन, त्यांच्या मारकपणाला पद्धतशीर वळवून तारक बनविण्याचीहि शक्ति माणसांनी अजमावलेली आहे. मनुष्याची कल्पनाशक्ति म्हणजे विश्वविधात्या परमेश्वराला जवळ जवळ एक प्रकारचे चॅलेंजच(सामन्याचे आव्हानच) म्हटले तरी चालेल. प्राचीन काळी कालीदासाने केवळ एका काव्यात कल्पनेची वावडी अंतराळात भिरकावून मेघदूत निर्माण केला. पण या २० व्या शतकांत प्रगमनशील मानवांनी खास बिनतारी तारायंत्र तयार करून, मेघदूताची काव्यमय कल्पना आज प्रत्यक्ष सृष्टीत शक्य करून ठेविली आहे. गाईचे रूप घेऊन गेलेल्या पृथ्वीला श्रीविष्णूने ' मी अवतार घेऊन येतो ' असे दिलेले आश्वासन तात्काळ साऱ्या त्रिभुवनाने ऐकले आणि आनंदाची एकच टाळी पिटली. कौरवांच्या चक्र-

व्यूहात अभिमन्यू एकटा सापडला व बेशुद्ध स्थितीत असता कौरवांनी ठार मारला. तात्काळ ' तों अशरीरिणि वदली उत्तर। धर्मयुद्ध नव्हे हे ॥ ' हे धर्मयुद्ध नव्हे; अशी बिनदेहाची, बिनयंत्राची अदृश्य अशी आकाशवाणी झाली. आज बिनतारी ब्रॉडकास्टिंग आणि मेगॅफोन कर्णा हीच कामे हुकमी करतात. वायरलेस ऊर्फ बिनतारी म्हणजे आजकालची अशरीरिणीच नव्हे तर काय ? पूर्वी म्हणे स्वर्गातल्या इंद्राच्या दरबारातल्या अंजनीची ललकारी पृथ्वीवरील इंद्रप्रस्थाच्या नृपतीला ऐकू येत असे. आज बिनतारी रेडियो लंडनच्या हॅरी लॉडरचा जलसा मुंबई सीलोन कलकत्त्यास हवा त्याला घर-बसल्या ऐकवतो आणि कलकत्त्याच्या प्रोमोदा कोमाराची सारंगी न्यूयॉर्कच्या लक्षावधि रसिकांना हुबेहूब सुनावतो. मनुष्याच्या प्रगमनशीलतेने आज निसर्गाला सुद्धा चिमटीत धरून त्याला हमाल बनविण्यात केलेली कमाल पाहून, शनि मंगळादि ग्रहांच्या पोटात खात्रीने भीतीची घडकी भरली असावी, यात काही संशय नाही. कारण, आता अवघ्या पृथ्वीला चोखाळून, माणसांनी आपल्या तीक्ष्ण संशोधनांचा मोर्चा आता या शनि मंगळादि ग्रहांकडेच वळविला आहे. आतापर्यंत आकाशस्थ सर्व प्रमुख ग्रहाचे फोटोग्राफ्स तर काढलेच, पण मंगळावर मानवांची वसति खास असली पाहिजे, या अंदाजाचे सत्य हुडकिण्यासाठी गुदस्त साली इटलीच्या आल्प्स पर्वताच्या अत्युच्च शिखरावरून मंगळावरील लोकाना इलेकट्रिक लाईटच्या (विद्युत्प्रकाशाच्या) खुणाहि करण्यात आल्या. बेटे अझून उलट सिग्नलांची उत्तरे देत नाहीत ! किती दिवस गप्प बसतात ते आम्ही पाहून घेऊ आणि एकदा का त्या मंगळ्या लोकांची दातखिळी उघडली कीं ' मंगळ ग्रह महाक्रूर। जैसी का ते खड्गाची धार। ' आहे, का मुमताजसारखी चवचाल नार आहे, याचा तेव्हाच उलगडा होईल. मनुष्यप्राणी इतका जबरदस्त हिकमती आणि पराक्रमी असताहि, पुष्कळ माणसांनी शनि

राहूच्या वक्र किंवा चक्र दृष्टीला इतके कां भेदरावे, हे समजत नाही.

पृथ्वीवरील इहलोकचे सर्व बरे वाईट व्यवहार माणसेच करतात. सुखाचा पाऊस पाडणे किंवा दुःखाची आग भडकविणे; स्वराज्य भोगणे किंवा परक्यांचे गुलाम होणे; इतरांच्या दुःखनिवारणार्थ स्वतः दुःखाला कवटाळणे, किंवा स्वतःच्या हितासाठी दुसऱ्याची मुंडी मुरगळणे, वगैरे सर्व हालचाली माणसेच चालवीत असतात. महालक्ष्मीच्या घोडदौडीत किंवा गोव्याच्या तिकिट-फडफडीत एखाद्या राखाड्या शंखोवाचा लाखाड्या व्यंकोबा बनला किंवा माफीचा साक्षीदार होऊन एकाद्या मानवी राक्षसाने आपल्या मायदेशाची मान ऐन यशाच्या घटकेला कापली, तरी त्यांतहि आम्हा माणसांच्याच धडपडी कारण असतात. आम्हा माणसांशिवाय या पृथ्वीवरील चैतन्याचे पान सुद्धा हालणार नाही. एकमेकांच्या गळ्याला मिठ्या मारणारे किंवा फास लावणारे मित्र आणि शत्रू आमचे आम्हीच. त्यात तिसऱ्या कोणा आकाश पाताळस्थ ग्रहांची लुडबूड मुळीच नसते. विशेष आश्चर्याची गोष्ट एवढीच की, माणसाला सुखाची समृद्धि असली, किंवा त्याला अवचित काही धनलाभ झाला, तर मात्र त्या वेळी, 'कोणत्या ग्रहाच्या मेहरबानीने हे असे घडले ?' याची ज्योतिष्याजवळ चौकशी करण्याच्या यातायातीत तो हटकून पडत नाही. एकाद्या मित्राने सहजगत्या आपल्याला सिगारेट किंवा तपकिरीची चिमूट दिली तर वर्तमाना रिवाजा प्रमाणे 'थँक यू' ने आपण त्याचे आभार मानतो. पण धनलाभ किंवा इतर काही लाभ झाले, तर लाभग्रहाची चौकशी करून त्याला अनुष्ठान तर राहोच, पण नुसता नमस्कार करण्याचीहि आम्हाला शुद्ध नसते. त्या वेळी "यांत कसला आला नमस्कार आणि ग्रहदशा ? हा सरळ व्यवहारी धोरणाचा पडताळा आहे. घेतले तिकीट, लागला नंबर. घेतले कंत्राट, एकाचे शंभर. लागला घोडा, पणतीच्या जागी झुंबर. यात कसले आले ग्रह आणि दशा ? हमारा तखदीरहि

ऐसी जबरदस्त है. " असे उद्गार काढून स्वारी पार मोकळी ! माझ्या परिचयाचे एक शाक्तमार्गी व्यापारी झव्वू आपल्या पैशाच्या उवाऱ्याच्या धमकीने नेहमी असे उद्गार काढतात कीं " My money is my God. On the strength of money, I make any man, whether high or low, bend his knees before me." [पैसा माझा परमेश्वर. पैशाच्या जोरावर मी हव्या त्या छोट्या बड्या माणसाला माझ्यापुढे ढोपरे टेकायला लावू शकतो.] ही गोष्ट खरी आहे; आणि मोठमोठ्या सरकारी अधिकाऱ्यांपासून तो खेड्यातल्या भिवऱ्या पांडव्या शेतकरी व बाळंभटा पर्यंत सर्व लोक या झव्वूपुढे रिंगणातल्या घोड्या कुत्र्यां प्रमाणे कसे नाचतात, हेहि मी स्वतः अनुभवलेले आहे. पण ज्या वेळी उपरोक्त गर्वोक्ती त्या झव्वूने मला दबविण्याच्या हेतूने उद्गारली, तेव्हा २४ तासाच्या आत "Your Money—God is nothing more than my Shoe" [तुझा पैसा—परमेश्वर म्हणजे माझ्या पायातले खेटर] हा सिद्धांत त्या मुर्दाडाला मी सक्रीय पटवून दिलेला आहे.

उलटपक्षी, माणसाचा व्यवहार बिघडला किंवा कोणी बिघडवला, तो लाखाधीशाचा खाकाधीश बनला, धंदा बुडाला किंवा नोकरी गेली, अगर सुखाच्या भरतींतून दुःखाच्या खडकावर आदळू लागला कीं मग तो आकाश पाताळातले ग्रह हुडकू लागतो, ज्योतिष्याच्या पंचांगात साष्टांग पडतो, जवळ दिडकी नसली तरी उसनवारी करून मारुतीच्या तेल शेंदराची सरबराई ठेवतो, गावातल्या बाई बुवांच्या मठात भगताची दीक्षा घेतो, ताईत गंडेदोऱ्यांची भेंडोळी गळ्यात अडकवतो, पंचाक्षऱ्याला घुमवतो, गुरुचरित्र किंवा शनिमाहात्म्याच्या पारायणावर झोड उठवितो, काय वाटेल ते करतो. याच वेळी त्याला देवाची आठवण होते. याच प्रसंगी तो श्रीहरीला शरण जातो. याच संकटकाळी त्याची मनोभूमिका लोण्यासारखी मऊ बनून त्यात

भक्तीचे बीज थरारते. याच कठोर अवस्थेत त्याचा दृष्टीकोन निवळून तो अखिल जगताकडे माणुसकीच्या नजरेने पाहू लागतो. सुखाबरोबर दुःख, भरती माघून ओहटी, प्रकाशा पाठोपाठ अंधार, दिवसा नंतर रात्र, हा जगाच्या व्यवहाराचा क्रम आहे, म्हणूनच ही सुखाला लालचटलेली मानवी दुनिया परमेश्वराला थोडी तरी आठवते.

आकाशस्त ग्रहांनी माणसांकडे फक्त संकटे आणि दुःखेच पाठविण्याचा काही खास मक्ता घेतलेला नाही. ग्रहांचे जसे दुष्परिणाम घडतात, तसे सुपरिणामहि घडतात. दुष्परिणामाच्या वेळी माणसे ग्रहगतीचा विचार करतात, सुपरिणामाच्या वेळी करीत नाहीत. परंतु हे बरे वाईट परिणाम घडविण्याची जाणीव त्या त्या ग्रहांना असते, असे मुळाच नाही. प्रत्येक ग्रहाचा काही विशेष निरनिराळा गुणधर्म आहे आणि पृथ्वी सह सर्व ग्रह एकमेकांशी परस्पराकर्षणाने जखडले असल्यामुळें, त्या त्या गुणधर्माचे परिणाम गति स्थिती प्रमाणे एकमेकांवर आपोआप होत असतात. २ऱ्या प्रकरणात घेतलेले तीनरंगी काचांचेच उदाहरण घ्या. सूर्य-प्रकाश एकच प्रकाशधर्मी. पण तांबडी काच आड येताच, तिच्यातून जाणाऱ्या किरणांचे परिणाम निरनिराळ्या रंगाच्या कपड्यांवर निरनिराळे घडत आहेत, याची जाणीव किंवा संवेदना त्या तांबड्या काचेला असणे शक्य नाही. लोकचुंबकाला लोह आकर्षण करण्याची शक्ति असते; पण त्या त्याच्या गुणधर्माने टाचणी खेचली का मोठी आगबोट खेचली, याची त्याला जाणीव असत नाही. लोखंड तडाक्यात आले कीं खेचायचे एवढाच त्याचा गुणधर्म. सूर्य प्रकाश देतो असे आपण म्हणतो. पण तो प्रकाश देतहि नाही आणि फेकीतहि नाही. 'प्रकाश असणे' हा सूर्याचा गुणधर्म. पण मी तो आता पृथ्वीवर सोडतो, शनीला देतो, चंद्रावर पसरतो, असे तो म्हणत नाही, मानीत नाही, समजत नाही. आपल्या प्रकाशधर्माचे परि-

णाम कोठे किती आणि कसे होत आहेत, याची सूर्याला मुळीच जाणीव नसते. त्याच प्रमाणे राहू शनि मंगळादि आकाशस्थ ग्रहांचे त्यांच्या परस्पर गुणधर्मानुसार पृथ्वीवरील पदार्थमात्रावर जे जे बरे वाईट परिणाम घडतात, त्यांची त्या ग्रहाना कसलीहि जाणीव असत नाही. तांबडी काच आड आल्यामुळे माझा पांढरा सदरा तांबडा झाला, पिवळा नारिंगी बनला आणि निळा जांभळा रंगला, ही भाषा आपण बोलतो; पण त्या भाषेचे त्या काचेला काय ? माझ्यातून सूर्यप्रकाश गेल्यामुळे हे तीन निरनिराळे परिणाम घडत आहेत, याची त्या काचेला कसलीहि संवेदना अगर जाणीव नसते. अर्थात् शनि माझ्याकडे पहात आहे, मंगळ माझ्या घनस्थानावर उखडला आहे किंवा राहू माझ्या तनुस्थानी घरणे घरून बसला आहे, असली भाषा खोटी आणि सर्वस्वी वायफळ होय. आपण ज्या पृथ्वीवर प्रत्यक्ष राहतो, तिच्या प्रमाणेच इतर सर्व आकाशस्थ ग्रह धोंडें दगड मातीचे जड अचेतन गोळेच आहेत. चंद्रग्रहणात पृथ्वीची छाया चंद्रावर पडते, पण तिची पृथ्वीला थोडीच काही जाणीव अगर संवेदना असू शकते ? ग्रहणे म्हणजे ग्रहांच्या परिभ्रमणगतीची शुद्ध गणिती आकडेमोडी. हवेवर किंवा पृथ्वीवरील पदार्थमात्रावर ग्रहणांचा काही जरी बरा वाईट परिणाम होत असला, तरी तो परिणाम मी घडवीत आहे, याची जाणीव पृथ्वीला चंद्राला अगर सूर्याला मुळीच नसते.

असले हे दगड मातीचे अचेतन जड गोळे पृथ्वीवरील, विशेषतः हिंदुस्थानातलि माणसांकडे किंवा ठराविक व्यक्तीकडे मेहेरबानीच्या किंवा सूडाच्या दृष्टीने पहात असतात, ही किती अडाणीपणाची समजूत आहे, याचा विचारवंतांनी विचार करावा; आणि असल्या ग्रहांच्या वक्रदृष्टीच्या पाखड-आगीची झळ शमविण्यासाठी भटांची पूजा, मारुतीची शेंदुरथापणी आणि तेलगाळणी किंवा घोड्याच्या नालापुढे डोकेघासणी इत्यादि प्रकार करणे, म्हणजे डोक्याला जखम आणि पायाला मलमपट्टी लावण्या सारखाच आच-

रटपणा नव्हे काय ? जपजाप्य केल्यामुळे ' शनि राहूची पीडा आपल्याला फारशी बाधणार नाही ' या **भावनेमुळे** मनुष्याला एक प्रकारचा सहनशीलपणा येतो, असे म्हणतात. पण तांबड्या तावदानामुळे पांढऱ्या सदऱ्याचा रामा लालबुंद पडला, तेथे जपजाप्यामुळे तांबडा रंग किंवा त्या रंगाच्या गुणधर्माचा रामावर होणारा परिणाम रामाला थोडाच टाळता येणार ? ' मी तांबडा पडलो नाही ' अशी नुसती **भावना** प्रत्यक्ष वस्तुस्थितीचे अस्तित्व किंवा परिणाम टाळण्यास सर्वस्वी नालायक ठरते.

अशी जर वास्तविक शास्त्रीय स्थिति आहे, तर शनि सौदागराचे रूप घेऊन विक्रमराजाकडे आला कसा ? शनिमाहात्म्यकर्त्याने काय हो लोण. कढी गप्पच झोकून दिली काय ? नाही. त्रिवार नाही. तात्याजी महिपतीच्या या काव्यकल्पनेतहि पुष्कळ सत्य आहे. मी ते स्वतः प्रत्यक्ष अनुभवले आहे. या सत्याचे स्वरूप स्पष्ट लक्ष्यात येण्यासाठी, निरनिराळ्या ग्रहांचे गुणधर्म विचारात घेतले पाहिजेत. जड अचेतन ग्रह पृथ्वीवर माणसांची रूपे घेऊन प्रत्यक्ष येणे जरी शक्य नाही, तरी त्या ग्रहांच्या गुणधर्मांशी ज्या ज्या माणसांचा प्रकृतिगुणधर्म हुबेहूब जुळता असतो, अशाच माणसाकडून बऱ्या वाईट घटनेचे आघात, ठराविक वेळी, आपल्यावर रोजच्या व्यवहारांत भोगावे लागतात. प्रत्यक्ष शनि येथे येऊन कोणाला साडेसातीच्या चरकात पिळीत नाही, तर त्याच्या गुणधर्माची ज्या माणसाच्या देह मनांत तंतोतंत प्रतिमा उमटलेली असेल, त्या माणसाकडूनच साडेसातीच्या छळणुकीचे सर्व प्रकार प्रत्यक्ष व्यवहारात घडून येत असतात. येथे विशेष लक्ष्यात ठेवण्यासारखे तत्व हेच कीं अशी छळणूक करणाऱ्या माणशी शनीला सुद्धा, ' मी अमूक माणसावर अमूक कार्य त्याला साडेसाती आली आहे म्हणून घडवीत आहे ' अशी कसलीहि जाणीव असत नाही. केवळ सरळ व्यवहार म्हणूनच तो ते कृत्य करीत असतो, आणि त्या कृत्याचे परिणाम मात्र साडे-

सातीच्या छळणाशी समगोत्री समरसी ठरतात. फार काय, पण असली बरी वाईट कृत्ये घडविणारा माणूस सुद्धा **देहाने** आणि **मनाने** हुबेहूब शनीच्या देहमनाच्या कविवर्णित वर्णनाबरहुकूमच असलेला आढळून येतो.

खगोल (ॲस्ट्रॉनमी) शास्त्राच्या भागेंत आकाशस्थ ग्रहांच्या निरनिराळ्या गुणधर्मांचा तपशील वाचकाना कंटाळवाणा होईल. सबब, तात्याजी महिपतीने आपल्या रसाळ वाणीने बालबोध भाषेत वर्णिलेला तोच तपशील वाचकानी विचारात घ्यावा, हेच बरे. महिपतीच्या या वर्णनात कवित्व फार थोडे आहे. पण प्रत्येक ग्रहाला एकेक **जात** देऊन, त्याने त्यांच्या गुणधर्माची प्रचिती त्या त्या जातीच्या लोकविश्रुत स्वभावधर्मानें* थोडक्यात पण समर्पक चितारली आहे.

(१) रवि (सूर्य) Sun.

रवि तो मुख्य दैवत । त्यावीण सर्वही जाणा व्यर्थ ।
नवग्रह आज्ञा पाळित । ऐसा श्रेष्ठ ग्रह हा ॥
रवि असे महाबळी । सर्वांमाजी आतुर्बळी ।
प्रत्यक्ष दिसतसे नेत्रकमळीं । तो हा सूर्यनारायण ॥

(२) सोम (चंद्र) Moon.

.....। सोमासि बळ अद्भुत ।
तो माळी असे म्हणवीत । वनस्पति पोषितसे ॥

---

* व्यवहारात कडकडीत जातिभेदचसा काय, पण जातिद्वेष बाळगिणाऱ्या, परंतु घराबाहेरच्या जगात जातिविध्वंसनाच्या तोंडपाटीलक्या करणाऱ्या आचरट हिंदूंनी, तात्याजी महिपतीकडे किंवा माझ्याकडे आंग्रेजी स्मृतीच्या १५३ अच्या दुर्बिणीतून डोळा मारण्याचे श्रम घेऊ'नये. जोंवर सर्वांस मनोवृत्तीची ठेवण एकजात एकसारखी बदललेली नाही, तोंवर व्यवहारातले अनुभव कितीहि घुरट्यात बसविले, तरी कुंभाराची सूम उकीरड्यावर आल्याशिवाय राहाणार नाही.

तो न गांजीच कोणाशी । अति सौख्यदाता सर्वांसी ।
सदा सर्वदा निर्मळ-मानसीं । धन्य जयाचे पूजन ॥

(३) मंगळ. Mars.

मंगळग्रह हा महाक्रूर । जैसी का ते खड्गाची धार ।
तयाचा नकळे पार । सर्व ग्रहांमाजी वरिष्ठ हा ॥
मंगळ ग्रह सोनार । क्रूरता जयाची अति थोर ।
परि तो पूजकासी कृपाकर । मंगल करी सर्वदा ॥

(४) बुध. Mercury.

बुध जातीचा असे वाणी । नवग्रहांत शिरोमणी ॥
बुधग्रह आहे ज्यास नीट । त्यास सर्व मार्ग सुचती सुभट ।
कोणत्या कार्यासही तूट । तो न करी कल्पांतीं ॥
बुधाची बुद्धि भारी । कोणासी निष्ठुरता न करी ॥
संसारचिंता हरी । प्राणिमात्राची ॥

(५) गुरू. Jupitor.

गुरु जातीचा असे ब्राह्मण* । सर्वांत श्रेष्ठ असे वर्ण ॥
गुरु असे ज्ञानाचा पुरा । तयाच्या साम्यासि नसे दुसरा ।
त्यापुढे नुरेचि थारा । कल्पनेचा कदांही ॥

(६) शुक्र. Venus.

.....। शुक्र ग्रह असे बहु भला ।
जेणे राक्षसां उपकार केला । संजीवनि मंत्रें करोनी ॥

---

* मात्र चित्पावन ब्राम्हण नव्हे. या प्राण्यांनी शनीची भूमिका घेतलेली आहे, हे महाराष्ट्रात तरी कोणाला नव्याने सांगणे नको.

शुक्राची शक्ति आहे फार। तो करी कर्माकर्माचा चूर ॥
शुक्रपूजनीं जे तत्पर †। त्यांच्या शौर्यासि नाहीं पारावार ॥

(७-८) राहू. केतू.

हे उभयता अति अद्भुत। दैत्यकुळींचे असती ॥
मातंग जातीचे दोन्ही। दुष्टक्रिया म्हणवोनी।
त्यांच्या दर्शनें चंद्रसूर्य गगनीं। चळचळा कापती ॥
राहू पीडी चंद्रासी। केतू तो सूर्यासी।
ग्रहण बोलिजे तयासी। प्रत्यक्ष दृष्टीसी दिसतसे ॥

(९) शनि. Saturn.

शनीश्वराची * मूर्ति काळी। तो जातीचा होय तेली ‡ ॥
चरण पंगु सुरत चांगली। पूजा करी काळभैरवाची ॥

या प्रमाणे प्रत्येक ग्रहाला एकेका जातीचे नाव देण्यात कवीने त्या त्या ग्रहाचा गुणधर्म किंवा प्रकृतिधर्म सुबोध रीतीने व्यक्त केलेला आहे. यावरून असे मानण्याचे मात्र मुळीच कारण नाही कीं सोनार जात क्रूर, तेली जात म्हणजे शनीचा अवतार, आणि ब्राम्हण जात म्हणजे सात्विक-पणाची पर्वति. सगळेच मांग सरसकट मांगहृदयी असतात, असे थोडेच आहे ? आणि सगळेच ब्राम्हण जर गुरूचे अवतार असते, तर आज त्यांची अस्पृश्यां इतकी आब्राम्हणेतर अस्पृश्यांकडून जी सर्वच बाबतींत सरीस ससहोलपट होत आहे, ती कशाला होती ? सारांश, जातिनिर्देशावरून

---

† ब्रह्मचाऱ्यांनी या सूचनेचा खोल अर्थ नीट विचारात घ्यावा.

* 'शनैश्चराची' असाहि पाठभेद आहे आणि तो 'चरण पंगू' या वर्णनाशी जुळता आहे.

‡ शनैश्चराची मूर्ति काळी। तो जातीचा होय कोळी।
चरण पंगु सुरत ढेवरी। मूर्ति खरी काळभैरवाची ॥

मला भेटलेल्या शनीचे वर्णन मी असे करीन.

तो न गांजीच कोणाशी । अति सौख्यदाता सर्वांसी ।
सदा सर्वदा निर्मळ-मानसी । धन्य जयाचे पूजन ॥

(३) मंगळ. Mars.

मंगळग्रह हा महाक्रूर । जैसी का ते खड्गाची धार ।
तयाचा नकळे पार । सर्व ग्रहांमाजी वरिष्ठ हा ॥
मंगळ ग्रह सोनार । क्रूरता जयाची अति थोर ।
परि तो पूजकासी कृपाकर । मंगल करी सर्वदा ॥

(४) बुध. Mercury.

बुध जातीचा असे वाणी । नवग्रहांत शिरोमणी ॥
बुधग्रह आहे ज्यांस नीट । त्यास सर्व मार्ग सुचती सुभट ।
कोणत्या कार्यासही तूट । तो न करी कल्पांतीं ॥
बुधाची बुद्धि भारी । कोणासी निष्ठुरता न करी ॥
संसारचिंता हरी । प्राणिमात्राची ॥

(५) गुरू. Jupitor.

गुरु जातीचा असे ब्राह्मण* । सर्वांत श्रेष्ठ असे वर्ण ॥
गुरु असे ज्ञानाचा पुरा । तयाच्या साम्यासि नसे दुसरा ।
त्यापुढे नुरेचि थारा । कल्पनेचा कदाही ॥

(६) शुक्र. Venus.

.....। शुक्र ग्रह असे बहु भला ।
जेणे राक्षसां उपकार केला । संजीवनि मंत्रे करोनी ॥

---

* मात्र चित्पावन ब्राम्हण नव्हे. या प्राण्यांनी शनीची भूमिका घेतलेली आहे, हे महाराष्ट्रात तरी कोणाला नव्याने सांगणे नको.

शुक्राची शक्ति आहे फार। तो करी कर्माकर्माचा चूर ॥
शुक्रपूजनीं जे तत्पर †। त्यांच्या शौर्यासि नाहीं पारावार ॥

(७-८) राहू. केतू.

हे उभयता अति अद्भुत। दैत्यकुळींचे असती ॥
मातंग जातीचे दोन्ही। दुष्टक्रिया म्हणवोनी।
त्यांच्या दर्शनें चंद्रसूर्य गगनीं। चळचळा कापती ॥
राहू पीडी चंद्रासी। केतू तो सूर्यासी।
ग्रहण वोलिजे तयासी। प्रत्यक्ष दृष्टीसी दिसतसे ॥

(९) शनि. Saturn.

शनीश्वराची * मूर्ति काळी। तो जातीचा होय तेली ‡ ॥
चरण पंगु सुरत चांगली। पूजा करी काळभैरवाची ॥

या प्रमाणे प्रत्येक ग्रहाला एकेका जातीचे नाव देण्यात कवीने त्या त्या ग्रहाचा गुणधर्म किंवा प्रकृतिधर्म सुबोध रीतीने व्यक्त केलेला आहे. यावरून असे मानण्याचे मात्र मुळीच कारण नाही कीं सोनार जात क्रूर, तेली जात म्हणजे शनीचा अवतार, आणि ब्राम्हण जात म्हणजे सात्विकपणाची पर्वति. सगळेच मांग सरसकट मांगहृदयी असतात, असे थोडेच आहे ? आणि सगळेच ब्राम्हण जर गुरूचे अवतार असते, तर आज त्यांची अस्पृश्यां इतकी आब्राम्हणेतर अस्पृश्यांकडून जी सर्वच बाबतींत सरीस ससहोलपट होत आहे, ती कशाला होती ? सारांश, जातिनिर्देशावरून

---

† ब्रह्मचाऱ्यांनी या सूचनेचा खोल अर्थ नीट विचारात घ्यावा.

* 'शनैश्चराची' असाहि पाठभेद आहे आणि तो 'चरण पंगू' या वर्णनाशी जुळता आहे.

‡ **शनैश्चराची मूर्ति काळी। तो जातीचा होय कोळी।**
चरण पंगु सुरत ढेवरी। मूर्ति खरी काळभैरवाची ॥

मला भेटलेल्या शनीचे वर्णन मी असे करीन.

कवीने फक्त तात्पर्यार्थ दर्शविलेला आहे. संस्कृतीचा बरा वाईट दर्जा दाखविला आहे, एवढेच. प्रत्येक मनुष्याला ज्या ज्या वेळी ज्या ज्या ग्रहाची बरी वाईट दशा अनुभवणे प्राप्त असते, त्या त्या वेळी त्या त्या प्रकृतीच्या आणि संस्कृतीच्या प्रत्यक्ष माणसाकडूनच सुखदुःखाचे किंवा लाभहानीचे आघात त्या मनुष्यावर होतात. उदाहरणार्थ, - शनिग्रहाचा तडाखा आला म्हणजे शनीच्या प्रकृति–धर्माशी ज्या व्यक्तीचा प्रकृतिधर्म अगदी जुळता असतो, अशाच व्यक्तीकडून आपल्याला व्यवहारात फार त्रास होतो. "शनैश्चराची मूर्ति काळी" असते. काळ्याकुट्ट कातडीच्या लोकांच्या कुंडल्या पहा. त्यात तनुस्थानी हटकून शनि असलाच पाहिजे. शनीची जात 'तेली.' तनुस्थानी शनि असून, ज्यांची संस्कृति आणि मनोवृत्ति तेलकट मळकट असते, काळभैरवासारख्या आक्काळविक्काळ दैवतांवरच ज्यांचा भाव असतो, किंवा त्या दैवतांचा जो प्रकृतिधर्म आहे असे आपण मानतो, तद्वत् ज्यांची मनोवृत्ति बनलेली असते, अशाच रंगाढंगाच्या लोकांकडून शनिग्रहाच्या पीडेची कामगिरी या पृथ्वीवर पार पाडली जाते. यशाच्या किंवा लाभाच्या बाबतीत चंद्र बुध गुरू इत्यादि ग्रहांच्या समान–गुणधर्माच्या लोकांकडूनच व्यवहारात आपल्याला यश लाभाची प्राप्ती होत असते. वाचक हा मुद्दा नीट लक्ष्यात घेऊन, आपल्या दिनचर्येचे निरीक्षण करू लागतील, तर आकाशस्थ ग्रह माणसांची रूपे घेऊन पृथ्वीवर येत नाहीत, परंतु पृथ्वीवर आणि पृथ्वीवरील यच्चावत् पदार्थमात्रावर होणारा त्यांच्या बऱ्या वाईट दशांचे परिणाम तत्तत्समानधर्मी माणसाकडूनच लोकव्यवहारात कसे बिनचुक घडून येतात, हे त्यांचे त्यानाच प्रत्ययास येऊ लागेल.

माझ्या चरित्रात विक्रमराजाची कथा किती बिनचुक तपशीलाने घडून आली, याचा वृत्तांत पुढच्या प्रकरणी वाचकांस निवेदन करीत आहे. त्यावरून तात्याजी महिपतीच्या विक्रम–कथेचा गूढार्थ बराच स्पष्ट होईल.

3469

प्रकरण ६ वे.

विक्रमाच्या कहाणीचा स्पष्टार्थ.

हा स्पष्टार्थ मी स्वानुभवाच्या पडताळ्यानी वाचकाना पटवून देणार, एवढ्याच कारणाने अनेक वाचकांच्या मनात तर्क कुतर्कांचे काहूर माजण्याचा संभव आहे. तेव्हा, नमनालाच घडाभर तेल जळाले तरी हरकत नाही, पण मी हा मार्ग कां पत्करीत आहे, याचा थोडा प्रस्ताव करणे श्रेयस्कर आहे. कहाणी विक्रमाची आणि ती स्वानुभवाच्या शब्दानीच कां ? अनुभवाचे बोल केव्हाहि श्रेष्ठच. त्या बोलांची महति सिद्ध करायला ग्रंथाधार नको, श्रेष्ठाधार नको, कोणाची कसलीहि मध्यस्थि नको. जे स्वतः पाहिले चाखले अनुभवले आणि अखेर ' कां ? कसे ? ' च्या कसाला लाऊन त्याचे सिद्धांत पडताळून पाहिले, तेच वाचकाना निवेदन करणे श्रेयस्कर होय. असे करण्यात मोठेपणा मिरविण्याचा किंवा लोकमान्यतेचा मुलामा चढवून घेण्याचा मजवर आरोप करणाऱ्या मित्राना मी पुन्हा एकदा या ठिकाणी नम्रतापूर्वक बजावून सांगतो कीं बाबानो, मी या दोनहि गोष्टीवर एकदाच कायमचे थुंकून ठेविले आहे. शिवाय, मी जसा मला स्वतःला पूर्ण ओळखू शकतो, माझ्या गुणदोषांची छाननी करून त्याबद्दल जाणीव ठेऊ शकतो, तसा या जगात दुसरा कोण असू शकेल ? इतरांचे मजविषयी अभिप्राय अक्षरशः एकांगीच असणार. त्याना माझ्या अंतरंगाचा ठाव कशाने लागणार ? फार काय, पण या अंतरंगाचा नकाशा यथातथ्य रंगविण्याचा मीच स्वतः जरी प्रयत्न केला, तरी तो कितपत साधेल याची

शंकाच आहे. तथापि संदिग्ध आणि त्रोटक चित्र जरी असले, तरी ते माझे मीच काढलेले असले, म्हणजे टीकाकारांची तेवढीच माथेफोड कमी होऊन, वाचकाना त्याबद्दल हवा तो वराबाईट दृष्टीकोन पत्करण्यास संकोच वाटणार नाही.

शरीराने मी जात्याच दुबळा असलो, तरी मनाने मी अचाटकर्मा क्रांति-मुमुक्षु आहे. मानधनप्रभुत्वाचा मी कट्टा भोक्ता असलो, तरी लौकिकी मान-धनप्राप्तीच्या मोहिनीपुढे मी आपले नपूंसकत्व अनेक महत्वाच्या प्रसंगी विन-शर्त कबूल केले आहे. अनेक राजे महाराजांच्या ताटाला ताट न् पाटाला पाट भिडविण्याचे शेकडो योग अनुभवून सुद्धा, अखेर मी आणि माझी लेखणी, या पलीकडे माझ्या लौकिकी भाग्याने विशेष मजल न मारण्याचे कारण तरी हेच. माझ्या मातोश्रीच्या दुर्घात लाळघोटेपणाचे दोन थेंब जरी परमेश्वराने मिसळले असते, तरी या वेळी मी धनकनक-संपन्नतेच्या गरमागरम उबाऱ्यात सुरक्षित बसून, इतर शेकडो झब्बू प्रमाणे, मनाला केवळ विरंगुळा म्हणून, लोकाहितवादाचे नाटक खुशाल नटवीत बसलो असतो. अडाणी रयतेच्या रक्ताच्या वंगणावर आपल्या लोकमान्य-तेचे आणि राजमान्यतेचे श्रीमंती थोर यरारविणाऱ्या झब्बू लोकांशी, आणि सरकारी नोकरीच्या क्षेत्रात हिंदी कामगारांना ' डॅम सिली डॉकी ॲस ' वगैरे निवडक पुष्पांजली वाहण्यातच राज्यकर्तृत्वाची मिजास मिरविणाऱ्या गोऱ्या अंमलदारांशी, किंचित गिळते मिळते घेऊन, माझा कार्यभाग **व्यवहारी चातुर्याने** मी सावरून घ्यावा, असा उपदेश अनेक संसारी मित्र मला आजहि करतात; पण तो मला क्षणभर सुद्धा पटत नाही. माझ्या पिंडालाच तो धर्म पारखा आहेसा दिसतो, त्याला माझा काय इलाज ? मग ते मित्र निराशेने म्हणतात कीं " ठाकरे, हा तुमचा ग्रहयोग ! "

'कैं भोज्य नाना परी । कैं कोरड्या भाकरी' हा तर माझ्या जीवन-क्रमाचा ट्रेडमार्कच आहे आणि त्याचा मला मोठा अभिमान वाटतो. चढ-पड नाही, सुख-दुःखाची चरचरीत फोडणी नाही, स्तुति-निंदेची तुफाने नाहीत, असले भेंड्याच्या भाजीचे मिळमिळीत गिळगिळीत एकमार्गी ऐदी जीवन मला साफ नको. अनेक पूर्वजन्मांचा कर्मसंग्रहाचा माझा ठेवा यथातथ्य उमगणे मला शक्यच नाही. पण सामान्यतः जीवनक्रमात माझ्या आचार-विचार-यंत्रावर क्षणोक्षणी ज्या चैतन्याच्या लहरी (व्हायब्रेशन्स) आदळत असतात, त्यावरून मी असे स्पष्ट म्हणू शकतो की माझा पिंड क्रांतिकारकाचा आहे. शांतिपेक्षा मला क्रांतीचा घोसरा फार. कोणत्याहि कार्याच्या भरतवाक्यासाठी भारतीयानी ॐ शांतिः शांतिः शांतिः असा उद्गार न काढता ॐ क्रांतिः क्रांतिः क्रांतिः असा उच्च ध्वनि काढावा, असे मला नेहमी वाटते.

माझ्या इतका कडवा प्रयत्नवादी, खटपट्या आणि घडपड्या माझा मीच, असे गर्वाने नव्हे, पण आत्मविश्वासाने म्हणतो. आत्मविश्वास हेच माझ्या जीवनाचे भांडवल आहे. त्याच्याच जोरावर मला शक्य ते मी आजवर केले आहे आणि पुढे आमरण करीन. स्वाध्याय उद्योग आणि आशावाद या त्रयीच्या जोरावरच मी आपले वर्तमान अस्तित्व कमावलेले आहे.

God above and Heart within.

माथ्यावरी देव । अंतरीं दृढ भाव ॥

या सूत्रावर मी आपले चरित्र आणि चारित्र्य हालवीत असतो. मी माणसांचा भरंसा कधीच धरला नाही. माझे जिवाचे जानीदोस्त म्हणजे

ग्रंथ. त्यांच्या संगतीनेच माझ्या जीवनांत प्रबोधन होत आलेले आहे. त्यांच्याच तेजस्वी प्रोत्साहनाने प्रयत्नांची कडेलोट शिकस्त करण्याची प्रवृत्ति माझ्यात बळावलेली आहे. पण ४३ वर्षांपैकी गेल्या ३० वर्षांचा माझा आयुष्क्रमाचा नकाशा—विशेषतः गेल्या पांच साडेपांच वर्षांतील क्रांति-मय जीवनातील अनेक भयंकर स्फोटांचा संकटपट तपासला असता, प्रयत्न-वादालाहि काही सीमा आहे; केवळ यत्नच ध्येयाची. अखेर साधतो असे नव्हे; मानवी प्रयत्नांच्या पलीकडे काहीतरी अनेक गूढ शक्ती आहेत, मग त्याना दैव म्हणा, ग्रहदशा म्हणा, ईश्वरी सूत्र म्हणा, का आणखी हवे ते नाव द्या, **त्या शक्तींचे सामर्थ्य आकलन करून, त्यांचा प्रयत्नवादात एकजिनशी मिलाफ** करून घेतल्याशिवाय, माणसाचा एकांडा प्रयत्नवाद फोल आहे; गंगानदीत केवढीहि प्रचंड जलसमृद्धी असली, तरी ज्याच्या त्याच्या भांड्याच्या मापा इतकेच पाणी त्याला घेता येते; कर्तव्याच्या कल्प-नेची भरारी आकाशा पलीकडे नेली, तरी प्रत्यक्ष व्यवहारात तक्तपोशीला हात लावताना पायाखाली उंच घडवंचीच घ्यावी लागते; इत्यादि अनेक विचा-रांचे समुद्रमंथन करून, मी शनिमाहात्म्याचे केलेले सत्यशोधन वाचकांच्या सेवेला रुजू करीत आहे. विक्रमराजाची कहाणी बऱ्याच शक्य तपशिलानी माझ्या आयुष्क्रमात किती हुबेहूब घडलेली आहे, इकडे आता वाचकानी लक्ष्य द्यावे.

विशेष सूचना:—खालील हकिकतीत जेथे जेथे शनि राहू अशी नावे येतील, तेथे तेथे शनिग्रहाचा गुणधर्म, राहूग्रहाचा गुणधर्म असाच अर्थ वाचकानी द्यावा. त्याचप्रमाणे या कथानकात ज्या इसमांची नावे सत्य-कथनार्थ मला घेणेच प्राप्त आहे, ते सर्व माझे मित्रच आहेत. त्यांचे माझ्या-विषयी ग्रह (समजुती) काहीहि असले, तरी त्यांच्याविषयी माझे ग्रह

(समजुती) अझूनहि शुद्ध आणि अभ्रष्ट आहेत. शनिग्रहाच्या साडे-सातीच्चे तात्पुरते ऐहिक नाटक नटविण्यासाठी या माझ्या मित्रांकडून **व्यावहारीक दृष्ट्या** ज्या बऱ्या वाईट गोष्टी घडल्या, त्या केवळ नट नात्याने त्याना घेणे भाग पडलेल्या भूमिकांचा परिणाम आहे, असे मी मानतो. जग ही एक रंगभूमीच आहे. त्यावर आपणा सर्वांना वेळोवेळी नाना प्रकारची सोंगे घ्यावी लागतात. शत्रूला मित्राची भूमिका वठवावी लागते. मित्रावरहि शत्रुत्वाने वागण्याचा प्रसंग येतो. रस्त्यावरील अपरिचित मनुष्य सुद्धा ऐन प्रसंगी पाठच्या भावापेक्षा आणि पोटच्या मुलापेक्षा विशेष ममत्वाने आपल्यासाठी प्राणार्पणहि करतो; आणि ज्याचा कधी जन्मात बरा वाईट संबंध आला नाही, असा मनुष्य एकाकी अवचित पुढे येऊन, एकाच प्रतिकुळ शब्दोच्चाराने आपल्या कार्यात माती कालवतो. पुन्हा, परिस्थितीचा देखावा बदलताच किंवा नाटकच संपूर्ण होताच, हेच सर्व नटामित्र उलट रंगांत रंगलेले दिसतात. तात्पर्य, मजवरील शनीच्या साडेसातीच्या नाटकातील नटांवर मी कसल्याहि बऱ्या वाईट गुण दोषांचा आरोप करू इच्छित नाहीं. मी सर्वांना **हितचिंतक मित्र** या एकाच दृष्टीने आज पहातो आणि आमरण पाहीन. कोणतीहि परिस्थिति चिरकाल कायम टिकत नाही. जगाचा सर्व व्यवहार म्हणजे धावत्या काळाचे धावरे देखावे होत. प्रत्येक नट आपापल्या व्यवहाराची भूमिका सरळच वठवीत असतो. त्यात त्याचा हेतू स्वार्थी असला तरी अव्यावहारीक मुळीच नसतो. स्वार्थ कोणाला सुटला आहे ? मलाहि तो सुटलेला नाही. अशा भिन्न भिन्न हेतूंच्या झटापटीनीच या जगद्रंगभूमीवरील व्यवहाराची नाटके अखंड रंगत असतात. या नाटकांतील मर्माचा ठाव पहाताना, प्रत्येक नटाच्या भूमिकेतील वर्म यथातथ्य शोधन करणे, हेच प्रत्येक सत्यशोधकाचे कर्तव्य आहे. मी भूमिकांचे पृथःकरण करीत आहे, व्यक्तींच्या गुणदोषांचे सिद्धांत ठरवीत नाही.

मी शनीची कुचाळी कशी केली ?

चंद्र सूर्याला ग्रहण लागण्यापूर्वी त्यांच्या विरोधी राहू केतूचा 'वेध' प्रत्यक्ष ग्रहणापूर्वी बराच वेळ लागलेला असतो. तद्वत शनीनें मला साडेसातीची धमकी देण्यापूर्वीच त्याचा वेध वर्ष दीडवर्ष आधी माझ्यावर लागलेला असावा. सरकारी नोकरीच्या घवघवीत सौभाग्याचा मळवट लागलेला असतानाच, तारीख १६ आक्टोबर १९२१ पासून 'प्रबोधन' पाक्षिकाची सुरुवात केली. १६ डिसेंबर १९२१ पासून 'मानसिक दास्याविरुद्ध बंड' ही लेखमाला सुरू झाली आणि तिचा ५ वा अग्रलेखांक ता. १ मार्च १९२२ ला प्रसिद्ध होण्यापूर्वीच, ता. १० फेब्रुवारी १९२२ रोजी दुपारी बरोबर १२ वाजता, राहू शनि आणि मंगळ या त्रिकुटाचे मेतकूट जमताच, अपमानाच्या क्षुल्लक सबबीवर मी ताडकन् सरकारी नोकरीच्या दास्याची जाडजूड रौप्यशृंखळा तोडून, तज्जन्य मानसिक दास्याविरुद्ध प्रत्यक्ष बंड केले. या अपमानाला कारण झालेली व्यक्ती राहूच्या गुणधर्माची असून, त्याच्या मातंगलीला अजूनहि घुष्कळ मेंढ्ये हिंदी कारकुंडे 'केवळ पोटासाठी' निमूटपणे सहन करीत आहेत. अपमानाच्या प्रतिकारार्थ राहूला मी वापरलेली भाषा विक्रमाच्या कुचाळीपेक्षा बरीच कडक होती. ज्योतिष्यांच्या गणिता प्रमाणे त्या क्षणी राहूच्या जोडीला शनि आणि मंगळ असल्यामुळे, माझ्या प्रतिकाराच्या भाषेची त्यानी समसमान वाटणी केली असावी खास. सरकारसेवेचा राजीनामा देऊन जनसेवेचे प्रतिज्ञाकंकण मी हातीं चढवून, दादर येथे '**स्वाध्यायाश्रम**' संस्था उघडली आणि **प्रबोधन** व **हुंडा-विध्वंसन** या दोन कार्यात मी मग्न झालो. संसाराची काळजी श्रीहरीच्या चरणी वाहिली; आणि आश्चर्याची गोष्ट हीच कीं श्रीहरीने प्रबोधनाचे आणि माझे कोठे काहीहि कमी पडू दिले नाही.

पडतां जडभोरी । दासीं आठवावा हरी ॥
मग तो लागूं नेदे शिण । आड घाली सुदर्शन ॥

ही तुकोबाची स्वानुभवाची ग्वाही, आणि

"Our happiness is in the power of **One**, who can bring it about a thousand unforeseen ways that mock our foresight."

ही गोल्डस्मिथकृत व्हिकार ऑफ वेकफील्डची वाणी मी या स्वाध्याया-श्रमाच्या काळात पूर्ण अनुभवली.

मागणे लइ नाही लइ नाही । पोटापुरते देई ॥

संसाराच्या विवंचनेचे वर्तुळ एवढ्याच चिंदूवर आणल्यामुळे, आणि ते आण-ण्यात व तज्जन्य सर्व अडचणी मोठ्या उत्साहाने, धैर्याने आणि विशेषतः संतोषाने सहन करण्यात माझ्या संसारदेवतेने व लहान मुलींनी मला प्रेमाने सहाय केल्यामुळे, एक वर्षाचा काळ सुखासंतोषात पार पडला. पण माझ्या-वर चिडलेला [निरयणा प्रमाणे धनु राशीचा आणि सायना प्रमाणे मेष राशीचा] शनि आपल्या साडेसातीच्या नाटकातील पात्रे शोधून रंगविण्यात गुंतला होता. शनीची एक मौज असते. तो कधी कोणाला ठार मारीत नाही. त्याला आदळ आपट छान साधते. त्यासाठी तो प्रथम मनुष्याला वर उंच नेतो आणि लगेच खाली आपटतो. ने उंच, आपट खाली; दाखव भरभराट, लाव धरघराट; आज राव तर उद्या रंक; आज प्रतिष्ठेला चढ-वील, तर लागलीच अप्रतिष्ठेच्या चापांत दाही दिशांनी नडवून रडवील; अशी शनीच्या छळणाची तऱ्हा आहे. त्याप्रमाणे, १९२२ च्या जुलई महि-यात प्रबोधनाचे एक वर्गणीदार. कै. आत्माराम केशव चित्रे, मुंबई, याज

कडून अवचित आणि अयाचित मला भेटीचे आमंत्रण आले. भेट होताच प्रबोधनाला १०१ रुपयांची उत्तेजनार्थ देणगी देऊन, " तुमच्या या प्रबोधन-कार्यासाठी स्वतंत्र छापखान्याची जरूर आहे. तुम्ही एखादा उत्तम छापखाना विकाऊ असल्यास शोध करा. मी पाच ते पंधरा हजारापर्यंत रकम खर्चायला तयार आहे. " असेहि त्यानी आश्वासन दिले. इतकेच नव्हे तर माझ्या बरोबर आणि स्वतंत्र रीतीने रा. चित्रेहि छापखाना शोधण्यासाठी मुंबईभर भटकू लागले. मला वाटले शाहू महाराज छत्रपतींच्या अकल्पित मृत्यूमुळे ठार * झालेला माझा छापखान्याचा पवित्र संकल्प आता खास वाढीला लागणार ! आणि तो लागलाहि. पण ही सुद्धा शनीचीच एक माया आहे, हे मला त्या वेळी कसे कळावे ? पाच सहा महिने भटकन्ती करून रा. चित्रे यानी एकदम एक दिवस थॉर्न्स कंपनीचा छापखाना खरेदी केला. मला मुळीच दाद दिली नाही. छापखाना कालबादेवी तार हापीसच्या गल्लीत आणून नीट उभा केला. पूर्वीचेच जुने कामगार नेमले आणि स्वारी मोटार घेऊन अवचित स्वाध्यायाश्रमांत आली व मला मुंबइला घेऊन गेली. " हा छापखाना, हे कामगार, आणि तुम्ही. आता काय पराक्रम दाखवायचा तो दाखवा. मी माझ्या वचनातून सुटलो. एक वर्षभर पडेल

---

* कै. शाहू छत्रपति करवीरकर यांच्या मनांत पुण्यास एक मोठा अपटूडेट छापखाना काढावयाचा होता. त्याच्या एस्टिमेटाची वाटावाट एक वर्षभर मजबरोबर त्यानी केली आणि सुरवातीचे भांडवल ४० हजार (२० हजार देणगी आणि २० हजार विनव्याजी कर्जाऊ) देण्याचा बेत कायम ठरला होता. इतकेच नव्हे तर ५ मे १९२२ रोजी रात्री ११ वाजता मला खास भेटीला बोलावून 'मी उद्या सकाळी कोल्हापुरास जातो. तूं ४-५ दिवसानी तिकडे ये आणि रकम घेऊन जा. आता या कामाला दिरंगाई नको.' असे सांगितले. मी घरी परत आलो. सकाळी ८ वाजता निजून उठतो तों सर्वत्र बातमी की " शाहू छत्रपति वारले ! "

तो तूटखर्च मी चालवीन, पुढे तुमचे तुम्ही पहा. " मला मोठा आनंद झाला. मी नियमाने छापखान्याचा धंदा चालवू लागलो. कामे मिळविण्यासाठी मुंबईभर भटकू लागलो. जेमतेम एक महिना होतो न होतो, तोंच एकदम आत्मारामजी चित्र आजारी पडले आणि न्युमोनिया होऊन चार पाच दिवसातच स्वर्गवासी झाले. आता पुढे काय ? सर्व मामला खलास. त्यांचे धाकटे दोन भाऊ एकदम वेलीफाच्या ऐटीने छापखान्यात येऊन बसले. त्यांपैकी दत्तोपंत यानी ' पुढे कसे काय करायचे ? ' असा सरळ प्रश्न तरी टाकला, पण दुसरा तरुण ग्रॅज्युएट आण्णासाहेब याने तर 'Who are you here?" (तूं येथे कोण ?) असा उर्मट सवाल टाकून आपली विद्वत्ता पाघळली. " मी येथे कोण ? या प्रश्नाचे उत्तर देणारा स्वर्गवासी झाला. त्याचा माझा ऋणानुबंध आणि ठरलेले बातबेत त्याच्या मृत्यूबरोबरच मेले. मला आता छापखाना नको न् तुमची कटकटहि नको. " असे स्पष्टोत्तर देऊन तात्काळ नगिनदास मेहता आणि गुते सॉलिसीटरांच्या ताब्यात छापछान्याचा सर्व चार्ज देऊन मी मोकळा झालो. पुनरागमनायच ! पुन्हा आमची स्वारी स्वाध्यायाश्रमाच्या ईझीचेअरमध्ये स्वस्थ ! शनीने पटकन् थोडे वर उचलून चटकन् घराडदिशी खाली आदळले. दुःखात सुख एवढेच की यानंतर मध्यंतरी राहूकेतू बंधूनी स्वाध्यायाश्रमात माझी हाडे प्रत्यक्ष चेचण्याचा जरी मातंगी प्रयत्न केला, तरी त्या वेळी मंगळ माझा जानीदोस्त असल्यामुळे, राहूकेतूचा अमंगळ उद्देश तडीला गेला नाही. तरीहि त्याचा व्हायचा तो दुष्परिणाम झालाच. त्याच वेळी श्रीयुत रामानंद चातर्जी, संपादक मॉडर्न रिव्यू, कलकत्ता, यांच्या विनंतीवरून अलाहाबादचे माझे परमस्नेही मेजर बसू याना 'स्टोरी ऑफ सातारा' ग्रंथासाठी ऐतिहासिक साहित्याची मी मदत करीत होतो आणि त्याच संधीत त्याच विषयावर मराठीत " शंभर वर्षांपूर्वीचा महाराष्ट्र " ग्रंथ लिहिण्याच्या

खटपटीत होतो. परंतु राहूकेतूच्या निष्कारण हल्ल्यामुळे माझ्या मनोवृत्तीला इतका आघात झाला कीं तो ग्रंथ आजपर्यंत नेटाने लिहून पूर्ण करण्याची प्रेरणाच मला होत नाही. सातारचे पापग्रहच साताऱ्याच्या कहाणीला नडले ! मी तरी काय काय करणार ? *

सौदागर घोडे विकायला येतो.

१९२२ च्या एप्रिलात साताऱ्यास शिवजयंति निमित्त मी तीन व्याख्याने देण्यास गेलो होतो. त्या वेळे पासून सुप्रसिद्ध कट्टे सत्यशोधक रा. भाऊराव पाटील यांचा माझा जो अकृत्रिम स्नेहसंबंध जडला, तो आजदीन पर्यंत अखंड आणि निर्मळ आहे. फार काय पण, भाऊरावाच्या मुळेच जरी सातारच्या कूपरशाहीच्या भट्टींत- मी न भूतो न भविष्यति असा तळला पोळला गेलो, तरी भाऊराव बद्दल कसल्याहि प्रकारचा विकल्प माझ्या

---

* " शंभर वर्षांपूर्वीचा महाराष्ट्र " ऊर्फ हिन्दवी स्वराज्याचा खून या ग्रंथाचे ऐतिहासिक साहित्यच छापले तर अजमासे ३०० पाने भरतील आणि विवेचनाला आणखी ५०० लागतील. एवढा ग्रंथ छापून त्याच्या हजारो प्रति अवघ्या ८ आण्यात गोरगरीब शेतकऱ्यालाहि सहज विकत घेता याव्या, या उद्देशाने कै. शाहू छत्रपति महाराजांकडून १० हजार रुपयांचे अभिवचन मिळालेले होते. त्यांच्या मृत्यूमुळे अर्थातच या उद्देशाचाहि मृत्यू झाला. गुदस्त साली विद्यमान दिवाण प्रो. आण्णासाहेब लठ्ठे यांची भेट झाली. या ग्रंथाबद्दल थोडी चर्चा झाली. त्यात ' सध्याच्या महाराजाना या विषयाची मुळीच कांही आवड नाही. त्यांच्या अत्यंत आवडीचा विषय म्हणजे घोड्यांच्या शर्यति. ' इतकाच निष्कर्ष निघाला. तात्पर्य, हे प्रचण्ड ग्रंथाचे काम मला स्वतःलाच स्वावलंबी मार्गाने केव्हां तरी पुरे करणे प्राप्त आहे. श्रीहरी मार्ग दाखवील तसे पुढे जाणे, एवढेच मला समजते.

सदसाद्विवेक बुद्धीला अझून तरी शिवलेला नाही. पण मौज काय पहा कीं सौदागराची भूमिका वठविण्यासाठी शनीने भाऊरावच पाटलाचीच योजना केली. त्याच्या तनुस्थानी शनीचे बिऱ्हाड असल्यामुळेच बहुतकरून ही योजना झाली असावी. सौदागराने दोन तीन योजनांचे घोडे बरोबर आणले होते. माझी उत्तम घोड्याची कल्पना म्हणजे छापखाना. अखेर एक दोन घोड्यांचे परीक्षण करून, अखेर कूपरच्या भागीदारीत छापखाना। हा घोडा मी पसंत केला. त्यावर मी बसता क्षणीच दादरच्या स्वाध्यायाश्रमातून मी जो उडालो, तो कुलाबा ठाणा आणि पुणा हे तीन जिल्हे ओलांडून थेट सातारा जिल्ह्यांतील पाडळीच्या मैदानात उतरलो. स्वाध्यायाश्रम म्हणजे दादरच्या सर्व नवमतवादी तरुणांच्या चळवळीचे केंद्र होते. गोविंदाग्रज मण्डळ येथेच, हुंडाविध्वंसक संघ येथेच, थोर वीर कवि जनांचे स्मृतिदीन साजरे व्हायचे येथेच, साप्ताहिक व्याख्याने प्रवचने, कलावंत गवयी कसबी यांचे गुणप्रदर्शन, गणपत्युत्सव, काय वाटेल ते स्वाध्यायाश्रमातच साजरे होत असे. मीच अवचित दादर सोडताच आश्रम बंद झाला, चळवळी थंडगार पडल्या, तरुणांच्या संघशक्तीची फाटाफूट झाली, सगळेच वाटोळे झाले.

पाडळीच्या मैदानात घोडा उतरताच, विक्रमाला जसा घोडा नदी झाडझुडपे गुप्त झाल्याचा देखावा दिसला, तसा मला भाऊरावने वर्णन करून सांगितल्यापैकी एकाहि सवलतीचा तेथे थांग लागेना. सगळेच कविवर्णन किंवा भुसावरच्या चिठ्ठयाचा अनुभव आला. पण करायचे काय ? 'तुमच्या करिता घर बांधून तयार आहे' असे स्पष्ट पत्र असताहि तेथे मजुरांच्या झोपड्यापैकीं एकींत आमची व्यवस्था लागली. खाणावळीची सोय नाही, जेवण करायला बाई किंवा बुवा नाही, सगळाच ठणठणाट !

आलीया भोगाशी दूरवर नजर देऊन सादर झाले. विक्रमाला **तामलिंदा** नगरी लाभली. मला **तामसनिंदा** पाडळी लाभली. विक्रमाला वैश्य सावकार भेटला, मलाहि कूपरच्या रूपानें तोच भेटला.

कूपरच्या कारखानीं । नांगर घडे घणाघणी ।
त्याने भला माणुस जाणोनी । आदर केला तयाचा ॥

परस्परानी एकमेकांच्या आचार विचाराचा मेळ बसवून घेतला. ती वेळ १९२३ च्या कौन्सिल इलेकशनच्या हंगामाची होती. इलेकशनच्या स्वयंवरात ब्राम्हणेतर पार्टीतर्फे दोन उमेदवार उभे रहावे, असा पार्टीचा दण्डक. पण दण्डकाला दण्डा दाखवून उभे राहिले तिघे नवरदेव. कूपरला शह जाधवरावचा आणि आचरेकराला मोर्चा दोघांचा.

त्या वैश्याची मानस-कन्यका । तिचे नाव भांडवालिका ।
तिचा पण हाचि देखा । पिता इलेकशनीं यशवंत ॥
पैसा त्याचा परमेश्वर । पारशी शोध करी निरंतर ।
लेखणीचा नसता आधार । पैसा पंगू इलेकशनीं ॥
भला भेटला हा लेखकू । गरजवंत आणि लायकू ।
भांडवालिकेशी जखडून टाकू । कशास कां कूं करील पै ॥

इलेकशनच्या धामधुमीच्या षड्रस मेजवान्या झडल्या, डावपेचाच्या झटापटी घडल्या आणि छापखान्यातून मॅनिफेस्टो हॅन्डबिलांच्या लक्षावधि बातेच्या घडाडल्या. अखेर कूपर वैश्याचा ' हत्ती ' जाधव क्षात्रियाच्या 'घोड्या' च्या जोडीनेच कौन्सिलाभिमुख झाला.

कौन्सिल-इलेकशनचा सत्यशोधकी जलसा आटोपताच, माझ्या छापखान्याचा व्यवसाय आस्ते आस्ते चालू लागला. विशेष तपशील न देता,

एवढे म्हटले म्हणजे पुरे कीं या पुढील सात आठ महिन्यांच्या अवधींत मी भांडवलशाहीच्या सपशेल पचनी पडावे, यासाठी अनेक प्रत्यक्षाप्रत्यक्ष प्रयत्न करण्यात आले. अखेर एके दिवशी

पारशी म्हणे केशवासी । चला मोटरतिं फिरावयासी ।
अति रम्य फळबागेशी । तेथे सर्व विदित होईल ॥

फळबागेत काय घडले हे वाचकाना विदित करण्याचा प्रसंग हा नव्हे. परंतु भांडवलशाहीच्या बाह्य झकपक लखाकीच्या आंत काय किंमतीचे ब्रह्मांड असते, याचा मला तेथे निश्चित थांग लागला आणि मी निषेधपूर्वक त्याचा धिःकार केला.

भिंतीचा निर्जीव हंस हाराची मोत्ये खातो.

विक्रमाने अलोलिकेच्या आकर्षणाचा जितक्या जाणत्या अजाणतेपणाने इन्कार केला, तितक्याच खुबीने भांडवलशाहीचे मला पचनी पाडण्याचे डाव मला हुकवावे लागले. हो ला हो ठोकून मी भविष्यावर शोधन–प्रकाश पाडीत होतो. बाह्यात्कारी मी कितीही उमेद दाखविली, तरी अंतर्यामी मी फार निराश बनलो होतो. पाडळी म्हणजे माझ्यासाठी अक्षरशः **तामसार्निंदा** बनली. माझा माणसांवरील विश्वासच उडाला. सारे जग मला मधुमुख विपघट दिसू लागले. ठाकरे आपल्या पचनी पडणे शक्य नाही; उलट, आपल्या घोरणांत आणि कारणांत हा जोड्यांतल्या खड्या प्रमाणेच सलणार, ही भांडवलिकेची खात्री पटल्यामुळे, तिलाहि माझे अस्तित्व जड वाटू लागले. भाऊराव पाटलाला हे दोनीहि परस्पर विरोधी देखावे स्पष्ट दिसत होते; पण त्याची प्रकृति शनीच्या पकंडीत असल्यामुळे, धड त्याला एकाहि बाजू धरता येई ना. केव्हा तरी बॉम्बचा स्फोट होणार, ही सर्वांची खात्री

होती. पण त्याच्या कर्तेपणाचा अग्रमान घ्यावा कोणी ? मृत्यू सुद्धा माणसाच्या किंवा कोणाच्याहि मरणाचे पाप आपल्या माथ्यावर न घेता, कोणत्या तरी लहान मोठ्या रोगाच्या टाळक्यावर ते थापतो. मग येथे तर काय ? धोरणी भांडवलशाही आणि तापट ठाकरे, असा मामला ! उघड घटस्फोटाची बोंब प्रथम कोणी मारावी ? एवढाच काय तो प्रश्न उरला होता.

इकडे शनीने पुण्यांत एक अकल्पित घटना घडविली. बुध आणि गुरू-वर शनीने आपली छाया टाकली. माझे परम जिव्हाळ्याचे स्नेही, प्रबोधनाचे सहसंपादक आणि अनन्य भक्त स्वर्गवासी रामचंद्र वामन उर्फ बापूसाहेब चित्रे, बी. ए. याना पुण्यास स्वतंत्र **प्रबोधन छापखाना** स्थापन करून, **प्रबोधन पाक्षिक** तेथे स्वतःच्या जबाबदारीवर पण माझ्याच संपादकत्वाखाली चालविण्याची प्रेरणा झाली. त्यानी एक विकाऊ छापखाना सहजगत्या हेरला, आणि अवचित एके दिवशी एका गायतोंड्या भटाला घेऊन बापूसाहेब पाडळीला आले. हा गायतोंड्या पुणेरी भट म्हणजे शनीने निर्माण केलेला ' भिंतीचा निर्जिव हंस असून तो लवकरच सजीव होऊन माझ्या व्यव'हाराची मोत्ये' मटामट मटकावील, अशी आम्हा कोणालाच कल्पना येणे शक्य नव्हते. हा निर्जीव हंस ज्या दिवशी पाडळीला आला, त्याच दिवशी माझी एक अपत्य हंसी मृत झाली. त्या अपत्याला मातीआड दृष्टी-आड करण्यासाठी त्याच्या समाधीवर दगड ठेवीत असतानाच भी त्या पुणेरी दगडाबरोबर, दगडाची छाती करून, छापखाना-खरेदीच्या पाटावरवंट्याची वाटाघाट करीत होतो. या प्रसंगी अपत्यशोकाने विदीर्णहृदय झालेल्या माझ्या सहधर्मचारिणीने " प्रबोधना पुढे पोटच्या गोळ्याची सुद्धा याना तिडीक येत नाही " हे काढलेले उद्गार भी वत्सलांच्छना प्रमाणे माझ्या हृदयावर

आमरण धारण केलेले आहेत. हाच माझा व्हिकटोरिया क्रॉस. यात माझी सत्वपरीक्षा झाली. तत्वपरीक्षा पार पडली. सुख दुःख प्रेम आदर आणि कर्तव्य यांचा हा संमिश्र विजय होय.

'माझे नाव आणि बापूसाहेबांचे गाव' अशा सोयीस्कर अटीवर, सर्व जबाबदारी पत्करून बापूसाहेबांनी पुण्याचा आयता चालू छापखाना आपल्या ताब्यात घेतला. माझे परमस्नेही सातारचे सराफ श्री. नारायण बळवंत बाळवेकर यांच्या मार्फत आणि प्रबोधनच्या शिल्लक फंडांतून तात्पुरत्या काम-चलाऊ रकमांची सोय मी बापूसाहेबाना करून दिली. पुण्यास प्रबोधन छाप-खाना स्थापन झाला व तशी मी प्रबोधन पाक्षिकात उघड जाहीरातहि दिली-पाडळ्यांच्या भांडवलशाही घवलगिरी वरून शनीला मला झटका देऊन खाली आदळायचे होते, म्हणून त्याने ही पुण्याच्या छापखान्याची 'माया' निर्माण केली.

झाले ! भांडवलशाहीला कुरापतीच्या सबबीला एवढे कारण पुरे झाले. तिची बुरखेबाज कुजबूज सुरू झाली. कारस्थानांच्या पुलाव्याच्या हंड्या शिजू लागल्या. मला त्या कळत होत्या, दिसत होत्या, प्रत्यक्ष ऐकू येत होत्या. भिंतीवर चितारलेला हा निर्जीव हंस खुंटीवरील हाराचे मोत्यांचे सर गटायस्वाहा. करीत आहे आणि या सर्व बुरख्या कारस्थानांचा माझ्यावर निष्कारण आघात होणार, याची मी पूर्ण जाणीव बाळगून होतो. पण कर नाही त्याला डर कशाला ?

हें शनिदेवाचे छळण । त्याणें रचिली माया जाण ॥

काय व्हायचे असेल ते होवो. माझ्याशी प्रत्यक्ष पुराव्याचा प्रश्न आल। तर त्याचा निःसंदिग्ध फडशा पाडायला मी खंबीर आहे. पण, शनिमाहात्म्या-

तल्या अलोलिकेला विक्रमावर प्रत्यक्ष चोरीचा आळ घेण्याचे वास्तवीक जे नीतिधैर्य होते, तेवढे सुद्धा धैर्य पाडळीच्या भांडवलिकेत मला दिसून येइना. जगांतील भांडवलशाहीच्या पिंडाच्या परिमाणूंचे पृथःकरण केले, तर त्यात नीतिधैर्याचा (मॉरल करेज) खडखडाटच दिसून यायचा. भांडवलशाहीचा पैसा-परमेश्वर प्रतिसृष्टया निर्माण करण्यात विश्वामित्रालाहि जरी ढोपरे टेकायला लावतो, तरी पाणबुड्याचे मरण पाण्यात, या नियमाने अखेर तो परमेश्वर पैशाच्या पाशातच पासला पडतो, हा इतिहाससिद्ध सनातन सिद्धांत आहे, आणि चालू घडीच्या जगाच्या भांडवलशाही राजकारणात (इंपिरिआलिस्टिक पॉलिटिक्स) हाच सिद्धांत जगाच्या सार्वत्रिक चळवळीत विशेषत्वाने सिद्ध होऊ पहात आहे.

कै. बापूसाहेब चित्रे यानी पुण्यास प्रबोधनाचे नुसते नाव देऊन एक चालू आयता छापखाना सुरू करताच, या भांडवलिकेने त्यावर असा खोडसाळ अर्थ बसविला कीं ठाकरे यानी पाडळीच्या छापखान्यातले साहित्य लांबवून पुण्यास नवीन छापखाना काढला. पण हा आरोप कोणी उघड बोले ना ! माझा संताप अनावर झाला. अत्यंत गरीब कुटुंबात मी जन्मलो आणि विपन्नावस्थेची कमाल कसोटीची संकटे अनुभवून मी मला आणि माझ्या घराण्याला इभ्रतदार गृहस्थपदाला आणले; पण माझ्या दुर्दिनांच्या तुफानी काळातहि माझ्यावर कोणी चोरीमारीचा अगर ठकबाजीचा आरोप कधी केला नाही. पण या ठिकाणी शनिमाहात्म्याचे नाटक वठत होते. सौदागर भाऊरावहि चिडला. अखेर सर्व नाटकाचे भरतवाक्य शांतपणाने आणि चांगुलपणाने पार पडावे, म्हणून मी तावडतोब सर्वसंन्यासाच्या उद्देशाने भांडवलिकेच्या पित्याला भेटीस बोलवून सर्व परिस्थितीचा भाऊराव समक्ष स्फोट केला. उपरोक्त ' आरोपांत माझा कसलाहि भाग नाही, विश्वास

नाही, मला तसे दिसत नाही, वाटत नाही. खोडसाळ क्षुद्रांच्या बडबडीवर आपण विचार करू नये. ' असे म्हणून पित्याने कानावर हात ठेवले. सिद्ध-साधकपणाची तामसानिंदा पाडळीची यंत्रतंत्ररचना मी पूर्ण अभ्यासिली असल्यामुळे, ' आपला छापखाना, साहित्य, हिशोब ठिशोब काय असेल नसेल ते स्वाधीन घ्या. मी आता येथे पाणी प्यायलाहि राहणार नाही ' असा स्पष्ट खुलासा करून, सर्व कारभाराचा मी पद्धतशीर व निःसंदिग्ध चार्ज दिला आणि कफल्लक * अवस्थेत पाडळीच्या शनिमाहात्म्याच्या नाट्यप्रयोगाचा एक अंक पुरा केला. शनीने मला खूप उंचीवर नेले आणि अवघ्या १२ महिन्याच्या आंत माझ्या सर्वस्वाचे बारा वाजवून, आपल्या पराक्रमाची मला पहिली सणसणीत सलामी दिली.

---

* पाडळीच्या वनवासात मी सर्वसंन्यास कसा केला, वाजवी घेण्यावर थुंकून नसत्या देण्याची प्रॉमिसरी नोट कां लिहून दिली, वगैरे हकिकत मी ' लोकहितवादी ' आणि ' प्रबोधन ' पत्रांत स्पष्ट प्रसिद्ध केलीच आहे. पाडळी सोडली तेव्हा मी अक्षरशः ' निर्निकल ' स्थितींत होतो. माझे मित्र किन्हईचे डॉ. पाटणकर व सातारचे सराफ श्री. नारायणराव वाळवेकर यांनी द्रव्यसहाय दिले, तेव्हा मी पुण्यास जाऊ शकलो. शिवाय, छापखान्याचा चार्जशीट, हिशोब, खरेदीपत्रकानुसार साहित्याची मोजदाद करण्याच्या कामी डॉ. पाटणकर, पंत पराडकर, दत्तोपंत देशमूख या मित्रांनी मला जे सहाय दिले व माझ्या चित्तक्षोभाला विवेकाचा पाठिंबा दिला, तो मी आमरण विसरणार नाहा. त्याच प्रमाणे माझ्या खासगी सामानाची बांधाबांध होत असताना, त्यात नजरचुकीने जाणून अगर नेणून काही ' चोरीचा माल ' जात आहे कीं काय, हे माझ्या खास आग्रहावरून तपासण्याचे काम माझे मित्र व कूपर. फॅक्टरीचे पेशवे रा. रा. बंड यानी केले व माझ्या रहाल्या झोपडीची झडती निर्दोष पाहिली, याबद्दल मी त्यांचाहि फार आभारी आहे.

प्रकरण ७ वे

खास शनिग्रहाच्या अड्डयांत.

स्वर्गवासी मऱ्हाठी इतिहासाचार्य राजवाडे पुण्याविषयी " पुणे हा एक मोठा शेतखाना आहे " असे उद्गार काढीत असत. हा सिद्धांत त्यानी ऐतिहासिक दृष्ट्या ठरविला, का आरोग्यशास्त्र दृष्ट्या काढला, हे समजणे कठीण आहे. तथापि त्यात पुष्कळच तथ्य आहे, यात संशय नाही. मी राजवाड्यां इतका पुढे न जाता, इतकेच स्वानुभवपूर्वक म्हणू शकेन कीं " पुणे हा एक शनिखाना आहे. " पुण्याची नजर जेथेजेथे गेली तेथेतेथे साडेसातीचा ज्वालामुखी फुटून सत्यानाशाचा कहरच गुदरला, असा मागील आणि चालू इतिहासाचा पुरावा आहे. पुणे शहराची कल्पना आणि स्थापना शनिवारीच घडलेली असावी, असा माझा तर्क आहे. मऱ्हाठी साम्राज्याची राखरांगोळी करणाऱ्या शनिखान्याच्या आद्यशनीचा वाडासुद्धा शनिवारवाडा आणि त्याच्या पेठेचे नावसुद्धा शनिवारपेठच! पुण्याच्या पेशवाईचे पापड भाजून, सातारच्या छत्रपतीच्या सिंहासनाची राखरांगोळी करणाऱ्या बाळाजीपंत नातूशनीचे वास्तुमंदीरहि याच शनिवारपेठेत. इतर कोणत्याहि शहरात अगर गावात बहुशः न आढळणारे शनीचे देऊळ *फक्त पुण्यातच अग्रमान पावलेले आहे. इतर ठिकाणचे ब्राम्हण ध्रुव लोक, तात्याजी महिपतीच्या व्याख्ये प्रमाणे, जरी गुरुग्रहाच्या गुणधर्माचे असले, तरी या शनिखान्यातला एकजात ब्राम्हण हमखास शनीचा अवतार असतो. इतकेच नव्हे, पण बाहेरचा कोणीहि शहाणा अथवा बावळा-गुरू एकदा का पुण्याच्या शनीच्या कक्षेत आला कीं त्याला त्याने तात्काळ आपणा-

---

* वसईला एक शनीचे देऊळ आहे आणि ते रास्तच आहे. रावबाजी शनीच्या मर्दुमकीचे स्मारक म्हणून पुण्याचा प्रतिध्वनि वसईला उमटला, तर त्यात चूक ती कशी ?

सारिखा केलाच म्हणून समजावे. विशेष लक्ष्यात ठेवण्यासारखी गोष्ट, पुण्याच्या पेठांच्या नावांत सगळ्या वारांची नावे आहेत, पण त्यात ब्राम्हणी गुणधर्माच्या गुरूवार पेठेच। अज्जीबात लोप झालेला आहे. पुण्यांत सगळे वार आहेत, गंज आहे, भवानी आहे, वेताळहि आहे; पण गुरू मात्र कोठेच नाही. सगळे महत्व शनीला ! इतक्या पराक्रमी आणि तात्काळ-परिणामी शनिखान्याचे स्थानमाहात्म्य सर्व ब्राम्हणेतर रहिवाश्यांवर थोडे फार पडल्याशिवाय कसे राहणार ? आणि व्यवहाराच्या दृष्टीने विचार केला तर ज्या ब्राम्हणेतराना शनिखान्यातल्या शनींशी हरघडी काही ना काही व्यवहार पडायचाच, तेथे त्याना आपली मनोवृत्ति, जबरदस्ताचा टिकाव साधण्यासाठी, सवाईशनि बनविणे प्रातच आहे. कितीहि सरळ आणि सात्विक वृत्तीचा मनुष्य असो, तो शनिखान्यात गेला पुरे कीं त्याला शनीची बाधा झपाटल्याखेरीज राह्यचचि नाही. कोणतीहि लहान मोठी चळवळ घ्या किंवा चळवळ्या घ्या, तिकडे पुणेरी शनींची नजर जाताच, तिची आणि त्याची साडेसातीच्या चरकात गठली वळलीच पाहिजे. गेल्या काळच्या मेल्या गोष्टी सोडल्या, तरी गणपति उत्सव काढणारा हाच शनि, आणि त्याचा भाद्रपदी शिमगा बनविणारा हाच शनि. महात्मा गांधीच्या चळवळीला हाच शनि भोवला आणि अस्पृश्यांच्या आत्मोद्धाराच्या राशीला याचीच साडेसाती खपाटी बसली आहे. शुद्धीचे खानावळी ताक हाच शनी घुसळीत आहे, आणि संघटनाचे थालीपीठ हाच थापटीत बसला आहे. दृक्प्रत्ययाच्या पुण्याईवर ज्योतिषशास्त्रात ढवळाढवळ करणारा हाच; आणि अखिल जनतेच्या पितर-पक्षातल्या खिरीवर स्वतःची एकांडी लोकमान्य दिवाळी साजरी करणारा हाच. नवमतवाद, मग तो इरसाल भटोत्पन्न असो वा भटेतरोत्पन्न असो, त्याच्या बोकांडी पुण्याचा शनिबसला नाही, असे कधीच घडले नाही. नवमतवादी सुधारकांचा पुण्याच्या शनिखान्याने आजपर्यंत जसा आणि जितका

छळ केलेला आहे, तसा आणि तितका छळ खास शनीनेहि कोणाचा केला नसेल. पुण्यात बुधाच्या बुधवार पेठेला बरेच बाजारी महत्व असल्यामुळे, तेथील चळवळी बाहेरच्या लोकाना मोठ्या दणदणाटाच्या वाटतात. पण ती सुद्धा महाराष्ट्राच्या या शनिखान्याची एक महामाया आहे, हे पुष्कळ बावळटांच्या सहसा लवकर लक्ष्यात येत नाही. आकाशस्थ नवग्रहांत जसा शनि, तसे महाराष्ट्रात पुणे, एवढे म्हटले म्हणजे पुरे आहे.

मन्हाठी इतिहासाच्या अध्ययनामुळे मूळपासूनच मला पुण्याचे काहीच आकर्षण नव्हते व सध्याहि नाही. पुण्यात राहण्याची पाळी कधी काळी मजवर येईल, अशी मला स्वप्नातहि कल्पना नव्हती. पण शनीच्या साडेसातीला अशक्य काय ? मी पुष्कळ नको म्हटले म्हणून शनि थोडेच मानणार ? कै. बापूसाहेब चित्र्याना 'बनवून' त्याने प्रबोधन छापखान्याचा जो 'भिंतीच निर्जीव हंस' पुण्यास निर्माण केला, त्याच्या आकर्षणाने पाडळीला सणसणीत हापटी खाऊन मी जो टाणकन् उशीसरसा उडालो तो नेमका शनिखान्याच्या जबड्यात ! तीन वर्षांच्या नियमित आणि सडेतोड कामगिरीने आधीच प्रबोधन पाक्षिक म्हणजे पुण्याच्या शनिदेवांच्या डोळ्यात वडसा प्रमाणे सलत होते. त्यात आता खास प्रबोधन छापखान्याचीच छावणी शनिखान्याच्या अड्ड्यात आल्यावर, त्यांच्या पोटात शनिगोळा कां उठू नये ? सगळे इरसाल शनि कावळ्यांप्रमाणे एकचित्त एकपित्त एकत्र जमले. आधीच त्या गायतोंड्या भटाने छापखान्याचा व्यवहार म्हणजे केवळ शनीची माया करून, बापूसाहेब चित्र्यासारखा सरळ मनाच्या तरुणाला बिनबोभाट भुरळले होते. त्या छापखान्यावर जवळ जवळ २०-२५ सावकारांच्या डिक्र्या लागू असतानाच, मे महिन्याच्या कोर्टाच्या सुट्टीच्या अवधीत, त्यान हव्या त्या सवलतीने विक्रीचा विधी उरकून घेतला. म्हणजे कोर्टाच्या

भट्टीत भाजले जाणारे सावकारी बटाटे परस्पर फोफाट्यातून बाहेर काढण्या-साठी, त्या भटी मर्कटाने आम्हा दोघाना मांजराच्या डावल्या बनविले. मी पुण्यास पाऊल ठेवताच हे सर्व मायावी नाटक मला स्पष्ट उमगले. आता काय करायचे ? दिवाणी फौजदारीची कज्जेदलाली लढवीत बसायचे, का ' अर्धम् ' च्या ऐवजी ' सर्वम् त्यजति पण्डितः ' करायचे ? ' विश्वास ' आणि ' वचन ' या दोनहि चिजा धुक्या इतक्याच मायावी ठरल्यामुळे, तरुण बापूसाहेब चित्रे दिङ्मूढ बनले. नाना प्रकारचे नाटकी मुखवटे घालून पुणेरी शनिदेवांच्या टोळ्याच्या टोळ्या मला उलट सुलट उपदेशाने ' मदत करण्यासाठी ' माझ्या बिऱ्हाडी घिरट्या घालू लागल्या. गाय-तोंड्याच्या ' डिक्रटलेल्या ' सावकारानीहि हाच क्रम पत्करला. प्रतिवादीचे गुप्त कारस्थान सावरण्यासाठी नकली वादीचे वकीलपत्र घेऊन खटले झुंज-विणारे कित्येक झुंझार कोंबडे विश्रामबागेच्या उकीरड्यावर आरवू लागले. ज्यांचा माझा जन्मात कधीं संबंध आला नाही व ज्यांची काळी गोरी तोंडे मी एकदाहि पाहिली नाहीत, अशा निवडक इरसाल शनींची एक दिवस तर माझ्या बिऱ्हाडी मोठी शनिकॉन्फरन्सच भरली. त्यांत ' श्रीमंत ' पदवी धारण करणाऱ्या वेड्या पासून तों हाटेलात खरकट्या कपबशा विसळून पोट भरणाऱ्या महात्म्यापर्यंत सर्व दर्जाच्या वेदोनारायण शनींचा भरणा होता. या कॉन्फरन्सने मला पुणेरी भटांच्या शनिमाहात्म्याचा जो अथांग थांग लागला, त्याची किंमत दहा टाटांच्या ऐश्वर्यालाहि देता देववणार नाही. पुण्यात उलट सुलट कायदेबाजीच्या भानगडी कोण कोण कसकसे चाल-वितात, याचा मला पुरा छडा लागला. अखेर उडदामाजी काळे गोरे निवडीत बसण्याची वांझोटी खटपट करीत न बसता, मी प्रबोधन छाप-खान्याचा बोर्ड काढून घेऊन, त्यावरील माझ्या नावाच्या संबंधाचा जाहीर संन्यास केला. गायतोंड्याला दिलेले पैसे, छापखाना चालविण्यात झालेला

खर्च, बुडालेली बिले* वगैरे बाबतींत अजमासे दीड दोन हजारांची कच-कचीत ठोकर खाऊन, या 'भिंतीच्या निर्जीव हंसा'पायी मी सक्षौर प्रायश्चित घेतले. विक्रमाच्या कहाणीतला हंस हाराची मोत्ये गिळून निर्जीव चित्रावस्थेत भिंतीवर कायम तरी राहिला, पण माझ्या कहाणीतला हंस भिंतीवरून सुद्धा साफ नाहीसा झाला.

पाडळी सोडताना पाय ठेवण्यासाठी शनीने निर्माण केलेली ही मायेची पायरी पायाखालून निसटताच मी खास शनीच्या अड्डयातच हातपाय तुटून निर्निकल अवस्थेत चारी मुंड्या चीत पडलो. प्रबोधन बंद पडला. हातातली जीवनदेवता लेखणी सांदीला पडली. माझ्या विक्रमाचे हातपाय तोडले जाऊन मी अक्षरशः अस्तित्वातून उखडला गेलो. असून नसून सारखा झालो. पुढे काय ?

आपत्तींचे आघात ग्रहांच्या दशेने घडोत वा माझ्या व्यावहारीक मूर्खपणाने होवोत, त्यांच्या उत्पत्ति स्थिति लयाची चिकित्सा करून, प्रयत्नवादाची समशेर विशेष हट्टी आग्रहाने पाजळण्याचा माझा प्रकृतिधर्मच आहे. हट्टी निश्चयाने मी एकदा एकाद्या घटनेचा पिच्छा पुरवू लागलो कीं त्यात तोंड फुटले तरी माघार घेण्याचा गुणधर्म माझ्यात नाही. हातपाय तुटले किंवा कोणी माहात्म्याने तोडले तर धुळीत लोळपाटणे न घेण्याइतका मी मर्त्य मानव नव्हे की काय ? विशेषतः भिक्षुकशाही कारस्थाने हाणून पाडण्यासाठीं स्वतःचे नाक कापून भटाना अपशकून करायला मी कधीच कमी करणार नाही. आदळआपट्या शनीने मला सर्वस्वनाशाच्या मसणवटीत बसवता बसवताच, माझ्या जन्मजात प्रयत्नवादाच्या डुक्कर-

---

* यांत एका 'स्वदेश'भक्तानेच २५० रुपयाचे बिल बोलबोलता बुडविले. तपास करता हा त्याचा नेहमाचाच धंदा आहे, असा ठाव उमगला.

मुसंडीच्या पलीत्यावर एका जबरदस्त निश्चयाच्या चकमकीची ठिणगी पाडून त्याला भडकवला. मायावी प्रबोधन छापखान्याच्या पाठ्या खाली उतरण्यासाठी माझा मनुष्य बापू जाधव गेला असता, काही निवडक शनिदेवांनी एक पाटी लाथ मारून खाली पाडली आणि त्यावर थुंकीमिश्रित राकेल ओतून ती भररस्त्यावर जाळली. शेलक्या शिव्यांच्या नांदी भरतवाक्यात "पुण्यांत प्रबोधन ? आम्ही जिवंत असता ही ब्राम्हणेतरी महामारी येथे ? अशी जाळून खाक करू." असा त्या पवित्र ब्रम्हवांत्युत्पन्नानी मोठा वेदघोष केला. सात्विक संतापाने प्रबोधनाभिमानी जाधवने मला ही गोष्ट सांगताच माझा प्रयत्नवाद बेफाम फुरफुरला आणि "करीन तर या शनिखान्यातच स्वतंत्र प्रबोधन छापखान्याची प्राणप्रतिष्ठा करीन," अशी मी प्रतिज्ञा केली. "पुण्याचे पाणी पिऊन माणुसकीवर निखारे ओतण्या इतकी माझी जीवनचर्या शनीच्या पिंडाची बनविण्याची जरी मला इच्छा नाही, तरी केवळ या इरसाल शनींच्या कृत्याचा सक्रीय निषेध म्हणून कमीत कमी दोन वर्षे तरी प्रबोधन छापखाना या शनींच्या छातीवर बसून चालवीन मग मला जिकडे जायचे तिकडे जाईन. पुण्यांत प्रबोधन ? होय पुण्यांत प्रबोधन चालवून दाखवीन. ठार मेलो तरी हरकत नाही. भडाडलेल्या होळीत उभा राहून या शनींच्या शनिमाहात्म्याचे दात पाडीन, तर नावाचा ठाकरे !" या माझ्या प्रयत्नवादी महत्वाकांक्षेला बापूसाहेब चित्रे आणि बापूजाधव यानी पूर्ण पाठिंबा देताच, मी स्वतंत्र छापखान्याच्या व्यवस्थेसाठी मुंबईस आलो.

मुंबईत शनीचा मायाबाजार.

मुंबईस येताच भांडवलासाठी लहान मोठ्या कर्जाऊ रकमा मिळविण्याच प्रयत्न करू लागलो. बारीक सारीक तपशील न देता, एवढे म्हटले म्हणजे

पुरे कीं त्या माझ्या भिक्षांदेहीच्या दौऱ्यात मी एकहि गरीब श्रीमंत लुच्चा खऱ्या मित्र भेटल्याशिवाय सोडला नाही. या भटकन्तीत मला माणसाची खरी पारख झाली. झऱ्या ढऱ्यांचे अंतरंग समजले. लोकहिताच्या कळकळीच्या पावशेर दुधात आत्मस्तोमाचे दीडशेर पाणी ढकलून गवळ्याचा धंदा करणारे ढवळे पवळे कोणकोण आहेत, याची मी यादी तयार केली. जवळ ट्रामपुरतेहि निकल नसल्यामुळे, सकाळपासून रात्रीपर्यंतची साऱ्या मुंबई शहरातली भटकन्ती दादरहून पायी चालत जाऊन करीत असे. माझे हे वांझोटे प्रयत्न कडव्या निश्चयाने चालू असता, दुसरीकडे शनि आपल्या कारस्थानाची हंडी शिजवीतच होता. शनीचा एक गुणधर्म मी मागेच सांगितला कीं तो आपल्या बळीला कायमचा मारून पाडीत नाही, तर एकदा हापटतो आणि लगेच त्याला हात देऊन उठवतो. त्याने पाडळीला आणि पुण्याला माझा चेंदामेंदा करून जमीनदोस्त पाडले. एवढ्याने त्याचे समाधान होणारे नव्हते. अर्थात् माझी कणिक आणखी तिंबविण्यासाठी मला हात देऊन उठविणे शनीला भागच होते; आणि हे काम त्याने इतक्या सफाईत पार पाडले कीं माझे मलाच अझून आश्चर्य वाटत आहे.

या वेळी मला भेटलेला मानवी शनि हुबेहूब तात्याजी महिपति कृत वर्णनाचा होता. त्याने जिव्हाळ्याच्या जानीदोस्तीचा मुखवटा घालून, भांडवल-जमाईच्या कामी मला कायावाचामने फार मदत केली. * हातात थोडी रकम पडताच छापखान्याच्या सर्व सामुग्रीची गुजराथी टाईप फौंड्रीला मी ऑर्डर दिली. सर्व सामान एकामागून एक पुण्यास रवाना होऊ लागले. जेहत्ते

---

* कारण याच मदतीच्या सुरांने पुढे त्याला माझा गळा सफाईत चिरावयाचा होता ! एका वेळचे अमृत दुसऱ्या वेळी त्याला जहर बनवायचे होते !

इतुक्यांत काय वर्तली माव । फौंड्रीला झपाटी शनिदेव ।
ट्रेडलचे पॉकिंग सावयव । ढिले खिळाखिळे घडले पै ॥
वसता आगगाडीचा धक्का । ट्रेडलचा चुरा झाला पक्का ।
फुटला आरपार खोका । मशिनरी सर्व मोडली ॥
पुण्याहून घडकली तार । ट्रेडल वगैरे मेले ठार ।
एकेका पार्टीचे तुकडे चार । आटोपला बाजार सर्वस्वी ॥
धाविन्नलो पुण्यनगरा । गोळा केला यंत्राचा चुरा ।
परत आणिला मुंबापुरा । रिपेरीस टाकला फॅक्टरीं ॥

शनिचा घाव नेमका वर्मावर असतो. छपाईचे साधन जे ट्रेडल तेच मोडल्यावर इतर सामुग्रीला काय चाटायची ? प्रथमग्रासे मक्षिकापात पुरवला, पण हा प्रथम प्रयत्ने वज्राघातच झाला. तरीहि धीर न सोडता किंवा निराशेने खचून न जाता, वचने मिळालेल्या भांडवली रकमा गोळा करण्यासाठी मी भटकन्ति करू लागलो. एक दिवस एका झब्बूच्या भेटीसाठी कल्याणला गेलो असता, उजव्या पायात पेटका आला. कसाबसा दाबला. स्टेशनवर आलो तो एकदम उजव्या भागात आपादमस्तक तिडका सुरू झाल्या. जेमतेम दादरला घरी येऊन पडलो. पाठोपाठ डेंग्यू× काविळ× मूळव्याध या त्रयीने जों बिछान्यात पडलो तों तब्बल चार महिने ! छापखान्याची अर्धी सामुग्री पुण्याला, अर्धी मुंबईत रिपेरीला आणि मी मृत्यूच्या पंथाला ! खर्चाचे भयंकर तोंड लागलेले आणि पैशाचा पुरा खडखडाट. रकमांची वचने दिलेले लोक सुद्धा थापबाजी करू लागले. एका इरसाल 'राव' झब्बूने थापबाजीच्या बाबतीत तर माझे पुरे कल्याणच केले. श्रीहरीची कृपा म्हणून मी या दुखण्यातून वाचलो; नाहीतर तोंडात तुळशीपत्र ठेवण्यापर्यंत पाळी आलीच होती.

आजार हटला, मशिनरीचे पार्ट दुरुस्त होऊन आले आणि मी अस्थि-पंजर स्थितीत १९२५ जानेवारीअखेर पुणे गाठले. ताबडतोब प्रबोधनाचा अंक काढण्याच्या खटपटीला लागलो. पण शनीला माझ्या उरल्या सुरल्या हाडांचे पीठ करायचे होते. प्रबोधन छापखान्याची उभारणी ज्यांच्या हिंमतीवर केली, त्या श्रीयुत दत्तोपंत देशमुखांचे वडील वारल्याची एकाएकी तार आली आणि ते कायमचे निघून गेले. मशिन चांगले 'फिटप' केले, तरी एप्रिल पर्यंत ते सात वेळा फुटले. एकदा तर भयंकर अपघातच टळला. या कामी पैशाचा इतका चुराडा झाला कीं चालत्या छापखान्यात फाटक्या खिशाचा मालक, अशी माझी स्थिति झाली. या वेळीच 'कोदण्डाचा टणत्कार' ग्रंथाची दुसरी आवृत्ति लिहून प्रसिद्ध केली आणि त्यामुळे माझी सांपत्तिक स्थिति पुष्कळच सावरली गेली. प्रबोधन नियमित चालू झाला, छापखानाहि व्यवस्थित बनला, आणि लग्नाळ्या युवती प्रमाणे लक्ष्मी जरी माझ्या गळ्यात चतुर्भुज धावत येऊन पडली नाही, तरी रोजच्या मीठ भाकरीची ददात तिने ठेविली नाही. मी, श्रीयुत कै. चित्रे आणि माझे विश्वासू चार कामदार, देव बुद्धी देईल तसे, एका जीवाभावाने प्रबोधन कार्याचे गाडे रेटीत होतो. अल्पसंतोष हाचं आमच्या जीवनाचा वाटाड्या असल्यामुळे, सुक्या ओल्या भाकरीचे अमृत करून व्यवहार चालवीत होतो.

प्रबोधन चालू होताच त्यात मुमताज-होळकर प्रकरणावर कडव्या निर्णयाचे कडकडीत लेख येऊ लागले. चालू घडीच्या मिलर-होळकर-प्रणयाच्या यल्लमाच्या थाबड्या डोक्यावर घेऊन नाचणाऱ्या भटी वृत्तपत्रांनी आणि झब्बूंनी त्या वेळी होळकराच्या डोईमिशीचा केस न् केस उपटण्याचा देशद्रोही शिमगा चालविला होता. क्षात्रबच्चे मराठे पत्रकार व झब्बू खव्या ब्राम्हणालाहि लाजवील अशा निर्विकार महंतावस्थेत तो शिमगा पहात स्वस्थ

वसले होते. अशा चमत्कारीक प्रसंगी प्रबोधनाने या सर्व विरोधकांच्या सैन्यावर कदरबाज वाग्शस्त्राची बातेरी झाडून त्यांची भटी कावकाव बंद पाडली. अर्थात् त्यामुळे सारा पुणेरी शनीचा कंपू प्रबोधनावर आतल्या आत धुमसत होता. इतक्यात पुण्यास ब्राम्हणेतरी चळवळीने उग्र रूप धारण केले. ' देशाचे दुष्मन् 'मुळे जेधे जवळकरावर शनीची संक्रांत वळली. त्याला दुजोरा म्हणून भटांनी घनवडे प्रकरणाचा पराचा पारवा केला. जेधे जवळकरानी टिळक–फुले–पुतळा प्रकरणाने त्याला प्रत्युत्तर दिले. जेधे जवळकरादि मराठे अडाणी आहेत, तोंडाने बेफाम असले तरी लेखणीत कच्चे आहेत, वगैरे स्वयंमान्य गैरसमजुतीने शनिदेवांनी असा पक्का निर्णय ठरविला की या साऱ्या ब्राम्हणेतरी तुफानाचे गुप्त सूत्रधार ठाकरेच होते, आणि हा सूत्र-धार चांगला वेचून पुण्यातून कायमचा उखडल्या खेरीज, पुण्याचे पुण्यपावन शनिमाहात्म्य यापुढे जगणेच शक्य नाही. हा निर्णय किती क्षुद्र मनाची अवलाद होता, हे चाणाक्ष वाचकाना सांगणे नकोच. पण त्या दिशेने मला खाड्यात घालण्यासाठी कित्येक कज्जेदलाल शनि माझ्या लेखांवर आणि ग्रंथांवर रात्रं-दिवस आपल्या अक्कला आपट आपट आपटीत होते. घमक्यांची आणि खुनाची पत्रे तर माझ्या आंगवळणीच पडली होती. पर्वतीच्या बाजूला फिरायला गेलो असता मोरेकऱ्यांच्या गुप्तछाप्याचाहि अनुभव घेतला. पण माझ्या काठीतल्या गुप्ततलवारीचे पाते बाहेर झळकताच ' क्षात्रःक्षात्रभंटो-भंटः ' एवढ्यावरच मुकाट्याला मिटला. धनवडे प्रकरणाच्या तिसऱ्याच दिवशी व्हिजिट कार्ड छपाईच्या सबबीवर, हाताला बँडेज बांधलेले एक तरुण शनिदेव, गामा गुंगाच्या ऐटीने, थेट माझ्या माडीवर चढून आले. हेतू एवढाच की ठाकरे व्यक्ति किती लांबरुंद जाडपातळ आहे, हे प्रत्यक्ष पाहून ठेवावे. मी त्याना योग्य ती माहिती दिली, तेहि चार शब्द गोड बोलले,

आणि गेले. घनवडे प्रकरणनिषेधाच्या शिव्याजी * मंदिरातल्या सभेच्या दिवशी सायंकाळी तर प्रबोधन छापखान्याच्या पाटीचा शनिदेवांनी एवढा गौरव केला कीं तेवढा राष्ट्रीयसभेच्या कोणत्याहि अध्यक्षाच्या मिरवणुकीत झाला नसेल. सभेकडे जाणाऱ्या प्रत्येक शनिटोळींतला प्रत्येक महात्मा प्रबोधन छापखान्याच्या पार्टीकडे मुद्दाम वळून थांबथांबून बोटे दाखवीत होता व छत्र्या उडवीत होता. पण मी शनिग्रहाच्या मोटारीत बसलेला पॅसेंजर असल्यामुळे, मला ठार मारून साडेसातीचे नाटक कायमचे बंद पाडण्या इतका तो मूर्ख नव्हे, हे मात्र एकाही महामूर्खाच्या ध्यानात येईं ना ! मी मोटारीचे आचके दचके हवे तितके खाईन, पण मरणार कसा ? मी मेलो, माझे चरित्र आटोपलें कीं शनीहि मेला, त्याचे माझे नाते गोते मेले. मग माझी साडेसाती तो दुसऱ्या कोणावर उगवून घेणार ? गणिताचा ठोकताळा चुकवून हव्या त्यावर हवी तेव्हा शनि वक्रदृष्टी करू म्हणेल तर त्याच्या डोळ्याला विक्रमाच्या घाण्याच्या बैलाचा चष्मा लावायला कोणीहि कमी करणार नाही !

पुणेरी शनिदेवांच्या सर्वच शनिलीला काही और! वाचकाना शितावरून भाताची पारख होईलच. मुद्रण प्रकाशनाच्या धंद्यावर सांपत्तिक दृष्ट्या मी थोडा सावरतो न सावरतो तोंच टेंम्पट्रेस पुस्तकाच्या खटल्याचा बॉम्ब फुटला आंणि त्यात होते नव्हते त्याची वस्त्रगाळ चांदी आटली. शनिदेव संतुष्ट झाले ! शापादपि शारादपि च ते ! दोनीहि अस्त्रांचा मारा, इंद्रजितावर सुटलेल्या लक्ष्मण-

---

* पुण्याच्या सदाशिव पेठेत भटांनी थापलेले शिवाजी मंदीर हे शिवाजी मंदीर नसून, त्याला शिव्याजी मंदीर म्हणणेच रास्त होईल. या कूसबंद भटी किल्ल्यात यच्चावत् ब्राम्हणेतरांच्या चळवळीना मनमुराद शिव्या देण्याचा पराक्रम गाजविला जात असतो. नाव शिवाजीचे आणि गाव भटजीचे असा या शिव्याजी मंदिराचा सोवळा संप्रदाय पुण्यात सर्वश्रुतच आहे.

बांणाप्रमाणे कसा जोराने आपटला, हे जनार्दन-जनतेला पुनरुच्चार करून सांगायला नकोच. एनकेन प्रकारेण मला कोणत्या तरी खटल्यात अडकवून पेचण्याची कारवायी पुण्यांच्या ठरावीक कज्जेदलाल कंपूत मोठ्या आल्या. रेट्याने चालल्याचे मला श्रुत होतेच. देशाचे दुष्मन खटल्यात माझ्या काही ग्रंथांचे पुरावे आरोपीतर्फे दाखल होत असता, 'थांबा, थोडे थांबा. लवकरच हेहि प्राणी बोर्डावर येणार आहेत' असा ध्वनि भरकोर्टात एका उच्चैः-श्रव्यान काढल्याचे पुष्कळानी ऐकून मला कळविले होते.

टेम्पट्रेस खटल्याच्या सबबीवर पांढऱ्याफेक नीतिमंताच्या सोनेमोल नीतीचे पिवळेधमक चलनी नाणे कायदेबाजीच्या टाकसाळीत घडत असतानाच, प्रबोधनाचे तरुण सहसंपादक बापूसाहेब चित्रे कल्याण मुक्कामी क्षयाला बळी पडले. बापूसाहेबांच्या मृत्यूने माझा उजवा हात लंजूर झाला आणि खटल्याने द्रव्यशोष करून डावा हात तोडला. खलास ! पुन्हा मी हातपाय तुटून खास शनीच्या अडुयांत 'चौरंगा' होऊन पडलो !

अशाहि हीनावस्थेत प्रबोधन कचेरी आणि छापखाना पुढे पावणेदोन वर्षे हिंमतीने चालविला; आणि याचे सर्व श्रेय माझे इमानी कामगार **(१) प्रभाकर चित्रे, (२) मारुती हराळे, (३) वापूराव वझे आणि (४) दिनकर सुरूडकर** यानाच आहे. यांच्या एकनिष्ठ प्रेमाचा आणि निश्चयी सेवेचा पाठींबा नसता, तर १९२६-२७ सालात माझ्या हातून झालेली लोकसेवा झालीच नसती. **लोकहितवादी** साप्ताहिक म्हणजे याच माझ्या कामगार बांधवांच्या प्रोत्साहनाचे गोड फळ होय. या १॥॥ वर्षांत लक्ष्मी माझ्यावर इतकी रुष्ट झाली कीं 'नच सुंदरि करु कोपा । मजवरि धरि अनुकंपा' म्हणून मी तिची परोपरीने समजूत केली; पण व्यर्थ ! केलेला प्रत्येक प्रयत्न सपशेल ठेचाळला. पुढे टाकलेले प्रत्येक पाऊल मागेच

पडू लागले. व्यवहाराचा आब सांभाळण्यासाठी गृहलक्ष्मीनेहि आपल्या सर्व मौल्यवान् स्त्रीधनाचा स्वयंस्फूर्तीने होम करून, ती केवळ मंगळसूत्राची लंकेची पार्वति बनली. उपासमरीचेहि काही प्रसंग अनुभवले. तथापि श्री हरीचे नाव घेऊन नेटाने कारभार रेटीत होतो.

इकडे, माझ्यावरील साडेसातीचे नाटक नटवायला निरनिराळ्या भूमिकांसाठी शनीने जी जी पात्रे निवडलेली होती, त्यांची अर्धवट राहिलेली कामे पुरी करून घेण्याचा शनीने संकल्प केला. तामलिंदा नगरीच्या वैश्याने चंद्रसेन राजाच्या दरबारात विक्रमाविरुद्ध चोरीची फिर्याद दाखल करण्यापूर्वी, विक्रमाला स्वतःच्या घरीच प्रथम चांगला कणक्या चोप दिला होता. सध्या हिंदुस्थानात चंद्रसेनाचे राज्य नसून इंग्रजसेनाचे राज्य असल्यामुळे, पाडळीच्या तामसनिंदा नगरीच्या वैश्याला माझ्यावर हा प्रयोग करताच येणे शक्य नव्हते. शिवाय, त्या वेळी खुद्द शनीचा सौदागरच आपल्या कडव्या कदरीचा चाबूक सरसाऊन, सात्विक संतापाने, माझ्या पाठीशी रात्रंदिवस उभा असल्यामुळे, तसल्या प्रयोगाचा नुसता वास येताच त्याने रक्ताचा सडा घातला असता. अर्थात् वैश्य–भूमिकेची सांगता पार पाडण्यासाठी, संतापाने घेणे नाकारून नसत्या देण्याच्या लिहून दिलेल्या 'परमेश्वरी नोटी' वर फिर्याद करण्याची तेवढी पाडळीच्या वैश्याला प्रेरणा झाली. * [पहा प्रबोधन वर्ष ५ वे, अंक १० आणि लोकहितवादी वर्ष १ ले अंक ८] येथपासून शनीने लोकव्यवहाराचे क्षेत्र सोडून कायदेबाजीच्या कोर्ट क्षेत्रात

---

* वास्तविक असले क्षुद्र कृत्य आचरणारा हा मनुष्य नव्हे; आणि त्याला या व्यावहारिक चुकीचा तात्काळ पश्चात्तापहि झाला. पण करतो काय विचारा ! शनीच्या पकडीत सापडलेला तो गरीब नट. ठराविक नाट्यभूमिका यथातथ्य बठविणे त्याला भागच पडले. त्याचा तरी इलाज काय ? चेतना झाली तस नाचला व पुढेहि नाचेल.

तांडवनृत्य आरंभले. प्रबोधन-कार्यासाठी ज्यानी ज्यानी लहान मोठ्या रकमा कर्जाऊ दिल्या होत्या, त्या सर्वांची माणुसकीची काळिजे शनीने खच्ची करून, त्या ठिकाणी कज्जेदलालीची काळिजे उलटी टांगली. भराभर फिर्यादी आणि समन्सांचा माझ्यावर वर्षाव होऊ लागला. सगळ्याच घेणेदारानी एकदम गिल्ला केला तर मोठमोठ्या बँकांचे चुटकीसरसे दिवाळ्याचे टिंपाड वाजते; मग माझ्यासारख्या व्यक्तीच्या कारभाराची गोष्ट कशाला ? कोर्टा-तली न्यायपद्धति काय विचारावी ? आले हरभऱ्याचे पोते, घाल भट्टीत; फोड फुटाणे. हा वऱ्हाडी हरभरा, हा घाटी हरभरा, हा कोकणी हरभरा, याची थोडीच चौकशी होते ? आली फिर्याद दे डिक्री. पण डिक्र्या म्हणजे प्रतिवादीच्या खिशात दमड्यांची निपज करणाऱ्या जंत्र्या नव्हत, याची दखल वादी किंवा न्यायाधीश याना मुळीच नसते. सर्वच परिस्थिति उलटीपालटी झाली आहे. नाण्याच्या टंचाईमुळे सरकारच्या बजेटाचाहि बजबजाट पागडीपालटीचा होत चालला आहे. दुष्काळ रोगराईच्या जोडी-नेच बेरोजगारीचा फास लोकांच्या गळ्याला तट्ट लागल्यामुळे, आज त्यांच्या हालांचे वर्णनहि करवत नाही. पांढरपेशा वर्ग भिकाऱ्याहूनहि भिकारी बनला आहे. हायकोर्टातल्या नादारीचे लिट्ट मारुतीच्या शेपटाप्रमाणे दररोज भरंसाट वाढत आहे. व्यापारी लोकांच्याहि खिशाना भोके पडून त्यांच्या तिजोऱ्या रिकाम्या पडत चालल्या आहेत. मोठमोठ्या बँकांचे दरवाजे खडाखड बंद होत आहेत. जमाना उलटा झाल्यामुळे जबान बिघडली आहे. माणसाना माणसे खाऊ लागण्याचा काळ दत्त म्हणून पुढे उभा आहे. तरीसुद्धा कायदे-बाज फिर्यादी, कज्जेदलाल वकील आणि कोर्टातली न्यायाधिशे असून रामकाळच्या सुवर्णयुगाच्या स्वप्नात दंग दिसतात, हा ब्रिटीश राज्यपद्धतीचा इतिहास लिहिताना काळी शाईसुद्धा लज्जेने पांढरीफिक्कट पडते !

शनीचा अखेरचा तडाखा काय ?

साक्षात् मानवी शनीने माझ्यावर फेकलेल्या कायदेबाजीच्या अस्त्राना तोंड द्यायला ७ नवंबर १९२७ रोजी पुण्याच्या घरातून मुंबईस येण्यासाठी पाऊल बाहेर टाकले. हे पाऊल कायमच्या उच्चाटनाचे आहे, माझा छापखाना व प्रबोधन कचेरी पुनरपि त्याच ठिकाणी असलेली पहाण्याचे मला लाभणार नाही आणि नेहमी प्रमाणे टांग्या भोवती जमलेल्या कामगारांचा मुजरा हा शेवटचा–निदान पुण्यातला तरी–अखेरचाच मुजरा असेल, अशी मला किंवा कोणालाहि कल्पना आली नाही. पण शनि काय करणार नाही ! सांगायला अगर लिहायला लागणाऱ्या वेळेच्या शतांशात या पुढील घडलेले चमत्कारीक प्रकार इतक्या कल्पनातीत घटनेने घडले कीं त्याचा यथातथ्य परिचय करून देण्याच्या कामी माझी बुद्धीच पांगळी पडते, मग लेखणी लंगडी कां न पडावी ! कादंबरीकाराच्या आणि कवीच्या कल्पनेलाहि चक्कविणारे परिस्थितीचे आघात झपाझप जरी माझ्यावर प्रत्यक्ष झाले, तरी त्यांच्या वास्तविक रूपाचे आणि वेदनांचे चित्र रेखाटण्याच्या कामी मी, सरधोपट निबंधकार, माझा कमकुवतपणा बिनशर्त कबूल करतो. ग्रहदशेने असो वा व्यावहारीक अडचणीने असो, पण परिस्थिति एकदा बिघडली कीं तिच्या शतमुखी तोंडात लगाम चढविताना मोठमोठ्या विक्रमी पुरुषांची मति आणि कृति कशी कुंठीत होते, त्यांची धोरणे त्याना कशी नडतात आणि मित्रसुद्धा शत्रू होऊन त्याच्या होळीने आपली दिवाळी कशी साजरी करू पहातात, याचा इतिहास मी पुष्कळ वाचलेला आहे, प्रत्यक्ष पाहिलेला आहे, आणि आता तर डोळे उघडे ठेऊन जिवंतपणी अनुभवला आहे. श्रीहरी ! तुझी माझ्यावर अशीच कृपादृष्टी असू दे. संकटांच्या भट्टीत माझ्या आचार विचार उच्चाराला चांगले खरपूस भाजून, त्यांच्याद्वारे जनता–जनार्दनाची माझ्याकडून अखंड सेवा घडीव.

१९२७ च्या नवंबर पासून परिस्थितीच्या पालटाचे फेरे इतक्या आश्चर्य-चकित वेगाने फिरू लागले कीं अवघ्या दीड महिन्यात होत्याचे नव्हते झाले. १० डिसेंबरला लोकाहितवादीचा १३ वा अंक निघेपर्यंत जो मी महाराष्ट्राच्या विचारक्षेत्रात क्रांतीचा धुमाकूळ घालीत होतो, तो मी अवचित निष्क्रीय बनलो. प्रकृति अनपेक्षित बिघडली, म्हणून घरची मंडळी पुण्या-हून दादरला धावून आली. घरात पाऊल ठेवतात तोंच एकुलते एक चिरंजिवास ब्रांको न्युमोनिया ! एका मुलीस डांग्या खोकला. दुसरीला मलेरिया. कुटुंबाला डिसपेपसिया. तिकडे पुण्यास छापखाना हातचा गेला. प्रबोधन कचेरीचे दरवाजे लागले. इमानी कामगार घरी बसले. बोल-बोलता पुण्यातले अस्तित्व धुक्याप्रमाणे नाहीसे झाले. मी तर दादरला बिछान्यात ! रात्रंदिवस चिंतेने आणि खेदाने मस्तक पोखरले. त्यात साव-कारांचे तगादे आणि समन्सांच्या बजावण्या. * आजारी अवस्थेत सुद्धा पैशाची जमवाजमव करून घसरत्या परिस्थितीला सावरण्याचा आटोकाट प्रयत्न केला. पण दोन तीन अपवाद खेरीज करून, बाकीच्या सर्व धनिक मित्रांनी ' आज या उद्या या ' आशीर्वादाने माझी हेटाळणी मात्र केली. निसरडेच ते ! त्यावर मी कितीसा कसरत करणार ? अखेर पडलोच खाली जमीनदोस्त. विचारयंत्र बंद, लेखणी सांदीला, सभोवार अंधार ! धाकट्या बंधूने आणि मेहुण्याने मला सहकुटुंब सहपरिवार पोसून शक्य तो योग-क्षेम चालवावा आणि मी आकाशाकडे पहात स्वस्थ बसावे. वाचकांनी या भयंकर स्थित्यंतराची करवेल ती कल्पना करावी.

झाले. प्रस्तुत प्रकरणाच्या घटके पर्यंतची माझी कर्मकथा येथे पुरी झाली. यापुढे तिचा उत्तरार्ध कसा रंगणार हे श्रीहरीला ठावे ! मी काय

---

* जप्त्या आणि पकडवारंटाचे विधीच काय ते व्हायचे राहिले आहेत संस्कारच ते ! ते नाहीत झाले तर मी संस्कृत होणार कसा ?

सांगणार ? प्रस्तुत कथेच्या कथनाने मी माझ्या याग्येतलो विक्रमाच्या श्रेष्ठतेच्या उंचीवर नेऊन ठेवीत आहे, असा निष्कारण गैरसमज वाचकानी करून घेऊ नये. घडल्या गोष्टी सत्य सत्य सांगितल्या आहेत. त्या प्रत्यक्ष घडताना मात्र शनिमाहात्म्याच्या तपशिला बरहुकूम यथाक्रम घडत आहेत, याचीहि मला काही कल्पना नव्हती आणि हे असे कसे बिनचुक घडले, याचे वाचकां प्रमाणेच मलाहि आश्चर्य वाटत आहे. विक्रमाच्या कहाणीत (१) शनि सौदागराच्या वेषाने आला, (२) भिंतीचा निर्जीव हंस (३) विक्रमाचे हातपाय तोडले जाणे, वगैरे गोष्टी, महिपतिकृत शनिमाहात्म्याच्या लक्षावधि वाचकाना, अघटित चमत्कार, देवाची करणी किंवा कल्पित कादंबरी अशाच वाटत असतात. परंतु माझ्या अनुभवाच्या उपरोक्त कथनावरून सर्वाना स्पष्ट समजून येईल कीं असल्या गोष्टी अगदी शक्य आहेत; फक्त कवीच्या वर्णनातील गूढार्थ मात्र नीट लक्ष्यात घेतला म्हणजे झाले. 'भिंतीचे निर्जीव हंस' तर प्रत्येक मनुष्याला व्यवहारात पदोपदी भेटतात. आत्मनिरीक्षणाच्या शोधन-प्रकाशाने त्याना कोणी स्मरणशक्तीकडून गिरफ्दार करवीत नाही, इतकेच. शनिमाहात्म्यातील विक्रमाचे हात पाय एकदाच तुटले. वर्तमान हिंदी परिस्थितीच्या वातावरणात शेकडो विक्रमांचे हातपाय शेकडो वेळा तुटत आहेत. माझीच कर्मकहाणी पहा. सात आठ कामगारांच्या संसाराची जबाबदारी सतत चार वर्षे पार पाडणारा मी अखेर सहकुटुंब सहपरिवार धाकट्या भावा मेहुण्याच्या कृपाछत्राखाली येऊन पडलो. त्यानी कर्ज करावे आणि आमचा योगक्षेम चालवावा. काल **प्रबोधन** आणि **लोकहितवादी** या दुघोडी रथांत आरूढ होऊन, कलम-समशेरीच्या तडाक्याने मोठमोठ्या झब्बूंची रग जिरविणारा, भिक्षुकशाहीला दे माय धरणी ठाय करणारा, आणि विचारक्रांतिच्या प्रचलित तुफानी वावटळात हजारो वाचकाना निश्चित विचारांची दिशा दाखवून त्यांच्या चित्ताचे रोखठोक प्रबोधन करणारा

प्रबोधनकार आज 'कसे करू, काय करू' च्या चक्रव्यूहात घायाळ होऊन पडावा काय ? काल घोड्यावर, आज खंदकाच्या धुळीत. काल चांगला सशक्त, आज सर्वस्वी अशक्त. काल चेकावर चेक खरडीत होतो, आज कोणाला कार्ड खरडीन तर दोन पैशासाठी बत्तिस दातांची विचकणी. विनं. तीचा एक शब्द ऐकताच जो मी माझ्या गरजू मित्राना ५ ते २०० रुपयांच्या रकमा झटकन् उसनवार देणारा, त्या मला आज माझ्या खाजगी आणि सार्वजनिक जीवनकार्यासाठी मुर्दाड धनिकांच्या दाढीचे केस मोजण्याचा प्रसंग यावा काय ? असे किती आणखी प्रसंग सांगावे ! विक्रमाचे हातपाय तुटतात, ते असेच नव्हे तर काय ?

या आपत्ति टाळता आल्या नसत्या काय ?

सगळ्याच नाही, तरी बऱ्याच खास टाळता आल्या असत्या. मी ज्या आपत्तींच्या चरकात पिळून निघालो, त्याला ग्रहदशा जरी कारण असली, तरी मी त्याचा **सर्व दोष माझ्या स्वतःच्या अज्ञानाला** देतो. माझे अज्ञानच माझ्या आपत्तीना कारण. ग्रह ग्रहदशा आणि त्यांचे फेरे या चिजा काय आहेत, या बाबतींत माझी 'सबझूट' वृत्ति आणि तद्विषयक चिकित्सापूर्वक विचार किंवा अभ्यास करण्याची निवृत्ति, हीच मला विशेष भोवली. आज या ग्रंथात ग्रहदशेच्या फेऱ्याचा उलगडा करताना मी ज्या निरनिराळ्या दृष्टीकोनानी माझ्या स्वतःच्याच चरित्राचे आत्मनिरीक्षण केले, त्या दृष्टीकोनांचा ज्योतिषी लोकांच्या अकलेत पुरा खडखडाट. ज्योतिषविषयक मराठी व देशी ग्रंथ पाहिले, तों त्यात सारा पारिभाषिक शब्दांच्या काथ्याकुटाचा खरकटवाडा ! असे कां होते ? कां व्हावे ? होत असेल तर कसे टाळावे ? असल्या चिकित्सेचा त्यात भरपूर अभाव.

कूपीं कीं जलधींत कुंभ भरतां घे मापिले तत्त्वता

या पलीकडे सिद्धांत नाही. उन्हाळा कडाडला असता, बाहेर पडणा· ऱ्याचे पापड भाजतीलच भाजतील, हे मुलाना सुद्धा समजते. अशा वेळी छत्री जोड्याची शिफारस करणाऱ्या शास्त्राची आणि मित्राचीच वास्तविक खरी किंमत. शनीच्या साडेसातीविषयी अगर एकंदर ग्रहदशेच्या गुणधर्मा· विषयी मला स्वतःला काही निश्चित ज्ञान असते, एकाद्या ज्योतिषी मित्राने मला ते करून दिले असते, अगर त्याच्या चर्चेचा एखादा सुबोध ग्रंथ माझ्या हातात ठेवला असता, तर साडेसातीच्या काळात विशेष खबरदारीने आणि धोरणाने वागलो असतो; आणि ग्रहदशाप्राप्त आपत्तींचे आघात वेळीं जरी मला टाळता आले नसते, तरी त्यांची नांगी मला खात्रीने बरीच बोथट करता आली असती. अकल्पित आघातांचा अचानक मारा, आगामी जाणिवेच्या ढालीवर खबरदारीने झेलता आला असता. कड्यावरून मी कोसळलो असतो, पण एकाद्या कपारीला घट्ट पकडून सावरलो असतो; अचेतन दगड धोंड्या सारखा थेट पायथ्याशी येऊन पडलो नसतो. अपायाला उपाय हा असलाच पाहिजे. साप कितीहि विषारी असला, तरी त्याची सुद्धा गठडी वळवायला मुंगूस असतोच. काट्याने काटा निघतो आणि विषानेहि वीष उतरते. पण रोगाचे ज्ञान नाही, त्याचे कारण समजत नाही आणि उपायहि उमजत नाही, अशा स्थितींत माणसासारख्या माणसाने प्रवाहपतित ओंडक्या प्रमाणे परिस्थिति नेईल तिकडे विनतक्रार वहात जाणे, ही खरोखरच शोचनीय स्थिति होय.

आपत्ति दोन प्रकारच्या असतात. नैसर्गिक आपत्ति आणि मानवकृत आपत्ति. तुफाने, वावटळी, धरणिकंप, ज्वालामुखींचे स्फोट, वीज पडणे, पावसाचे आव-

र्षण इत्यादि प्रकार नैसर्गिक आपत्तींचे होत. याना ' अस्मानी सुलतानी ' असे नाव आहे. या आपत्ति टाळण्याचे पुष्कळ प्रतिबंधक उपाय माणसानी शोधिले आहेत; तरीहि त्याना कायमचा प्रतिकार करण्याच्या कामी मनुष्य अझून पंगूच ठरलेला आहे. धरणिकंप धडाडू लागला किंवा तुफानात घरे-दारे कोसळू लागली कीं मनुष्याच्या हाती देवाच्या प्रार्थने पलीकडे काहीच साधन उरत नाही. परंतु मानवकृत आपत्तींचा प्रश्न असा नव्हे. मंगळ मातला आणि शनि खवळला, तरी ते दगडमातीचे अंतराळातले गोळे माणसे होऊन आमच्या बोकांडी बसायला येत नाहींत. अर्थात् ग्रहदशेच्या आपत्त्या माणसाना माणसांच्याच हातून भोगाव्या लागतात, हे आपण ५, ६ आणि चालू ७ व्या प्रकरणी पाहिलेच. काही कल्पनातीत घटनेचे चमत्कार आणि अपघात बगळले. तर ग्रहदशेच्या बहुतेक आपत्त्या मनुष्यकृत असतात आणि त्या तशा असल्यामुळे शेराला सव्वाशेर या नात्याने, किंवा परस्पर पावणेतेरा घोरणाने, मनुष्याला त्याच्याशी झुंज घेता येणे शक्य आहे. प्रतिकाराचा मारलेल फटका किंवा प्रयत्नांची हाणलेली डुकरमुसंडी प्रतिकूळ ग्रहदशेमुळे यशस्वी झाली नाही, तरी ' मी प्रतिकाराची आणि प्रयत्नांची शिकस्त केली ' एवढे समाधान सुद्धा कमी महत्वाचे नव्हे. परंतु व्यावहारीक विरोधांची जाणीव ठेवतानाच, विश्वातल्या इतर गूढ शक्तींच्या विरोधांची कसलीच जाणीव आपण ठेविली नाही, अगर त्यांच्या परस्पर संबंधाना सबझूट मानले, तर त्या अज्ञानापासून होणाऱ्या आघाताना पायबंध कोणी आणि कसा लावावा ? विरोधाची कल्पना झाली तरच त्याच्या प्रतिकाराची खबरदारी मनुष्य ठेवील. मग ते प्रतिकाराचे उपाय मवाळ असोत वा जहाल असोत, धार्मिक असोत वा कार्मिक असोत, शारिरिक असोत वा मानसिक असोत.

ज्योतिष्यांचे ज्योतिष्य म्हणजे भूताचे भाविष्य.

आकाशस्थ ग्रहांच्या दशेचे उर्फ गुणधर्माचे परिणाम प्राणीमात्रावर त्याच्या त्याच्या जन्मजात प्रकृतीप्रमाणे होतात किंवा नाहीत, या विषयी मी पूर्वी कधी काही विचारच केला नव्हता. बरे, ज्या ज्या ज्योतिर्विदांशी भाषण-प्रसंग घडले, त्याना या विषयी माझी मुळीच खात्री पटविता आली नाही. त्याना माझ्या नेहमीच्या 'कां ?' चे समाधान करता आले नाही. केवळ बाबावाक्यं प्रमाणम् मानणारा मी नव्हे. विवेकाला पटल्याशिवाय मी कशा-वरहि आंधळा विश्वास ठेवीत नाही. बहुतेक सारे ज्योतिषी गोष्ट घडल्यावर तिचे भविष्य वर्तविणारे भविष्य-पुराणकार असतात. १९२३ ते १९२७ अखेरपर्यंतचे माझे बॉम्बस्फोटी जीवन अभ्यासून, 'तुमची सध्या साडेसाती चालू आहे' असा अनेक ज्योतिष्यानी एकच गिल्ला चालविला. पण त्यावर उपाय काय ? तर उपाय काहीच नाहीं. 'स्वस्थ बसावे । हरि ठेविल तैसे रहावे !' फार छान उपाय ! पडतील ते आघात आणि घडतील ते संस्कार पोशीत घोंड्याप्रमाणें अचेतन पडून रहावे अं ? साडेसाती सुरू होऊन तिचे उपरोक्त बॉम्ब माझ्यावर कडाकड फुटेपर्यंत मात्र हे सगळे आकाशस्थ ग्रहज्ञाते तोंडाला कुलूप लाऊन स्वस्थ मजा पहात होते. परिणाम घडल्यावर त्याची कारणमिमांसा थेट शनि राहू केतूच्या माजघराशी नेऊन भिडविणारे कुंडलीबहादर पुष्कळ असतात. तेवढ्यासाठी ज्योतिषशास्त्र-प्राविण्याची फुशारकी कशाला ? दिवा भडकून घर पेटून जमीनदोस्त झाल्यावर, राहूच्या महादशेची सबब ज्योतिष्याच्या दूरदृष्टीचे मुळींच समर्थन करू शकणार नाही. घडल्या गोष्टी सांगण्यासाठी ज्योतिषशास्त्रच कशाला ? आमचे घर कां पेटले ? तर दिवा भडकला म्हणून. दिवा कां भडकला ? आमचा गाढवपणा म्हणून. आकाशस्थ राहू शनि राकेलचा काकडा घेऊन थोडाच

आमचे घरी येत असतो ? कर्मांचे कारण व्यवहारशास्त्रसुद्धा बिनचूक सांगते, त्यासाठी निराळ्या ज्योतिषशास्त्राची जरूर कशाला ? Forewarned is forearmed [आगाऊ एकाद्या घटनेची स्पष्ट सूचना असली, तर मनुष्य तितकाच सावधगिरीने वागतो.] येत्या आठवड्यात तुमच्यावर मारेकऱ्याचा हल्ला होण्याचा संभव आहे, असा इषारा मिळाल्यावर कोणीहि आत्मसंरक्षणाच्या साधनांशिवाय बाहेर पडणार नाही. अचानक रीतीने होणारा मारेकऱ्याचा हल्ला, मनुष्य सावध असता होणाऱ्या हल्ल्यापेक्षा, पुष्कळच कमी आघाताचा होईल ! बाहेर कडक उन्हाळ्याचे फुटाणे फुटत आहेत. जोडा छत्रीशिवाय बाहेर पडेल त्याचे पापड भाजून निघतील, हे स्पष्ट दिसत आहे. अशा वेळी ' जोडा छत्री घेऊन बाहेर पडा ' असा निःसंदिग्ध इषारा न देता, एकादा माणूस पाय पोळून सन्स्ट्रोकने मेल्यावर, 'हा साडेसातीचा परिणाम ' म्हणून विद्वत्ता पाघळणाऱ्या ज्योतिषाची त्याच उन्हात खांबाला उघडाबोडका बांधून कोणी संभावना केली, तर त्यात काही चूक होणार नाही, असे मला वाटते. आकाशस्थ ग्रहदशेचे बरे वाईट परिणाम मनुष्यमात्रावर होतात हे जर सिद्ध सत्य आहे, तर त्याविषयी आगामी सूचना देणे, इतकेच नव्हे तर उपाय सुचविणे, हेच वास्तवीक ज्योतिष्यांचे कर्तव्य. पण बहुतेक सारे ज्योतिषी नुसते गणित्ये ठोकळे असतात. त्यांचे उपाय म्हणजे मारुतीच्या मूर्तीवर शेंदूरतेल थापा आणि हातपाय जोडून स्वस्थ बसा, या ठराविक मासल्याचे असतात. अमूक ग्रह अमक्या गृहात आला कीं त्याचे फळ अमूक, असल्या पाचसहाशे वर्षांपूर्वी ठरलेल्या ठोकताळ्या पलीकडे त्यांची अक्कल जात नाही. मग ते मनुष्याच्या स्वभावप्रवृत्तीचा, त्याच्या अंतस्थ संस्कृतीचा, त्याच्या चारित्र्याचा, कशाचाहि विचार करीत नाहीत. तिनांत चार मिळाले कीं बेरीज सात, एवढेच भांडवल. या पेक्षा अधिक विचार नाही, शोधन नाही, स्वाध्याय नाही, विश्वात आणि व्यवहारात नित्य

होणाऱ्या बदलांची जाणिव नाही. असल्या पोटार्थी प्राण्यांच्या कक्षेत येणारा प्रत्येक दैववादी हटकून मर्दाचा नामर्द आणि अर्जुनाचा हिजडा बनत असतो. दैवाच्या रेषा समजून घेण्यासाठी येणाऱ्या माणसाला आत्मनिरीक्षणाचा "Man, know thyself" कानमंत्र देणारा, एकहि ज्योतिषी माझ्या आढळात किंवा ऐकिवात नाही. आत्मनिरीक्षणालाच जे स्वतः पारखे, त्यानी इतरांच्या दैवाची गणिते सोडविण्याची घमेंड मारणे, हे हिंदु पोटार्थी ज्योतिष फार भयंकर आहे.

अखेर संक्रांतीला विचारक्रांति झाली.

सर्व सणांत मला संक्रांतीचा सण फार आवडतो. या सणाच्या नावात क्रांति तर आहेच आहे, पण या दिवसा पासुन साऱ्या विश्वाच्या चक्रगतीतहि क्रांतीच होत जाते. अशा या क्रांतिकारक दिवशी प्रत्येक विचारवंताने आपल्या चरित्राचे सिंहःवलोकन करावे, गुण दोषांची छाननी करावी, कर्म अकर्माचा आढावा काढावा, कर्तव्याचा नकाशा नीट अभ्यासावा, यशापयशाची मुद्देसूद चिकित्सा करावी आणि तीळ व गूळ या स्नेहाळ व रसाळ प्रसादाची देवघेव करून, माणुसकीच्या उच्च मानवधर्माची आपली ईश्वरदत्त दीक्षा विशेष उज्वल करावी. दरसाल या दिवशी मी आत्मनिरीक्षणात मग्न असतो. Man know thyself (मानवप्राण्या स्वतःला ओळख) हाच संक्रांतीचा खरा संदेश आहे. ' आपण आपणाशी ओळखावे । या नाव ज्ञान ' असा समर्थी-चाहि इषारा आहे. या दिवशी मी जे चिंतन मनन केले, त्याचा परिणाम मी प्रस्तुत ग्रंथाच्या रूपाने जनता-जनार्दनाच्या सेवेला सादर रुजू करीत आहे. हातपाय तुटून आपत्तींच्या धुरोळ्यात लोळता लोळताहि ' शनिमाहात्म्य ' लिहून मला माझ्या देवाची-जनता जनार्दनाची-सेवा करता आली, हे काय लहान सहान समाधान ?

प्रकरण ८ वें.

विक्रमाच्या साडेसातीची कहाणी (उत्तरार्ध.)

विक्रमराजाचे हातपाय तोडून त्याला गावाबाहेर उकीरड्यावर फेकून दिले, त्याला कोणी अन्नपाणी देऊ नये अशी सक्त ताकीद जाहीर झाली, येथपर्यंतच्या कहाणीचा परामर्ष ३ऱ्या प्रकरणात घेतला. येथून साडेसातीचा उत्तरार्ध चर्चेला घेऊ.

एक महिनाभर विक्रमाला अन्नपाणी मिळाले नाही. कारण राजाज्ञाच तशी कडक होती. पुढे राजालाच दया आली आणि अन्नपाणी देण्याची त्याने मोकळीक दिली. अशा अवस्थेत दोन वर्षे गेली. शनिग्रहाच्या कदरीला उतरती कळा येऊ लागली. त्याचा जहाल गुणधर्म मवाळ पडू लागला. तेव्हा संकटसमातीचे एकेक योग, पूर्वीच्या संकटप्राप्ती प्रमाणेच, आपोआप येऊ लागले. एके दिवशी उज्जनीची एक तरूण तेलीण पालखीत बसून तामलिंदा नगरीला आपल्या सासरी चालली होती. तिने उकीरड्यावर हा कोण प्राणी पडला आहे, म्हणून सहजगत्या त्याहाकून पाहिले, तों हा आपला विक्रम राजा ! लगेच ती पालखीतून उतरली व राजाला प्रणिपात करून त्याच्या आपत्तीची कळकळीने विचारपूस करू लागली. सर्व क्षेमवृत्तांत परस्पर श्रुत झाल्यावर, त्या राजनिष्ठ तेलिणीने विक्रमाला पालखीत बसवून सासुरवाडीस आणले. चोरीच्या आरोपावरून शिक्षा झालेला हा दुर्दैवी प्राणी आपल्या सुनेने घरी आणलेला पाहताच तेलीबोवा घाबरून गेले.

तंव तो तेली कांपे थरथरा । म्हणे नसते विघ्न आणिले घरा ।
जरी श्रुत होईल राजेश्वरा । मग कैसे करावे आपण ॥

तेलीच तो ! घाण्यापुरतीच त्याची अक्कल. पण ती तेलीण सून मोठी धीराची आणि डोक्याची. बोलून चालून ती उज्जनीची ती आपल्या भेदरट सासऱ्याला म्हणाली " अहो मामंजी, असे घाबरता कशाला ? हा कोणी आडुमाडू नव्हे.

हा माळवा देशीचा धनी । जाकिरड्यांत पडला चिंतामणी ।
दैवें लाधला आपणालागोनी । म्हणोनी आला गृहाते ॥ "

तेली बुवाला धीर आला. त्याने जाऊन राजाला विनंति केली कीं " महाराज, आपण हातपाय तोडून नगराबाहेर टाकलेल्या इसमाला, सरकारची परवानगी मिळेल तर, मी घरी बाळगायला तयार आहे. त्या दीन अनाथावर आता दया करावी. "

मग राव म्हणे भलारे भला । आणावे तया तस्कराला ।
प्रतिपाळ करी वहिला । अन्नवस्त्र देवोनी ॥

ग्रहदशेची कमान एकदा उतरू लागली कीं चढत्या कमानीच्या काळातले सगळे हंबीरराव गंभीरराव हिंदु हाटेलातल्या आईसक्रीमप्रमाणे पाण्यापेक्षा पातळ लागतात. मग त्या वेळी तेलीणच काय, महारीण मांगीण सुद्धा मातेच्या ममतेने त्या दुर्दैवी माणसाचा कैवार घेते. राजाची संमति घेऊन तेली घरी येताच,

मग राव म्हणे मेहतरासी । तुम्ही श्रुत न करावे कोणासी ।
विक्रम आहे मम गृहासी । ऐसे कोठे न वदावे ॥

बरोबरच आहे. विक्रमी पुरुषाचे अधःपतन होताच त्याला त्या पतनावस्थेत जगाला तोंड दाखविणे मरणप्राय वाटते. लाखों रुपयांचे दिवाळे काढून पुन्हा खादीच्या पांढऱ्याफेक आवरणाखाली नाक वर करून चालण्याची गुर्जर देशीय सफाई लोकमान्य असली, तरी खऱ्या खानदानीचा खंबीर वीर आपल्या आपत्काळी अज्ञातवासच पत्करतो. त्या दयाळू तेल्याने

घाणा हाकावा माझिया घरा । देइन मी अन्न आणि वस्त्रा ।

या अटीवर विक्रमाची नेमणूक केली, आणि माळव्याचा चक्रवर्ति राणा एका यःकश्चित तेल्याचा घाणा हाकून जगू लागला. परिस्थितीच्या प्रतिकूळ लाटा कोणाला कोठे कशा नेऊन टाकतील, याचा काही नेम नाही !

ताऱ्याजी महिपतीने ही तेल्याच्या घाण्याची कल्पना अतिशय रम्य आणि समर्पक योजिली आहे. किंबहुना, त्याने रचिलेल्या विक्रम-काव्यातला तेल्याचा घाणा म्हणजे त्याच्या योजना-कुशलतेचा 'मास्टर स्ट्रोक' च म्हटला तरी चालेल. आपत्काळाची कमाल झाली म्हणजे प्रत्येक मनुष्याच्या मस्तकांत तेल्याचा घाणाच चालू होतो. सारा दिवस रात्र गरगर फिरतो, तरी प्राणी अखेर आपल्या जागेवरच. विचारांवर विचार आणि बेतांवर बेत हजारो लढवा, अखेर बेरीज पूज्यच. जेवढी धडपड करावी तेवढी जागच्या जागी चिरडून तिचे तेल व्हायचे. आजूबाजूला सोबती कोण ? तर बैलोबा, आणि त्यांचेहि डोळे घट्ट बांधलेले. जरा इकडे तिकडे हाल-चाल करावी तों हात नाहीतर पायच घाण्यात पिळून निघायचा. तीच लेलकट खोली, तोच घाणा, तेच आसन, तोच बैल, तीच प्रदक्षिणा, चालली आहे गिरकी रोजच्या रोज ! ना गतीत बदल, ना स्थितीत बदल ! डोके हापटा नाहीतर प्राण द्या, या क्रमात बिलकूल फरक पडायचा नाही. विचार कर करून डोके फुटले तरी घाणामात्र कायमच्या कायम ! पुष्कळ वाचकाना आपल्या संसारक्रमात हा अनुभव आलेला असेल. त्याना महिपतीच्या या घाण्याचे चित्र कुतुहलोत्पादक खास वाटेल. मनुष्याची परिस्थिति एकदा ढासळली कीं ती सावरण्यासाठी त्याच्या आचारविचारांच्या धडपडी कशा चालतात, याचे चित्र या तेल्याच्या घाण्यात यथातथ्य पहावयाला मिळते. पुढे, तीच परिस्थिति निवळू लागली, ग्रहदशेचे मान अस्ताकडे

कलंङ्क लागले कीं क्षुल्लक कारणाने सुद्धा त्याच्या क्षुद्र उच्चाराला किंवा आचाराला किती विलक्षण महत्व येते, हे आता पहा.

विक्रमाच्या साडेसाती पैकी ७ वर्षें पूर्ण झाली. घाणा हाकण्याचे काम करीत असता, एक दिवस संध्याकाळी दीपरागाचे सूर काढून गाण्याची विक्रमाला सहज बुद्धी झाली. यापूर्वी सुद्धा त्या बिचाऱ्याने अनेक वेळा आपला कंठ मोकळा केला असेल. जात्यावर किंवा घाण्यावर माणूस बसला कीं तो सहसा तोंड मिटून बसणार नाही. काहीतरी आं आं ऊं ऊं करणारच. पण आज त्याच्या आंआंऊंऊं ला महत्व यायचे होते. विक्रमाने दीपरागाचे सूर आठवून

रागउद्धार करितां प्रत्यक्ष । दीप लागले लक्षानुलक्ष ।
जैसी दिपवाळीच देख । प्रकाशमान नगरांत ॥,

त्या नगरात कितीक तरी रहिमतखां तानसेनखां असतील. गाड्यावरी गंधर्व पडले असतील. त्यांचे तबले तंबोरे सकाळ संध्याकाळ झडत असतील. सगळ्या रागरागिण्यांचे जलसोद्धार एकसारखे सुरू असतील. पण त्यापैकी एकाच्याही भाग्यात दीपराग आळवून साऱ्या नगरात ' इलायट्रीची दिवाळी ' निर्माण करण्याचे सामर्थ्य नव्हते. ते फक्त विक्रम राजालाच लाभले. बरे, हा विक्रम तरी कोणी धंदेबाज गवय्या होता, असेहि नाही. पण एकदा का भाग्योत्कर्षाची लाट येऊ लागली कीं, क्षुद्र गोष्टीसुद्धा भलत्याच महत्वाची किंमत हवकून बसतात. हातात माती धरली तर त्याचे सोने होते म्हणतात, ते हे असे.

विक्रमाच्या दीपरागाने साऱ्या नगरात भलत्याच हंगामात दिवाळी केल्यामुळे, एकखांबी माडीवर राहणाऱ्या पद्मसेना राजकन्येचे तिकडे विशेष लक्ष गेले. तिने तावडतोब आपल्या दासीना

दीपवाळी तों आज नाही । आणि लग्नहि नसे कोठेहि ।
तरी हें आश्चर्य दिसतें काही । पाहून यावें सत्वर ॥

अशी आज्ञा केली. त्या साळकाया माळकाया पदर सावरून बाहेर पडणार तों

इकडे दीपराग झाला संपूर्ण । तेव्हा दीप मावळले मुळीहुन ।
दुसरा श्रीराग नामेंकरून । तेथे राग आळवितसे ॥

तेव्हा पद्मसेना म्हणाली कीं "हा पुरुष विशेष रागज्ञानी दिसतो. सारे नगर धुंडाळा आणि जेथे तो असेल तेथून येथे लवकर घेऊन या." तात्कळ चार दासी नगरात शोध करायला निघाल्या.

दीपराग आणि श्रीराग या तात्याजी मंहिपतीच्या कल्पना फार गोड आणि समर्पक आहेत. साडेसातीच्या काळयाकुट्ट ढगानी हृदयाकाश एकदा का गर्द कोंदाटले, म्हणजे मनुष्य अंतर्बाह्य अंधारात गुरफटून बुळाबावळा बनतो. अशा वेळी त्याला आपली अंतस्थ ज्ञानज्योतच पाजळून, आजूबाजूच्या परिस्थितीचे निरीक्षण करावे लागते. दिवा लावल्याशिवाय अंधार जाणार कसा आणि दिसणार काय ? हेच 'अंतरिच्या ज्ञान-दिव्या' चे तत्व महिपतीने दीपरागाच्या उपमेने व्यक्त केले आहे. एकदा दीपराग चांगला आळवला गेला, अंतरीचा ज्ञान-दिवा प्रज्वलित होऊन आजूबाजूवर प्रकाश पडला, कीं त्याच्या पाठोपाठ "श्री" राग ठेवलेलाच. दीप लावल्याशिवाय श्रीची प्राप्ती होणार कशी ?

पद्मसेनेचा एकखांबी महाल तेलीआळीत तेल्याच्या घरानजिक खात्रीने नसला पाहिजे. तो कोठेतरी दूर गावाबाहेर मोकळ्या हवेतच असणार. कोणीहि मोठा तानसेन असला तरी त्याची तानदानी आणि रागदारी फार फार तर त्या आळीतल्या लोकाना थोडी ऐकू जाईल. पण साऱ्या नगरात आणि नगराबाहेर राजकन्येच्या एकखांबी महालात कशी ऐकू जाणार ?

[रेडिओ ची सिद्धी २० व्या शतकातली आहे. ती विक्रमाच्या वेळी खास नव्हती.] तथापि, जेथे सहज रागोद्धाराने साऱ्या नगरात दिवाळी झाली, तेथे तेल्याच्या घरातली विक्रमाची मेंडमुरकी आणि तान सुरावट साऱ्या नगरात घरोघर स्पष्ट ऐकू गेली, तर त्यात नवल कसले ? तात्पर्य, ग्रहदशा अनुकूल नसता एकादा मोठा पट्टीचा गवयी घरोघर ताना ठोकीत जरी हिंडला, तरी त्याच्यावर मूठभर तांदळाचीहि मेहरबानी करायला कोणाला सुचायचे नाहीं. पण अनुकूळ काळात सहज कोणी स्वतःच्या घरात नुसता शिंकला तरी " ओ हो हो हो ! काय ही भैरवीची तान ! " म्हणून सारे लोक तेथे जमतील. प्रतिकूळ काळात थोड्याशा गरजेसाठीं साऱ्या गावात जोडेफाड केली तर जोड्याच्या टाक्यापुरतीहि कोणी दाद घेत नाहीं. पण तोच काळ पालटला कीं हजार मैलावरचे 'रसिक' घ्या घ्या म्हणून शोध करीत येतात. दुनियेचा बाजार असा उलट्या पावलाचा आहे !

गवर्ईबुवांचा शोध करून दासी परत आल्या आणि राजकन्येला म्हणू लागल्या, खो खो हासत सांगू लागल्या कीं " ताईसाहेब, काही वर्षांपूर्वी चोरीच्या आरोपावरून हातपाय तोडून गावाबाहेर टाकून दिला होता ना ?

तो तस्कर तेलियाच्या गृहाप्रती । घाणा हांकीत बैसला ॥
तोचि करीत आहे रागरंग । परि स्वरूप दिसताहे वेढंग ।
जैसें का ते शिमग्याचे सांग । ऐसियापरी दिसताहे ॥

इतके वर्णन ऐकून एकाद्या राजकन्येने फारफार तर या शिमग्याच्या सोंगाची कींव करून, त्याच्या एक दोन वासनांतल्या चिजा ऐकण्यासाठी त्याला आमंत्रण दिले असते. पण येथे पहावे तों प्रकार निराळाच !

मग पद्मसेना म्हणे साचारं । तरी घेउनि या तो तस्कर ।
जीवे भावे करीन भ्रतार । वेध लागला अंतरी ॥

दीपराग आळवला तो काय आणि राजकन्या फिदा होते काय ! या पोरिचे पाणिग्रहण करायला कितीक तरी तारुण्याळलेले राजे लाळ घोटीत असतील, पण अखेर स्वयंवराचा प्रसाद कोणाला ? तर पाणिग्रहणासाठीं एकहि हात शिल्लक नसलेला, चोर ठरलेला, शिमग्याचे सोंग बनलेला असा एक उपटशुंभ गवई ! गावातल्या गवयाना ही बातमी कळताच, वैराग्याच्या झटक्यात तंबोऱ्यांवर डोकी हापटून त्यानी आत्महत्त्या आणि रागहत्त्या एकदमच केली असावी, असा माझा तर्क आहे. बाहेरच्या भुरट्या गवयाची गावात पंचारति झाली कीं गावकरी गवयाना पंचप्राण–हत्त्येच्या वेदना होतात, असा तानसेन स्मृतीचा दाखला आहे.

राजकन्येने विक्रमाला आपल्या एकखांबी महालात आणले. तेथे त्याची उत्तम बडदास्त ठेविली. सारा दिवस रात्र विक्रम बुवांचे रागदारीचे जलसे सुरू झाले. बुवा गाणार आणि बाई ऐकणार ! असे सहा महिने जाताच, साडेसातीची साडेसात वर्षें पूर्ण झाली. " राजकन्येच्या एकखांबी माडीवर अलीकडे हा संगीत जलशांचा धुमाकूळ कसला चालला आहे ? काय हिने एकाद्या नाटक मंडळीला आश्रय दिला आहे, का हीच मोगरी एकाद्या बापड्याच्या गळ्यात पडली आहे ? आहे तरी काय मानगड ? " म्हणून चंद्रसेन राजाने पद्मसेनेच्या दासीजवळ चौकशी केली. त्या काय टवाळ सटव्या स्पष्ट बोलणार !

पद्मसेनेचा विचार । आम्हा सांगता न ये साचार ।
म्हणोनि तेथे चलावे सत्वर । मग जे करणे ते करावे ॥

राजा तावडतोब एकखांबी महालाकडे निघणार होता. पण इतक्यात त्याला एक फार जरूरिचे काम पडले. त्याला क्षोप आली. म्हणून तो निजला.

इकडे विक्रमाचा घाणा सुटला आणि तंबोरा नशिबी लागला. घाणा कधी सुटेल ? ही विवंचना माजी पडून, ही तंबोऱ्यावरची घसाफोडी कधी सुटणार, या चिंतेत तो मग्न होता. घाणा परवडला, पण हा तंबोरा नको. घाणा तिळाचे तेल पाडीत होता, पण तंबोरा नरड्याची चरबी गाळीत होता.

साडेसाती नंतर शनीची खास मुलाखत.

राजा मनीं चिंता करीत । म्हणे केव्हा उज्जनी होईल प्राप्त ।
क्लेश भोगिले अत्यंत । परी कृपा न करी ग्रहस्वामी ॥
ऐसा राव चिंता करित । तंव तेथे काय वर्तली मात ।
शनिदेव होऊनि कृपावंत । सन्मुख उभा ठाकला ॥

कवि तात्याजी महिपतीने विक्रमाच्या साडेसाती काव्याची जी मूळ स्वतंत्र कल्पना निर्माण केली, ती येथे संपूर्ण झाली. या पुढील सारा मजकूर लिहिण्यासाठी त्याला पौराणिक भारूडाचीच कास धरणे भाग पडले. शनि प्रसन्न होऊन विक्रमा सन्मुख उभा ठाकणे, त्याने आपल्या पराक्रमाच्या सर्व जुन्या कथा विक्रमाला श्रुत करणे, त्या कथांच्या जंत्रीत सगळ्या देवदानवांपासून तों थेट रामकृष्ण हरिश्चंद्रा पर्यंत सर्वांची खोडकी जिरविल्याची घमेंड मारणे आणि ' सर्वांत मी शनि श्रेष्ठ, माझा धाक साऱ्या त्रिभुवनाला, माझ्यापुढे हे विश्व म्हणजे कःपदार्थ ' ही पौराणिकी परंपरेची प्रतिष्ठा प्रसिद्ध करणे, वगैरे मामुली पुराणी प्रकारच तात्याजी महिपतीने कथन केले आहेत. गणेशपुराणात गणपति श्रेष्ठ, बाकी देव कुचकामी. शिवपुराणात शिव श्रेष्ठ, बाकी देव फोलकट. देवी पुराणात देवी थोर, बाकीचे पुल्लिंगी देव सारे खापऱ्याचोर. ही जी पुराण-लेखकांची जुनी खोड,

तीच अखेर तात्याजी महिपतीलाहि पत्करावी लागली. आधींच हिंदुस्थाना-तल्या हिंदूंच्या बोकांडी तेहतीस कोटी देवांची फलटण गांधीलमाशां प्रमाणे डसलेली आहे. त्यात पुन्हा शैववैष्णव, जैन-लिंगायत, वेदिक-भागवती वगैरे वादांची पानपते नित्य धुमश्चक्री घालीत असतातच. आणि त्यातच प्रत्येक पुराणातला आणि माहात्म्यातला 'हरि' स्वतःच्या सर्व-श्रेष्ठत्वाचा ताशा चौघडा बडवू लागला कीं " आता व्हट्ट द्याव तरी कोन कोनाला ? " असा विलक्षण इलेक्शनी पेच वाचक-भगतांपुढे पडतो. बोलून चालून हे " शनिमाहात्म्य, " तेव्हा त्यात कवीने शनीचे सर्वांगणि स्तोम न माजवावे, तर कोणाचे ? इलेक्शनच्या हंगामात प्रत्येक उमेदवार झब्बूचे पोवाडे गाण्यासाठी जसे शेकडो पोटाळ पंडीत टोळधाडी प्रमाणे खेडोखेडी त्या झब्बूचे तुणतुणे वाजवीत फिरतात, तसेच हे माहात्म्य-लेखक आपा-पल्या माहात्म्य-देवाचे ढोलके बडवितात. या पेक्षा त्यात विशेष काहीच नाही. सर्व पुराणांचे आणि माहात्म्यांचे कुंभार माणसेच असल्यामुळें, त्यांच्या निरनिराळ्या लहान मोठ्या मडक्यांच्या घाटात माणसांचा माणुसघाण्येपणा उतरला नाही, तर मग कुंभाराची कुशलता काय कामाची ? माणसे जशी एकमेकांना पाण्यात पाहतात, आत्मस्तोमासाठी दुसऱ्याला पाण्यापेक्षा पातळ करतात, स्वतःच्या मानमान्यतेसाठी दुसऱ्यांविषयी कुझकट कुचाळ्यांचा कलकलाट चालवितात, तोच कोंबडझुंजी मामला निरनिराळ्या देवांच्या माथी मारून माणसांनी पुराणग्रंथांची पैदास केलेली आहे. शनीने आपल्या आत्म-स्तोमी पराक्रमांच्या ज्या लहान मोठ्या कहाण्या आपल्या खास मुलाखतीत विक्रमाला श्रुत केल्या, त्यांचा परामर्ष आपण मागाहून घेऊ. सध्या, विक्रम उज्जनीला जाण्यासाठी फार उतावीळ झालेला आहे, तेव्हा त्याच्या दैव-लीलेच्या नाटकाचे अखेरचे प्रवेश प्रथम चर्चेला घेऊन, त्याला मोकळा करावा हे बरे.

प्रत्यक्ष शनिदेव समोर येताच, त्याने विक्रमाला विचारले " काय शहाण्या (अज्ञाना) मला ओळखलेस का नाही ? माझा इंगा तुला समजला का नाही ?" हातपाय तुटलेले असल्यामुळे नमस्कार करवेना, म्हणून विक्रमाने त्याच्यापायीं लोळण घेतली.

तेव्हा शनि म्हणे राया विक्रमा । धन्य धन्य तुझा महिमा ।
आता मी प्रसन्न राजोत्तमा । इच्छा असेल ते माग ॥

शनीला वाटले कीं विक्रम आता राज्य मागेल, हातपाय मागेल, इंद्राचे ऐश्वर्य मागेल. पण त्याची कल्पना उच्च जनीच्या विक्रमाने सपशेल खोटी पाडली. उच्च जनीचा विक्रम नेहमी परार्थी असतो. स्वार्थी नसतो. परार्थापुढे तो त्रिभुवनाच्या साम्राज्यप्राप्तीलाहि कवडीमोल मानतो. शनीने इच्छावराची संधी देताच,

तंव विक्रम सद्गद बोले वचन । मनुष्यदेहा न पीडी जाण ।
होचि द्यावे मज दान । कृपाळुवा शनिदेवा ॥
म्यां दुःख सोशिले अनिवार । ऐसे प्राण्यांसि नाही सोसणार ।
तरी तूं कोणासी न पीडी साचार । हेचि मागणे शनिदेवा ॥

विक्रमाने एवढाच वर मागताच शनि चारीमुंड्या चीत झाला. मनातल्या मनात ओशाळला. " विक्रमा तुझी धन्य असो. परपीडेचा अनुभव तुझ्याच हृदयाला टोचलेला पाहून, मी फार खुष झालो. तुझी भूतदया काय वर्णू ? तू हातपाय मागत नाहीस, आणि राज्यछत्राचीहि आठवण करीत नाहीस. मात्र परदुःखनिवारणार्थ तुझी सारी तळमळ ! शर्थ असो तुझ्या सत्वाची आणि माणूसकीची. विक्रमा, तुला प्रत्यक्ष ईश्वरच म्हटले पाहिजे. "

१९१२ नं. ३५६९

राजकन्येच्या माडीवर । विक्रमा ते भेटले शनैश्चर ।
तेव्हां रायाचे दिव्य झाले शरीर । जैसा सूर्य प्रगटला ॥

विक्रमाने जो वर मागितला त्याने शनीच्या शनिमाहात्म्याच्या नाडयाच पुऱ्या आखड्डून टाकल्या. वर तर पुरा केलाच पाहिजे. 'न पीडी प्राणिमात्रासि' हा वर शनीजवळ मागणे, म्हणजे बाबू चष्मावाल्याकडून किंवा काबुली पठाणांकडून 'दरवडे घालू नका' असा वर मागण्यासारखेच होते ! खादाड मावशी, कशी राहील उपाशी ? धंदेवाला चटक्या चोर, मेला तरी होणार नाही साधू थोर. घातगातांचा अग्रणी, त्याचे नाव पडले शनि. वर द्यावा तरी पंचाईत, न द्यावा तरीहि पंचाईतच ! प्राणांतिक प्रसंगांतसुद्धा विक्रमाने सर्वस्वावर लाथ मारून माती लोटली, पण सत्वाला पारखा झाला नाही. आता तर त्याने शनिच्याच सत्वावर जती आणली ! प्राणिमात्रास छळायचे नाही, तर मग शनीला दुसरा धंदा तरी कोणता उरला ? धंदेबाज ठगाच्या हातचा फाशच हिसकून घेण्यासारखा हा इच्छावर नव्हे काय ? शनीची ही अडचण तात्याजी महिपतीने बिनबोभाट सफाईत सोडविली. त्याने शनीशी संगनमत करून आपल्या **पुस्तकाचा प्रसार** आणि **शनिचा विक्रमाला वर** या दोघांची बिनतोड सांगड घालून एका धोंडयाने दोन पाखरे मारली कशी, ती पहा--

तेव्हां प्रसन्न झाला शनैश्चर । रायासि देता झाला निजवर ।
हा ग्रंथ * श्रवण पठण करी जो नर । तयासि पीडा न करी मी ।
भावें करिता श्रवण पठण । आदरें ग्रंथसंरक्षण ।
त्यांसि रक्षी मी रात्रंदिन । कृपा करीन सर्वथा ॥

---

* म्हणजे तात्याजी महिपतीकृत ३८८ ओव्यांचे मराठी शनिमाहात्म्य !

परंतु—

जो का श्रवण पठण न करी । आणि ग्रंथाची हेळणा करी ॥
तया नराच्या शरीरीं । पीडा फार करीन मी ॥

सध्या जाहिरातीचे युग चालू आहे. ताईत गंडे दोरे मंत्रचिट्ठीवाल्यां पासून तों थेट शब्दापुढे शब्द ठेऊन 'ग्रंथकार' बनणाऱ्या कलमदान्यां पर्यंत सर्व लोक आपापल्या मालाच्या जाहीराती देताना, सवलतींची फाय-द्यांची सर्टिफिकीटांची रामबाणपणाची सर्वोत्तमपणाची पुष्कळ वाचाळ-पंचविशी करतात. पण तात्याजी महिपतीने आपल्या शनिमाहात्म्याच्या प्रसारासाठी योजिलेली जाहिरातीची 'युगत' जगात आजपर्यंत एकाहि जाहीरात-विद्यापटूच्या कल्पनेला शिवलेली दिसत नाही. आज हिंदुस्थानात, विशेषतः मराठी भाषेच्या महाराष्ट्रात, तात्याजी महिपतीच्या शनिमाहात्म्य चोपड्याचा इतका प्रसार आहे, कीं दरसाल लक्षावधि प्रति छापूनहि मागणीचे तोंड बंद पडत नाही. तुझी विक्री जास्त का माझी विक्री जास्त, म्हणून सर्टिफिकेटी कुत्तरभुंग करणाऱ्या मुंबईच्या भांडकुंदळ आंग्ल दैनि-कांना आमच्या शनिमाहात्म्याच्या प्रसाराचा रामटोल्या कचका अझून कळला नाहीसे दिसते !

बदलत्या काळाचे बदलते देखावे.

काळ एक मोठा किमियागार आहे. केव्हा तो कशा सोन्याची माती करील आणि मातीचे सोने करील, याचा थांग लागत नाही. एकाद्या मनु-ष्याला तो निष्कारण महत्पदाला नेईल, तर दुसऱ्याच घडीला त्याला जगात तोंड दाखवायला जागा ठेवणार नाही. केव्हा कोणावर कसला मुखवटा चढ-वून त्याच्या हातून खाटकाचे काम करवील, तर कधी त्याच खाटकाकडून

साऱ्या मानवतेला संजीवनीची फुकट खैरात करवील. सहज सुईच्या अग्राने लक्षावधि लोकांची अंतःकरणे चिरफाड करणारा हाच, आणि कसलाहि उपाय न करता केवळ पाठ फिरवून दुभंगलेली हृदये अभंग जुळविणारा हाच. अवघ्या नवग्रहांच्या भिन्नाभिन्न गुणधर्मांची माया काळाच्या उदरात सामावलेली असल्यामुळे, या जगद्रंगभूमीवरील सर्व बऱ्या वाईट छोट्या मोठ्या नाटकांचा सूत्रधार हाच होय. विक्रमाची ग्रहदशा बदलताच या सूत्रधाराने कसकसले ट्रान्सफर सीन (बदलते देखावे) निर्माण केले, तिकडे आता वाचकांनी सावधान ठेवावे.

विक्रमाचा देह नितांत सुंदर* करून, शनीने त्याला आशीर्वाद दिला व तो स्वस्थानी गेला. इतक्यात चंद्रसेन राजा तेथे आला, पहातो तों एक 'मदनाचा पुतळा'! बाप आलेला पाहताच पद्मसेनेने गांधर्व पद्धतीने विक्रमाला आपले पाणिदान केले आणि त्यानेहि

गृभ्णामि ते सुप्रजास्त्वाय हस्तम् ।
मया पत्या जरदष्टिर्यथासः ॥
भगो अर्यमा सविता पुरन्धिः ।
मह्यं त्वा दुर्गार्हपत्याय देवाः ॥

या प्रतिज्ञेने तिचे पाणिग्रहण केले. चंद्रसेनाने आपल्या जावयाला विचारले कीं 'महाराज आपण कोण ?'

---

* काळ प्रतिकूळ असता प्रत्यक्ष मदनाचे पुतळे सुद्धा लोकांच्या दृष्टीला तिरस्करणीय आणि किळसवाणे दिसतात; आणि काळ अनुकूळ होतांच खेकडलोंड्या पिचकण्या प्राणी लोकांना सुंदर दिसू लागून, काळ्याकुट्ट नकट्या फेफट्याच्या सरळ नाकाची स्तुति करायला लोकांचा आनंद त्यांच्या जीवनातच काय, पण गगनात मावेनासा होतो !

विक्रम वदे साचार । मी तुमचा असे चोर ॥
श्रीपति वैश्य सावकार । बोलावा आधी तयासी ।

आमंत्रण जाताच ताबडतोब वैश्य सावकार तेथे धावून आला. आपण 'चोर' ठरविलेला आदमी इतका 'थोर' बनलेला पाहून, त्यालाहि फार अचंबा वाटला. वैश्याच्या आग्रहावरून सर्वजण त्याच्या घरी चित्रशाळेची तपासणी करायला गेले, तों तेथे सुद्धा अचंबाच !

तंव चित्रींचा निर्जीव हंस । जेणे गिळिले होते हारास ।
तो पुन्हा उगाळी सावकाश । जैसा होता तैसाचि ॥

भिंतीवरच्या चित्राने वैश्यकन्या अलोलिकेचा मोत्याचा हार जशाचा तसा ओकून परत टाकलेला पाहून,

जन म्हणाति अघटित कळा । निर्जीव लेपें हार गिळिला ।
दोष लाविला महापुरुषाला । तें आजि कळू आले ॥

लोक म्हणजे काय ? सहस्रमुखी शेषाचे बाप. हजार वेळा हजार प्रकारचे उद्गार काढणारी त्यांची हजार तोंडे ! केव्हा काय बोलून कोणाला कसा खाडयात घालतील, आणि कोणा नरवंश्याला नरदेव बनवून त्याला डोक्यावर घेऊन नाचतील, याचा नेम नाही. राजे लोकांच्या मनोवृत्तीला आपण वारांगनेची उपमा देतो. पण नीट विचार केला तर या उपमेपासून लोकमताचीहि सुटका होत नाही. लोकमताच्या चंचलपणाचे थेर कोणत्या थराला जातात, याचे दाखले सध्याच्या हिंदी राजकारणाच्या क्षेत्रात हवे तितके दिसून येतात. हाराचा आरोप खोटा

ठरताच, श्रीपति वैश्य सावकाराने विक्रमाचे 'क्षमस्व' म्हणून पाय धरले आणि आपली कन्या त्याला अर्पण केली.* तेव्हा

चंद्रसेन पुसे विक्रमासी । आपण राहता कोणे देशीं ।
कोण नाम कोण वंशी । जन्म तुमचा सांगावा ॥
तंव विक्रम म्हणे चंद्रसेना । काय पुससी विचक्षणा ।
मी असे उज्जनीचा राणा । नाम माझे विक्रम ॥

'मी उज्जनीचा चक्रवर्ती राणा विक्रम' इतके शब्द ऐकताच घमंडा-नंदन चंद्रसेनाला जवळजवळ झीटच आली. अरे बापरे ! केवढे हे ज़ाड्या प्रकरण आणि आपण त्याची काय विटंबना केली ! "महाराज, या दासाला क्षमा असावी. माझ्या हातून फार घोर अन्याय घडला." असे म्हणून स्वारीने विक्रमाच्या पायावर लोळण घेतली. "आपण उज्जनीचे विक्रम चक्रवर्ति, इतके आपण आधीच कळविले असते, तर घडला अनुचित प्रकार झाला नसता."

Of all sad words of tongue and pen,
The saddest are these, 'It might have been'

चित्ता उपजविती खेद । बोलता लिहिता जे जे शब्द ।
तयामाजी अत्यंत दुःखप्रद । "असे झाले असते" हे † ॥

हा जगाच्या व्यवहाराचा साळसूद न्यायच आहे. त्या वेळीं जरी विक्रमाने खरी परिस्थिति स्पष्ट सांगितली असती, तरी त्यावर विश्वास टाकण्या इतका एकहि शहाणा विवेकाधीन नव्हता. उलट, थोरामोठ्याचे नाव सांगून

---

* खांबाला बांधून दिलेला कणकया चोप व्याजात वळता करून घेतला !

† उपरोक्त आंग्लोक्तीचे कै. हरीभाऊ आपटे कृत भाषांतर.

चोऱ्यामाऱ्या करणारा लफंगा (इंपोस्टर) म्हणुन हातापायाच्या बरोबरच मुंडकेंहि छाटण्याची इंडियन पिनल कोडी गाजवायला या शहाण्या चंद्रसेनाची न्यायबुद्धी धावकली नसती. शिवाय, विक्रमाने आपले नाव गाव सर्व हकिकत त्या धनाशेट्या वैश्याला प्रथमतःच स्पष्ट कळविली असताहि, त्याने तरी काय असा मोठा विवेक दाखविला, तर चंद्रसेनाच्या आताच्या मामुली सबबीची विक्रमाने फारशी पर्वा करावी ! विक्रमाने खडखडीत जबाब दिला कीं " मेहरबान, झाले ते झाले. आता हे नक्राश्रू कशाला ! तुमच्याकडे कसलाहि दोष नाही. हा सारा आमच्या ग्रहदशेचा परिणाम. तुम्ही लोक शनिदेवाच्या नाटकातल्या कळसुत्री बाहुल्या. त्याने नाचविले तसे नाचलात. घेतलेल्या भूमिका उत्तम वठविल्या. आता त्याचे काय ! त्यावेळी ग्रह प्रतिकूळ होते, म्हणून तुझी बुद्धी तशी वागली. आता तेच ग्रह मला अनुकूळ झाल्यावर तुम्ही आता ही पश्चात्तापाची भाषा बोलू लागला. ठीक आहे. मला पूर्वी काही घडल्याचे दुःख नाही, आणि आता होत आहे त्याचे सुखहि नाही. सुखदुःखाचा माझा जमाखर्च नेहमीच शून्य असतो. प्राणान्तिक आपत्तीतहि मी माझ्या सत्वाला पारखा झालो नाही, यातच मी माझ्या उज्जनीचे नाव राखले."

नंतर सर्वत्र मोठमोठे उत्सव सुरू झाले, मेजवान्या झडू लागल्या, दानधर्माचा मुसळधार पाऊस कोसळू लागला. पण सत्वधीर विक्रम आपल्या खऱ्या पुरस्कर्त्याला विसरला नाही.

मग तो तेली बोलाविला । विक्रमे तयासी नमस्कार केला ।
एक देश तया देवविला । सुखी केला तये वेळी ॥

विक्रमाने दाखविलेले हे कृतज्ञतेचे उदाहरण, म्हणजे त्याच्या सात्विक मनोवृत्तीचा नितांत मधुर परिपाकच होय. खरा मानवधर्म म्हणतात तो

हाच. बाकीच्या धर्माच्या ठ्याल्या नाटकी आणि खोट्या. आपत्काली उत्तेजनाचा धीराचा किंवा करुणेचा एकच गोड शब्द बोलणारा जर आपल्याला देव वाटतो, तर वारांगनेव राजमताची आणि लोकमताची दिक्कत न बाळगता, जो संकटकाळी आपल्याला आपंगून धरतो, त्याला परमेश्वरच समजले पाहिजे. एरवी अनुकूळ काळात तोंडचोंबडेपणा करणारे इष्टमित्र सगेसोयरे ढेकणा चिलटा इतके उमाप भेटतात; पण प्रसंग पडला कीं एक सुद्धा उपयोगी पडत नाही.

मोका पडे बाका । तो गध्देको कहना पडता काका ॥

अशी एक म्हण आहे. पण प्रसंगी गध्द्याला सुद्धा काका म्हणून हाक मारली तरी तो जवळ उभा रहात नाही. जगाच्या असल्या उलट्या काळंजाच्या व्यवहारात, कठीण काळी जो उपयोगी पडेल, तोच खरा माणूस! बाकी माणसे म्हणजे जगाच्या लोकसंख्येची भरताड. विक्रमाला सर्वांनी झिडकारले पण त्या मातृहृदयी तेलिणीने त्याला आपंगिले. तिच्या सासऱ्याने त्याचा योगक्षेम चालविला. या सून सासऱ्याची महती किती वर्णावी! महात्मे ते हेच. शनिग्रह जातीचा तेली असो, नाही तर कोळी असो; तेलीजात किंवा कोळीजात म्हणजे शनिवृत्तीची असते, असा काही तात्याजी महिपतीचा कटाक्ष खास नाही, हे या उदाहरणावरून स्पष्ट सिद्ध होते. ब्राम्हणब्रुवांत पुष्कळ मांग असतात, आणि पुष्कळ मांग ब्राम्हण असतात. हिंदूंच्या जातिभेदाच्या दुर्बिणीतून पाहून, या तत्वाचा गाभा उमगणे कठीण आहे. उदात्त चरित ही कोणा एका विशिष्ट जातीची सनदी जहागीर नव्हे. ती सर्व मनुष्यप्राण्यात सर्वत्र हिरे माणकांप्रमाणे आढळते. एवढेच, कीं शैले शैले न माणिक्यम् मौक्तिकं न गजे गजे. एकाच आईच्या उदरातून जन्मले म्हणून काही भाऊ बहिणीचा जिव्हाळा उत्पन्न होत नाही. त्या जिव्हाळ्याचा

असा जन्मजन्मार्जित व पूर्वकर्मार्जित असावा लागतो. असा किती भाग्य-वहिणीत आढळतो ? पाठची बहीण हाडे फोडण्यात मागीणीला शरम आणते, तर मांगवाडयातली मांगीण आपत्प्रसंगी बहिणीच्याच काय पण जन्मदात्या आईच्या प्रेमाला 'मागे सर' म्हणते. जिव्हाळ्याच्या या मानवधर्मात जातपात, नातेगोते आतडीकातडी यांचा मुळीच संबंध येत नाही. कोण मनुष्य कोठे 'मेरा प्यारा भाई' म्हणून येऊन मिठी मारील आणि कोण मावली कोठे आईच्या उमाळ्याने आपल्याला पोटाशी धरील, किंवा बहिणीच्या प्रेमाने भाऊबीज साजरी करील, याचा नियम नाही. आपत्प्रसंगीच शत्रुमित्रांची पारख होते. भावाबहिणीचा परिचय होतो. लोकव्यवहाराचे प्रवाह उमगतात, आणि —आणि— आणि विशेषतः आत्मा आणि परमात्मा, जीव आणि शिव; यांच्या अन्योन्य संबंधाचा ऋणानुबंधाचा उलगडा होऊन, साऱ्या जंगाकडे पहाण्याची आपली दृष्टी निवळते ! ॐ श्रीहरी !

एक महिनाभर जावईपणाचा थाटमाट भोगून विक्रमराजा चतुरंग दळ सिद्ध करून, दोन नवीन राण्या, हत्ती, घोडे, दासदासी वगैरे सह उज्जनीला परत आला. नागरीकांनी नगर शृंगारून मोठा उत्सव केला आणि

सुमुहूर्त पाहोनि । विक्रम बैसविला सिंहासनी ।
याचक तृप्त केले दानीं । चिंता चित्तीं असे ना ॥

सर्वत्र आनंदी आनंद झाला. तसा तो प्रस्तुत ग्रंथाच्या वाचकांनाहि सदैव लाभो; अशी श्रीहरीजवळ याचना करून, मी पुढे प्रयाण करतो. आता आपण

शनीने सांगितलेले शनिमाहात्म्य

काय आहे, याची चिकित्सा केली पाहिजे. 'प्राणिमात्रास पीडा देऊ नको' अशी जेव्हा शनीजवळ विक्रमाने मागणी केली, तेव्हा शनि त्याला आत्म-

स्तोमाच्या फुरफुरीने म्हणतो " अरे वेटया विक्रमा, तुला मी दिलेले दुःख काय घेऊन बसलास ? तुज दुःख दाविले किंचित. माणसांची गोष्ट कशाला ? मी तर अनेक देव दैत्य ग्रहांना सुद्धा चांगले उलट सुलट 'तासून' काढले आहेत. कोणीहि मनात गर्व धरू नये. गर्वाने कोणी फुगला रे फुगला की मी त्याला धरून हापटलाच खाली ! प्रत्यक्ष श्रीशंकराला मी साडेसातीचा दम भरून कैलासात लपून बसायला लावले. अयोध्येचा दशरथपुत्र श्रीराम याच्या राशीला जेव्हा मी आलो, तेव्हा त्याला १४ वर्षे वनवासात * पाठविले आणि त्याच्या बायकोला रावणाकडून चोरून पळविले. आम्हा नवग्रहांना एक तो रावण मात्र बेटा मोठा खमक्या भेटला. आमच्या पालथ्या पाठीवर पलंग ठेऊन त्यावर तो निद्रा घेत असे. एकदा नारदमुनि तेथे आले: आणि त्यानी आम्हाला टोमणा मारला, " अरे, तुम्ही मोठे घमेंडखोर श्रेष्ठ ग्रह ना ? आणि ही तुमची स्थिति ? थुःत् तुमच्या जिनगानिवर ! तुम्ही नुसते गोरगरिबांचे मात्र काळ. समर्थापुढे तुम्ही लेंडयाच गाळाव्या. नंगेसे खुदा बेजार, मग तुमची काय किंमत ? फुकट पुरुषार्थाच्या तुमच्या वल्गना !" मला हा टोमणा जिव्हारी लागला. मी नारदाला म्हटले की आम्ही पालथे पडलो आहो ते उलथे करण्याची काही युगत करा, मग या शनीचा इंगा कसा पठाणी पिंगा घालील तो पहा. 'वैरियाच्या उरावरी पाय द्यावा' असा कानमंत्र नारदाने रावणाला दिला आणि आम्ही पालथ्याचे उलथे होताच, मी माझी दृष्टी फिरवली

---

* शनीच्या मेहरबानीचा खराटा फक्त ७|| वर्षेच चालतो. मग श्रीरामचंद्राला १४ वर्षाची हद्दपारी आणि वनवास काय म्हणून भोगावा लागला ? 'डबल मर्डर' गुन्ह्या प्रमाणे श्रीरामांच्या कुंडलीत दोन शनि होते, का शनीच साडेसातीचे गणित मोजताना चुकला ?

मात्र, तों सहा महिन्याच्या आत श्रीरामचंद्राकडून रावणाला मी सहकुटुंब सहपरिवार जमीनदोस्त निर्दाळला. हरिश्चंद्राची हकिकत तर काय सर्वश्रुतच आहे. त्याला तर मी 'बारावा अतिक्रूर स्थानी' आलो होतो. नळ दमयंतीच्या बोकांडी मी बसलो, तेव्हा त्यांचे क्षणात तनितेरा वाजविले. इंद्राच्या राशीला जेव्हा मी आलो तेव्हा त्याने गौतम मुनीची पत्नि अहिल्या भोगिली आणि त्या ऋषीच्या शापाने इंद्राचा सारा देह कुष्टाने सडला. चंद्राची स्थिति हीच. त्याने गुरूपत्नीवर हात टाकला आणि स्वतःचे तोंड काळे करून घेतले. वशिष्ठाचे शंभर पुत्र मीच ठार मारले आणि पराशराच्या बुद्धिला डागळून त्याच्या कडून मत्स्यगंधेच्या, आपल्या सुनेच्या, कौमार्याचा भंग मीच करविला. पांडवांचा वनवास आणि दुर्दशा मीच केली आणि कौरवाना रसातळाला नेले ते मीच. अरे विक्रमा, देवदानवाना माझा दरारा तर आहेच आहे, पण 'कृष्णं वंदे जगद्गुरूम' म्हणून ज्या पूर्णावतार श्रीकृष्णाची तुम्ही एवढी मोठी थोरवी गाता, त्या पट्ठ्याला सुद्धा अस्मादिकानी पछाडल्याशिवाय सोडला नाही. त्याच्या राशीला मी येताच त्याच्यावर स्यमन्तक मणि (कोहिनूर) चोरल्याचा आरोप आला.

ऐसे देवादिकांसि त्रासिले । त्यांत तुजला कांहींसे दुःख दिले ।
किंचित चमत्कारासि दाविले । मजावया तुजलागी ॥

हे सर्व देव दानव ग्रह राहू दे. पण गुरूग्रह तर ब्राम्हण ना ? विक्रमा ब्राम्हण म्हणजे सर्वश्रेष्ठ. पवित्रापेक्षा पवित्र. त्यात गुरूचे महत्व काय सांगावे ? 'गुरु केवळ माउली । सदा कृपेची सावली.' पण या माउलीचाहि 'सवा प्रहरात' मी कसा 'मातेरा केला' हे वृत्त तुला तात्याजी महिपति कृत शनिमाहात्म्यात सविस्तर श्रुत होईल. या ग्रंथासारखा ग्रंथ

मराठी * भाषेशिवाय जगातल्या किंवा हिंदुस्थानातल्या कोणत्याहि भाषेत कोणाला आढळणार नाही. त्याला मी माझे खास सर्टिफिकीट दिले आहेः—

हा ग्रंथ करिता श्रवण । सकळ विघ्ने जाती निरसून ।
ग्रहपीडा अति दारुण । न बाधे कदा कल्पांती ॥
श्रवण पठणीं निदिध्यास । लेखक पाठक सर्वांस ।
ग्रंथ संरक्षी तयास । क्लेश विघ्ने न बाधती कदा ॥
ही शनैश्चराची ख्याति । केवळ शनैश्चराची मूर्ती ।
अहर्निशीं जे का ध्याती । त्यांसी संरक्षी शनिदेव ॥
सकळ दुःख दारिद्र्य । येणे निरसेल समग्र ।
भावे श्रवण करिता साचार । फळ प्राप्त तयासी ॥ ''

गीता उपनिषदादि मोठमोठ्या ग्रंथांच्या नशिबी जे सर्टिफिकीट लाभले नाही, ते तात्याजी महिपतीच्या 'शनिमाहात्म्य' चोपड्याला लाभले ! ते फक्त मराठी भाषेला मिळाले ! त्याची महति फक्त महाराष्ट्रात ! केवढे आमचे भाग्य ! काय आमची थोरवी ! शनिदेवाची महाराष्ट्रावर केवढी ही लांबरुंद कृपेची पाखर ! एका या शनिमाहात्म्याच्या नुसत्या श्रवणाने

---

* शनिमाहात्म्य फक्त मराठी भाषेतच आहे. गुजराथी हिंदी मद्रासी बंगाली किंवा गुरुमुखी भाषेत याचा पत्ता नाही. या भाषा बोलणाराना मराठी भाषा समजत नाही. शनीची साडेसाती जर सर्व मनुष्यमात्रास भोवते, तर या बिनमराठी भाषकांची साडेसाती टाळण्याचे काहीच शनिबाण साधन शनीने निर्माण केलेले नाही, असे म्हणावे लागते. शनीची कृपादृष्टी साऱ्या जगात फक्त मराठी महाराष्ट्रावरच विशेष दिसून येते. म्हणूनच महाराष्ट्रात 'पुणे' आणि 'शनिमाहात्म्य' या दोन विनतोड चिजांची खास मेहेरबानी झालेली दिसते.

अतिदारुण ग्रहपीडा कल्पांति सुद्धा बाधायच्या नाहीत ! लेखक पाठकांना सुद्धा खास ग्रंथाचे व शनीचे ' पोलीस प्रोटेक्शन. ' केवळ ' भावें श्रवण ' केले पुरे, कीं दुःख दारिद्र्याचा निःपात झालाच म्हणून समजावे. असला हा शनिमाहात्म्याचा कल्पतरु किंवा चिंतामणि, अवघ्या एक आण्यात खरेदी करून, खिशात बाळगिण्याची महाराष्ट्रीय मन्हाठ्याना खास सवलत दिल्याबद्दल शनीचे अभिनंदन करावे, का तात्याजी महिपतीच्या बिनतोड भाग्याचा महिमा गावा, एवढाच प्रश्न सुटावयाचा आहे. परंतु,

दरिद्री चले दरयेकू । करम चले साथ ।
मोतन खातर डुब्बी मारी । तो शंख लगे हात ॥

अशी तर महाराष्ट्रात काही ' गेन्बाची मेख ' नाही ना ?

——:o:——

प्रकरण ९ वे.

शनिमाहात्म्यावर शोधनप्रकाश.

मागील प्रकरणी शनीने आपल्या माहात्म्याचे जे चुरचुरीत वर्णन विक्रमाजवळ केले, त्याचा कोणीहि विचार केला तरी त्याला एकदम हीच कल्पना होईल, कीं शनीच्या पराक्रमापुढे साऱ्या देव दानवांनी आणि आकाशस्थ ग्रहांनी सपशेल हात टेकल्यामुळे, शनि हाच अवघ्या विश्वाचा स्वामी. परमेश्वर म्हणतात तो हाच. याच्यापुढे कोणाची टाप चालायची नाही कीं यावर कोणाची छाप बसायची नाही. याने नजर फिरवली कीं साऱ्या विश्वाचे सुद्धा होळकुकडे आणि तेरा तुकडे व्हायचे. अतिश्रेष्ठ ब्राम्हणवृत्ति ग्रह जो गुरू, त्यानेहि " मी गुरु तुज अतिश्रेष्ठ । बरा उपकार फेडिला " असा टोमणा मारून " परि ऐसे कोणा न कष्टवी वहिले । तुज शपथ माझी ये वेळे । " अशी शनीला शपथ घातली. विक्रमानेहि हेच मागणे मागितले, तरी शनीचा शनिपणा आहे तसाच कायम. अशा वर्णनाने भरगच्च भरलेले हे तात्याजी महिपती कृत शनिमाहात्म्य वाचणारांच्या मनांवर काय परिणाम होत असतील बरे ? कोणताहि ग्रंथ वाचायचा कशाला ? आपल्या ज्ञानात काही भर पडावी, अंतःकरणात उत्तेजक प्रकाश पडावा आणि निराशेचा अंधार नाहीसा होऊन चित्तवृत्ती प्रफुल्ल व्हावी, एवढ्यासाठीच. साडेसातीची जाहीरात फडकल्याशिवाय आधी कोणी शनिमाहात्म्य हाती घेत नाही. घेतल्यानंतर, त्याच्या पारायणाने वाचकाला काही धैर्य येण्याच्या ऐवजी दिवसेदिवस तो मनातल्या मनात खचतच जातो. एवढा मोठा उज्जनीचा चक्रवर्ति विक्रमराणा, पण त्याचा सुद्धा शनीने चिकण्या चेंदामेंदा केला, तर माझी काय कथा ? मी कोण कोटश्च कीटक ! जो नुसता जन्मता क्षणीच

बापाच्या — सूर्यदेवाच्या — आंगावर कोड फोडतो, त्याने माझ्याकडे वाकडी नजर केली तर काय जाळपोळ होईल, घातपात होतील, काय नेम सांगावा ? ज्याने सर्वश्रेष्ठ गुरूचा सव्वा प्रहरात मातेरा केला, शंकराला कैलासात पळवून, पूर्णावतार श्रीकृष्णालासुद्धा भयंकर आरोपाचे काजळ फासले, तो शनि माझी कर्णिक कोणजाणे कसकशी तिंवचणार तो ! नळ दयमंति आणि हरिश्चंद्र यांच्या आपत्तींची कडेलोट नाटकांच्या रूपाने सर्वश्रुत झालेली आहेच. हीं नाटके पाहताना अश्रु ढाळल्याशिवाय घरी परतणारा प्रेक्षक विरळा. या सत्वधीर पुरुषोत्तमांची हाडे शनीने ठेचून काढली, तर आता माझी अवस्था तो काय करणार ? असल्या कल्पनांच्या भाराखाली वाचक अर्धमेला होऊनच, शनिमाहात्म्य—पारायणाच्या फलश्रुतीची, अर्धवट विश्वासाने आणि कच्च्या दिलाने, आशा बाळगून दिवस कंठतो. या पोथीचे सामर्थ्य काय, आणि ती नुसती पोपटा सारखी बडबडून होणार काय, याविषयी वास्तवीक कल्पना ज्ञान अनुभव विचार किंवा आत्मविश्वास एकाहि साडेसाताळलेल्या वाचकाला असत नाही. नुसत्या पोथीची घोकंपट्टी करून विक्रमाच्या आणि हरिश्चंद्र नळाच्या आपत्तींचा वज्रप्रहार मला खरोखरच टाळता येईल काय ? असाहि संशय मधून मधून त्याच्या भाविक वृत्तीला उंदराप्रमाणे कुरतडीतच असतो. अशा लटपटित व लंजूर मनाच्या अवस्थेत एकदा का तो पोटभरू ज्योतिषी आणि पोटाळ भटजी यांच्या तडाक्यात सापडला, कीं मग त्याच्या चरित्राचे आणि चारित्र्याचे जे वाभाडे उडतात ते सांगता पुरायचे नाहीत. आकाशस्थ शनि पत्करला, पण हे देशस्थ कोकणस्थ शनि नकोत, असा त्याचा जीव मेट्याला येतो. आत्मशोधनाची आणि सत्यशोधनाची प्रवृत्ति शेकडा ९९ लोकात सहसा नसते. महाराष्ट्रातला बहुजनसमाज आधीच अशिक्षित. जे कोणी साक्षर असतात, त्यांच्यावर ज्ञातेपणाचा आरोपहि करणे

मुष्किलीचे होईल. 'एज्यूकेटेड' म्हणविणारांचीहि संभावना याच पंक्तीत. कोरडा ठणठणीत सचझूटपणा, नाहीतर बाष्कळ वाचाळपणा, यांपैकीं एकाद्या खांदीच्या टोकावर बसून चिकित्सेची कुऱ्हाड चालविणारे महापंडीत ते! अर्थात् सत्यशोधक प्रवृत्तीच्या अभावामुळे बहुतेक सोर साडेसाताळलेले लोक पृथ्वीवरील या जिवंत शनींच्या हातात शेणगोळया मेणगोळया प्रमाणे हवे तसे दाबले फुगविले जातात. बाधा शनीची, पण तेल शेंदराचा अभिषेक मारुतीच्या * मस्तकावर काय म्हणून? काय मारुती म्हणजे शनि? का शनीचा वकील? का पृथ्वीवरील एजंट? शनीचे चरित्र काय, मारुतीचे चरित्र काय, कशास काही मेळ? पण असला एकहि प्रश्न विचाऱ्या शून्याळलेल्या दिङ्मूढ प्राण्याना कधी सुचायचा नाही. श्रीरामभक्त ब्रह्मचारी मारुतीरायाच्या भजन पूजनाने समर्थ रामदासानी अवघ्या महाराष्ट्रात दिव्य आत्मशक्तीचे चैतन्य आरपार थरारून सोडले आणि सारा देश अक्षरशः 'समर्थ' केला. मारुतीरायाच्या संप्रदायाने सुद्धा असे तेजाळ ओजस्वी वाङ्मय निर्माण करून ठेविले आहे कीं त्यांतील "भीमरूपी महारुद्रा" हे स्तोत्र आणि "सत्राणे उड्डाणे हुंकार वदनी" ही आरतीच जरी नुसती म्हटली तरी निराशा आणि कुकल्पनांचे खड खड मुर्दे पडून, मनुष्याचा आत्माराम आत्मसामर्थ्याच्या दिव्य चैतन्याने बुभुःकार करू लागतो. कोठे ते बजरंग बली मारुतीरायाचे तेजस्वी वाङ्मय आणि कोठे हे शनिमाहात्म्याचे

---

* विचाऱ्या ब्रह्मचारी मारुतीवर त्याच्या भगतांनी इहलोकी भयंकर अत्याचार चालविले आहेत. त्यानी त्या दिव्य उदारचरिताची महाक्रूर शनीशी तर नसती सांगड घातलीच आहे, पण वांझोट्या बायांनी अपत्यप्राप्तीसाठी त्या चिरंजीव ब्रह्मचाऱ्याला दररोज प्रदक्षिणा घालघालून अगदी उठवणीस आणला आहे. आजन्म ब्रम्हचाऱ्याजवळ अपत्यप्राप्तीची याचना करणाऱ्या बाया युवांना मनाची नसली तरी जनाचीहि लाज वाटेनाशी झाली आहे.

पातडे ! कशास काही मेळ ? तात्पर्य, तात्याजी महिपतीकृत शनिमाहात्म्याच्या पारायणाने पाठक श्रोत्यांचा आत्माराम जागृत तर होत नाहीच, पण उलट तो निराशेच्या आणि कुकल्पनांच्या काळ्याकुट्ट अंधारात मात्र अधिकाधिक गुरफटतो. आधीच मुळी शनिमाहात्म्य म्हणजे काल्पनीक काव्य. त्यांतील एकहि गोष्ट खरी नव्हे. सगळ्या व्यक्ती आणि सगळा तपशील म्हणजे केवळ कवीच्या कल्पनेचे कागदी पत्र्याचे किल्ले. जसे हरिश्चंद्राचे चरित्र काल्पनीक कथा, तशीच ही विक्रमाची कहाणी कादंबरी. कमाल कठोर आपत्तीच्या तुफानात सत्वधीर मनुष्याने आपल्या सत्वरक्षणासाठी स्वार्थत्यागाची, किंवहुना आत्मयज्ञाची किती निर्वाणीची शिकस्त करता येणे शक्य आहे, याची कवींनी ही दोन उत्तम कल्पनाचित्रे रंगवून तयार केली. यापेक्षा त्यात विशेष काही नाही. त्यात बोध पुष्कळ असेल, पण त्यात मनाला चैतन्य नाही, आत्मजागृतीचा धक्का नाही, पुरुषार्थाचा संदेश नाही, कसलेच उत्तेजन नाही; येथून तेथून एकजात एकापेक्षा एक वरचढ आपत्तींचे देखावे ! 'ट्रॅजेडी' [दुःखपर्यवसायी नाटक] मोठी 'इफेक्टिव्ह' [परिणामकारक] होते, असे मूठभर आधुनिक विद्वानांचे मत आहे; आणि ते पाश्चात्य कल्पनासंकराचे फळ आहे. आद्य नाट्याचार्य श्रीभरतमुनि यानी भारतीय नाट्यात ट्रॅजेडीला मज्जाव केलेला आहे. असे करताना त्यानी भारतीय मनोवृत्तीचा चांगलाच अंदाज बांधलेला असला पाहिजे खास. आधुनिक मऱ्हाठी रंगभूमीने ट्रॅजेडी नाटकाना कितीहि मुक्तद्वार ठेवलेले असले, तरी त्यांचा मऱ्हाठी समाजावर फारसा काहीच परिणाम होत नाही. जठर-कुमारी विवाह-निषेधाचे कार्य कै. देवलांच्या आनंदपर्यवसायी **शारदा** नाटकाने जितके हासत खेळत दणदणीत केले, तितके विधवापुनर्विवाहाचे महत्त्व पटविण्यास कै. गडकऱ्यांची **प्रेमसंन्यास** ट्रॅजेडी मुळीच परिणामकारक

झाली नाही. लोक नाटक पाहतात, थेटरापुरते हळहळतात, पुंढे काही नाही. सगळाच आईस्क्रीम ! तात्पर्य, शनिमाहात्म्याच्या पोपटपंची पारायणाने साडेसातचिा फेरा तर टळत नाहीच नाही, (कारण त्यात तसे काही सामर्थ्यच नाही) पण उलट मनात निराशेची भीतीची आणि नसत्य संकटांच्या कल्पनांची निष्कारण पोखरण पडल्यामुळे, पावणेआठ वनलेला माणूस आपणच आपली साडेसाती निर्माण करू लागतो. अपायाला उपाय असतोच. तसा तो शनिग्रहाच्या दशेलाहि आहे. पण तो उपाय म्हणजे तात्याजी महिपती कृत ३८८ ओव्यांचे मराठी शनिमाहात्म्य मात्र खास नव्हे.

शनीच्या वलगनांचे वास्तवीक स्वरूप.

मी गुरूला छळले, मी शंकराला पिळले, मी हरिश्चंद्र नळाला खोल चिळले मी श्रीरामाला वनवासांत पिटाळले, मी श्रीकृष्णाला बोलबोलता पोळले, तुझी विक्रमा काय कथा ? वगैरे ज्या वलगना तात्याजी महिपतीने शनीच्या तोंडी घातल्या आहेत, त्या प्रत्येक देवाच्या व देवीच्या तोंडी त्या त्या पुराणकाराने हुबेहुब घातलेल्या आढळून येतात. शनि म्हणतो रामाचा वनवास मीच घडविला. देवीपुराणात देवी हेच म्हणते. आठरा पुराणांचे आठरा देव हेच ओरडून सांगतात. तेव्हा खरे कोणाचे मानायचे ? पार्वतीने म्हणायचे मी शंकराला चीत केले. शंकराने म्हणायचे मी विष्णूला पादाक्रांत केले. भस्मासूर ओरडतो 'हम्ने तो सब देवदानवोकू गिरीकंदरमे भगा दिया.' अशा या ब्रम्हघोटाळ्यात साधारण वाचकांची सपशेल दिशाभूल होऊन, घड कशांत काही नाही, असल्या यतो भ्रष्टस्ततो भ्रष्टः स्थितीत ते आपल्या भाविक मनोवृत्तीच्या गोधड्यांना शेकडो ठिगळे लावीत बसतात. शैव वैष्णव वादाची उत्पत्ति याच गोधड्यांत सापडते. शैवानी म्हणायचे विष्णू लुच्चा,

वैष्णवानी म्हणायचे शिव पाजी गंजड. शैवांचे गंध आडवे, तर वैष्णवांचे उभे. शैवांनी महाशिवरात्रीचा उपास करायचा, तर वैष्णवांनी त्या दिवशी पुरणपोळ्यांवर तुटून पडायचे. कांद्याने मात्र वैष्णवांची वकिली रोखठोक बजावून शैवांच्या तोंडा डोळ्यांतून तो रोज पाणी गाळीत असतो.: शैवांना कांदा तर हवा, पण बेटा आडवा चिरावा तर विष्णूचे सुदर्शन चक्र निघते आणि उभा कापावा तर शंख हातात येतो. शेवटी शंकराला शंखप्रिय बनवून शैवांचा 'आडवा' संप्रदाय, आपत्प्रसंगीचा अपवाद म्हणून, फक्त कांद्याच्या बाबतीत 'उभा' ठरविला आणि उभा चिरलेला कांदा शंकर–शंख म्हणून सेव्य मानला. देवादिकांची पुराणोक्त भांडणे त्यांची भगत–माणसे व्यवहारात किती अक्षरक्षः चालवितात, याचा मासला या शैव–वैष्णव संप्रदायात चांगलाच पाहावयास मिळतो. असे म्हणतात कीं एकाद्या वैष्णवाने शेजारच्या शैवाकडे चूल पेटवायला विस्तव मागितला, तर प्रथम पाणी शिंपडून शुद्ध करून मग तो घरात घेतात! असल्या भांडकुदळ भगतांच्या देवांची पुराणे आणि माहात्म्ये किती भांडखोर चढाओढीने लिहिलेली असतात, याचा नमुना शनिमाहात्म्यात चांगलाच उमटलेला आहे.

शिवाय असाहि एक विचार सुचतो. सीताराम, तारामति–हरिश्चंद्र, दमयंति–नळ याची पाशवी विटंबना केल्याची शेखी जर प्रत्येक देव आणि ग्रह मारतो, तर हे सारे मानव–छळक्ये काबुली पठाणांचे बाप कीं काय? असल्या या गाल्डन गँग टग्यांची माणसांनी काय म्हणून पूजा बांधावी? आणि असल्या या गंळेकापू देवांचे पुराणस्तोम माजवून, हिंदुलोक जगाच्या बाजारात आपली आणि आपल्या धर्माची काय किंमत ठरवून घेऊ इच्छितात?

शनीने आपल्या कर्तबगारीचे जे माहात्म्य स्वतःच मोठ्या दिमाखाने वर्णन केले आहे, ते अक्षरशः खरे मानले तरी त्यावरून सुद्धा त्याला देव-

कोटीत ढकलण्या पूर्वी बराच विचार करावा लागेल. सगळ्या देव-दानवांचा आणि समव्यवसायी ग्रहांचा पिच्छा पुरविण्यातच कर्तव्यानंद मानणारा हा शनिग्रह 'देव' मानणे, म्हणजे रस्त्यावरच्या शिपुर्ड्याला पोलीस कमिशनर मानण्या इतकाच मूर्खपणा होईल. राष्ट्राचा व्यवहार चालण्यासाठी आम्ही माणसानी जशी 'सरकारें' निर्माण केलेली आहेत, कायदे ठरविले आहेत आणि त्यांची अंमलबजावणी करण्यासाठी निरनिराळे छोटे मोठे हापसर नेमलेले आहेत, त्याप्रमाणे या विश्वाचे विशाळ आणि अनंत साम्राज्य काटेकोर कदरीने चालविण्यासाठी विश्वविधात्याने अशी काहीतरी घटना कशी केलेली नसेल ? अलबत केलेली आहे; आणि ती अत्यंत पूर्ण आणि निर्दोष आहे. म्हणूनच साऱ्या विश्वाचा कारभार बिनबोभाट चालू आहे. विश्वाचा कारभार जर शनीसारख्या घातपात्यांच्या हाती असता, किंवा हेच साऱ्या विश्वाचे प्रजापति असते, तर विश्वचक्राचे कधीच तीनतेरा वाजून ते सांदीला गंजून पडते. पण असे ज्या अर्थी झालेले नाही, त्या अर्थी हे शनिमहाराज स्वतः कितीहि लंब्या-चौड्या बाता झोकीत असले, तरी यांची पायरी विश्वनियंत्रणाच्या कौन्सिलात मुळीच कोठे नसून, ती कौन्सिलहॉलच्या देवडीजवळ कोठेतरी असली पाहिजे खास. शनीची अत्मस्तोमाची बडबड एकाद्या राजकारणी मुत्सद्याला शोभेशी नसून, तो एकाद्या राक्षसी हृदयाच्या फौजदाराच्या किंवा उलट्या काळजाच्या कारस्थानी पोलीसाच्या तोंडात फार छान शोभते. रस्त्यावरचा संत रुपड्याचा काळ्या कपड्याचा पोलीस, पण त्याच्या तडाक्यात भाजीवाल्या माळणीपासून तों एकाद्या पेनशनर मॅजिस्ट्रेट अगर रावबहादुरापर्यंत जरी का कोणी सापडला, तर त्याची विटंबना करण्यात तो शनीचा सख्खा भाऊ बनतो. त्यातल्यात्यात त्यांच्यावर जर एकाद्या भयंकर गुन्ह्याचा आरोप आलेला असेल, तर कबुलीजबाबाचे गुळवेलसत्व गाळण्यासाठी अंमलात येणारे पोलिशी प्रयोग प्रत्यक्ष शनीच्या अकलेला मागे सारतात, असा लोक-

प्रवाद सर्व राष्ट्रांत सर्वश्रुतच आहे. क्वचित्काळी आरोपीच्या नैतिक धैर्याने पोलीशी शनिलीला न्यायकोर्टाच्या चव्हाटयावर आल्या, म्हणजे शनि-माहात्म्य कादंबरी नसून, इहलोकची प्रत्यक्ष वस्तुस्थिति आहे, हा दाखला सर्वांना पटतो. पोलीशी शनिमाहात्म्याच्या चरकातून 'सवा प्रहराचा मातेरा' भोगून बाहेर पडलेले स्त्रीपुरूष जर आपापले आत्मानुभव लिहून निर्भय-पणाने प्रसिद्ध करतील, तर पृथ्वीतलावरील पोलीशी शनिमाहात्म्याची ती बाडे प्रसिद्ध करण्यासाठी दहा ज्ञानकोश कंपन्या चालू कराव्या लागतील. एकाद्या पाषाणहृदयी पोलिसाने किंवा जमादार इन्स्पेक्टराने वाटेल ते अत्या-चार केले, म्हणजे त्याना जाब विचारणारा जगात कोणीच नाही, असे थोडेच आहे ? कमिशनरच्या कानावर अत्याचारांची कुणकुण जायची थातड, तों खडाड वरून हंटरचे तडाखे सुरू होतात आणि अत्याचार सिद्ध झालाच तर त्याच शनिदेवांची डोंगरी येरवड्यात खडेफोडींवर रवानगी होते. इतकेच नव्हे तर, कमिशनर पासून तों थेट रस्त्यावरच्या गणेशटेबला (कॉन्स्टेबला) पर्यंत सर्वजण जर एकाद्या शनिमाहात्म्यात रंगले, तर सबंध पोलिस खात्यात चौकशीचे फिनाईल ओतून, दोषी उंदीर पिसवाना यथा-तथ्य प्रायश्चित्त देणाऱ्या वरीष्ठ सत्तांची चढण एकावर एक थेट खुद्दापर्यंत लागलेली आहेच. सत्यशोधन होऊन न्याय मिळविण्यासाठी एकापेक्षा एक वर-चढ सत्तेची योजना राज्यकारभारात * असल्यामुळेच, क्षुद्रांतल्या क्षुद्र

---

* बोलून चालून मानवांची कृति म्हणून कितीहि दोष असले तरी या बाबतींत ब्रिटीश राज्यकारभार साऱ्या जगात एकमेवाद्वितीयच होय. प्राचीन भारतीय राज्यकारभाराचे कोणी कितीहि गोडवे गायिले, तरी त्यांत चंद्रसेनी हातपायतोडीचेच प्राबल्य फार असे, हे नाकबूल करण्यात अर्थ नाही. ब्रिटीश राज्यकारभारात व्यक्तीला महत्व नसून तत्वाची कदर जबरदस्त आहे आणि यातच त्याचे वैशिष्ट्य आहे. व्यक्तिच्या व्यक्तित्वाला डावलून सम-ष्टीच्या मताने चालणाऱ्या या कदरबाज राज्ययंत्राने गव्हर्नर आणि व्हाईस-रॉयसारख्या राजप्रतिनिधींवरहि इंपीचमेंटचे खटले करून पापाचे जाब घ्यायला कमी केलेले नाही.

प्र.ण्याला सुद्धा आपल्यावरील हकनाहक अत्याचारांची बोंब थेट खुद्दांच्या कानापर्यंत पोहोचवून, आपल्या मानवी हक्कांचे स्थैर्य अबाधित राखता येते. निसर्गतःच मानव चुकीला पात्र असल्यामुळे, त्याची प्रत्येक कृति सदोष असणे शक्य आहे. सर्व बाबतीत एक परमेश्वरच काय तो 'परिपूर्ण' [परफेक्ट] आहे, मानव अपूर्ण [इंपरफेक्ट] च आहे. मानवांच्या सदोष व अपूर्ण राज्यकारभारात जर एवढी सोय आहे, तर परमेश्वराच्या निर्दोष व सर्वांगपूर्ण विश्वरचनेची राज्यव्यवस्था किती चोख असेल बरे ? शिपायीबुवा एखी कितीहि गुर्मीने वागले, किंवा गणेशपेटर (इन्स्पेक्टर) साहेब कशाहि घाशीरामीने उन्मत्त बनले, तरी एकदा का थेट कमिशनरपुढे किंवा मॅजिस्ट्रेटापुढे एकाद्याने त्यांच्या अत्याचाराची बोंब मारली आणि ते **'प्रकरण वरून खाली आले'** कीं त्यांच्या गुर्म्या न् घाशीराम्या भसाभस वितळू लागतात. हाच न्याय शनीच्या साडेसातीला लाऊन, जर आम्ही थेट खुद्दांच्या दरबारात सणसणीत शंख फुंकला, तर त्याच्या अत्याचाराला पायबंद लागणार नाही का? 'प्रकरण वरून खाली' आले कीं बंदोबस्त झालाच पाहिजे. पण आम्ही खुद्दाना अज्जिबात विसरून त्या अत्याचारी शिपायीबुवाचेच पाय रगडीत बसतो. त्याच्याच माहात्म्य-ग्रंथाच्या पारायणाची झोड उठवितो. त्याचीच स्तोत्रे गातो आणि त्याच्याच आरतींत कापरासाठी सारे जपान जाळतो. या अनाठायी उपद्व्यापामुळे तो शनि जास्त शेफारतो आणि 'ज्याअर्थी या गाढवाची मजल माझ्यापेक्षा वर जात नाही, त्या अर्थी याला शक्य तितका पिळलाच पाहिजे,' म्हणून तो त्याला विशेषच छळतो. प्रकरण वर जात आहे, इतका नुसता त्याला वास आला पुरे कीं स्वारीच्या नाड्या आखडल्याच म्हणून समजावे. "आंवऱ्या गोट्टी कनाला जाव्तेस्" म्हणून शिपायीबुवा हव्या त्या इसमावर गुर-गुरतात आणि आपल्या दिग्विजयी कर्तबगारीचा त्याच्यापुढे लांबलचक पाढा वाचतात. शनिबुवा हेच करतात. शिपायीबुवा आणि शनिबुवा यांचे गोत्र पात्र एकाच ठशाचे एकजिनशी मसाल्याचे आहे. ही केवळ माझीच विचारसरणी आहे असे नव्हे, तर त्याला ज्योतिषशास्त्राचाहि आधार आहे.

ग्रह.	परिणामाचे स्थान.	विश्वव्यवस्थेत स्थान.	रंग.	क्रीडास्थान.	वर्ण.	गुण.	तत्व
रवि	आत्मा	राजा	काळसर तांवडा	देऊळ (देवघर)	क्षत्रिय	सत्व	
चंद्र	मन	राजा	शुभ्र	तीर	वैश्य	सत्व	
मंगळ	सामर्थ्य	सेनापति	फिका तांवडा (तांबुस गौर)	अग्नि	क्षत्रिय	तम	तेज
बुध	वाणी	युवराज ,	काळसर हिरवा	क्रीडाभुवन	शूद्र	रज	पृथ्वी
गुरु	सर्व प्रकारचे सुख,ज्ञान,	प्रधान	गोरा	भांडागार (जामदारखाना).	विप्र	सत्व	आकाश
शुक्र	रतिसुख	प्रधान	शुभ्र	शयनागार	विप्र	रज	आप
राहू			निळा	वेस			
केतू			विचित्र वर्णाचा.	कोपरा			
शनि	सर्वप्रकारचे दुःख.	चाकर (जासूद)	काळा.	उकीरडा.	अंत्यज.	तम.	वायू

वायू तत्वाचा, तमोगुणी, जातीचा अत्यंज, रंगाने काळा, उकीरड्यावर राहणारा, सर्व प्रकारच्या दुःखांचा कोठारी आणि धंदा शिपायाचा, असे हे शनिचुवा आणि शिपायीचुवा समगोत्री कसे नव्हत ?

शनि हा शिपायी असो, नाहीतर शिपायी हा शनि असो, विश्वाच्या आणि मानवाच्या सुराज्यव्यवस्थेला दोघांचीहि अत्यंत आवश्यकता आहे. सगळेच पोलीसखाते जर सात्विक साधूंचे संस्थान बनेल, तर या जगात भयंकर प्रळय होतील. पोलीसच जर सात्विकगणाचा पुतळा बनला तर जगातल्या तामसी तमाशाना पायबंद लावायचा कोणी, आणि शेकडा ९५ दुष्टांच्या दुष्टपणापासून उरलेल्या ५ सात्विकांचे संरक्षण करायचे कोणी ? पुष्कळ वेळा सुक्याबरोबर ओलेहि जळले जाते, ही गोष्ट कितीहि खरी असली, तरी दुष्टांच्या दुष्कृत्यांचा उच्छेद करायला आणि त्याविषयी इतरांवर कायमची जरब बसवायला पोलीस खात्याची, हवा पाणी अन्नाइतकीच, मानवसमाजाला आवश्यकता आहे. शिवाय, पोलीस खात्याला इतक्या विलक्षण आणि भयंकर गुन्ह्यांचे तपास लाऊन बिलंद गुन्हेगाराना शोधून काढावे लागते, कीं पुष्कळ वेळा त्या कामी त्याना आपल्या प्राणांवरही तुळशीपत्र ठेऊन, समाजस्वास्थ्यासाठी पडेल ते धाडस करावे लागते. पोलीस खाते म्हणजे जगातल्या सर्व गुन्ह्यांच्या घाणीचा बंदोबस्तखाना. अशा खात्यात काम करण्यासाठी कोणी कितीहि सात्विक मनोवृत्तीचा माणूस गेला, तरी त्याला अखेर आपली मनोवृत्ती शनीइतकीच सवाई तामस बनविल्याशिवाय भागतच नाही. सत्वाच्या वृध्दीसाठी तमाचा उच्छेद, हेच ज्या खात्याचे ध्येय, त्यातल्या कामगारांना दिढी दुपटी बिलंद बनल्याशिवाय गुन्हे आणि गुन्हेगार यांचा शोध करून त्यांचे पारिपत्य करताच आले नसते आणि पोलीसखाते नसतें तर माणसाने माणसाला खाल्ल्याशिवाय खास

प्रवाद सर्व राष्ट्रांत सर्वश्रुतच आहे. क्वचित्काळी आरोपीच्या नैतिक धैर्याने पोलीशी शनिलीला न्यायकोर्टाच्या चव्हाटयावर आल्या, म्हणजे शनि-माहात्म्य कादंबरी नसून, इहलोकची प्रत्यक्ष वस्तुस्थिति आहे, हा दाखला सर्वांना पटतो. पोलीशी शनिमाहात्म्याच्या चरकातून 'सवा प्रहराचा मातेरा' भोगून बाहेर पडलेले स्त्रीपुरूष जर आपापले आत्मानुभव लिहून निर्भय-पणाने प्रसिद्ध करतील, तर पृथ्वीतलावरील पोलीशी शनिमाहात्म्याची ती बाडे प्रसिद्ध करण्यासाठी दहा ज्ञानकोश कंपन्या चालू कराव्या लागतील. एकाद्या पाषाणहृदयी पोलिसाने किंवा जमादार इन्स्पेक्टराने वाटेल ते अत्या-चार केले, म्हणजे त्याना जाब विचारणारा जगात कोणीच नाही, असे थोडेच आहे ? कमिशनरच्या कानावर अत्याचारांची कुणकुण जायची थातड, तों खडाड वरून हंटरचे तडाखे सुरू होतात आणि अत्याचार सिद्ध झालाच तर त्याच शनिदेवांची डोंगरी येरवड्यात खडेफोडींवर रवानगी होते. इतकेच नव्हे तर, कमिशनर पासून तों थेट रस्त्यावरच्या गणेशटेबला (कॉन्स्टेबला) पर्यंत सर्वजण जर एकाद्या शनिमाहात्म्यात रंगले, तर सबंध पोलिस खात्यात चौकशीचे फिनाईल ओतून, दोषी उंदीर पिसवाना यथा-तथ्य प्रायश्चित्त देणाऱ्या वरीष्ठ सत्तांची चढण एकावर एक थेट खुद्दापर्यंत लागलेली आहेच. सत्यशोधन होऊन न्याय मिळविण्यासाठी एकापेक्षा एक वर-चढ सत्तेची योजना राज्यकारभारात * असल्यामुळेच, क्षुद्रांतल्या क्षुद्र

---

* बोलून चालून मानवांची कृति म्हणून कितीहि दोष असले तरी या बाबतींत ब्रिटीश राज्यकारभार साऱ्या जगात एकमेवाद्वितीयच होय. प्राचीन भारतीय राज्यकारभाराचे कोणी कितीहि गोडवे गायिले, तरी त्यांत चंद्रसेनी हातपायतोडीचेच प्राबल्य फार असे, हे नाकबूल करण्यात अर्थ नाही. ब्रिटीश राज्यकारभारात व्यक्तीला महत्व नसून तत्वाची कदर जबरदस्त आहे आणि यातच त्याचे वैशिष्ट्य आहे. व्यक्तिच्या व्यक्तित्वाला डावलून सम-ष्टीच्या मताने चालणाऱ्या या कदरबाज राज्ययंत्राने गव्हर्नर आणि व्हाईस-रॉयसारख्या राजप्रतिनिधींवरहि इंपीचमेंटचे खटले करून पापाचे जाब घ्यायला कमी केलेले नाही.

प्रण्याला सुद्धा आपल्यावरील हकनाहक अत्याचारांची बोंब थेट खुद्दांच्या कानापर्यंत पोहोचवून, आपल्या मानवी हक्कांचे स्थैर्य अबाधित राखता येते. निसर्गतःच मानव चुकीला पात्र असल्यामुळे, त्याची प्रत्येक कृति सदोष असणे शक्य आहे. सर्व बाबतीत एक परमेश्वरच काय तो 'परिपूर्ण' [परफेक्ट] आहे, मानव अपूर्ण [इंपरफेक्ट] च आहे. मानवांच्या सदोष व अपूर्ण राज्यकारभारात जर एवढी सोय आहे, तर परमेश्वराच्या निर्दोष व सर्वांगपूर्ण विश्वरचनेची राज्यव्यवस्था किती चोख असेल बरे ? शिपायीबुवा एरवी कितीहि गुर्मीने वागले, किंवा गणेशपेटर (इन्स्पेक्टर) साहेब कशाहि घाशीरामीने उन्मत्त बनले, तरी एकदा का थेट कमिशनरपुढे किंवा मॅजिस्ट्रेटापुढे एकाद्याने त्यांच्या अत्याचाराची बोंब मारली आणि ते **'प्रकरण वरून खाली आले'** कीं त्यांच्या गुर्म्या न् घाशीराम्या भसाभस वितळू लागतात. हाच न्याय शनीच्या साडेसातीला लाऊन, जर आम्ही थेट खुद्दांच्या दरबारात सणसणीत शंख फुंकला, तर त्याच्या अत्याचाराला पायबंद लागणार नाही का ? 'प्रकरण वरून खाली' आले कीं बंदोबस्त झालाच पाहिजे. पण आम्ही खुद्दाना अज्जिबात विसरून त्या अत्याचारी शिपायीबुवाचेच पाय रगडीत बसतो. त्याच्याच माहात्म्य-ग्रंथाच्या पारायणाची झोड उठवितो. त्याचीच स्तोत्रे गातो आणि त्याच्याच आरतींत कापरासाठी सारे जपान जाळतो. या अनाठायी उपद्व्यापामुळे तो शनि जास्त शेफारतो आणि 'ज्याअर्थी या गाढवाची मजल माझ्यापेक्षा वर जात नाही, त्या अर्थी याला शक्य तितका पिळलाच पाहिजे,' म्हणून तो त्याला विशेषच छळतो. प्रकरण वर जात आहे, इतका नुसता त्याला वास आला पुरे कीं स्वारीच्या नाड्या आखडल्याच म्हणून समजावे. "आंवऱ्या गोट्टी कनाला जाय्तेस्" म्हणून शिपायीबुवा हव्या त्या इसमावर गुर-गुरतात आणि आपल्या दिग्विजयी कर्तबगारीचा त्याच्यापुढे लांबलचक पाढा वाचतात. शनिबुवा हेच करतात. शिपायीबुवा आणि शनिबुवा यांचे गोत्र पात्र एकाच ठशाचे एकजिनशी मसाल्याचे आहे. ही केवळ माझीच विचारसरणी आहे असे नव्हे, तर त्याला ज्योतिषशास्त्राचाहि आधार आहे.

ग्रह.	परिणामाचे स्थान.	विश्वव्यवस्थेत स्थान.	रंग.	क्रीडास्थान.	वर्ण.	गुण.	तत्व
रवि	आत्मा	राजा	काळसर तांबडा	देऊळ (देवघर)	क्षत्रिय	सत्व	
चंद्र	मन	राजा	शुभ्र	तीर	वैश्य	सत्व	
मंगळ	सामर्थ्य	सेनापति	फिका तांबडा (तांबुस गौर)	अग्नि	क्षत्रिय	तम	तेज
बुध	वाणी	युवराज	काळसर हिरवा	क्रीडाभुवन	शूद्र	रज	पृथ्वी
गुरु	सर्व प्रकारचे सुख,ज्ञान,	प्रधान	गोरा	भांडागार (जामदारखाना)	विप्र	सत्व	आकाश
शुक्र	रतिसुख	प्रधान	शुभ्र	शयनागार	विप्र	रज	आप
राहू			निळा	वेस			
केतू			विचित्र वर्णाचा.	कोपरा			
शनि	सर्वप्रकारचे दुःख.	चाकर (जासूद)	काळा.	उकीरडा.	अंत्यज.	तम.	वायू

वायू तत्वाचा, तमोगुणी, जातीचा अत्यंज, रंगाने काळा, उकीरड्यावर राहणारा, सर्व प्रकारच्या दुःखांचा कोठारी आणि धंदा शिपायाचा, असे हे शनिचुवा आणि शिपायीचुवा समगोत्री कसे नव्हत ?

शनि हा शिपायी असो, नाहीतर शिपायी हा शनि असो, विश्वाच्या आणि मानवाच्या सुराज्यव्यवस्थेला दोघांचीहि अत्यंत आवश्यकता आहे. सगळेच पोलीसखाते जर सात्विक साधूंचे संस्थान बनेल, तर या जगात भयंकर प्रळय होतील. पोलीसच जर सात्विकगणाचा पुतळा बनला तर जगातल्या तामसी तमाशाना पायबंद लावायचा कोणी, आणि शेकडा ९५ दुष्टांच्या दुष्टपणापासून उरलेल्या ५ सात्विकांचे संरक्षण करायचे कोणी ? पुष्कळ वेळा सुक्याबरोबर ओलेहि जळले जाते, ही गोष्ट कितीहि खरी असली, तरी दुष्टांच्या दुष्कृत्यांचा उच्छेद करायला आणि त्याविषयी इतरांवर कायमची जरब बसवायला पोलीस खात्याची, हवा पाणी अन्नाइतकीच, मानवसमाजाला आवश्यकता आहे. शिवाय, पोलीस खात्याला इतक्या विलक्षण आणि भयंकर गुन्ह्यांचे तपास लाऊन बिलंद गुन्हेगाराना शोधून काढावे लागते, कीं पुष्कळ वेळा त्या कामी त्याना आपल्या प्राणांवरही तुळशीपत्र ठेऊन, समाजस्वास्थ्यासाठी पडेल ते धाडस करावे लागते. पोलीस खाते म्हणजे जगातल्या सर्व गुन्ह्यांच्या घाणीचा बंदोबस्तखाना. अशा खात्यात काम करण्यासाठी कोणी कितीहि सात्विक मनोवृत्तीचा माणूस गेला, तरी त्याला अखेर आपली मनोवृत्ती शनीइतकीच सवाई तामस बनविल्याशिवाय भागतच नाही. सत्वाच्या वृध्दीसाठी तमाचा उच्छेद, हेच ज्या खात्याचे ध्येय, त्यातल्या कामगारांना दिढी दुपटी बिलंद बनल्याशिवाय गुन्हे आणि गुन्हेगार यांचा शोध करून त्यांचे पारिपत्य करताच आले नसते आणि पोलीसखाते नसतें तर माणसाने माणसाला खाल्ल्याशिवाय खास

सोडले नसते. मानव समाज सात्विकपणाची कितीहि वलगना करीत असला, तरी जात्या तो किती डांबीस आणि दुष्ट असतो, याचे महत्वमापन यंत्र म्हणून पोलीस खात्याचे महत्व फार आहे.

अनंत विश्वाच्या सुराज्यासाठी परमेश्वराने नवग्रहांकडे जी जी कामे दिली आहेत, त्यात पोलीसखात्याचे किचकट काम शनीला देण्यात आले आहे; आणि हे काम त्याने इतक्या चोख टापटिपीने चालविलेले आहे कीं त्यात जरा थोडी कोठे आंगचोरीची ढिलाई अगर फुसलावणीची खासगी भलाई कधी झाली असती, तर या विश्वाचा, विशेषतः आम्हा शहाण्या मानवांचा व्यवहार कधीच एळकोटात निघाला असता. प्रत्येक व्यक्तीच्या बऱ्या वाईट कर्मांची झाडझडती घेण्यासाठी शनीच्या साडेसातीचा हंटर फडाडला नसता तर ही मानवी दुनिया एकमेकाना जिवंत फाडून खाऊन कधीच ओस पडली असती.

"या (शनि) ग्रहापासून मिळणाऱ्या अनेक अशुभ गोष्टींमुळे त्याला **काळ, यम,** Reaper, **दुःख, दैन्य, सैतान** इत्यादि पुष्कळच गुण व स्वरूपवाचक नांवें पडलीं असून त्यांवर कथानकें आहेत. स्वतःची मुलें भक्षण करणारा म्हणून याला **कालभक्षक देव** असेंहि संबोधिलें आहे. फलज्योतिष वाङ्मयामध्यें 'लोभ मोह दंभ मद मत्सर सूड परपीडा निर्दयपणा निलाजरेपणा विषमता उत्पात निष्ठूरपणा निर्धनपणा दुर्मति.....' इत्यादि गोष्टींचा कारक शनिग्रह आहे, असें वर्णन आहे. आंग्ल ज्योतिर्विदांनीं 'रोग, दीर्घकाळ टिकणारे विकार, अडथळे, विलंब (खोळंबा), व्यंग, मृत्यू, दैन्य, दारिद्र्य, पाप, नाश, गुह्यें'.....इ०यांचा कारक हा ग्रह मानलेला आहे." [श्रीयुत प्रधान कृत 'जातक मार्गोपदेशिका' पृ० २३८] तात्पर्य, शनि हा सर्व ग्रहांत पक्का कचकचा रेचकचा आहे. याचे

गुणधर्म एकजात एकसारखे उत्पातकारकच, असे मुळीच नाही. शनि भयंकर असला तरी शुभंकरहि असतो. म्हणजे तो न्यायनिष्ठूर **शुद्धि-संघटण्या** म्हटला तरी चालेल, पूर्वजन्मार्जित बऱ्या वाईट कर्मांची झाडझडती घेण्याच्या कामी शनीचे कुदळ खोरे कोनाकोपऱ्यातले अणुरेणू सुद्धा खणून खोदून काढायला कमी करीत नाही. बुटांच्या तळव्यांत कोकेनच्या पुड्या, वेबस्टर-च्या डिक्शनरीतं मॉझर पिस्तुले आणि फणसाच्या पोटात काजूची दारू छपवून, मानवी पोलीसांच्या डोळ्यात कोणी कितीहि धूळ फेकली, तरी गत-जन्मी निष्पाप कुमारिकेवर किंवा पतिव्रतेवर अंधारात टाकलेला हात सुद्धा या जन्मी खच्ची करायला शनीची न्यायनिष्ठूर कदरबाज करवत एका क्षणा-चाहि मुलाजा राखणार नाही.

न कळतां पद अग्निवरी पडे ।
न करि दाह असें न कधीं घडे ॥

हे तत्व प्रतिपादन करण्यासाठी अज्ञेयवादी किंवा साशंक पंडित (ॲग्नॉ-स्टिक्स) ज्याला ' नेचर ' निसर्ग म्हणतात, त्याचेच किंचित् पाल्हाळाने शब्दचित्र काढून ज्योतिर्विद आपल्यापुढे शनि उभा करतात. पुण्यकर्मांची पाठ थोपटून, पापाचे भरपूर माप पदरात घालणारी शनीची शक्ती जर विश्वाच्या राज्यकारभारात मुळीच नसती, तर अनवस्थेच्या अत्याचारात सारे विश्व कधीच कोलमडून नापत्ता होते ! ' जसे करावे तसे भरावे ' हा निसर्गाचा दण्डक बिनमुर्वत कदरीने अंमलात आणण्याच्या कामी नवग्रहांची योजना झालेली आहे. प्रत्येक ग्रहाला एकेक विशेष गुणधर्म, पंचतत्वांपैकीं एकेक विशेष तत्व आणि निरनिराळ्या भावनांवर बिनचुक बरा वाईट परिणाम करणाऱ्या दशा (Influences) दिलेल्या आहेत. त्यामुळे कसलेहि लहान मोठे, दृश्य अदृश्य, उघड गुप्त, कायिक वाचिक मानसिक, बरे वाईट कर्म

त्यांच्या दण्डकाच्या कदरीतून प्रायश्चित्ताशिवाय किंवा पारितोषिकाशिवाय सुटलेच जात नाही. मंगळाला सेनापतीची आणि शनीला पोलीसाची भूमिका दिलेली असल्यामुळे, या दोन ग्रहांचा कारभार विशेष दणक्याचा होत असतो. त्यातल्या त्यात पापपुण्याच्या झाडझडतीच्या बाबतीत शनीची ' ॲडमिनिस्ट्रेटिव ' जबाबदारी फार मोठी.

न्याय अन्यायाची मिमांसा.

माणसाच्या शोधक बुद्धीने जगाच्या संसारात ज्या विलक्षण घडामोडी घडविण्याचा धूमधडाका चालविलेला आहे, त्याकडे नीट लक्ष पुरविले म्हणजे प्रतिसृष्टी निर्माण करून त्याने खास विश्वविधात्या परमेश्वराला सर्वच बाबतीत तोडीला तोड आणि जोडीला जोड देण्याचा चंग बांधला आहे कीं काय, असे वाटल्याशिवाय रहात नाही. जमीन पाणी आणि हवा ही तर माणसाची क्रीडांगणे झालीच आहेत, पण वातावरणाच्या अदृश्य लहरींना सुद्धा त्याने हुकमी ' मेघदूत ' बनवून, आकाशस्थ ग्रह नक्षत्रांना आपल्या कदरबाज कटाक्षात गिरफ्दार करण्याच्या खटपटी अखंड चालविल्या आहेत. साध्या संसाराच्या राजकारणात सुद्धा सत्य–असत्याची उडीद–निवडी चिकित्सा करून, याय–अन्यायाच्या मिमांसेत पृथ्वीवर स्वर्ग निर्माण करण्याची त्याची अहमहमिका रात्रंदिवस अखंड चालूच आहे. पाप–पुण्याचे रोख ठोक निवाडे करून, माणसाचा न्याय म्हणजे परमेश्वराचा न्याय, हे तत्व निःसंदिग्ध सिद्ध ठरविण्यासाठी कोर्टे, हायकोर्टे, प्रिव्ही कौन्सिले, लीग ऑफ नेशन्स वगैरे अनेक भपकेदार जाडजूड संस्थांची पैदास माणसानी केलेली आहे. याशिवाय, लोकमत लोकशाही वगैरे ' पाचामुखी परमेश्वरी ' नाटकांच्या फार्सीचे जलसे घावत्या सुधारणेने चालवून, मानवांच्या न्यायबुद्धीला थेट परमेश्वरी न्यायबुद्धीच्या डोक्यावर नेऊन बसविण्याच्या यातायाती एक-

सारख्या सुरू आहेत. देव मानवांत चाललेल्या या वर्चस्वप्राप्तीच्या शर्यतीत अखेर कोणाचा घोडा जिंकणार, या विषयी मानवांचा आशावाद विश्वा-इतकाच विस्तीर्ण आणि अनंत असला, तरी सर्वस्वी 'अपूर्ण' मानवाला सर्वस्वी 'पूर्ण' परमेश्वराच्या काटेकोर न्यायधर्मापुढे अखेर साष्टांग नमस्कारच घालावा लागेल. लष्करी आणि पोलीसी शक्तीच्या दमघाटीच्या पाठबळावर आणि माणसांनीच लिहून काढलेल्या व नित्य बदलणाऱ्या कायद्यांच्या चुकांच्या उलथापालथीवर पापपुण्याचे निवाडे करण्यासाठी, राजसत्तेचा सोन्याचांदीचा राजदंड टेबलावर आडवा ठेऊन आणि आंगावर तांबड्या, पिवळ्या, काळ्या झुली चढवून, कोणीहि बृहस्पति **न्यायाधीश** म्हणून न्यायासनावरून खऱ्या खोट्याचे निकाल देत असला, तरी तो देहमनाने मलमूत्रजन्य माणूसच असल्यामुळे, न्यायाची केवळ नक्कल साधण्यापलीकडे त्याच्या हातून विशेष काहीच घडणार नाही. लोकशाही, लोकमत, ज्यूरी, न्यायाची बिनचुकती तागडी, वगैरे सणया तुताऱ्या शिंगे शंख फुंकून, माणसानी न्यायदानाचा कितीही राजमान्य गाजावाजा केला, तरी ईश्वरी निसर्गधर्माच्या न्यायाचा अस्सलपणा मनुष्याच्या केवळ नकलेला साधणार नाही. जात्याच मनुष्य प्राणी स्वार्थी असल्यामुळे, त्याच्या न्यायमंदीरातला न्याय नेहमीच कोठे ना कोठे तरी स्वार्थाने डागळलेला असतोच असतो. विशेषतः जेथे राज्यकर्त्यांच्या—मग ते राजेशाही असो, अर्धवट राज-लोकशाही असो, अमेरिकेसारिखी झब्बू-लोकशाही असो, नाही तर इटली रशिया सारखी दिवाणमुखी मुसोलिनी लेनीनशाही असो,-राजकारणाचा विशेष संबंध येतो, तेथल्या खटल्यांत राजकारणी स्वार्थाच्या चरकांत पुराव्याचे भुईमूग सफाईत चिरडले जाऊन, हुकमी अंदाजाच्या न्यायाचे तेल किती वस्त्रगाळ गाळले जाते, हे चाणाक्ष वाचकाना सांगितलेच पाहिजे असे नव्हे. माणशी न्याय जर काटेकोर अव्यंग असते, तर त्यांत ॐपलीची

लफडेबाजी घुसडून ठेवण्याची जरूरच पडली नसती. फिर्यादितर्फे पुराव्याच्या उकीरड्याच्या किती गाड्या दाखल करून घ्याव्या, आरोपीतर्फे बचावाच्या किती बालद्यांना परवानगी द्यावी वा न द्यावी, आणि कायद्याच्या प्रत्यक्ष शब्दांच्या अर्थाची किती उलट सुलट लावणी लावावी, वगैरे कायदेबाज पंडितांच्या कजेदलाली लीलांचा विचार केला, तर माणशी न्यायमंदिरातला न्याय किती जर्मनसिल्वरी असतो, याचा तेव्हाच थांग लागतो. शिवाय मानवी न्याय अन्यायाची मिमांसा मानवकृत कायद्याच्या चष्म्यातूनच होत असल्यामुळे, हवी तेव्हा हव्या त्या रंगढंगाची काच कळत वा नकळत त्या चष्म्याच्या चौकटीत ढकलून न्यायाधीशाला चकविण्याची किंवा चुकाविण्याची चतुराई चपलजिव्ह वकीलाच्या तोंडचा फेंस असल्याने, प्रत्यक्ष खुनी इसम साधुत्वाचे सर्टिफिकीट घेऊन आणि कुप्रसिद्ध गावभवानी अक्षतयोनी कौमार्याची पावती घेऊन, मानवी न्यायमंदिरातून बाहेर पडल्याची उदाहरणे पुष्कळ आढळतात. त्यातल्या त्यात राजकारणी स्वार्थ हा असा एक बेदरकार ज्वालामुखी आहे कीं तो केव्हा कोठे कसा आपले तोंड उघडून आग ओकू लागेल आणि कोणत्या पांढऱ्या गोष्टीवर तांबडा रंग चढवून त्याची न्यायोक्त राखरांगोळी करील, याचा काहीच नेम सांगता येत नाही. तात्पर्य, माणसांची न्यायबुद्धी कसल्या ना कसल्या स्वार्थाच्या गजकर्णाने चिडचिडलेली असल्यामुळे, मानवी न्यायमंदीरातला न्याय हा शुद्ध न्याय नसून, न्यायाचा केवळ नाटकी फार्सच होय.

परमेश्वरी न्याय अन्यायाचे कोडे.

मानवी न्याय नाटकी म्हणजे पाचकळ तर खराच, पण देवाच्या घरी तरी न्याय आहे काय ? मानवांच्या घरी न्याय नाही, आणि देवाच्याहि घरी न्याय नाही, तर हा विश्वाचा कारभार काय

अन्यायावरच बिनधोक चाललेला आहे ? मानवी राज्यांत अन्यायाची परमावधि झाली तर बोलबोलता राज्यक्रांति होऊन, मोठमोठी साम्राज्ये रसातळाला गेल्याची साक्ष इतिहासात मुबलक आढळते. विश्वाचा पारमेश्वरी किंवा निसर्ग कारभार जर अन्यायाने किंचित् कोठे डागळता, तर या अनंत सृष्टीचा एका क्षणात एळकोट उडाला नसता काय ? पृथ्वीच्या पाठीवर शेकडो क्रान्त्यांची उलथापालथ दररोज घडत असताहि, पृथ्वीचा भ्रमणक्रम, चंद्र सूर्याचे उदयास्त, ऋतूंची येणीजाणी, इत्यादि ठराविक कार्यक्रमाच्या कदरीत अणुमात्र कधी कोठे अदलबदल नाही, तर देवाच्या घरी न्याय नाही, असे कसे म्हणता येईल ? या अनंत विश्वाचा नियंत्रणकर्ता ग०ई-नर कोणीहि असो, तो दिसो वा न दिसो, निर्गुण असो वा सगुण असो, पुल्लिंगी स्त्रिलिंगी असो वा निर्लिंगी असो, तें एकादे तत्व असो वा सत्व असो, त्याच्या विश्वनियंत्रणात न्याय अन्यायाच्या खटकेबाज कदरीची काही शक्ती सदैव जागृत नसती, तर विश्वाचा कारभार एक क्षणमात्र सुद्धा चालता ना ! अंतराळात विखुरलेल्या अनंत विश्वाची घटना व कारभार जर शिस्तवार कदरीने चाललेला आहे, तर परमेश्वराच्या दरबारात न्याय नाही असे कसे म्हणावे ? पण

" देवाच्या घरी न्याय नाही "

असे उद्गार आपण शेकडो लोकांच्या तोंडून ऐकतो आणि परिस्थितीची वर-वर पाहणी करून त्या उद्गाराना पाठिंबा देतो. एकाद्या निःसंशय सज्जन गृहस्थावर आपत्तींचा कडेलोट झाला, एकाद्या परोपकारी माऊलीवर दैवा-ग्नीचा ज्वालामुखी बेफाम आग पाखडू लागला, किंवा एकाद्या निरिच्छ स्वार्थत्यागी जनसेवकाच्या कार्यात संकटांच्या काट्यांच्या पायघड्या पडल्या,

तर आपण बेलुट असा निर्णय देतो कीं 'देवाच्या घरी न्याय नाही.' सतीच्या घरी वस्ती भडकते कां, आणि वेश्येच्या दारी हत्ती झुलतो कां ? पुष्कळ सज्जन दुःखांनी होरपळत असतात तर, हजारो दुष्टकर्मे मानवी राक्षस सुखात लोळत असतात ! कळकळीच्या जनसेवकाना अठरा विश्वे दारिद्र्याची मिरास, तर जळवांप्रमाणे लोकांचे रक्त पिऊन तुंद बनलेल्या झर्‍यूंच्या घरी सर्व ऐश्वर्याची आरास ! रंजल्या गांजल्या अस्पृश्यांना आवंगून पोटाशी धरणाऱ्या व त्यांच्या साक्षरतेसाठी स्वतःच्या संसारावर तुळशीपत्र ठेवणाऱ्याच्या पायात फाटका जोडा नसावा, आणि लोकाना सर्रास बेवडा पाजून त्याच्या घाणीवर झर्‍युगिरी मिरविणाऱ्या घाणबहाद्दराच्या ढुंगाखाली चोवीस तास पळती मोटार चिकटून रहावी, या विषमतेचे कारण काय ? गोरक्षकाच्या गळ्यात भिकेची झोळी आणि कसायाला दरवडीला तूप पोळी ! घडघडीत लोकांचे गळे कापण्याचा धंदा करणाऱ्याच्या गळ्यात पाचूची कंठी, आणि अभेद भावाने परोपकार करणाऱ्याच्या टाळक्यात दुर्दैवाची खुंटी, इत्यादि प्रकार पाहिले म्हणजे 'देवाच्या घरी न्याय नाही' असे उद्गार उद्वेगाने बाहेर पडतात. इतकेच नव्हे तर अधमाधम राक्षसी कृत्ये करणारांच्या पापावर पांघरूण घालण्यासाठीच श्रीमंतीच्या छिनाल लक्ष्मीला देवाने या जगात वेश्येप्रमाणे मोकाट सोडली आहे कीं काय, असा आपल्याला दाट संशय येऊ लागतो; आणि हा विश्वाचा कारभार देवाने समतेपेक्षा विषमतेवरच चालविला आहे, ही कल्पना कॉंक्रीट सिमेंटाच्या दगडा प्रमाणे वज्रलेप घट्ट बनते.

आम्हा मानवांच्या जन्मावरोबरच आमच्या पिंडाला चिकटून जन्मलेल्या स्वार्थबुद्धीच्या दुर्बिणीतूनच न्याय अन्यायाची चिकित्सा करण्याची आमची प्रवृत्ति असल्यामुळे, देवाच्या घरी आम्हाला न्याय दिसत नाही. आमच्या

सुखाला, म्हणजे सुखाविषयी आमच्या ठराविक कल्पनेला, जरा किंचित कोठे टाचंणीचे टोक लागले कीं आमच्या असंतोषाचा धणवा आतल्या आत धुमसू लागतो. त्यातूनहि जेव्हा तुफाने वावटळी धरणीकंप ज्वालामुखी महापूर अग्निप्रळय इत्यादिकांच्या रणधुमाळीत आमच्या सर्वस्वाची चांदी आटते; किंवा महामारी प्लेगा सारख्या सर्वभक्षक रोगांच्या साथीत लक्षावधि मानवांचा बोल बोलता संहार होतो, तेव्हा तर विश्वंभर परमेश्वरावर जुलमांचे आणि अत्याचारांचे हवे तितके हवे ते आरोप करताना आमची मनोवृत्ति लवमात्र मुरडत नाही. मनावरच स्वार्थाचे जाडजूड पूट बाजलले असल्यामुळे, निसर्गाच्या समतोल संरक्षणासाठी उपरोक्त नानाविध क्रान्त्यांच्या दणक्यांचा वरवंटा यथाक्रम यथाकाल फिरवणे, ईश्वरी न्यायाला किती अगत्याचे आणि क्रमप्राप्त असते, याची थोडीशीहि कल्पना आमच्या विचारयंत्रात विवेकाचे वंगण घालीत नाही. अर्थात् सज्जनांचा छळ कां होतो, आणि दुर्जनांवर छिनाल लक्ष्मीच्या वैभवाची मुसळधार खैरात कां होते, इतका सोपा प्रश्न सोडावायलाहि आमच्या बुद्धीची लायकी नालायक बनली, तर त्यात आश्चर्याला किंवा आचंब्याला जागाच कोठे आहे !

प्रत्येक मनुष्याचे-एवढेच नव्हे तर प्रत्येक प्राणीमात्राचे—वर्तमान जीवन म्हणजे त्याच्या पूर्वजन्मार्जित बऱ्या वाईट कर्मांचा आणि संस्कारांचा परिपाक होय. मागील जन्मी ज्या बऱ्या वाईट कर्मांचे विरजण घातले असेल, त्या प्रमाणात या जन्मी त्याला बऱ्या वाईट संचिताचे दही लाभते. हे दही किती गोड, किती आंबट, किंवा किती पाणचट आहे, एवढेच प्रत्येक मनुष्याच्या जन्मकुंडलीवरून अजमावता येते. यापेक्षा अधिक काही नाही. कुंडली म्हणजे मागील जन्माच्या संचिताचा नकाशा. संचित भोक्तृत्व आणि क्रीयमाण या तिरंगी गोफांत मनुष्याच्या जीवनाचा ओघ जन्मानुजन्म

गुंफला जातो. जसे पूर्वीचे संचित असेल, तसे या जन्मी भोक्तृत्व भोगल्या-शिवाय सुटकाच नसते. चालू जन्माच्या क्रियमाणाची फळे पुढील जन्मी भोगावयाची असतात. त्यांच्या जमाखर्चाचा गोंधळ चालू भोक्तृत्वात मुळचि नसतो. शिवाय, निसर्गाच्या चित्रगुप्ताच्या कचेरीत सत्कर्माच्या आणि दुष्कर्माच्या नोंदवह्या अगदी निरानिराळ्या आणि स्वतंत्र असल्यामुळे,

सत्कर्मांतून दुष्कर्मांचा वजावाट

करण्याची सावकारी 'मेहरबानी' निसर्गाला माहित नाही. चच्या वाईट संचित कर्मांप्रमाणे बरी वाईट भोक्तृत्वाची फळे निरानिराळी भोगल्याशिवाय निसर्गाच्या दण्डकातून कोणीहि निसटू शकत नाही. पुष्कळ वेळा सज्जनांवर आपत्तीचे पर्वत कोसळतात, याचे कारण त्यांचे पूर्वजन्मार्जित दुष्कृत्यांचे अथवा कुसंस्कारांचे भोक्तृत्वाचे परिणाम; किंवा त्या व्यक्तींच्या विशेष सद्गुणांचा उत्तम परिपाक होण्यासाठीं त्यांची निरानिराळ्या संकटांच्या भट्टीत होणारी सत्वपरीक्षा. ते सज्जन असले, सत्पुरुष असले, परोपकारी असले, तर त्यांच्या या सर्व सत्कर्मांची साठवणी ऊर्फ संचित ते पुढील जन्मी मधुर फळांच्या रूपाने उपभोगतील. परंतु ते **या जन्मी** सज्जन आहेत, या सबबीवर त्यांच्या **मागील जन्मीच्या** संचिताचे भोक्तृत्व त्याना टाळता यावयाचे नाही. चालू जन्माच्या भोक्तृत्वावरून आपल्याला आपल्या पूर्वजन्मीच्या संचिताच्या बऱ्या वाईट स्वरूपाची स्पष्ट कल्पना झाली पाहिजे, होणे भगत्याचे आहे, आणि ही कल्पना नीट झाली म्हणजे त्याप्रमाणे चालू आयुष्यात आपल्या क्रियमाणाची पावले नीट जपून कशी टाकावी, पुढील जन्मासाठी सत्कर्मांच्या सचिताचे भांडवल मुबलक कसे जमवून ठेवावे, हाच सर्व आपत्तींचा खरा मूळ उद्देश असतो. आपले पूर्वसंचिताचे दशी जर आंधटढाण बनलेले

असेल, तर त्यात थोडी चतुराईची साखर टाकून ते गोड करून खाणे, यालाच पुरुषार्थ असे नाव आहे. क्रिया घडली की प्रतिक्रियेचा प्रत्याघात व्हायचाच. तो निसर्गालाहि टाळता येत नाही, तर निसर्ग तरी आम्हा मानव प्राण्याना तो टाळण्याची सवलत किंवा मदत काय म्हणून देईल? परंतु मनुष्यप्राण्याला बुद्धीची विशेष देणगी प्राप्त झालेली असल्यामुळे, आघाताचा प्रत्याघात त्याला सर्वस्वी जरी टाळता आला नाही; तरी त्या-विषयी आगाऊ अंदाज बांधून त्याच्या दणक्याला पुष्कळ प्रमाणात सौम्य करण्याइतकी बुद्धीची कुशलता माणसात निसर्गाने खास ठेवलेली आहे. विस्तवाच्या निखाऱ्याला हात लावला तर हात भाजून बोटाला टरटरून फोड येतात. हा निसर्गाचा नियमच आहे. राजा असो वा रंक असो, कोणाचाहि त्यापुढे मुलाजा चालणार नाही, किंवा कोणालाहि विस्तव क्षमा करणार नाही. अशाहि स्थितीत किंचित झटपट चपळाई करून एकादा रखरखीत निखारा चटकन् हातानेच उचलून गुडगुडीच्या किंवा चिलमीच्या 'टकुऱ्या' वर ठेवणारे लोक असतातच ना! ही जी झटपट चपळाई, तिलाच बुद्धि-कौशल्य असे म्हणतात. स्पर्शाच्या परिणामाची जाणीव ठेवून, तो परिणाम शक्य तितका सौम्य करण्यासाठी, मनुष्य या ठिकाणी जी बुद्धीची कुशलता दाखवितो, तीच कुशलता आकाशस्थ ग्रहांच्या दशांचे आपत्तिकारक परिणाम सौम्य करण्याच्या कामी खात्रीने उपयोगात आणू शकतो. जन्मकुंडलीवरून आपत्कारक ग्रहांच्या परिणामाची रूपरेषा ज्योतिषी सामान्यतः सांगू शकतात. त्या परिणामांच्या पूर्ण तडाक्यांचा आगाऊ अंदाज बांधून, आपण जर आपल्या आचार विचारादि जीवन-क्रमात योग्य तो बदल चाणाक्षपणाने केला, तर ग्रहदशेचे आपत्कारी फटके (टळले नाहीत तरी) जोराने बसण्या ऐवजी बऱ्याच सौम्यपणात बसतील, यात मुळीच संशय नाही. परंतु, ग्रहदशांच्या परिणामाना सपशूट मानणारांची


किंवा त्या परिणामांची नेमळेपणाने हैवत खाणारांची मात्र, त्या फटक्यांच्या कडकडीत दणक्यांतून सुटका होणे केव्हाहि शक्य नाही. विस्तवाची दाहकता सबझूट मानली काय, किंवा त्याची रात्रंदिवस घास्ती घेतली काय, निखारा उचलण्याचा प्रसंग आला कीं दोघांचेहि हात .लटपटून, बुद्धि-कौशल्याच्या अभावी, ते खरपूस पोळल्याशिवाय रहाणार नाहीत.

पूर्वजन्मार्जित बऱ्या वाईट संचिताची बरी वाईट फळे यथातथ्य भोगायला लावण्याची कामगिरी परमेश्वराने आकाशस्थ ग्रहांकडे सोपविलेली आहे; आणि ती त्यांच्याकडून परस्पराकर्षणाच्या अखंड तत्त्वाने आपोआप बजावली जाते. सर्व सृष्टी अवघ्या पंचमहाभूतांच्या पाच तत्वांची गोळाबेरीज आहे. मानवदेह सुद्धा पंचतत्त्वात्मकच आहे. प्रत्येक ग्रहाच्या दशेत एकेक तत्व विशेष प्रधान असल्यामुळे, आमच्या कायिक वाचिक मानसिक कस-ल्याहि बऱ्यावाईट कर्मांची शुभ अशुभ फळे देण्याच्या कामी ते ते तत्व हुकमी परिणामकारक होत असते. चांगल्या संचिताचा परिणाम चांगला आणि वाईटाचा वाईट असा भोगल्याशिवाय कोणत्याहि जीवाची अथवा प्राण्याची सुटकाच कधि व्हायची नाही, असा ज्या सृष्टीचा निसर्गदण्डक अखंड जागरूक आहे, त्या सृष्टीचालकावर अन्यायाचा आरोप करणे चुकीचे आहे. आमच्या डोळ्यावर चिकटून बसलेला स्वार्थाचा चष्मा बाजूला काढून ठेवल्याशिवाय, लौकिकी व्यवहारात दिसणाऱ्या

विषमतेतच निष्कलंक समता

कशी आहे आणि अन्यायातच खरा न्याय कसा दडून बसला आहे, याची आम्हाला प्रचिती पटणार नाही. राक्षसकर्म्या नराधमांवर ऐश्वर्याची आवण-

झोड कां ? आणि नपूंसकाच्या गळ्यात पद्मिनी प्रमाणे, महामूर्ख घंढांवर लक्ष्मीची फिदा मर्जी कां ? या ' कां ' ची चिकित्सा सुद्धा आपण नेहमी स्वार्थी भावनेनेच करीत असतो. जसे ज्याचे संचित, तसे त्याचे भोक्तृत्व ! शिवाय, केवळ लक्ष्मीची बहाल मर्जी एकाद्यावर झाली, म्हणजे तो प्राणी पूर्वजन्मी मोठा पुण्यकर्माच असतो, असे थोडेच आहे ? श्रीमंती ऐश्वर्य आणि गलाल्त लक्ष्मीची पायचाटी म्हणजे उत्तम श्रेष्ठ संचिताचे पारितोषिक तरी कशावरून समजायचे ? या अवस्थेतच अनेक जीवांच्या दुष्कर्मांची कडेलोट व्हावयाची असते. योगभ्रष्ट जीवच तेवढे राजाच्या जन्माला जातात असे जे म्हणतात, त्या उक्तीतच या शंकेचे समाधान सापडते. सुखदुःखाच्या कल्पना आमच्या आम्हीच बनवीत असतो. अर्थात् ज्याला आम्ही सुख समजतो, तेच अंती दुःख आहे, आणि ज्याला आम्ही दुःख मानून खेदाने कण्हतो कुंथतो, त्याच्या पोटातच सुखाचा कोंब आहे, हे आम्हाला पटायलाच फार कठीण जाते. म्हणूनच शनि राहू मंगळादि ग्रहांच्या दशांच्या परिणामानी आम्ही हतबल व हतबुद्ध होऊन दैवाच्या सबबीवर देवाच्या न्यायाला दोष देतो.



प्रकरण १० वे.

साडेसातीची आवश्यकता.

विश्वविधात्या परमेश्वराने विश्वाचा हा कल्पनातीत अनंत पसारा प्रथम कां व कसा निर्माण केला, केला का आपोआप झाला, केव्हा केला, कधि झाला, या प्रश्नांची उत्तरे देण्याचा खटाटोप आजपर्यंत अनेक शास्त्रज्ञांनी केलेला आहे. पण त्यामुळे खुद्द संशोधकांचेहि समाधान झाल्याचे दिसत नाही. संशोधनाच्या दृष्टीने या प्रश्नाना कितीहि महत्व असले, तरी हे सारे विश्व अनादि व अनंत आहे असे गृहीत धरून, या विश्वरचनेच्या कार्यक्रमात आम्हा मानवांची भूमिका कोणती, आणि कर्तव्य काय, याचा विचार केला पाहिजे.

परमेश्वराने या विश्वाची रचना केली ती कशासाठी? ही पृथ्वी निर्माण केली ती कशासाठी? अनंत कोटी जीवजंतू पशुपक्षी यांच्या बरोबरच अचाट कल्पनाशक्तीची देणगी दिलेला मनुष्यप्राणी त्याने निर्माण केला, तो कशासाठी? काही विद्वान् म्हणतात की परमेश्वराने विश्वरचना केली आणि त्यात चाललेले खेळ पहात तो स्वस्थ बसला आहे. म्हणजे त्याने काही तरी एक बाजार भरविला आणि आपण मात्र त्यापासून वेगळा झाला; आता तो बाजार जाणे नि त्यातले बाजारी जाणे, हवा तो बरा वाईट गोंधळ घाला, मला काय त्याचे? असा या विधानाचा अर्थ होतो. परमेश्वरावर इतक्या बेजबाबदारीचा आरोप करताना, या ताळेबंद विश्वरचनेत बिनचुक जबाबदारीने वागणारा निसर्गधर्म आपल्याला कसा दृष्टीआड करता येईल? अंतराळात अधांतरी विखुरलेल्या नक्षत्रांपासून तों थेट आपल्या पृथ्वीपर्यंत सर्व ग्रहांची

दिनचर्या काटेकोर ताळेबंद चाललेली प्रत्यक्ष दिसत असताहि, विश्वाच्या पसाऱ्याला खेळ लीला किंवा करमणूक असल्या सदरात टाकू पहाणे, हा केवळ बुद्धिभ्रंश होय. दिवस रात्र, सूर्योदय चंद्रोदय व त्यांचे अस्त, समुद्राची भरती ओहटी, चंद्रसूर्यांची ग्रहणे, धूमकेतूंचे उदयास्त, ऋतु-मानांचे ठराविक येणे जाणे, चंद्राची क्षयवृद्धी, इत्यादि अनंत गोष्टी, घड्याळा-तील कदरबाज यंत्ररचने प्रमाणे, जर दररोज आम्ही उघड्या डोळ्यानी पहातो, आणि केवळ आकडेमोडी साध्या गणिताने सांगतो, तर ही विश्व-रचना आणि तिचा जीवनक्रम ही नुसती लीला किंवा काहीतरी करम-णुकीचा बेजबाबदार खेळ, असे कसे म्हणता येईल ? तिथीची पाऊणपट केली कीं तितक्या वाजता समुद्राच्या भरतीचा सीमाकाल बिनचूक अज-मावून दररोज पहाता येतो, तर भरती ओहटी म्हणजे सात अष्टमांश पृथ्वी व्यापणाऱ्या महासागराची उच्छृंखल लीलाच मानायची काय ? भरती ओहटीचे आकर्षण मुख्यतः चंद्राशी आहे. त्यातहि कधि क्षणाची चुकभूल घडत नाही. असले उघड्या डोळ्याना दिसणारे पुरावे पाहूनहि, विश्वरचनेला लीला किंवा खेळ समजणे, कवींच्या काव्याला शोभले तरी, विवेकवादाला पटत नाही.

अंतराळात विखुरलेल्या शनि मंगळ बुध गुरू इत्यादि ताऱ्यां प्रमाणे आपली पृथ्वी ही सुद्धा अंतराळात पद्धतशीर भ्रमण करणारी एक तारका आहे. एक ग्रह आहे. मनुष्यापासून तो किडीमुंगीपर्यंत जसे या पृथ्वीवर जीव आहेत, तसे ते या शनि मंगळ बुध गुरूवर आहेत कीं काय, असल्यास ते कसे असावे, त्यांच्याशी आपल्याला काही बातचीत करता येईल कीं नाही, इत्यादि अनेक दृष्टि युरपस्थ खगोल-शास्त्रज्ञांनी हाती घेतले असून, त्यात त्यानी अनेक अनुमाने काढली आहेत.

मंगळ ताऱ्यावर वसति आहे, हा सिद्धांत बहुतेक सिद्ध झाल्य सारखा असून, नुकताच मंगळ तारा पृथ्वीच्या बराच जवळ आल्याची पर्वणी साधून, युरपस्थ खगोल शास्त्रज्ञांनी आल्पस पर्वताच्या माथ्यावर प्रचंड प्रकाशाचा झोत तयार करून, मंगळावरील लोकाना 'सिग्नलिंग्' खुणा करण्याचा प्रयत्न केला. अझूनहि हे असले प्रयत्न चालूच आहेत आणि निसर्गदत्त कल्पनाशक्तीच्या जोरावर मनुष्य प्राणी या विश्वरचनेचे एकानिष्ठ संशोधन करण्यात काय काय चमत्कारांचा आदिअंत हुडकून काढील, हे सांगण्याचा अधिकार फक्त भविष्य कळालाच आहे.

मूठभर मीठ आणि पोटभर भाकरीला महाग झालेल्या आजच्या हिंदुस्थानाला स्वतःच्या पोटाच्या विश्वापलीकडे पहाण्याची शक्ति जरी नसली, तरी विश्वाच्या पोटांतील चमत्कार हुडकिण्यासाठी युरप अमेरिके सारख्या समृद्ध देशांतील खगोलज्ञ लोक रात्रंदिवस परिश्रम करीत आहेत. केवळ अंतरिक्षांतील चमत्कारच नव्हे, तर या सृष्टीच्या निसर्ग धर्मांतील गूढ रहस्याना सुद्धा हुडकून काढून, त्यांचा मानवी सुखवर्धनासाठी उपयोग करण्यात संशोधक विद्वानांच्या पिढ्यान् पिढ्या खर्ची पडल्या आहेत, आणि सध्या पडत आहेत. हिंदुस्थानात प्रोफेसर सर जगदीश चंद्र बोस यांनी वनस्पतींच्या जीवन-संवेदना विषयी लावलेले शोध, आणि युरोपात विनतारी तारायंत्राने केलेली अचाट क्रान्ति. * इत्यादि

---

* विनतारी रेडिओने आज साऱ्या जगाला जवळ जवळ आपल्या रहात्या घरात अगदी उशापायथ्याला आणून ठेवले आहे. मुंबई, कलकत्ता, कोलंबो येथे दररोज होणारे संगीत जलसे, वाद्यवादन, व्याख्याने, बातम्या, बाजारभाव खुशाल घरबसल्या आज हवा तो मनुष्य स्पष्ट ऐकू शकतो. मुंबईस रेडिओचा प्रसार घरीदारी हॉटेलांत सार्वजनिक कट्टांगणांत सध्या पुष्कळच झालेला आहे.

परिणाम नीट विचारात घेतले तर बुद्धिमान मानवांच्या या सर्व धडपडी कशासाठी चालल्या आहेत ? हा प्रश्न प्रामुख्याने आपल्यापुढे येतो. लक्षावधि मैल अंतरावर असणाऱ्या अंतराळातील सूर्य चंद्र शनि मंगळाचे खास फोटो काढून, त्यांवर काय काय भानगडी चालल्या असाव्या, त्या कोण करीत असाव्या, इत्यादि धाडशी प्रयोगापासून तों केवळ वातावरणाच्या लहरींतून पाताळवासी अमेरिकन मित्रशी विनतारी टेलिफोनचे खास संभाषण करण्यापर्यंत, माणसानी निसर्गावर जी हातखंडा मोहीम चालविली आहे, तिची अखेर तरी कशात होणार ! बॉम्ब हाविट्झर टॉरपेडो ड्रेडनॉट विमाने वगैरे मानवसंहाराच्या साधनांचीहि मुबलक पैदास करण्यात माणसांचा आटारेटा रात्रंदिवस चालूच आहे. घरबसल्या चुटकी वाजविताच अनेक अक्षौहिणी सेना ठिकच्या ठिकाणी गारद करणारे मंत्र तंत्र वा यंत्र शोधून काढण्याहि अनेक खंदे संशोधक आपली बुद्धी आणि आयुष्य खर्ची घालीत आहेत. या सर्व संशोधक महाभागाना विचारले कीं 'ही सारी खटपट आणि धडपड तुम्ही कशासाठी चालविली आहे ?' तर ते झटकन् उत्तर देतात कीं

"जगात शांति प्रस्थापित करण्यासाठी."

तलवार चालवून मानवी रक्तपाताच्या पुण्याईवर परदेशांना गुलामगिरीत जखडून टाकणारे शहाणेसुद्धा आपल्या अत्याचारांचे मण्डण शांतीच्या सबबीनेच करतात. महायुद्धे कशासाठी ? तर म्हणे जगात शांति प्रस्थापित करण्यासाठी. रक्तपात कशासाठी ? तर रक्तपात थांबविण्यासाठी. काट्याने काटा काढता आला, तरी त्याने जखमा बऱ्या होत नसतात ! म्हणजे विषप्रयोग करून विष उतरणारे देवदूतच हे म्हणायचे ! रक्तपात अत्याचार

मुस्कटदाबी इत्यादि साधनानी .परदेशांवर राज्य करणाऱ्या उपटशुंभ राज्यकर्त्यांनी " आम्ही हे सर्व शान्तिसाठी करीत आहों " असल्या वल्गना करणे, म्हणजे घराला लागलेली आग पेट्रोलचे डबे ओतून विझविण्याचा प्रयत्न करण्या इतकेच बाष्कळपणाचे आहे. आज हिंदुस्थानात ब्रिटीश नोकरशाहीची जी सोटेबारगिरी चालू आहे, तीसुद्धा ते म्हणतात " पीस ॲण्ड ऑर्डर " साठीच.

पीस ऊर्फ शांति म्हणजे काय ?

त्यांचा तो " पीस " ऊर्फ शांति ही चीज तरी काय असावी ? शांतीची शांतता थंडीच्या कडाक्याप्रमाणे सर्वत्र फैलावली, म्हणजे काय होणार ? काय रामेश्वर उठून काश्मिरला जाणार, सगळे भिकारी टाटा बनणार, हिंदु लोक गोरे बनणार, साहेब लोक काळे अदमी बनणार, दारूचे अमृत होणार, पाण्याऐवजी दुधाचा पाऊस पडणार, टाकसाळीत मुक्तद्वार द्रव्य लुटले जाणार, बायांचे चुवा होणार ? होणार तरी काय ? शान्ति म्हणजे कायमची निवांती. मग कसली खटखट नाही, धडपड नाही, काही नाही. शांति मिळाली कीं मग जन्म तरी कसला आणि मृत्यु तरी कसला ? शांतीचे स्थान म्हणजे मसणवटी. तेथे मात्र ' पीस ' आणि ' आर्डर ' नांदते खरी. ' हिंदुस्थानात पीस आणि ऑर्डर प्रस्थापित करावयाची आहे' या महावाक्याचा स्पष्टार्थ

" हिंदुस्थानाची मसणवटी बनवायची आहे "

असाच होतो. माणूस मेला म्हणजे त्याला शांति मिळते. फलाण्याच्या 'आत्म्याला शांति मिळो! ' ही प्रार्थना कोणीहि जिता माणूस कोणाच्या जीवंतपणी करीत

नाही. जिवंतपणा हा शांतीसाठी मुळी नाहीच. अर्थात् शांतीसाठी धडपडणारी तडफडणारी राष्ट्रे आपल्या जीवाला कंटाळलेली आणि मृत्यूसाठी चवताळलेली असली पाहिजेत एक, अथवा लचाड बोलून भोळ्या भाबड्याना फडविणारी सोनेरी टोळी असली पाहिजेत; या पेक्षा तिसरा कयासच संभवत नाही. चिरकालीक शांतीच मिळवायची तर जे काम सोमलाच्या एका पुडीने, किंवा तळ्याविहिरीतल्या एका बुडीनेहि सफाईत साधते, त्यासाठी चमत्कारशोधनाचा आटारेटा कशाला, जिनीवाची लीग ऑफ नेशन्स कशाला, हिंदुस्थानात रॉयल कमिशने कशाला आणि बिनचौकशी कैदेचे कायदे तरी कशाला ? मध्यवर्ति दिल्लीच्या बुरुजावरून चौफेर हजारमैली हॉवित्झरचा मुलखमैदानी मारा केला कीं चोवीस तासात अखिल भरतखंडात शांतीच शांति ! शांतिसूक्ते म्हणायला सुद्धा कोणी जिता जीव सापडणार नाही ! अशा शांत अवस्थेत शांतिसम्राट म्हणून दिल्लीच्या तक्तावर बसायला कोणाचे प्रेत तयार होईल, हे तरी कोणाच्या शांत थंडगार प्रेताने जाहीर करावे ? आसेतु हिमाचल पीसच पीस आणि ऑर्डरच ऑर्डर !

शान्ति का क्रान्ति ?

विधात्याने हे अनंत विश्व आणि ही नाना रत्नानि वसुंधरा निर्माण केली, ती जर केवळ शांतीसाठीच असती, तर पृथ्वीला आणि अंतराळातल्या अगणित ग्रह ताऱ्यांना नियमित गतियुक्त करून त्याना सूर्याभोवती वणवण भटकायला त्याने लावलेच असते कशाला ? चंद्राची क्षयवृद्धी कशाला आणि समुद्राची भरती ओहोटी तरी कशाला ? तुफाने कशाला ? धरणीकंप कशाला ? चंद्र सूर्याची ग्रहणे कशाला ? ज्वालामुखीचा अग्निप्रलय कशाला ? आणि जन्ममृत्यु तरी कशाला ? माणसांप्रमाणेच जर विश्वविधाता

शांतीचा भोक्ता असता, शांति हेच त्याच्या विश्वनिर्मितीचे ध्येय असते, तर त्याने या विश्वाचा कायमचा एक जड ठोकळा रचून ठेवला असता कीं काम भागले असते ! मग काय शांतीच शांति ! ना कोठे धडपड का ना कोठे काही गडबड. सर्व शांत निवांत ! म्यूझियम मध्ये सृष्टीचे शेकडो देखावे हुबेहूब करून मांडलेले असतात. तसला प्रकार दिसला असता. म्यूझियम मधला ज्वालामुखीचा देखावा साक्षात् अग्निप्रळयाचा दिसतो. पण तो काही म्युझियमची इमारत जाळून खाक करीत नाही. केव्हाहि पाहिले तरी तोच धुराचा लोट, तोच अग्नीचा वर्षाव ! प्रत्यक्ष त्याला हात लावला तरी हात भाजत नाही, जळत नाही. मातीचे ढेकूळ ! थंडगार. अगदी शांत. तेथील प्रदर्शनात मोठमोठे सिंह वाघ सर्प ठेवलेले असतात. ते सुद्धा अगदी हुबेहूब जित्याप्रमाणे दिसतात. आता आपल्यावर झडप घालतील कीं काय असा भास होतो. पण जित्यांचा जिवंतपणा त्यात नसतो. ते थंडगार, शांत असतात. कारण ते मेलेले मुर्दे असतात. विश्व-विधात्याने या अनंत सृष्टीच्या सनातन चालनेसाठी प्रत्येक अणुरेणूत जी एक वर्णनातीत **प्राणज्योत** उजळून ठेविली आहे, ती या मुर्द्यांत विझा-लेली असते. ती विझाली, किंवा कोणी विझविली, तेव्हा ते सिंह वाघ शांत झाले. त्यांचे मुर्दे पडले. ते मेले. त्याना ' पीस ' मिळाला आणि मग त्यांच्या मुर्द्यांना ही प्रदर्शनांतील ' ऑर्डर ' म्हणजे सुव्यवस्था लाभली.

शांति मुर्द्याची, क्रांति मर्दाची.

जित्या मर्दाने क्रांति करावी, मेल्या मुर्द्याने शांति वरावी. क्रांति माण-साची, शांति मसणाची. हा निसर्गाचा सनातन धर्म आहे. विश्वरचनेचे ध्येय आहे. विश्वातली अगम्य प्राणज्योत क्रांतीसाठी धडधडत असते, शांतीसाठी नव्हे.

परमेश्वराने विश्वरचनेची जी एवढी यातायात केली आणि या पृथ्वीला नानारत्नांची खाण बनविली, ती काय मेल्या मुर्ख्यांची मसणवटी म्हणून ? मुळीच नाही. अखंड प्रकाशमान् सूर्याला मध्यवर्ति केंद्र बनवून, त्याच्या भोवती चंद्र मंगळादि ग्रहाना पद्धतशीर चक्राकार फिरत ठेवले आहे, तेव्हा त्या परस्परांमध्ये काही तरी आकर्षणाचा विशेष धर्म असलाच पाहिजे. आणि ज्या अर्थी सारे विश्वच क्रांतीसाठी निर्माण झालेले आहे, त्या अर्थी या सर्व ग्रहांमध्ये क्रांतिकारक काही तरी विशेष धर्माची योजना झालेली असलीच पाहिजे. त्याशिवाय क्षुद्र कीटकापासून तों थेट मनुष्यापर्यंत आणि धुळीच्या क्षुल्लक कणापासून तो हिमालयाच्या गौरीशंकरापर्यंत क्रान्ती-एनरजीचा सणसणाट आपोआप चाललेला राहताच ना. क्रान्तीचे चैतन्य मानवी जीवनविकासाला पुरविण्याचे काम नवग्रहांकडून कसकसे बजावले जाते, ते आता पाहूः-

[१] आपली जीवन-संवेदना म्हणजे जगण्याची इच्छा ही गर्भसंभवापासूनच आपल्या अंतर्यामी हळुहळू उमलत असते. फुलाप्रमाणे तिचा विकास होत असतो. या विकासाच्या कामी रवि-सूर्य-याचे गुणधर्म सहाय करीत असतात. सूर्य ज्या प्रमाणे आपल्या स्वयंभू तेजाचा विकास करीत असतो, तीच विकसनाची क्रिया जीव आपल्या अनुकरणात आणतो. म्हणजे रवि हा जीवन-विकासाचा ग्रह होय.

स्पष्टीकरण.

प्रकाश म्हणजेच जीवन. प्रकाश नष्ट झाला कीं साऱ्या विश्वाने राम म्हटलाच. अखिल विश्वाचे जीवन सूर्यप्रकाशावर विनधोक चालले आहे. प्रकाशाबरोबरी सारी सृष्टी धडपडत असते. सूर्यास्त झाल्यावर अंधाराला पाय-

बंद लावण्यासाठी आपण दिवे लावतो. शुक्लपक्षात परप्रकाशी चंद्राचे चांदणे १५ रात्री लाभते. तरीसुद्धा गॅसलाईट इलेक्ट्रिसिटीचा प्रकाश निर्माण करून, आपण आपली स्वयंभू प्रकाश-वांछना पुरविण्याच्या धडपडी अखंड चालविल्याच आहेत. रात्र छोटी असो वा मोठी असो, चांदणी असो वा काळोखी असो, आम्हाला लवमात्र अंधार सहन होत नाही. अंधार म्हटला कीं आमचा जीव कोंदाटतो, प्रकाशासाठी धडपडतो; मग तो प्रकाश मेण-बत्तीचा असो, नाहीतर पणतीचा असो, पण आम्हाला प्रकाश पाहिजे.

या कारणें सूर्यापुढें । दुसरी साम्यता न घडे ।
जयाच्या प्रकाशें उजेडे । प्राणीमात्रांसी ॥ ३ ॥
सूर्याचे अधिष्ठान डोळे । डोळे नसता सर्व आंधळे ।
या कारणें कांहींच न चले । सूर्येंविण ॥ ८ ॥
म्हणाल अंध कवित्वें करिती । तरी होहि सूर्याचीच गति ।
थंड झालिया आपुली मति । मग मतिप्रकाश कैचा ॥ ९ ॥
उष्ण प्रकाश तो सूर्याचा । शीत प्रकाश तो चंद्राचा ।
उष्णत्व नसता देह्याचा । घात होये ॥ १० ॥
या कारणें सूर्येंविण । सहसा न चले कारण ।
श्रोते तुम्ही विचक्षण । शोधून पाहा ॥ ११ ॥

—दासबोध, दशक १६–२ स.

सहा महिने रात्र आणि सहा महिने दिवस असलेल्या उत्तर ध्रुवाच्या बर्फमय प्रदेशातिल प्राचिन आर्यजनानी अग्निपूजनाचा उपक्रम कां सुरू केला, त्याचे मर्म वाचकांच्या आता लक्ष्यात आले असेलच. तेच अग्निउपासक आर्यजन उत्तर ध्रुवाकडून मध्यआशियातील गोबीच्या अरण्यात आणि पंजाबच्या सरहद्दीवर येताच, त्यांना स्वच्छ निळवर्ण निरभ्र आकाशात सूर्यबिंबाचे दर्शन होताच त्यांचा हर्ष गगनात मावे ना.

सूर्यापुढें आणिक दुसरें । कोण आणावें सामोरें ।
तेजोरासी निर्धारें । उपमेरहित ॥ १८-१६।२.

जीवन-प्रकाशासाठी अग्निपूजन करणाऱ्या प्रकाश-मुमुक्षू आर्यांना सूर्यदर्शन होताच, त्यांचा मतिप्रकाश विकसित झाला आणि त्यातच हिंदूना पूज्य व पवित्र वाटणाऱ्या चतुर्वेदांची न भूतो न भविष्यति अशी निष्पत्ति झाली. मतिप्रकाशजन्य कवित्वाच्या उत्कट उमाळ्यातून

ॐ भूर्भुवः स्वः
ॐ तत्सवितुर्वरेण्यं भर्गो देवस्य धीमही
धियो यो नः प्रचोदयात्

हा जो सवितृ-प्रार्थनेचा गायत्रि मंत्र निर्माण झाला, तो आजहि अनेक सूर्योपासकांच्या जीवन-संवेदनेला अंतःप्रकाशाने अखंड उज्वल ठेवीत आहे. तात्पर्य, रविग्रह म्हणजे यच्चावत जीवसृष्टीचा जीवन-प्रकाशच होय. सूर्योपासना आणि अग्निपूजन केल्यामुळे मनुष्याची कायिक वाचिक मानसिक आणि आत्मिक शक्ति सूर्याप्रमाणेच तेजस्वी आणि वीर्यवान् बनते. क्षयरोगासारखे असाध्य रोग केवळ सूर्यप्रकाशानेच सुधारण्याचे प्रयोग आज सिद्ध झाले आहेत. आर्यवंशज म्हणविणाऱ्या हिंदुजनानी अग्निपूजा लाथाडून, सूर्योपासनेऐवजी भलभलत्या ३३ कोटी दगडधोंड्या देवांची उपासना चालू केली, त्या क्षणापासूनच त्यांचा ऱ्हास आणि अधःपात चालू झाला आणि आजच्या घटकेला ते परराष्ट्रांचे गुलाम बनून माणुसकीच्या हक्कानाहि मुकले आहेत. पारशी इराण्यांसारखी मूठभर लोकसंख्येची जात सूर्योपासक व अग्निपूजक असल्यामुळे, हव्या त्या भल्याबुऱ्या परिस्थितीत उत्कर्षत्वाने टिकाव धरून कां राहाते, याचा उलगडा हिंदुजन पुन्हा सूर्योपासनेकडे एकाग्र चित्ताने परततील, तरच त्याना प्रत्यक्ष अनुभवाने पडताळता येईल. एरवी वायफळ पुराणे प्रवचने काय कामाची ? सूर्योपासना आणि अग्निपूजन बंद

झाल्यामुळे हिंदूंच्या जीवन--विकसनाची संवेदनाच हतसंज्ञ झाली, या वर्मांकडे मी अखिल हिंदु जनतेचे मार्मिक लक्ष्य विशेष अट्टहासाने वेधू इच्छितो.

सकळ दोषांचा परिहार । करिता सूर्यास नमस्कार ।
स्फूर्ति वाढे निरंतर । सूर्यदर्शन घेतां ॥ २२-१६-२.

[२] जीवाने आपल्या विकसनासाठी रवी पासून प्रकाश घेतला कीं त्या प्रकाशाचे परावर्तन मनावर होऊन, तेथे विकार आणि विचार यांचा जन्म होतो. कसा ? सूर्याचा प्रकाश जसा चंद्रावर पडून आपल्याला चांदणे लाभते, कमळे उमलतात, समुद्राला भरती येते, त्या प्रमाणे. म्हणजे **चंद्र** हा मनाचा व मनोविकारांचा कारक ग्रह आहे. मना प्रमाणे चंद्र सुद्धा चंचळ असून, त्याला क्षयवृद्धि होत असते.

[३] मनोविकार पुष्कळ जमा झाले आणि समुद्राच्या भरती प्रमाणे त्यांच्या लाटा उसळू लागल्या, पण त्यांच्यावर शुद्ध स्वच्छ मनाचे--विवेकाचे नियंत्रण अगत्य पाहिजे. हा विवेकाचा पुरवठा करण्याचे काम **बुध** ग्रह करीत असतो. 'बुधाची बुद्धी भारी' असे तात्याजी महिपतीने केलेले वर्णन सार्थ आहे.

[४] मनोविकाराना नुसत्या नियंत्रणाची तोंडबेडी घालून काय उपयोग ? ही बेडी लोखंडी अविवेकाची असो, नाहीतर सोनेरी विवेकाची असो, ती बेडीच. ती नुसती अटकाव करील. विवेकाने मनोविकाराना नियंत्रण घातल्यावर, म्हणजे मनुष्याने मनाला समतोलपणा आणल्यावर, स्वतःसाठी आणि इतरांसाठी, विशेषतः समोरच्या व्यक्तीसाठी, (पुरुषाने स्त्रीसाठी आणि स्त्रीने पुरुषासाठी) त्या मनोविकारांची एकतानता कशी साधावी, या कल्पनेचा उगम होतो. मनोविकारांची ही एकतान वाटणी करण्याचे काम **शुक्र** ग्रह करतो.

[५] पण ही सर्व कामे सर्व काळी यथासांग थोडीच शेवटाला जातात ? मध्यंतरी काही ना काही भानगडी उपस्थित व्हायच्याच. ठरलेले ध्येय प्रत्यक्ष कृतीत उमटताना, जगाच्या व्यवहाराचे काही बरे वाईट संस्कार त्यावर पडतात आणि दुर्दैवाने जेथे आपण शांतीची कल्पना करावी तेथे भांडणतंटे धुसफूस वेवनाव दत्त म्हणून उभे. ध्येय गाठण्यासाठी चढ चढ मनुष्य चढला. आता एकच उडी घेतली कीं शिखराचा कळस हाती लागलाच, म्हणून जों पुढे सरसावतो तों पाय घसरून धडाड टेकडीच्या पायथ्याशी पालथा ! काल ऐश्वर्याच्या स्वर्गात, तर आज अधःपाताच्या नरकात ! अशा अधःपात झालेल्या मनुष्यानी स्वतःच्या मनगटाच्या जोरावर फिरून निश्चयाने आपले ध्येय गाठावे, पुन्हा आत्मबळावर नरकातून ऐश्वर्याच्या स्वर्गात उड्डाण करावे, अशी स्फूर्ति देण्याचे काम लढवय्या **मंगळ** ग्रह करीत असतो.

[६] खडकाळ व्यवहाराच्या मैदानावरून कधी अडखळत ठेचाळत तर कधी हासत खिदळत, मनुष्याच्या जीवनक्रांतीचा प्रवास चालला असता, एकदा त्याला न्याय क्षमा भूतदया या सद्गुणांची पूर्ण ओळख पटली कीं त्याला पोटाशी धरायला **गुरु** ग्रहाची योजना झालेली आहे.

[७] परंतु नुसत्या दया क्षमा शांतीच्या भांडवलावर जीवनोत्क्रान्तीचा कार्यभाग पूर्ण होत नाही. जेव्हा **शनि** त्याला आपल्या कोलदांड्यात अडकवून, घोड्या प्रमाणे चांगला आडवा उभा हाबकतो, तेव्हा आत्मानात्म विचार काय आहे, शुद्ध ज्ञान काय, त्याच्या शोधनप्रकाशाने अनेक गूढ प्रश्न सोडविण्याची सोपी युक्ती काय, याचा शोध करण्याची आतुरता–मुमुक्षुवृत्ति–माणसात जागृत होते; आणि तो एकदा त्या आतुरतेच्या मार्गाने नीट जाऊ लागला कीं अखेरीस **शनीच्या कोलदांड्यासारखा जिव्हाळ्याचा उपकारी**

मित्र दुसरा कोणी नाही, हेच त्याच्या प्रत्ययाला येते. तात्पर्य, एकादी आई आपल्या मुलाला सडकून चोप देते, किंवा ' मर मेल्या कार्ट्या ' म्हणते, म्हणजे त्या मुलाने आपला मार खाऊन ठार मरावे, अशी तिची इच्छा असणे शक्य असते काय ? मुळीच नाही. त्या मुलाने दुर्गुणी होऊ नये, सद्गुणी व्हावे, ही जी तिची इच्छा, तीच शनीच्या कोलदांड्या साडेसातीत गर्भित आहे.

[८] मनुष्याच्या जीवनाची उत्क्रांति केवळ उपरोक्त मुमुक्षवावस्थेने पुरी होत नाही. आजूबाजूला पसरलेल्या निसर्गापलीकडचेहि निसर्गातीत ज्ञान प्राप्त करावे लागते. या ज्ञानाचा ठाव लागल्या खेरीज, ' मी कोण ? ' याचा उलगडा होणार नाही. हे निसर्गातीत ज्ञान (सुपरनॅचरल नॉलेज) **प्रजापति** (युरॅनस, हर्शेल) पासून प्राप्त होते.

[९] आणि अखेर—

अजं निर्विकल्पं निराकारमेकम् ।
निरानंदमद्वैतमानन्दपूर्णम् ।
परं निगुर्णं निर्विशेषं निरीहम् ।

असे जे परब्रह्माचे परमोच्च परम पवित्र ज्ञान, त्याच्या अवगाहनाचा मार्ग वरुण नेपच्यून दाखवितो.

सारे विश्व, सारी सृष्टी क्रान्तीसाठी धडपडत असते. मळमळीत ठराविक साच्याच्या जीवनाला क्रान्तीच्या या धसळामुसळीत मुळी जागाच नाही.

नित्य नवे, क्रान्तीला हवे.

क्रान्ति म्हटली कीं अदलाबदल, तोडमोड, जाळफोड आलीच. नवग्रहांच्या सहाय्याने निसर्गात क्रान्तीचे चैतन्य अखंड थरारत ठेवण्यात, बुद्धिप्रधान माणसानी आत्मजीवनात क्रांति करून साऱ्या जगाला क्रांतीने

जगवावे, हाच परमेश्वराचा हेतु आहे. पण क्रान्ति म्हटली कीं आमच्या तंगड्या मटकन् मोडतात. शांतीचा ऊरफोडी धोसरा धरून, सुखाच्या पाठलागातच आम्ही नेहमी गर्क. साध्या टीचभर संसारात सुद्धा आम्हाला दुःखाचा लवलेश नसावासा वाटतो. सर्व काही सुरळीत चालावे, कोठे कसलाहि अटकाव नसावा, क्लेश नसावे, सुखाच्या सर्व कल्पना हुकमी हातात पाव्या, सर्व कारभार शांतपणे चालावा, ही आमची इच्छा. कोठे पायाला काटा बोचलेला आम्हाला सहन व्हायचा नाही. लगेच प्राणान्तिक बोंबाबोंब सुरू. उदरंभरणाच्या धडपडीची यातायात जर नसती तर आम्ही सुखलोलूप हिंदी माणसे थडग्या प्रमाणे शांत अवस्थेत निश्चित पडून राहिलो असतो. अशा वृत्तीच्या शांतिप्रिय माणसाना साध्या संसारी संकटानी चक्कर यायची, तर ग्रहदशेचे जीवनविकासी फेरे मृत्यूपेक्षा भयंकर, अन्यायी आणि जुलमी वाटून, ते आत्महत्येलाहि प्रवृत्त झाले तर नवल कशाचे ! बरे, सुख कोणते आणि दुःख कशाला मानावे, याच्या कल्पनाहि आमच्या आम्हीच ठरविलेल्या आहेत. आमच्या सर्व धडपडींचा रोख त्या सुखाच्या कल्पनेच्या दिशेकडे. अमूक प्रकारची धडपड केली तर मला अमूक प्रकारचे सुख मिळेल, यापेक्षा दुसरी कसलीहि विवंचना आमच्या हालचालीत नसते. या सुखाच्या कल्पनासुद्धा आम्ही दुसऱ्या कोणाकडे—आमच्या हिशोबाने सुखी असणाराकडे—पाहून ठरवीत असतो. कल्पनेप्रमाणे सुखाची स्थिति लाभली तर आम्ही प्रयत्नवादाचे गोडवे गातो; आणि प्रयत्नांची कडेलोट करूनहि जर ती ठराविक स्थिति प्राप्त झाली नाही, तर लगेच कट्टे दैववादी बनून दुःखाने हळहळू लागतो. या सगळ्या हासण्या रडण्यातले तात्पर्य इतकेच कीं

सर्व गोष्टी आमच्या मनाप्रमाणे व्हाव्या.

इतकीच आमच्या महत्वाकांक्षेची सारी भरारी. दैववाद आमची डोकी प्रत्यक्ष फोडीत असला, तरी प्रयत्नवादावरहि डोकी फोडायला आम्ही कमी

करीत नाहीं. पण या दोनहि वादांच्या वादात देववाद मात्र आजिबात डावलून त्या अनंत ब्रह्माण्ड नायक परमेश्वराची आम्हाला चुकून सुद्धा आठवण होत नाही. जेथे देवालाच आम्ही विस्मरणाची बगल मारली; तेथे विश्वनियंत्रणाची आणि जीविवकसनाची देवाची शाश्वत इच्छा आमच्या अशाश्वत आणि तात्पुरत्या सुखाच्या पेनशनीत काढली, तर त्यात आश्चर्य कसले ?

असल्या शांतिमुमुक्षु मुद्यांकडून क्रान्तीच्या क्षेत्रात मर्दाची कामगिरी काय घडणार ? आणि असले लोक ग्रहदशेच्या फेऱ्याच्या वावटळीत गवताच्या गुंडीप्रमाणे भुर्रर्र उड्डून बेपत्ता कां होणार नाहीत ? त्यातच हिंदी पंचांगब्रह्मदेवानी शनीचे चित्र इतके भेसूर आणि भयंकर रंगविलेले आहे कीं त्याच्या दर्शनानेच माणूस पाऊणमेला होतो. शनि म्हटला कीं छातीत एकदम धडकी भरते. मृत्यु पत्करला पण ही शनीची साडेसाती नको, म्हणून पुष्कळ नामर्द शांतिषंढ आत्महत्त्येचा मार्ग स्वीकारतात. विश्वनियंत्रणात आणि विशेषतः मनुष्याच्या जीवनविकासात क्रांतीचे कोणते महत्कार्य साधण्यासाठी शनीची योजना आहे, याचा ते क्षणभर सुद्धा विचार करीत नाहीत. ज्योतिष्यांकडे पहावे तों तेहि मारुतीच्या तेलशेंदरात आणि जप, जाप्याच्या भिक्षुकी एजन्सीत अडकलेले. रुईचो फुले, तिळाचे तेल-शेंदूर आणि टकल्या धोंडभट या नवग्रहपीडानिवारक चिजा पाश्चात्य देशांत अझून घुसलेल्या नसल्यामुळे, तिकडील ज्योतिर्विदांनी शनीची चित्रे बऱ्याच विवेकबद्ध प्रमाणात रेखाटली आहेत. शिवाय ज्योतिष्य शास्त्राला तिकडे खगोलशास्त्राचे उत्कृष्ट पाठबळ असल्यामुळे, पाश्चिमात्य ज्योतिषी ग्रहदशेचा तपशील बऱ्याच विवेकवादी भाषेने देतात. याचा एक नमुना म्हणून मिस्टर ई. पार्कर कृत 'ॲस्ट्रालजी' नामक ग्रंथातला शनीच्या साडेसाती विषयी एक उतारा पहा:—

"Satan is the Watcher on the Threshold of the Temple of the King; he stands in Solomon's porch, he keeps the keys of the sanctuary. (The Secret Doctrine Part II, p. 285) Saturn is the last of the 7 planets belonging to our system, the circumference of that realm of which the Sun is the centre, it is the planet of **Limitation**, of temptation and purification and therefore its effects in our lives are felt to be hindrance, opposition, trial. "He binds in fetters and limits all things" and **through that very limitation** gives us a clear conception of what lies before us. Saturn takes away from us our social ballast, our friends, our deceptive pleasures, and leads us willingly or unwillingly into solitude, where the "Voice of the Silence" may be heard. Therefore Saturn is the friend of those who thirst for insight and intensification of life; but to those who seek **themselves** and turn away from higher things, he is the inexorable judge able to compel and to destroy.....until in the end man comes to understand his language and blesses the iron hand that has guided him. For not until we have understood Saturn can we cross the threshold. (Astrology and its Practical Application. (By E. Parker, p. 17)

भावार्थः—परमेश्वराच्या मंदिराच्या उंबरठ्यावरचा पहारेवाला म्हणून **सेटन**ची* योजना झालेली आहे. सज्जन ज्या कमानीखालून मंदिराकडे जातात तेथेच तो उभा असतो. मंदीरातील मुख्य पवित्र दालनाच्या किल्ल्या सेटनच्याच ताब्यात असतात. [मॅडम ब्लावटस्की कृत सीक्रेट डॉक्ट्रीन, भाग २ पृष्ठ २८५.]

"ज्या ग्रहमण्डळाचा सूर्य मध्यवर्ति केंद्र आहे, त्या ग्रहांत **शनि** हा शेवटचा ७ वा ग्रह होय. प्रत्येक वस्तूला अगर स्थितीला मर्यादित करणे, मोह उत्पन्न करणे आणि शुद्धिकरण करणे, हे या ग्रहाचे गुणधर्म आहेत. त्यामुळे, मार्ग खुंटणे, विरोध होणे आणि कसोटीचा छळ होणे, इत्यादि परिणाम आपल्या जीवनावर होतात. लोखंडी कोलदांडे टाकून प्रत्येक गोष्टीला शनि अटकाव करीत असतो, आणि या अटकावामुळेच आपण पुढे कर्तव्याचा मार्ग कसा चोखाळला पाहिजे याची स्पष्ट व स्वच्छ कल्पना आपल्याला करून देतो. आपले सामाजिक स्थैर्य, आपले मित्र आणि आपण मानलेल्या सौख्यसाधनांतली भुलभुलावणी शनि आपल्याजवळून हिसकावून नेतो; आणि आमची खुषी असो वा नसो, तो अखेर आम्हाला एकांत-वासाच्या शांत वातावरणात नेऊन ठेवतो. या एकांतवासातच शांतीचा गूढ

---

* शनीला इंग्रेजीत 'सॅटर्न' असे नाव आहे. वायबलात 'सेटन' येतो. तो जवळ जवळ शनिकर्माच असल्यामुळे, त्याचे 'सैतान' असे मराठीत भाषांतर पुष्कळांनी वाचले असेल. पण सेटन म्हणजे सैतान नव्हे. वरच्या उताऱ्यात सॅटर्नच्या ऐवजी वापरलेला तत्सदृश सेटन शब्द 'सैतान' शब्दाच्या वाईट अर्थाने मुळीच योजिलेला नाहीं. किंबहुना सेटन काय किंवा सॅटर्न काय कोणीहि वाईट नाही. हरिश्चंद्राच्या नाटकात विश्वामित्राची भूमिका नसती, तर ते नाटकच मुळी जन्माला आले नसते, मग हरिश्चंद्राच्या सत्वपरिक्षेला जगात कोणी कवडीची तरी किंमत दिली असती काय ?

संदेश आम्हाला ऐकू येतो. अर्थात् ज्याना अंतर्दृष्टीची तहान लागलेली आहे, आपल्या जीवनविकासासाठी जे तळमळत असतील, त्यांचा खरा हितकर्ता मित्र शनीच होय. पण ज्यांची दृष्टी स्वार्थापुरतीच संकुचित, ज्याना जीवनविकास नको, काही नको, टीचभर सुखाची लालसा कशी-बशी भागली म्हणजे झाले, म्हणून जे उच्च व उदात्त तत्त्वांपासून दूरदूर पळतात, अशा लोकाना मात्र शनीचा रामटोल्या कचका सणसणीत चेचायला मागेपुढे पहात नाही. न्यायनिष्ठूर न्यायाधीशाप्रमाणे तो त्यांचे कान पकडून एकतर त्याना 'नको' ते करायला लावील, नाहीतर त्यांचा कपाळमोक्ष करील, हवा तो छळ करील. हे सारे कोठपर्यंत ? एकदा मनुष्याला शनीची भाषा समजली, त्याच्या उद्दिष्ट हेतूची नीट जाणीव झाली आणि त्याच्या कदरबाज लोखंडी हाताने आपल्याला सन्मार्ग कसा दाखविला, याचे प्रत्यंतर पटेपर्यंत. शनीच्या कोलदांड्याचा शुद्ध अर्थ आमच्या जीवनात प्रत्यक्ष बिंबल्या खेरीज, आम्हाला भगवद्मंदीराचा उंबरठा ओलांडताच येणे शक्य नाही."

आपल्या जीवनविकासाचा क्रम, आपल्या आत्म्याची उत्क्रांति, आपल्या संकुचित स्वार्थाची किंवा खुषी नाखुषीची पर्वा न करिता, कान धरून किंवा मान पकडून, पुढे पुढे रेटीत नेण्याचे काम करणारा शनि हा एकच जबरदस्त ग्रह आहे. वरवर पाहाणाराला तो मृत्यूपेक्षा क्रूर दिसतो, पण त्याच्या क्रौर्यात सुद्धा मातृहृदयाचे निःसीम सात्विक प्रेम असते. त्याच्या लोखंडी पंजाची चपराक आमची बत्तिशी पदच्युत करते आणि पुष्कळ वेळा तो आमची गचांडी पकडून आम्हाला भरल्या ताटावरून उठवतो, गजबजलेल्या इष्टमित्रांच्या घोळक्यांतून तो अचानक आम्हाला उखडतो आणि सत्तेच्या किंवा सौख्याच्या शिखरावर आमचे बूड टिकते न टिकते तोंच तो आम्हाला फुंकरासरसा 'परस्वाधीन जिणे आणि पुस्तकी विद्ये'च्या एकलकोंड्या

निर्जनावस्थेत दूर झुगारून देतो. ठाकठीक चाललेल्या संसाराचे एक चाक चुटकीसरसे निखळून, त्याचे होत्याचे नव्हते करतो; आणि प्रयत्नवादाची शिकस्त करून करून यशाचा पेला ओठाशी लागतो न लागतो तोंच त्यात तो माती कालवतो. पण यात दानीचा कसलाहि दुष्ट हेतू केव्हाहि नसतो. त्याच्या करणीत अन्याय नसतो. आमच्या वऱ्या वाईट करणीचे कणशः पृथःकरण करून, आमच्या जीवनओघाची वरचेवर शुद्धी शनि न करील, तर आमच्या उत्क्रांतीची प्रगति कधीच होणार नाही.

कसाशिवाय माल नाही, शनीशिवाय कस नाहा.

वरच्यावर प्रखर भट्टीतून तावून सुलाखून निघाल्याशिवाय सोन्याचा कसा ठरला जात नाही. अस्सल हिरा आहे कीं नाही, हे सिद्ध करण्यासाठी त्याला ऐरणीवर ठेऊन त्यावर घणाचा घावच घालावा लागतो. खरा हिरा अग्नेल तो घणाच्या घावाला डगमगणार नाही आणि अस्सल सोने भट्टीच्या धगीला भिणार नाही. पण त्यांचा कस लागण्यासाठी त्याना या भयंकर दिव्यांतून जावे लागतेच लागते. कित्येक सज्जन चांगल्या माणसांवर ग्रह-दशेचा फेरा आग पाखडून लागला, म्हणजे आपण देवाला किंवा दैवाला दोष देतो, ही अज्ञानपणाची चूक आहे. त्या सज्जनांचा सज्जनपणा किती नंबरी कसाचा आहे, त्याना कोलदाड्यांत अडकवून तोडवणी पाडले, किंवा वैभवाच्या शिखरावरून भिक्षांदेहीच्या पाताळात चिणले, नाना तऱ्हेची भलभलती आकर्षक आमिषे त्यांच्यापुढे नाचविली, आणि त्यांचा हवा तो छळ केला, तर ते सज्जन आपल्या उत्क्रांत ध्येयाला रामराम ठोकतील काय, आपल्या सत्वाला पारखे होतील काय, आमिषाना भुरळून कर्तव्याची दिशा बदलतील काय, किंवा छळाला कंटाळून आत्महत्येचा निखालस भ्याड मार्ग

पत्करतील काय, हेच शनिग्रहाला अजमाऊन पाहावयाचे असते. या कसोटीला जो उतरला, त्याला शनीकडून लायकीचे सर्टिफिकीट मिळते, कीं 'हा हिरा असल आहे,' 'हे सोने शंभर नंबरी आहे.' शनीच्या परीक्षेत जो उतरला, त्याला मग साऱ्या त्रिभुवनात कोठे अटकाव नाही. राजकारणी सौद्याच्या सोदेगिरीसाठी आम्ही माणसे वर्षातून चार वेळा

रावबहादर खानबहादुरांच्या भट्ट्या

उबवून शेकडो माणसांना महत्पदाचा सफेदा चढवितो. रावबहादुर खानबहादुर म्हणजे नरांतले नारायण ठरवण्याचा पाचकळ उपव्याप करतो. पण रावबहादुराला गाव विचारित नाहीं आणि खानबहादुराच्या खाणीच्या मातीची कोणी मडकीहि घडवीत नाही. असला उघडाउघड लाळघोटीचा आणि जुत्तेचाटीचा चावट प्रकार निसर्गाच्या साम्राज्यात मुळींच नसल्यामुळे, देवाघरची रावबहादुरकीची पदवी मिळविण्यासाठी शनीच्या तेल्याच्या घाण्यात हाडे चिकून पिकून द्यावी लागतात.

चणे खावे लोखंडाचे । तेव्हा ब्रह्मपदी नाचे ॥

ब्रह्मपदी नाचण्यासाठी लोखंडाचे चणे किती कठोर मर्यादेपर्यंत खाता येतात, याचे चित्र यथातथ्य रंगविण्यासाठीच कविजनानी हरिश्चंद्र आणि विक्रम यांची उत्कृष्ट हृदयद्रावक कथानके आपल्या उज्वल कल्पनाशक्तीने रंगवून, आज शेकडो वर्षे लोकांच्या स्मृतिपटलावर नाचती ठेवली आहेत. विक्रमापेक्षाहि हरिश्चंद्राचे कथानक करुणरसाने विशेष रंगलेले आहे. विशेषतः व्यावहारिक दृष्टीने त्यात (विश्वामित्राने निर्माण केलेल्या चमत्कारांशिवाय) अशक्य व विसंगत असे काहीच नसल्यामुळें, हरिश्चंद्राची साडे-

साती म्हणजे खराखुरा घडलेला इतिहास, अशाच भावनेने आज सारी दुनिया त्याकडे पहाते. हरिदासाच्या आख्यानात, पुराणिकाच्या व्याख्यानात आणि रंगभूमीवरील नाट्यप्रयोगात* हरिश्चंद्राची कथा लागलीं कीं डोळ्यांतून अश्रूंचा पाट वाहिल्या शिवाय घरी परतणारा प्रेक्षक श्रोता विरळाच !

केवळ स्वप्नात दिलेले वचन खरे

करण्यासाठी हरिश्चंद्राने आपल्या साम्राज्याच्या सम्राटपदाचा त्याग करावा राणी तारामति व राजपुत्र रोहिदास यांच्यासह वनवासाचे अमानुष क्लेश शांत व धीरोदात्त वृत्तीने भोगावे, पदोपदी भुरळविणाऱ्या विश्वामित्राच्या मायावी आमिषाना बळी न पडता सत्वरक्षणासाठी तहान भुकेचीहि पर्वा करू नये, अखेर काशीक्षेत्राच्या भरचव्हाट्यावर अयोद्धेच्या या चक्रवर्ती राजाने सहकुटुंब आपल्या देहाचा विक्रा करावा, आणि त्याच्या राजदंडधारी हाताना डोंबाघरी पाणी वाहून मसणवटीची राखण करण्याचा प्रसंग यावा, हे दृश्यच इतके हृदयभेदी आहे कीं कथानक वाचताच कल्पनेला मूर्छना

---

* कथा पुराणापेक्षा नाट्यप्रयोगाचे परिणाम मनावर फार जबरदस्त होतात. हल्लीच्या 'बुकीश' (प्रोज गद्य) नाटकांपेक्षा पूर्वीची पौराणिक नाटके हरिश्चंद्राख्यान फारच परिणामकारक वठवीत असत. सांगलीकरांच्या पहिल्या पौराणिक मंडळीचा हरिश्चंद्राख्यान नाटकाचा प्रयोग मी ६-७ वर्षाचा असेन तेव्हा पाहिला होता; पण त्याचे सर्व देखावे मला अझूनपर्यंत जशाचे तसे स्मृतिचक्षूपुढें स्पष्ट दिसतात. २५ वर्षापूर्वी कै. वासुदेवराव जोशी (तिवरेकर ता. कर्जत जि. कुलाबा) यांची पूर्णचंद्रोदय नाटक मंडळी पौराणिक हरिश्चंद्र नाटक करीत असे. 'आमचा प्रयोग पाहून रडल्याशिवाय घरी परत जाणाराला तिकिटाचे पैसे परत' अशी त्यांची जाहीरातीवर ठळक अक्षरांची ओळ छापलेली असे. कौतुकाची गोष्ट एवढीच कीं पैसे परत मागणारा एकहि इसम शपथेवर कधी पुढे आला नाही.

येते, तर नाट्यप्रयोगासारख्या दृश्यकथानकाने प्रेक्षकांच्या भावनांचे होणारे पाणीपाणी डोळ्यावाटे कोसळले, तर त्यात नवल कशाचे ? असे काय मोठे भयंकर दुष्कर्म गतजन्मी हरिश्चंद्राकडून घडले कीं या जन्मी त्यावर ग्रह-दशेचा फेरा इतक्या कल्पनातीत रीतीने उखडावा ?

ग्रहदशेमुळे येणारी संकटे नेहमीच गतजन्मीच्या वाईट संचितांचीच फळे असतात, असे मुळीच नाही. पुष्कळ वेळा ती चांगल्या संचितांच्या सत्त्वाची परीक्षाहि करीत असतात. संचित चांगले केव्हा ? तर ते संकटांच्या भट्टीत तावून सुलाखून अढळ टिकेल तेव्हा. प्रत्येक गोष्टीला कसोटी ही पाहिजेच. जगाच्या व्यवहारात सज्जनांपेक्षा दुर्जनांवरच सुखांची चांदरात विशेष कां झडते आणि दुर्जनांपेक्षा सज्जनांवरच ग्रहदशेची वक्रदृष्टी विशेष कां फिरते, या शंकांचा असाहि खुलासा करता येणे शक्य आहे कीं, कसोटी लावायची ती नेहमी सोने हिरा माणिक या मूल्यवान् वस्तूनाच लावतात; दगड धोंडे माती शेण याना कस लाऊन पहाण्याचा उपद्व्याप कोणीच करीत नाही. * पारख करून महत्पदाला न्यावयाची वस्तू नेहमी 'श्रेष्ठ' च असावी लागते. कनिष्ठ क्षुद्र वस्तूला किंमतच नाही, तर पारख तरी कोणी आणि कशाची करायची ! अर्थात् आत्मोन्नतीचे अढळ ध्येय नजरेपुढे ठेऊन जन्मानुजन्माच्या श्रेष्ठ आचरणाने जीवनविकासाचा मार्ग आक्रमणाऱ्या

---

* कोणी म्हणतील कीं भूगर्भशास्त्री (Geologists) दगड धोंडे मातीत डोके खुपसून पृथःकरण करीत असतात. होय. पण एकादी माती त्याला उत्तम आढळली म्हणून तिचा दागिना म्हणून कोणी उपयोग करीत नाहीं. एकाद्या मातीत सोन्याचे कण आढळले, तर तेथे खाण सुरू करण्याची तो शिफारस करील. पण पुढे सुवर्णकणांची कसोटी पूर्ण झाल्याशिवाय मात्र ' सोने ' म्हणून कोणी भलतीच धातु पत्करणार नाही, किंवा हिरा म्हणून गारगोटी स्वीकारणार नाही.

सज्जनांवरच ग्रहदशेच्या भट्टीत आपल्या सत्वाची कसोटी ठरवून घेण्याचे कठोर प्रसंग यायचे. ज्याचा 'विक्रम' 'उच्च जनीचा' असेल, त्यावरच शनीच्या शुद्धिकरणाचा ज्वालामुखी भडकून त्याच्या सत्वाची कसोटी ठरायची. लौकिकी दृष्टीने दुर्जन कितीहि सुखात लोळत असले आणि ऐश्वर्याच्या तूपसाखरेत घोळत असले, तरी त्यांचा जीवनविकास कनिष्ठ दर्जाचा असतो. ते माणसाच्या देहाचे असले तरी त्यांच्या आत्म्याची उत्क्रांति पशुकोटिपलीकडे फारशी उत्क्रांत झालेली नसते. म्हणूनच पुष्कळ श्रीमंत लोक पशुवत् आचरणात आरपार रंगलेले दिसतात. श्रीमंत असल्यामुळे सत्ताबाज बनणाऱ्या बाजीरावाना साध्या माणुसकीचीहि दृष्टी कां नसते, आणि पुष्कळ प्रसंगी दया क्षमा शांति सारख्या उच्च गुणाना वेधडक लाथाडण्या इतकी त्यांची काळिजे फत्तरापेक्षाहि कठीण असलेली कां दिसतात, याचे पुष्कळाना मोठे कोडे पडते. पण यात गूढ असे काहीच नाही. ज्यांच्या आत्म्याची उत्क्रांतीच मुळी पशुकोटीची, ते देहाने जरी माणूस असले तरी पशुवृत्तीपेक्षा त्यांच्या कायावाचामनाने अधिक सत्या उच्चवृत्तीचे प्रदर्शन होणार? आणि नवग्रहानी किंवा शनीने या असल्या

माणशी गाढवांची परीक्षा

कोणत्या कसोटीने लावायची ? नवग्रहांच्या किंवा शनीच्या दशेची या प्राण्याना सूट मिळालेली असते, असा प्रकार मुळीच नाही. परंतु, कचऱ्याकडे जसे आपण फारसे लक्ष देत नाही, पण बराच उकीरडा साचला कीं त्याला भडाग्नि देऊन गतीला नेतो, तसाच काहीसा प्रकार दुर्जनांच्या बाबतीत ग्रहांच्या दशेला करावाच लागतो. मग काय ? सो सोनारकी और एक लोहारकी ! दणका बसायचा अवकाश कीं ढेकूण चिलटांप्रमाणे खलास. असे काही होणार नाही. तर जगाच्या व्यवहारातला समतोलपणा पारनाहीसा

होऊन, सारे जग या जिवंत राहू केतू शनींच्या हातातले दुर्दैवी खेळण होऊन बसेल !

खरे विक्रमी आणि आत्मविकास-मुमुक्षू पुरूष असतात, ते सुख दुःखाच्या लौकिकी कल्पनाना बळी पडत नाहीत. लौकिकी सुख हे दुःखपर्यवसायी आहे आणि दुःखातच शाश्वत सुखाचा शोध लागत असतो, हे त्याना चांगले उमगलेले असते. म्हणून आपल्या विशिष्ट ध्येयाच्या सत्वरक्षणासाठी ते आपला सुखातला जीव दुःखात लोटायला मागेपुढे पहात नाहीत. त्यांचा ईश्वरी न्यायावर अचळ विश्वास असल्यामुळे, ध्येयसाधनासाठी आणि सत्वरक्षणासाठी, हव्या त्या प्राप्त परिस्थितीला वा संकटाना, डोळे उघडे ठेवून धीराने आणि शांत वृत्तीने तोंड देतात. प्रयत्नांविरुद्ध दैवाविरुद्ध किंवा देवाविरुद्ध कसलीहि तक्रार करीत नाहीत. इतकेच नव्हे तर, अनेक जन्मसंसिद्धीने या जन्मी जवळ असलेले कसलेहि **श्रेयस्** खर्ची टाकून प्राप्त संकटाची किंवा दुःखाची तोंडामिळवणी विक्रमी पुरुष कधीहि करीत नाहीत. उदाहरणार्थ, विक्रमाचीच गोष्ट घ्या. तामलिंदा नगरीच्या त्या भांडवल्या वैश्याने विक्रमावर हार चोरल्याचा आरोप घेतला, तेव्हा विक्रमाने " शहाण्या, कोणावर चोरीचा आरोप करतोस ? मी उज्जनीचा विक्रम चक्रवर्ति राणा आहे. चल तुझी खात्री करून देतो. तुझ्या पोरीच्या त्या हाराची किंमत काय ! असले हार माझे मोतदार घोड्यांच्या गळ्यात घालतात. तुला किती हार मोजदल्यात पाहिजेत तितके देतो. उज्जनीला चल." असा खडखडीत जबाब दिला असता, तर चंद्रसेनाची काय छाती होती एकदम बिना चौकशी शिक्षा ठोठावण्याची ? पण विक्रम हा अस्सल 'विक्रम' च असल्यामुळे त्याने आपले चक्रवर्तिपदाचे श्रेयस् तशाहि प्राणान्तिक अवस्थेत खर्ची घातले नाही. हरिश्चंद्राने तर विश्वामित्राला केवळ **स्वप्नात** वचन दिले!

स्वप्नात आपण सुद्धा कधीमधी राजे बनतो, पण सकाळी जागे झाल्यावर काय असते ? ना दिवाण ना दरबारी ना हुजरे ना दासी ! आपण न् चहाचा कप आणि संसाराची ठरावीक कर्मकटकट ! राणीच्या जाहीरनाम्याला सुद्धा नर 'रद्दीचे चिठोरे' ठरविता येते आणि दस्तऐवजावरची सही 'माझी नाहीच' म्हणून ' ईश्वराला स्मरून खरे ' सांगता येते, तर केवळ स्वप्नात दिलेल्या वचनासाठी जिवंतपणी यमयातना भोगणारा हरिश्चंद्र आम्हा शहाण्या लोकांच्या दृष्टीने ' वेडा पागल 'च ठरणार नव्हे का ? बेर, नवरा ' वेडा ' झाला तरी त्याच्या बायकोने—राणी तारामतीने—तरी त्याच्या वेडेचाराला आळा घालावा ? ती नवऱ्यापुढे शंभर कदम. लेक पहावे तर तेहि

वड्लांच्या पाव्लावर पाऊल

टाकून आणखी दोनशे कदम पुढे. मग वेडे कोण ? अर्थात् आम्ही. कारण, या सत्वधीर त्रिवर्गानी आपल्या सर्वस्वावर उघड्या डोळ्यानी निखारे ठेवले, पण स्वप्नात दिलेले वचन अक्षरशः पाळले. आपल्या सत्वाला लवमात्र दूषित होऊ दिले नाही. शनिकर्मा विश्वमित्राने पेटविलेल्या संकटाग्नीच्या नानाविध ज्वाळात त्रिवर्ग शांत धीरोदात्त वृत्तीने उभे राहिले, पण सत्वाला पारखे झाले नाहीत. विश्वाची प्राणज्योत क्रांतीने पाजळलेली आहे, हे लक्ष्यात घेऊन, सत्व कसोटीला लावणाऱ्या संकटाना आणि आपत्तीना जो आनंदी वृत्तीने आणि शांत चित्ताने तोंड देतो तोच मर्द, तोच खरा वीर, आणि तोच देवाचा लाडका !

दुःखांची चरचरीत फोडणी पडल्याशिवाय सुखाची कढी कधी खमंगच व्हायची नाही, हा मानव-जीवन-विकसनाचा सनातन सिद्धांत आहे. ही फोडणी किती कमाल मर्यादेपर्यंत कडकडते, आणि तशाहि सर्वस्वनाशाच्या

प्रसंगी विक्रमी पुरूष आपल्या सत्वाला प्राणापेक्षाहि किती आतुरतेने सांभाळतात, याची उज्वल चित्रे कविजनानी विक्रम हरिश्चंद्र नळ इत्यादि थोर-थोर पुरुषोत्तमांच्या चरित्र-कथानकानी रंगवून ठेविली आहेत, आणि ती अनेक विचारवंतांच्या चारित्र्याना आपत्प्रसंगी चैतन्यदायक होतहि आहेत. या कथा केवळ काल्पनीक कादंबऱ्या मानणाऱ्या चिकित्सकाने चिकित्सापूर्वक सभोवार नजर टाकली आणि गतकालीन् सर्व राष्ट्रांच्या व विशेषत-भरतखंडाच्या इतिहासाची पाने चाळली, तर त्याला हरिश्चंद्र आणि विक्रमाचे नमुने ठिकठिकाणी कितीतरी आढळून येतील. सत्वधीर पुरुषांची कसोटी ग्रहदशा किती भयंकर दिव्याने लावते, आणि तशाहि दिव्यातून ते सत्व-सलामत बाहेर कसे पडतात, याचा चालता बोलता दिव्य चित्रपट म्हणजेच पांडवांचा इतिहास नव्हे काय ?

जातस्य हि ध्रुवो मृत्युर्ध्रुवं जन्म मृतस्य च ।
तस्मात् अपरिहार्येऽर्थे न त्वं शोचितुमर्हसि ॥
स्वधर्ममपि चावेक्ष्य न विकंपितुमर्हसि ।
धर्म्याद्धि युद्धाच्छ्रेयोऽन्यत्क्षत्रियस्य न विद्यते ॥
हतो वा प्राप्स्यसि स्वर्गं जित्वा वा भोक्ष्यसे महीम् ।
तस्मात् उत्तिष्ठ कौंतेय युद्धाय कृतनिश्चय. ॥

असल्या चैतन्याच्या संदेशाने सारी दुनिया थरारून सोडणारा गीता-कोहीनूर ज्या खाणीने, सहज एक नमुना म्हणून, बाहेर काढला, त्या महाभारतात कशाची उणीव ? पांडव काल्पनीक व्यक्त्या नव्हत, किंवा महाभारत म्हणजे कादंबरी अथवा पुराण नव्हे. ग्रंथाच्या शोभेसाठी आणि स्वतःच्या विद्वत्तेच्या मुर्वतीसाठी कवीनी मधून मधून काव्यकल्पनेच्या वेलबुट्टयांची कितीहि नक्षी रंगविलेली असली, तरी

महाभारत शुद्ध इतिहास आहे.

विक्रम हरिश्चंद्राप्रमाणे पांडवांच्या सत्वपरीक्षेचा इतिहास एकदेशी एकरंगी नाही. ग्रहदशेचे फेरे जितक्या उलट सुलट आणि उग्र बिकट तऱ्हानी फिरणे शक्य आहे, तितक्या सर्व तऱ्हांचा मारा पांड्वांवर होऊन, त्यांची सत्वपरीक्षा कसोटीला लागली. विशेष लक्ष्यात ठेवण्यासारखी गोष्ट म्हणजे श्रीकृष्ण परमात्म्या सारखा पुरुषोत्तम पांडवांचा पाठीराखा असताहि, त्यांच्या ग्रहदशेच्या आपत्तींचा एक अणुरेणू सुद्धा टाळला गेला नाही, कीं संकटाची एकादि वेदना शमविली गेली नाही. दुर्दैवाच्या आपत्तींचे सर्व फेरे आणि त्यातली सर्व लहान मोठी दुःखे पांडवाना भरपूर भोगावी लागली. असे कां ? ज्या श्रीकृष्ण परमात्म्याने अर्जुनाला आणि कुंतीला विश्वरूपदर्शन देऊन आपले चराचर विश्वव्यापकत्व चुटकीसरसे सिद्ध करून दाखविले, त्याला धर्माच्या हातातले जुगारी फासे, भीमाचे पोळपाट लाटणे, अर्जुनाची ' सैय्या भैया ' आणि द्रौपदीचा सैरंध्रीपणा टाळता आला नसता काय ? पांडवांसारख्या पापभीरू सत्यनिष्ठ अजिंक्य वीरांवर दाती तृण धरून बारा वर्षे वनवास आणि एक वर्ष अज्ञातवासाचा प्रसंग यावा, अर्वाचीन साम्राज्यवादी सत्ताधाऱ्यांच्या गुर्मीत सत्तांध बनलेल्या कौरवांनी त्यांचा हवा तो अनिर्वाच्य छळ करावा आणि कंसचाणूरमर्दक गोवर्धनधारी श्रीकृष्णाने पांडवांची सर्व ग्रहदशा उघड्या डोळ्यानी पहावी, हे चमत्कारीकच नव्हे काय ? सुदर्शन चक्राच्या एका फेकीत साऱ्या कौरवांना रसातळाला नेण्याचे ज्या श्रीकृष्णप्रभूचे सामर्थ्य, हाक मारताच जो देवी द्रौपदीच्या पाठीमागे हात जोडून उभा, त्याला पांडवांचा झालेला भयंकर छळ मूळातच उखडता नसता का आला ? आला असता. पण—! पण काय ? पांडवांच्या सत्वधीरपणाचा पांडु रंग ग्रहदशेच्या भट्टीतच जसा

ताऊन सुलाखून कसाला लागला, तसा तो श्रीकृष्णाच्या दैवी मध्यस्थीने मुळीच लांगला नसता. परमेश्वरच निसर्गाच्या ताळेबंद नियमात सबलतीचे आणि सुटीचे थेर भक्तजनांच्या प्रेमाखातर माजवू लागेल, तर विश्वनियंत्रणाची कदर तावडतोब कोलमडून परमेश्वरालाहि वेपत्ता झाल्याशिवाय गत्यंतर उरणार नाही,

सत्वपरीक्षेचा कडेलोट

झाला म्हणजे भक्ताच्या धाव्याला देव खास धावतो; पण कसल्याहि सबबीवर सत्वपरीक्षेच्या कसोटीची माफी देवाच्या पिनलकोडात आढळणार नाही. भरदरबारात एका प्रतिष्ठित स्त्रियेचे वस्त्र फेडून तिची नागडी उघडी विटंबना करणाऱ्या, मानवी कल्पनेलाहि अज्ञात अशा बीभत्स अरेरावीपर्यंत जेव्हा कौरवांच्या साम्राज्यसत्तामदाची मजल गेली आणि देवी द्रौपदीने श्रीकृष्णपरमात्म्याचा अाक्रंदून धावा केला, त्यावेळी तो भक्तवत्सल कसा स्वस्थ बसेल ? पतिव्रता

निष्पाप बाईच्या निरीला हात ?

विश्वाच्या ठिकऱ्या ठिकऱ्या उडतील आणि परमेश्वराचे कोळसे होतील. देवी द्रौपदीच्या निरीला हात ? श्रीकृष्ण परमात्म्याच्या अनन्य भक्ताच्या अब्रूचे छिनाल धिंडवडे ? भारतसम्राटाच्या दरबारात पांडवांची पट्टराणी नागडी उघडी होणार ? काय त्या साम्राज्याला आग लावायची, त्या सम्राटाला उभा पेटवायचा आणि परमेश्वराच्या भक्तवात्सल्यावर पेट्रोल ओतायचे ! अरे अरे अरे ! आता त्या पापग्रह दुःशासनाने एकच हिसडा मारला की देवी द्रौपदी जिवंतपणीच मेली आं ?

दुःशासन सोडाया झोंबे स्वकुळांहितोदया लुगड्या ।
तेव्हां स्मरली कृष्णा, कृष्णा दीनांचिया दयालु गड्या ॥
तो दुर्जन आधीं ही साधूंच्या करुनि हानि रीतीची ।
नग्न सभेंत कराया पाहे खळ धरुनि हा निरी तीची ॥
जैं दृर्दशा कराया दुर्दैवें सिद्ध नीच हा केला ।
तैं दीनबंधुला ती कृष्णा मारी मनीं च हाकेला ॥ मोरोपंत

जगातले सारे व्यवहारपटु चोर आपल्या पिंडजात स्वार्थाच्या चष्म्यातून न्याय अन्यायाची मिमांसा करू लागले, सत्ताबाज बाजीरावांच्या हलकट लहरीच्या मुर्वतीस्तव 'नरो वा कुंजरो वा' ने धर्माच्या परम सूक्ष्मत्वाच्या फोलकट सबबी-वर दगडी पुतळ्याचे मौन पत्करू लागले, आणि अन्यायपीडित हतबलांना माणशी न्यायाच्या मशिदीत न्याय मिळण्याचे सर्व मार्ग बंद झाले, कीं त्याला परमेश्वराशिवाय कोणाचा आधार ? देवाशिवाय कोणाची याचना करावयाची ? तोच दयानिधी, तोच करुणासागर, तीच मायमाऊली, तिलाच करुणेचा पाझर फुटायचा, म्हणून द्रौपदीने श्रीकृष्ण भगवंताचा टाहो फोडून धावा केला:-

हे नाथ ! रमानाथ ! व्रजनाथ ! हरे ! मुकुंद ! कंसारे !
गोविंद ! कृष्ण ! केशव ! दीनार्तिहरस्त्वमेव संसारे ॥
काळें हि सख्या ! न तुझ्या दासींस पहावयासहि न सकावे ।
त्वद्भगिनीवस्त्र खळें नग्न करायास काय हिसकावें ?
जीहुनि नसे सुभद्रा तुज बहुमान्या, अकीर्ति हे तीची[2] ।
धांव दयाब्धे ! होते विश्वांत तुझ्या अकीर्ति हेतीची[3] ॥
' भगिनी ' ऐसें वदलेंयें, परि फार चि लाजलेंयें, न हें लटिकें ।
प्रभुजी ! रक्षा, तुमच्या दासांची मीं लहानसी बटिक ॥

---

१ स्वकुळ-नाशाच्या उपायाकरितां. २ द्रौपदी. (टिपा पुढील पानावर)

भो भगवन् ! भो वत्सल ! भो हतचाणूरमल्ल ! भागावें ।
विश्वें तुझेंचि, दुसरें न, यश श्रीप्राणवल्लभा ! गावें ॥
आजि असत्परपुरुषस्पर्श, न अपराध, अन्य केला हो !
झांका प्रसादपदरें न कुजनदृक्स्पर्श कन्यकेला हो !

द्रौपदीनें त्या करुणासागराची, गोवर्धनधारी श्रीकृष्ण परमात्म्याची करुणा भाकताच,

अवतरला उतराया जो दुःसह दुष्टभार माहिवरला ।
अहिवरलास्यपटु प्रभु करुणोक्तें द्वारकेंत गाहिवरला ॥
परमेश्वर रूप धरी स्वपरै-जन-हितोदया लुगडियांचें ।
निववाया सभ्यांसह नयन मनहि तो दयालु गडियांचे ॥
हा अंबरावतार श्रितलज्जारक्षणार्थ अकरावा ।
प्रभुमत असें, सदवनीं आग्रह वेषीं कदापि न करावा ॥

द्रौपदीचा धावा ऐकताच भगवंताने अंबरावतार धारण करून—

शेलें शालू साड्या क्षीरोदक लांबरुंद पाटावे ।
झाला अनंत वस्त्रे, कीं तीस अनाथसें न वाटावे ॥
पदसेवार्थ चि भजती अनवरत महाविभूति ज्या निपट ।
तो कृष्णावपु झांकी होवूनि महाविभूतिजानि पट ॥

---

१ संसारांत दीन जनांचें दुःख हरण करणारा तूंच आहेस. २ त्या तुझ्या बहिणीची (माझी). ३ शास्त्राची. ४ खोटें. ५ कष्टी व्हावें. (धावत यावें.) ६ दुष्ट परकी पुरुषाचा स्पर्श. ७ दुष्टांच्या दृष्टीचा स्पर्श. ८ 'क' हा प्रत्यय वात्सल्य, अनुकंपा व अल्पत्व दर्शवितो. ९ सर्पश्रेष्ठ जो कालीय त्याच्या फणां वर नृत्य करण्यांत कुशल असा. १० आपल्या भक्तजनांच्या उत्कर्षाकरितां. ११ मत्स्यकूर्मादि दशावतार व हा अकरावा. १२. साधूंचे रक्षणाविषयीं.
१३ पांढरें पातळ. १४ रेशमी वस्त्रं. १५ नित्य, अखंड १६. महाविभूति (लक्ष्मी) आहे जाया ज्याची तो (कृष्ण).

हा पट–वर्धनाचा चमत्कार कसा घडून आला ? घडून येणे शक्य आहे काय ? वगैरे पुष्कळ शंका चिकित्सकाना नेहमीच येतात. पण हे ' चमत्काराचे ' कोडे चिकित्सकां करिता मुळी नाहीच. पाण्यामध्ये मासा झोप घेई कैसा ? जावे त्यांच्या वंशा तेव्हा कळे. परमेश्वर आणि त्याचे अनन्य भक्त यांच्या मधला ऋणानुबंधाचा हा संबंध दोघापेक्षा तिसऱ्याला उमगणार कसा आणि उलगडणार कसा ?

या प्रसंगा प्रमाणेच सर्व संकटांच्या प्रसंगी पांडवांनी आपली शक्ति किंवा श्रेयस् खर्ची घालून, ग्रहदशेच्या फेऱ्याला–म्हणजे तज्जन्य विपरीत परिस्थितीला–विरोध कधीहि केला नाही. द्रौपदीवस्त्रहरणाचा प्रसंगच घ्या. त्यावेळी मनातच आणले असते तर एकट्या भीमाने तेथच्या तेथे धृतराष्ट्राच्या शंभर पुत्रांची नरडी फोडून सारा दरबार मसणवटी बनविला असता. भीम खवळलाहि होता, परंतु

आम्हां व्यसनार्तांची धर्मास्थिति होचि याज, पावे गा ।
त्वां मोडावें न इला, स्वस्वास्थ्यसुखार्थ वा ! जपावे गा ॥

अशी अर्जुनाने विनवणी केल्यामुळेच, तो काळाचा काळ भीम चरफडत स्वस्थ बसला. प्राप्त परिस्थिति देवाचा प्रसाद समजून, आपल्या जीवनविकासासाठी, येतील त्या संकटाना मर्दाप्रमाणे तोंड देण्यातच, त्या

संकटांतला ईश्वरी संदेश

आपल्याला उमगू लागतो. तलवारीला धार देण्यासाठी तिचे पाते सहाणेच्या चाकावर धरून घासावेच लागते. टणाटण ठिणग्या उडतात. प्रात्याचा खर्रखस्स खर्रखस्स आवाज सारखा निघतो. पण चक्रीसहाणेवरच्या त्या

भयंकर दिव्यातून ते पाते बाहेर पडले कीं त्याच्यापुढे विरोधाला कोण उभा राहील ? तद्वतच आपल्या जीवनाचा विकास, आपल्या शक्तीयुक्तीचा पराक्रम तलवारीच्या पात्याप्रमाणे तेंखदार आणि तेजस्वी करून घ्यायचा असेल, तर ग्रहदशाप्राप्त आधीव्याधीना न कंटाळता, त्याना शांत वीरोचित वृत्तीने कवटाळून, त्यांच्या ठिणग्यात आत्मोन्नतीचा ईश्वरी हेतू काय आहे, तो हस्तगत करूनच घेतला पाहिजे. संकटांच्या द्वारे देव आमच्या आत्म्याच्या उत्क्रांतीची कमावणि अंदाजित असतो. जितकी आमची उत्क्रांति अधिक, तितका अधिक जोराचा दाब संकटांच्या चक्री सहाणेवर आमच्या जीवनाला तो देतो. साध्या लोखंडाच्या सुरीला दगडावर सहज घासली तर धार येते, आणि ती धारहि तात्पुरतीच असते. पण समशेरीचे पाते पक्क्या पाण्याचे पोलादी असल्यामुळे त्याला कचकचीत सहाणेवरच रगडावे लागते. जितका अधिक पाणिदार घुरूप, तितकी अधिक जबरदस्त कसोटी त्याला ग्रहदशेच्या चक्री सहाणेवर भोगणेच प्राप्त असते.

तलवार कितीहि कडक पात्याची पाणिदार असली, तरी तिला वरचेवर सहाणेवर धरून धार द्यावीच लागते. एकदा धार दिली म्हणजे जन्मभर टिकत नाही. फार झाले तर एकादी मोहीम पार पाडील. पण ती अखंड पाजळलेली राखायची तर तिला मुदतबंद धारेवर धरणेच प्राप्त असते.

जीवनविकासाला लागणाऱ्या आत्मिक चैतन्याची गोष्ट अशीच आहे. या चैतन्यालाहि वरचेवर ग्रहदशानिर्मित आपत्तींच्या चक्री सहाणेवर धार दिल्याशिवाय ते उत्तम काम करू शकत नाहीं. बॉयलरमध्ये वाफेचा अखंड पुरवठा नसेल, तर इंजीन चांगले चालणार नाही. वाफ जसजशी खर्ची पडत जाईल तसतसा कोळसा पेटवून पाणी घालून वाफेचे ठराविक प्रमाण

अखंड राखावे लागते. मुंबई लत्त्याला आता विजेच्या रेलगाड्या* सुरू झाल्या आहेत. माथ्यावरील तारेतून विजलीचा पुरवठा होत असला, तरी खुद्द वीजगाडीत इलेक्ट्रिक एनर्जीचा पुरवठा करणारा डायनामो अखंड चालूच असतो. पॉझिटिव आणि निगेटिव विद्युत्प्रवाहांचा संयोग होतो तेव्हा विद्युच्चैतन्याची ठिणगी पडून वीजगाडी धावू लागते. माथ्यावरच्या तारेत पुष्कळ विद्युत्प्रवाह असला, पण खुद्द गाडीच्या पोटातला डायनामो जर रुटुखुटू करू लागला किंवा अज्जीबात बंद पडला, की वीजगाडी ठिकच्या ठिकाणी थंडगार ! म्हणून

डायनामोची एनर्जी अखंड भरपूर

राखण्यासाठी रेलवे कंपनीचे इंजिनीयर डोळ्यात तेल घालून अखंड श्रमत असतात. याच नियमाप्रमाणे प्रत्येक व्यक्तिमात्राच्या आत्म्याच्या उत्क्रांतीच्या डायनामोमध्ये जीवनविकासाची एनर्जी किती कमीजास्त आहे, यावर कोटे-कोर नजर ठेवण्याची कामगिरी सृष्टीविधात्याने नवग्रहांकडे सोपविलेली असून, या इंजिनियर खात्याची मुख्य सूत्रे शनिग्रहाच्या हाती आहेत. या शनि-इंजनेराची तपासणी ३० वर्षांनी येते. आमच्या डायनामोमध्ये एनर्जीचा पुरवठा बहुतेक दिवाळ्यातच निघालेला असतो. मग ही चीफ इंजिनियरांची स्वारी आपल्या असिस्टंटांवर भयंकर उखडते. कोणाची कसलीहि सबब न ऐकता तावडतोब तो डायनामो स्वतःच निखळू लागते. सारे सांधे स्क्रू खिळे पट्टया वगैरे सर्व सामान पार निखळून त्याची धू पूस पॉलीश रिपेर स्वतः हाती घेते. वाकडे तिकडे भाग घणाचे घाव घालून सरळ करते.

---

* आता 'आगगाडी' शब्द मागे पडून 'वीजगाडी' शब्द रूढ झाला पाहिजे.

सरळ झाले नाहीत तर नवीन बसविते. गंजलेली यंत्रे उकीरड्यावर झुगारून देते. कित्येक लिंबलिंबीत स्प्रिंगाना भट्टीत भाजून पाणी चढविते. असा हा रिपेरीचा धूमधडाका साडेसात वर्षे स्वतः चालवून, तो डायनामो फर्स्टक्लास एनर्जी देणारा बनला, की पुढे २२॥ वर्षे त्याच्या कामाकडे पहावे लागत नाही. बिनखटका एनर्जी चालू. खुद्द बडे इंजनेर साहेबच डायनामोची रिपेर करीत असल्यामुळे, त्याच्या पुढील २२॥ वर्षाच्या समाधानकारक कामाची निराळी विमा पॉलिसी घ्यावीच लागत नाही.

हिंदी ज्योतिषांनी शनिग्रहाची चित्रे भेसूर आणि भयंकर रंगविल्यामुळे, त्याच्या दशेच्या फेऱ्याचा आमच्या जीवनविकासावर होणारा क्रांतिकारक शुभ परिणाम अजमावण्याची आमची बुद्धीच महिरून गेलेली आहे. त्यामुळे कर्तव्य काय, अकर्तव्य कोणते, संकटाचा मूळ हेतु काय, आपत्प्रसंगी कसे वागावे, कठोरतम कष्ट सहन करूनहि आपले ध्येय, त्याचे सत्व, कसे जिवापाड रक्षण करावे, इत्यादि महत्तत्वांची आमची जाणीवच ठार मेली. अर्थात् सुख दुःखाच्या भलभलत्या कल्पनांच्या भरी भरून, पुष्कळ मूर्ख

आत्महत्येचा* हलकट भ्याड मार्ग

पत्करतात. साडेसात वर्षे आमच्या जीवनाच्या डायनामोची डागडुजी करून आत्मविकासाच्या एनर्जीचा झरा पुढे २२॥ वर्षे अखंड उपभोगण्याची

---

* 'आत्महत्या' म्हणजे 'आत्मा-हत्या' असे पुष्कळ लोक समजतात. ती त्यांची गैरसमजूत आहे. आत्म्याची हत्या कोणीहि करू शकत नाही आणि त्याच्या उत्क्रांतीसाठी जन्मोजन्मी भोगावी लागणारी सुखदुःखे आत्महत्या करणारालाहि कधी टाळता यायची नाहीत. या जन्मी देहाचा नाश करून नामर्द पळाला, तरी पुनर्जन्माच्या देहाची यातायात त्याला थोडीच टाळता येणार आहे? आत्म्याने देहाचा पोषाख चढविला की भोक्तृवाचा ससेमिरा लागलाच मागे!

योगीची सवलत देणारा शनि ग्रह आम्हाला शत्रूप्रमाणे आणि मृत्यूप्रमाणे भयंकर कां वाटतो, याची कारणे आमच्या अज्ञानाच्या तळघरातच कोठच्या तरी अडगळीच्या कोपऱ्यात कुझत असली पाहिजेत खास.

साडेसात वर्षांची कमाई खर्च करायला २२॥ वर्षांची मुदत. अर्थात् ही मुदत संपण्या बरोबरच आमच्या कमाईचेहि भांडवल संपुष्टात येते. एनर्जी देण्याची आमच्या डायनामोची पॉवर लंजूर पडते. म्हणून पुन्हा ३० वर्षांनी शनि-इंजनेराचा इन्स्पेक्शन रिपेरीचा दौरा येतो. या दौऱ्यालाच साडेसातीचा फेरा असे म्हणतात. यात अनिष्ठ भयंकर आत्मनाशक असे आहे तरी काय ? तलवारीचे पाणी गेले तर ते जर वरचेवर द्यावेच लागते, बैजगाडीच्या डायनामोच्या बॅटऱ्या जर मंद पडल्या तर त्यांचीहि उलथा-पालथ आणि आदलाबदल करावी लागते, तर ३० वर्षांनी आमच्या जीवनविकासाच्या चैतन्याची घासपूस करायला शनिग्रहाच्या साडेसातीची आवश्यकता किती अगत्याची आहे, याचा वाचकाना आता स्पष्ट पडताळा पटलाच असेल.

प्रकरण ११ वे.

थेट खुद्दांच्या दरबारात.

हरिभजनावीण काळ घालवूं नको रे ॥ धृ० ॥
दोरिच्या सापा भिउनि भवा । भेटि नाही जिवा शिवा ।
अंतरिचा ज्ञानदिवा । मालवू नको रे ॥ १ ॥
विवेकाची ठरेल ओल । ऐसे वोलावे कीं वोल ।
आपुले मतें उगिच चिखल । कालवू नको रे ॥ २ ॥
संतसंगतीनें उमज । आणुनि मनीं पुरते समज ।
अनुभवावीण मान । हालवू नको रे ॥ ३ ॥
सोहिरा म्हणे ज्ञानज्योति । तेथे कैचि दिवस राती ।
तयाविणें नेत्रपाती । हालवू नको रे ॥ ४ ॥

रात्री अंधार पडला कीं आपण दिवा लावतो. रात्री कोठे बाहेर जायचे तर ठेच लागू नये, विंचू काटा चावू नये, रस्ता चुकू नये, दोरीला साप समजून दचकू नये, म्हणून आपण बरोबर दिवा घेतो. पूर्वी मशाली असत, त्याना वाऱ्याचा उपद्रव होत असे. आता ती अडचण वादळी दिवे (हरिकेन लॅन्टर्न) आणि बिजली बत्त्या (इलेक्ट्रिक टॉर्च) यानी साफ नाहीशी केली आहे. इतकी व्यवस्था सहजसाध्य असून हि एकादे धोंड भटजी किंवा तिस्मारखा अंधाऱ्या रात्री काळोखातून मजला मारीत निघाले आणि एकाद्या खाड्याच्या आयत्या थडग्यात समाधिस्त झाले, तर मूर्ख कोण ? अंधार घालविण्यासाठी दिवा लावलाच पाहिजे. ग्रहदशेचा अंधार पसरून बुद्धी बुळीबावळी बनली तर अंतरिचा ज्ञानदिवाच ईश्वरभक्तीची वात सरसावून प्रदिप्त केला पाहिजे. विक्रमाला

सुद्धा प्रथम **दीपरागच** आळवावा लागला, तेव्हा पुढे **श्री** रागाचे सूर त्याला आपोआप स्फुरले. ज्ञानदीप उजळला कीं अंतःकरणात उजेड पडून बुद्धी डोळस बनते आणि ती अवघ्या जगाकडे उजळ दृष्टीने पाहू लागते. दृष्टी उजळ झाली कीं सारी सृष्टीच निराळी दिसू लागते. साडे-सातीच्या तुफानी तडाक्यात लंजूर झालेल्या विचाराना सकसपणा येऊन आचारांची गति विशेष तेखदार आणि दणदणित होत जाते. जसा विचार तसा आचार. म्हणून विचार–यंत्राची विशेष काळजी घेणे जरूर आहे.

जयांस आहे विचार । ते सुखासनीं झाले स्वार ।
इतर जवळील भार । वाहाताचि मेले ॥ ३–९–८

पुरुषार्थाची सिद्धी आचाराने होते आणि आचाराची सिद्धी विचारानी साधावयाची असते. म्हणून शारिरिक स्वास्थ्यासाठी आपण जेवढी काळीज आणि फुप्फुसाची (हार्ट व लिव्हर) काळजी घेतो, तेवढीच, किंबहुना विशेष, आपल्या विचारांची घेतली पाहिजे. विचार लंजूर पडले, डळमळले गंजले कीं सारा कारभार रद्दीत निघालाच.

शुद्ध विचाराची एकाग्रता

ही एक दिव्य प्रभावशाली शक्ती आहे. हिला कोणतीहि परिस्थिति पादा-क्रांत करू शकत नाही. शनीची साडेसाती येवो, नाहींतर तिच्या बापाचा बाप येवो, ही शक्ति, काही काळ लोहाळ्याप्रमाणे वाकली तरी अखेर, ताठ उभी राहिल्याशिवाय रहात नाही. दृढनिश्चय आत्मविश्वास वगैरे कल्पना याच शक्तीत सामावेलेल्या असतात. एकाग्र विचारांच्या तीव्रतेने मृत्यूच्या पाशालाहि अटकाव करून 'थांब' म्हणणाऱ्या वीरांची उदाहरणे पुष्कळ आहेत.

शिवरायाची तोफ जोंवरीं पडे न मम कानीं ।
तोंवरिं आला काळ तरी त्या ठेचिन लाथांनी ॥

या वीररत्न बाजीप्रभु देशपांडयाच्या उद्गारात हीच शक्ति उत्कटत्वाने सणा-णली, आणि अखेर त्याच्या हुकमी इच्छामरणाने मऱ्हाठी इतिहासा आचंद्रार्क दणाणली. या शक्तीचे दुसरे चिरंजीव हृदय म्हणजे

शिवरायाचा आग्रा येथील औरंगझेबी मुकाबला.

"हें हिंदवी स्वराज्य व्हावें हें श्रीच्या मनांत फार आहे" या एकाच एकाग्र विचाराला "प्रतिपच्चंद्ररेखेव" आपल्या हृदयात 'वर्धिष्णु' कर-णाऱ्या शिवरायावर परिस्थितीचा फास पडला आणि जयसिंगासारख्या बादशाही शब्दाच्या यापवाजीला भुरळून तो अभ्यास अचानक बादशाही अटकेत अडकला. आग्ऱ्यास जाताना हत्तीच्या अंबारीत बसून जो दरव-ज्याचा सिंह रायगड उतरला, तो तीन महिने नजरकैद आणि सहा महिने जंगलाच्या पायपिटीचा भयंकर वनवास भोगून,

कटि लंगोटा । घेउनी भिकेचा लोटा ॥

अशा गोसाव्याच्या वेषाने रायगडला परत येतो आणि अहल्लक् गर्जना करून मातोश्रीच्या चरणांवर लोळण घेतो, तो कोणत्या चैतन्याच्या जोरावर ? ज्याच्या नुसत्या नावाचा दरारा अवघ्या आसेतुहिमाचल भरतखंडात थरकाप उडवीत होता, ज्याचा शब्द झेलायला तानाजी सारखे हनुमंत आणि बाळप्रभू सारखे मसलती चित्र-गुप्त शेकड्यांवरी हात जोडून उभे. आणि ज्याच्या नुसत्या स्वराज्यपूर्वक ऐश्वर्याने विजापूरची सुलतानशाही दिङ्मूढ चकित झालेली, त्या महत्त्वा-

कांक्षी तरूण शिवाजीवर नजरकैदेचा आणि आंगाला राख फासून, कंदमुळे खातखात, लपतछपत, जंगले तुडवीत, भणंग भिकाऱ्या प्रमाणे वणवण भटकण्याचा प्रसंग यावा; या विपरीत परिस्थितीची, ग्रहदशेच्या या नरकवासाची, किंवा शनीच्या साडेसात्या कोलदांड्याची, वाचकानी सहृदयतेने कल्पना केली, तरच शिवरायाच्या वज्रप्रहारी विचारशक्तीच्या चैतन्याचा महिमा त्यांच्या कौतुकाच्या समुद्राला अपरंपार भरती आणील.

हिंदवी स्वराज्य झालेच पाहिजे

ही एकच कल्पना, हा एकच निश्चय, हा एकच विचार शिवाजीच्या तनुमनाच्या अणूरेणूत बिजली प्रमाणे सणाणता सणाणता त्याच्यात इतका एकजीव समरस झाला होता की स्वराज्य म्हणजे शिवाजी आणि शिवाजी म्हणजे स्वराज्य. अशा एकतान स्थितीला कोणती आणि कसली परिस्थिति पायबंद लाऊन पालथी पाडणार !

जेथें बहुत विचार । तेथें ईश्वरावतार ।
झाले आहेत पुढें होणार । देणें ईश्वराचे ॥

केवळ विचार एकाग्र झाले म्हणजे पुरुषार्थी पराक्रमाचा मार्ग मोकळा होत नाही. विचारांची शुद्धी ठरवायला तसेच काहीतरी सर्वसमर्थ पाठबळ पाहिजे. किंवहूना त्याशिवाय विचारांची एकाग्रताच साधणे शक्य नाही. शुद्ध विचारांना लागणारे पाठबळ हे ' देणे ईश्वराचे ' आहे. हे ईश्वरी देणे मिळविण्यासाठी नुसती विचारांची कमावणि किंवा आचाराची डुक्करमुसंडी फुकट आहे. त्यासाठी अंतरीचा ज्ञानदिवाच प्रदिप्त करून, त्याच्या प्रकाशात आपल्या विचारांची शुद्धाशुद्धता पारखून, शिवाय अवघ्या विश्वाचे नियंत्रण करणाऱ्या ईश्वरी सूत्राची ओळख करून घेतली पाहिजे.

तस्मात् विचार करावा । देव कोण तो वोळखावा ।
आपला आपण शोध घ्यावा । अंतर्यामीं ॥ ४-९-७

ज्या देवाने ही नानारत्नानि वसुंधरा निर्माण केली आणि नवग्रहांसह अनंत विश्वाचे जो पालन पोषण करतो, त्याचीच ओळख पटवून घेतली कीं मग शनि मंगळादि ग्रहांच्या गुणधर्मांची निराळी ओळख करून घेण्याची यातायातच उरत नाही. उदाहरणार्थ ब्रिटीश राजकारणी दगलबाजी (डिप-लोमसी) ची मूळ मख्खीच एकदा चांगली ओळखली कीं मग गव्हर्नर व्हाईसरायादि ग्रहोपग्रहांच्या बऱ्या वाईट हालचालींच्या रोखांचा अंदाज तेव्हाच अटकळीत येतो. त्यासाठी वेगळी खटपट करावीच लागत नाही.

जेणें संसारी घातलें । आवघें ब्रह्मांड निर्माण केले ।
त्यासी नाही वोळखिले । तोचि पतित ॥ ६-१-१३

खुद्दाला डावलून, त्याच्या हुजऱ्याच्या हुजऱ्याची मिंधा करीत बस-णाराला कोण ज्ञानी म्हणेल ? विद्वान् पुष्कळ असतात, पण ज्ञानी फार थोडे असतात. विश्वविद्यालयाच्या कडेलोटाच्या असतील नसतील त्या झाडून साऱ्या डिग्ऱ्या मिळाल्या म्हणजे माणूस ज्ञानी होऊ शकत नाही. फार झाले तर त्याला विद्यावान्—विद्वान् म्हणा. पण तो ज्ञानी नव्हे. कारण—

पोट भराव्या कारणें । नाना विद्या अभ्यास करणें ।
त्यासी ज्ञान म्हणती परी तेणें । सार्थक नव्हे ॥
देव वोळखावा एक । तोंचि ज्ञान तें सार्थक ।
येर आवघोंचि निरार्थक । पोटविद्या ॥
येवं पोट भराव्याची विद्या । तयेसि म्हणो नये सद्विद्या ।
सर्वव्यापक वस्तु सद्या । पाविजे तें ज्ञान ॥ ६-१-२३

ऐक ज्ञानाचें लक्षण । ज्ञान म्हाणिजे आत्मज्ञान ।
पाहावें आपणासि आपण । या नाव ज्ञान ॥
मुख्य देवास जाणावें । सत्य स्वरूप ओळखावें ।
नित्यानित्य विचारावें । या नाव ज्ञान ॥ ५-६-२
साहेबास लोटांगणीं जावें । नीचासारिखें व्हावें ।
आणि देवास न मनावें । हें कोण ज्ञान ? ॥ ६-७-१९

शिवाजी महाराज विद्वान् नव्हते, यास्तव त्यांच्या निंदक वंदकात दुमत नाही. ते विद्वान् नव्हते, पण पट्टीचे ज्ञानी होते. त्यानी 'मुख्य देवास' जाणिले होते. 'सत्य स्वरूप' ओळखून 'नित्यानित्य विवेक' त्यानी पूर्ण कमाविला होता. त्यांचा कर्मयोग ईश्वरी ज्ञानाच्या पाठिंब्यावर पुढे पुढे रेटला जात होता, म्हणूनच तो निष्काम घडला, आणि म्हणूनच तो यशस्वी झाला. शिवरायाच्या चरित्राचा सुक्ष्माठाक राजकारणा पुरताच विचार करणाऱ्या मंडळींची दृष्टी एकाक्ष असते. अफझुलखानासारख्या प्रचंड दैत्याला चुटकीसरसा चीत करणाऱ्या आणि आग्ऱ्याच्या बादशाही दरबारात औरंगझेबाची बेफाम निर्भत्सना करणाऱ्या शिवाजीची मनोवृत्ति ईश्वरभक्तीने किती चबचबीत भिजलेली असे, याची त्याना कल्पना होत नाही. " करता करविता परमेश्वर, होणे जाणे त्याच्या हाती, सुख दुःख येवो जावो, मी केवळ निमित्तमात्र; पडेल ते काम, घडेल तो मुकाबला, भेटतील ती संकटे, या सर्वांना मर्दाप्रमाणे तोंड देऊन, यशापयशाचा भार 'श्री' च्या चरणी वाहून, मी यथामति यथाशक्ती कर्तव्याची कमाल कसोशी करीत राहणार " हा एकच चैतन्याचा विद्युत्प्रवाह शिवाजीच्या अखिल जीवनात अखंड सणाणत होता. मिसरूट फुटले नव्हते आणि कशास काही पत्ता नव्हता, अशा काळात सुद्धा देशपांडे दादाजी नरस प्रभूशी स्वराज्य-स्थापनेच्या प्रतिज्ञेची आणभाक वाहताना सुद्धा तरुण शिवाजी " हे राज्य व्हावे असे

'श्री' च्या मनात फार आहे''

असेच उद्गार काढतो; 'माझ्या मनात फार आहे' असल्या क्षुद्र कल्पनेचा वारा त्याच्या हृदयात शिरणेच शक्य नव्हते. कारण, बाळपणापासूनच तुकाराम रामदास जयरामस्वामी रंगनाथ मोरयादेव इत्यादि संत महंतांच्या संगतीने शिवाजीने परमेश्वरभक्तीची वात सरसावून, आपल्या हृदयात ज्ञानदीप अखंड तेवत ठेवला होता. सुखदुःखाच्या आणि लाभहानीच्या सर्व कल्पना जगन्मातेला, तुळजामातेला, समर्पण करून, आपल्या आत्मीय संकेताचा परमेश्वरी संकेताशी एकजीव करून टाकला होता. निर्गुण स्वरूपात जगन्माता तुळजाई आणि सगुणरूपात माता जिजाई यांच्या कृपेची ढाल पांघरूनच शिवाजीने अगणित प्राणघातक मुकाबल्यांच्या जबड्यात आत्मविश्वासाच्या घडाडीने उड्या घेतल्या आणि त्या ढालीच्या सर्वसमर्थ प्रभावाने शीरसलामत यशवंत होऊन शिवाजी बाहेर पडला. वास्तवीक पाहिले तर शिवाजीचे सर्व आयुष्य अत्यंत दुःखपूर्ण आणि कंटकमयच होते. ज्याला आपण प्राकृत संसारी जन 'सुख' मानतो, त्याचा लवलेश सुद्धा शिवाजीला कधी चाखायला मिळाला नाही. बुद्धीची किंचित् वाढ होऊन समजू लागल्या पासूनच, त्याच्या जगद्व्याळ कर्तव्याचे विराट स्वरूप त्याच्या ज्ञानचक्षूपुढे नाचू लागले. त्याच्या पूर्ततेसाठी वडिलार्जित सरदारी श्रीमंतीच्या सुखोपभोगाना लाथ मारून, त्याने तारुण्याच्या उषःकालीच फकीरी पत्करली. राजकारणी क्षेत्रात प्रत्येक क्षणाला त्याचा जीव अखंड धोक्यात. अफझुलखानी मुकाबले तर त्याच्या पाचवीलाच पूजलेले. कौटुंबिक अथवा सांसारिक सुखाचा तपास केला तर तेथेहि सगळाच खडखडाट. मरे पर्यंत कौटुंबिक सुखाने शिवाजीकडे एकदा सुद्धा चुकून कधी स्मितहास्य केले नाही. संसारिक आपत्तिना कंटाळून आपल्या कमजोर बुद्धीची धाव आत्म-

इत्येसारख्या नामर्द मर्यादेला भिडविणाऱ्या आणि सुखदुःखाच्या फोलकट कल्पनाना आपल्या कर्तव्याचा बळी देणाऱ्या पंढानी शिवरायाच्या चारित्र्याचा मननपूर्वक विचार अगत्य करावा. सांसारिक व्यावहारिक आणि लौकिकी आपत्तींचा क्षणमात्र विचार न करता, अमीराच्या पोटी जन्मून फकीरीने राहणाऱ्या शिवाजीने जो एवढा मोठा लोकोत्तर पराक्रमांचा हिमालय उभा केला, तो केवळ एकाच सामर्थ्यावर. त्याने आकाशस्थ किंवा पृथ्विस्थ छोट्यामोठ्या ग्रहोपग्रहांची पर्वा केली नाही. त्याने थेट खुदाच्या दरबारात धाव घेऊन,

आदिमाया जगदंबेच्या पायी मिठी

मारली. यशापयशाचे सुखदुःखाचे, लौकिकी अब्रूबेअब्रूचे, लज्जलज्जेचे सोर गाठोडे त्या तुळजामातेलाच अर्पण केले. मग काय विचारावे ? 'भावार्थबळें जेंहिं भगवंतासि बोभाइले' त्याला तो श्रीहरी, ती जगदंबा, काय कधीं अंतर देईल ? नाही, नाही, शतशः नाही. असल्या अनन्य भक्ताने हाक मारा-

यचि यातड तों—

देव आपण घालूनि उडी । तयांसी नेले पैलथडीं ।
येर तें अभाविकें बापुडीं । वाहातचि गेली ॥
भगवंत भावाचा भुकेला । भावार्थ देखोन भुलला ।
संकटीं पावो भाविकाला । रक्षितसे ॥
जयास भगवंत आवडे । तयाचें देवासीं सांकडें ।
संसार दुःख सकळ उडे । निजदासाचें ॥ ३-१०-११
निःकाम भजनाचें फळ आगळे । सामर्थ्य चढे मर्यादे वेगळे
तेथें बापुडीं फळें । कोणीकडे ॥

भक्तें जैं मनीं धरावें । तें देवें आपणाच करावें ।
तेथें वेगळें भावावें । नलगे कदा ॥
दोनी सामर्थ्यें येक होतां । काळास नाटोपे सर्वथा ।
तेथें इतरांची कोण कथा । कीटकन्यायें । १०-७-२३

शिवाजीने लौकिकी सर्वस्वाला लाथ मारून देवभक्ती आणि देशभक्ती यांचा असा एकजीव केला कीं त्यांच्या संयुक्त सामर्थ्यापुढे शनि मंगळादि ग्रहांच्या दशेचे दणके वायवार ठरले. संचिताचे भोक्तृत्व म्हण, ग्रहदशा म्हणा, का व्यावहारीक आपत्ति म्हणा, वाटेल त्या प्रसंगी चित्तवृत्ति शांत आणि संतुष्ट ठेऊन, शिवाजी हव्या त्या संकटाच्या नरड्या-लाच थेट जाऊन भिडत असे. ' मी मेलो तर काय होईल ? ' याचाहि जो क्षणमात्र विचार करीत नसे, तो सुखदुःखाची आणि लाभहानीची किती दिक्कत बाळगणार ?

सुखदुःखे समे कृत्वा लाभालाभौ जयाजयौ ।
ततो युद्धाय युज्यस्व नैवं पापमवाप्स्यासि ॥

[अर्थः-सुख आणि दुःख, लाभ आणि हानी, जय आणि अपजय सारखे मानून तूं युद्धास तयार हो. या रीतीने तुला कोणतेहि पातक लागणार नाही.] हा योगीश्वर श्रीकृष्णाचा जीवनमंत्र शिवाजीने आपल्या चारित्र्यात अपरंपार भिनविल्यामुळेच, त्याच्या पुरुषार्थी पराक्रमाला यशवंत करण्याची जबाबदारी त्या जगन्मातेला स्वतः पत्करावी लागली.

आम्ही संसारी माणसे. संसारा पलीकडे आणि त्यातल्या फोलकट सुख दुःखांच्या विवंचने पलीकडे आम्हाला काहीच दिसत नाही. संकटांचा वारा

जरा उलटापालटा वाहू लागताच आमची तारांबळ उडते. मग आम्हाला देवाचा धावा सुचतो. नवग्रहांची शांति अठवते. तरीहि दक्षिभर स्वार्थापलीकडे आमच्या मनाची धाव जात नाही.

देवाशी सुद्धा सौद्याची सोदेगिरी

करायला आम्हाला खंत वाटत नाही. माझी परीक्षा पास होईल तर मी सत्यनारायण करीन. मला गोव्याची लाटरी लागेल तर मी लघुरुद्र महारुद्र करीन. बायकोला मुलगा होईल तर मी तुझ्या जत्रेला येईन. सगळ्या नवसांची यंत्रे या जर–तर–च्या वंगणावर चाललेली. शनीची साडेसाती सुरू झाली कीं मारुतीवर तेलशेंदराचा अभिषेक, आणि प्रार्थना काय ? तर 'शनिदेवा, मला छळू नकोस. तुला एक सोंडून लाख लोटांगणे घालतो. पण माझ्या संसारातल्या चाकांचे वंगण कमी करू नकोस. हापीसात रिडक्शनची गडबड चालू आहे, त्यात मला डिच्चू देऊ नकोस; ' वगैरे वगैरे वगैरे. देवाला नवस करण्याचे इतक्या चमत्कारीक आणि विचित्र अटींचे कित्येक मासले लोकात प्रचलित आहेत, कीं ते ऐकले म्हणजे आम्हा स्वार्थी संसाऱ्यांच्या कीटकवत् जीवनाची खरोखरच खंत येते.

देवावेगळे कोणी नाही । ऐसे बोलती सर्वही ।
परंतु त्यांची निष्ठा कांहीं । तैसीच नसें ॥ ४-८-१९

संकटांच्या वेळीच आम्हाला देवाची आठवण व्हायची, आणि त्यात काही चूक नाही अगर वाईट नाही. संकटांमुळेच देवभजनी लागण्याची संधी आम्हाला लाभते, हे संकटांचे आमच्यावर केवढे उपकार ! पण तेवढी लाट ओसरली कीं आम्ही पूर्वपदावर येतो, हेच काय ते वाईट.

ग्रहांचे गुणधर्म पारखले, त्याप्रमाणे आचार विचाराना शिस्त लावली, लौकिकी प्रयत्नवादाची शिकस्त केली, आणि परमेश्वराला मात्र अजीबात डावलले, तर नुसता एकांडा प्रयत्नवाद कधीहि यशस्वी होणार नाही. भगवंताच्या अधिष्ठानाशिवाय नुसत्या प्रयत्नवादाची कोरडी डुक्करमुसंडी फुकट आहे. अलीकडे कोरड्या प्रयत्नवादाची महति गाऊन, हिंदी तरुणात कर्तबगारीची शिरशिरी उत्पन्न करणारी नियतकालिके व पुस्तके याना बराच ऊत आलेला आहे. 'फिरून यत्न करा' या तोडग्यात वाह्यतः कितीहि जादू भरलेली दिसत असली, तरी तेवढ्या जादूच्या तुटपुंज्या भांडवलावर प्रयत्नवाद यशवंत झाल्याचे उदाहरण नाही. कावेबाजीने लोकांच्या मुंड्या मुरगाळून खाकाधिशाचे लाखाधीश पुष्कळ होतात. पण हा प्रयत्नवाद म्हटला तरी तो कर्मयोग नव्हे आणि ते मुंड्यामारू लोक कर्मयोगीहि नव्हत. नुसते दगडावर दगड रचून मनोरे बांधले जात नाहीत. कोरड्या प्रयत्नांच्या परमावधीने दगडांचा मोठा थोरला डोंगर बनला तरी त्याला कोणी किल्ला म्हणणार नाही, कीं ताजमहालाची महति त्याला येणार नाही.

जो जो प्रयत्न रामाविण । तो तो दुःखासी कारण ॥

विश्वनाथाला विसरून केलेले प्रयत्न, लोकांच्या समजुतीने कितीहि ताडमाड उंच गेले, तरी ते अखेर अल्पायूच ठरतात. गेल्या महायुद्धाच्या धामधुमीत शेकडो मानकाऱ्या व्यापाऱ्यानी दहाचे हजार आणि हजारांचे लाखो रुपये यक्षिणीच्या कांडी प्रमाणे मिळवून ते "श्री" मान् बनले. यशवंत प्रयत्नवादी म्हणून त्यांच्या कीर्तीचा नगारा झडला. श्रीमंतीच्या जोरावर ते लोकात पुण्यशील पुढारी म्हणून प्रख्या पावले. राजकारणातहि त्यांची सलामसलत तोळामाशावर विकू लागली. कोरड्या प्रयत्नवादाचे गोडवे गाणाऱ्या कोडग्या वृत्तपत्रानी त्यांची सचित्र चरित्रे प्रसिद्ध केली. महत्वा-

कांक्षी तरुणांचे आदर्श म्हणून त्यांच्या स्तुतिस्तोत्रांचा मुसळधार पाऊस कोसळविताना, या " श्री " मंतांच्या करणीत " श्री "किती आणि ' राम ' आहे का नाही, याचाहि कोणी विचार केला नाही. अखेर परिणाम व्हायचा तोच झाला.

परमार्थीं तो राज्यधारी । परमार्थ नाही तो भिकारी ॥

हा सनातन सिद्धांतच प्रत्ययाला आला. कोरड्या ठणठणीत प्रयत्नवादी दगलबाजीचे या नकली ' श्री ' मंतांचे ऐश्वर्य अवघ्या १० वर्षांत कडाड कोसळून जमीनदोस्त झाले. कित्येकानी आत्महत्त्या केल्या. कित्येक फरारी झाले. कित्येक नादारी घेऊन बाई बुवांच्या मठात देवभक्तीला लागले. कित्येक तुरुंगात खडी फोडायला गेले. लक्षावधि लोकांच्या ठेवी बुडाल्या-मुळे ते या ' कर्मयोग्यां 'च्या नावाने आपल्या कर्मभोगाला शिव्याशाप देऊ लागले.

असे कां झाले ? तर या एकांड्या प्रयत्नवाद्यांच्या घडपडीत अथेति कोठे ' राम ' च नव्हता. आम्ही हजार चळवळी केल्या आणि लाख प्रयत्न केले, तथापि

अहो ज्यां नरां रामाविश्वास नाही ।
तया पामरां साधिजे सर्व काही ॥

हाच अनुभव अखेर द्यावा लागतो. " सामर्थ्य आहे चळवळीचे । जो जो करील तयाचे । " एवढे समर्थवाक्य आम्हाला चांगले पाठ येते. परंतु " **परंतु येथे भगवंताचें । अधिष्ठान पाहिजे ॥** " या ' परंतु ' कडे मात्र आम्ही सपशेल पाठ फिरविलेली असते. सांसारिक किंवा सार्वजनिक

चळवळींतील प्रयत्नांची आम्ही कसोशीने कितीहि उपासना केली, तरी अनंत ब्रह्मांडनायक श्रीरामाच्या उपासनेशिवाय त्या चळवळीत 'राम' उत्पन्न होणार कसा ? परमेश्वराच्या

उपासनेचा मोठा आश्रयो । उपासनेविण निराश्रयो ।
उद्दंड केलें तरी तो जयो । प्राप्त नाहीं ॥
समर्थाची नाहीं पाठी । तयास भलताच कुटी ।
या कारणें उठाउठी । भजन करावें ॥ १६-१०.

जबरदस्त पाठिंबा असल्याशिवाय कोणतेहि कार्य यशवंत होऊन चिरकाल टिकत नाही. परमेश्वराशिवाय असला जबरदस्त पाठिंबा कोण मानवाची लंडी देणार ? राजे महाराजे कोणीहि कितीहि असले, तरी तेच स्वतः जेथे मलमूत्रजन्य मरणाधीन माणसे, तेथे त्यांचा 'आश्रय' काय किंमतीचा मानायचा ? त्यांच्यावरहि ग्रहदशेचा वरवंटा फिरला कीं त्यांचीहि हाडके भर होळीपौर्णिमेच्या होळीत कशी कडाकड उफलतात, याचे प्रत्यंतर होळकराच्या होळीने नुकतेच सर्वांच्या नजरेला पडलेले आहे. तुकोजीराव होळकरात जर काही 'राम' असता, तर त्याला आपल्या सिंहासनाला राम्राम ठोकण्याची पाळीच आली नसती. ही पाळी टाळण्यासाठी त्याने प्रयत्नांचे विंध्याद्री उलथे पालथे केले. न भूतो न भविष्यति डावपेच लढविले. संपत्तीचा डोळेफाट होम केला भटांच्या आशीर्वादासाठी त्याना पोटफाट मेजवान्या दिल्या. पण त्याला 'समर्थाची पाठी'च नसल्यामुळे त्याला 'भलताच येऊनी कुठून' गेला.

आपुले आवघेचि जावें । परी देवासीं सख्य राहावें ।
ऐसी प्रीती जीवें भावें । भगवंतीं लागावी ॥
देव म्हणिजे आपुला प्राण । प्राणासी न करावें निर्वाण ।
परम प्रीतीचें लक्षण । तें हें ऐसें असे ॥

ऐसें परम सख्य धरितां । देवास लागे भक्ताची चिंता ।
पांडव लाखाजोहरी जळतां । विवरद्वारें काढिलें ॥ ४-८-११

सर्व कर्मे निष्काम बुद्धीने ' कृष्णार्पण ' करून, निश्चयी विवेकाने विहित कर्तव्य बजावणाऱ्या भक्तावर प्रत्यक्ष कृतांतकाळ कोपला, तरीहि त्या भक्ताचा रोमसुद्धा वाकडा होऊ शकणार नाही; मग या आलतू फालतू शनि मंगळादि ग्रहांच्या दशांचा मगदूर काय ?

देवें भक्त कोण वधिला । कधीं दोखिला ना ऐकला ।
शरणागतांस देव झाला । वज्रपंजरू ॥ ४-८-२५

' समर्थाची पाठी ' नसता केलेला एकांडा प्रयत्नवाद देखता देखत मातीला कसा मिळतो, याचा दाखला नेपोलियन बोनापार्टाच्या चरित्रात उत्तम मिळतो. तो उत्तम ज्योतिषी व खगोलज्ञ होता. नवग्रहांचे गुणधर्म तो यथातथ्य जाणत असे. ज्योतिषशास्त्राच्या सहाय्याने मोहिमांचे लष्करी डावपेच तो इतक्या अचाट निपुणतेने ठरवीत असे कीं ठरल्या मिनिटाला विजयश्री धावत येऊन विजयाची माळ त्याच्या गळ्यात घालीत असे. नेपोलियनने आकाशस्थ नवग्रहांच्या दशाना आपल्या इतक्या हुकमतीत आणलेले होते कीं त्याच्या मुहूर्ताचा ठोकताळा, वॉटरलूच्या अधःपातापूर्वी, एकदा सुद्धा कधी हुकला नाही. त्याचा निरीश्वरी एकांडा प्रयत्नवाद समुद्राच्या भरती प्रमाणे एकसारखा बेफाम फोफावतच गेला. तथापि एक श्रीहरीची कृपाच काय ती अमर्याद, बाकी सर्व गोष्टीना मर्यादा आहेत, याचे त्याला भानच राहिले नाही. नेपोलियनचा प्रयत्नवाद कळसाला पोहचला असेल नसेल तोंच वॉटरलूच्या समरांगणावर त्याची मर्यादा संपून तो धडाड खाली कोसळला. प्रयत्नवादाचा किल्ला उभारण्यासाठी त्याला सारी हयात खर्ची घालावी लागली, पण तो कोलमडून ढासळायला एक मिनीट

पुरून उरले. साऱ्या युरपखंडाला आपल्या तलवारीच्या जरबेत ठेवणारा हा द्वितीय राज्यक्रांतिकार अखेर कुत्र्याच्या मोताने मेला. नवग्रहांशी एकतान झालेला हा ज्योतिर्विद पुरुषोत्तम इंग्रेजांच्या सेंट हेलेना बेटातल्या तुरुंगात सडत पडत असता, एकाहि गुरु बुधाला किंवा रवि चंद्राला त्याच्या धावप्याला धावता आले, नाही. सेंट हेलेनाला जाताना तो म्हणाला ' मी स्वपराक्रमाने रंकाचा राव झालो, नराचा नरपति झालो; आज माझ्या दैवाने गोता दिला. ' त्याला दैव आठवले पण देव चुकूनसुद्धा आठवला नाही.

आता शिवाजी महाराजांच्या चारित्र्याकडे पहा. हिंदवी स्वराज्य प्राप्तीसाठी प्रयत्नाचे पाऊल उचलण्यापूर्वीच त्यानी प्रथम भगवंताचे अधिष्ठान शोधले. देवावर भार घातला. आदिमाया जगदंबेच्या चरणी सुखदुःख, यशापयश आणि लाभ हानिचे गाठोडे वाहिले, साधुसंताचे आशीर्वाद घेतले आणि केवळ निष्काम वृत्तीने पडेल त्या मुकाबल्याच्या छातीवर तो चालून गेला. शिवाजीने आपल्या प्रयत्नवादाला भक्तिपूर्ण ज्ञानयोगाची जोड देऊन गीतोक्त कर्मयोगाची तपश्चर्या निष्काम बुद्धीने आचरली. म्हणूनच शिवाजीचा प्रयत्नवाद यशवंत होऊन चिरंजीव झाला. ' स्वराज्य प्राप्तीच्या दिशेने पडेल ते कार्य आणि भेटेल ते साहस कुशलतेने तडीला न्यायचे, एवढेच माझे काम. यशापयशाची काळजी तुळजामातेला.' इतक्या वृत्तीला गेलेल्या योग्याकडे काळ सुद्धां वाकड्या नजरेने पाहू शकणार नाही, मग कोण कोठला अफझुलखान आणि कोणत्या झाडाचा पाला अवरंगझेब ?

सर्व भार देवावर टाकला म्हणजे आपण आपल्या कर्तव्याच्या बऱ्यावाईट जोजारातून मोकळे होतो, असे मुळीच नव्हे. देवावर भार घाला वा नका घालू, कर्तव्याला पाठ दाखविणे नामर्दीशिवाय कोणालाच शोभणार नाही. " कर्मण्येवाधिकारस्ते. " तुझे जे विहित

कर्तव्य असेल ते इमाने इतबारे आणि विशेषतः अत्यंत कुशलतेने बजावणे, हाच तुझा अधिकार. त्याला गोड फळ येईल का कडू येईल, का मुळीच येणार नाही, याच्या यातायातीत तू पडू नकोस. तुझ्या कर्तव्याचा मार्ग सरळ असो वाकडा असो, वा आवडीचा असो वा नावडीचा असो, सुखाचा असो किंवा दुःखाचा असो, तो तुला निष्ठेने आणि निश्चयाने चोखाळलाच पाहिजे. आंगचुकारपणा चालणार नाही. संकटांच्या आणि आपत्तींच्या सावलीने भेदरण्यात पुरुषार्थ नाही. ते हिजड्याचे–नामर्दाचे लक्षण. स्वार्थबुद्धीला लवमात्र थारा न देता तूं कर्तव्यनिष्ठेने कर्तव्याची शिकस्त कर, म्हणजे तुला माझी निराळी उपासना करायलाच नको. " हाच श्रीकृष्ण योगीश्वराचा अखिल मानवाना कर्मयोगाचा संदेश आहे.

शेकडा शंभर लोकाना आधी मुळी कसले ध्येयच नसते, मग कर्तव्याची दिशा कशी उमगणार ? निरक्षर अडाण्यांची गोष्ट सोडली, तरी युनिवर्सिट्यांच्या ज्ञानयोगात मुरंब्याप्रमाणे मुरलेल्या पदवीधरांच्या ठिकाणी सुद्धा ध्येयाचा. आणि कर्तव्यकल्पनेचा खडखडाटच आढळून येतो. बीए कां झालास ? तर मॅट्रिकची ट्रिक साधली म्हणून. पुढे काय करणार ? ते काही ठरले नाही. बघून पण मास्तरकीची नोकरी मिळाली तर लॉ–टर्म्स भरून एलेल्बीचा किंवा एमएचा प्रयत्न करीन. बरे, पुढे काय ? ते आज काही सांगता येत नाही. बीए एमए झाले तरी ध्येयाची कल्पना ज्याना निश्चित ठरविता येत नाही, असल्या मुर्दाडांकडून कोणी कसल्या कर्तबगारीची अपेक्षा करावी ? शाब्दिक ज्ञानाच्या पोपटपंचीपलीकडे जवळ भांडवल नसलेल्या या शब्दशूराना जेथे कर्तव्यच उमगत नाही, तेथे कर्तव्यनिष्ठा तरी साधणार कशी ? आणि कर्तव्यनिष्ठेची फुरफुरी चुकून आलीच, तर तिच्या साधनक्रमात अवश्यमेव भेटणाऱ्या आपत्तीना आणि संकटाना हे एकांडे

ज्ञानाशिलेदार कोणत्या शक्तीच्या जोरावर तोंड देऊ शकणार ? यांचे पुस्तकी शब्दज्ञान चिकित्सेची वटवट करायला उपयोगी पडले, तरी लोकव्यवहाराच्या धकाधकीच्या मामल्यात टिकाव धरताना त्याचे वानितेरा उडतात.

ज्ञान कितीहि डोळस असले तरी त्याची एकांडी मुषंडी काहीच कार्य घडवू शकणार नाही. ज्ञानाला जेव्हा ईश्वरभक्तीचा पाठिंबा द्यावा, तेव्हा कोठे त्याच्या डोळसपणाला खरी धार लागते; आणि तेव्हाच मनुष्य कर्तव्याच्या क्षेत्रात निष्काम कर्मयोग आचरण्यास अधिकारी होतो. भक्ती ज्ञान आणि कर्म हे तीन योग कितीहि सामर्थ्यवान् असले, तरी त्या प्रत्येकाची एकांडी शक्ती फुकट आहे. तिघांचा जेव्हा समरशी समन्वय होईल, तेव्हाच खरे सामर्थ्य चमकू लागेल. एरवी नाही. ज्ञानाशिवाय भक्तीमार्गी कितीहि टाळ ठोकीत बसला तरी फुकट. रामनामाची कोट्यवधि जपणी केली तरी

रामनाम सब कुहि कहे ठक ठाकुर और चोर ।
जिस नामसे ध्रुव प्रल्हाद तरे वो नाम कुच और ॥

मनुष्य कितीहि ज्ञानी झाला, तरी त्याचे हृदय जर भक्तिशून्य असेल, तर त्याच्या पांडित्य-दीपाची अवस्था तैलशून्य दिव्याप्रमाणेच व्हायची. आणि, भक्तियुक्त ज्ञानाशिवाय कर्मयोग कोणी आचरू म्हणेल, तर तेथे त्याला

उंदराच्या पिल्लाने सापळ्याचे खेळ

खेळल्यावा अनुभव भोगावा लागेल. पण आमचा सर्व व्यवहार पहावा तों एकाक्ष आणि एकांड्या. जे भक्तीमार्गाला लागतात ते नुसते टाळ कुटीत बसतात. जे ज्ञानमार्गाला जातात ते तेथेच वाक्पांडित्यात गर्क राहतात. शब्द कौशल्याच्या पंखाने त्यांचे मन साऱ्या त्रिभुवनाची यात्रा करते, पण

अंतःकरण भक्तीच्या अभावी स्नेहशून्य ताठरच असल्यामुळे, त्याना कित्येक गूढ प्रमेयांचे उलगडे झाले नाहीत, म्हणजे ते नास्तिक किंवा संशयी बनण्यातच आपल्या ज्ञानाचा कळस झालाम्रे मानतात. याच्यापुढे मात्र त्यांचा रस्ता बंद ! * भक्ती आणि ज्ञान डावलून जे कोणी कोरड्या प्रयत्नवादाच्या भरी पडतात, ते दगडावर दगड रचून केवळ हमाली वृत्तीने ताजमहाल बांधण्याचा मरे मरे तों अट्टाहा करता; परंतु संकटाचा एखादा फटका बसलारे बसला कीं देवाला नाहीतर दैवाला दोष देत मटकन् कायमचे खाली बसतात.

कित्येक वाचक असे म्हणतील कीं हे भक्ती–ज्ञान–कर्म–योगांचे त्रांगडे आमच्या विचाराना पुष्कळ पटले, पण आमच्या हातून ते आचारात वठले तर पाहिजे ना ! आम्ही साधीसुधी संसारी माणसे. केवळ पोटार्थी प्राणी. विक्रमी पुरुषांच्या ज्ञानयोगांच्या न् कर्मयोगांच्या गोष्टी आम्हा अज्ञ जनाना काय होत ? आमच्या सारखा माणूस विपरीत ग्रहदशेच्या अथवा साडेसातीच्या तडाक्यात सापडला, तर त्याने त्या आपत्ती टाळण्यासाठीं, निदान त्या सौम्य करण्यासाठी काय करावे ? अपायाला काही उपाय आहे कां नाही ?

उपाय आहे. पण तो गुळखोबऱ्या सारखा बाजारात मिळणारा मात्र नाही. जसे संचित तसे भोक्तृत्व. ते भोगल्याशिवाय पांडवासारख्या पुरुषोत्तमांची सुटका झाली नाही, मग तुम्ही आम्ही घडाभासरी माणसे कोणत्या झाडाचा पाला ? दुःखात सूख एवढेच आहे कीं

---

* "There are many things in heaven and on earth, Horatio, than are dreamt of in your philosophy."—Hamlet.

विक्रमालाच साडेसाती विशेष भोवते.

ये रे दिवशा आणि भर रे पोटा, अशा वृत्तीच्या संसारी लोकात जर विक्रमाचाच खडखडाट, तर तेथे शनीची साडेसाती तरी काय करणार एवढा मोठा गडगडाट ? काहीच नाही. मग या संसारी जनाना इतके भिण्याचे कारण काय ? विक्रम असेल तेथेच शनीच्या साडेसातीचा बॉम्ब विशेष जोराने उफलणार. आसेतुहिमाचल हिंदुस्थानात पंजाब आणि बंगाल-कडे हे साडेसात्ये सुरुंग विशेष दणक्याने फुटत आहेत. कुप्रसिद्ध ओड्वा-यरशाहीच्या अमदानीत पंजाबातल्या एकूणएक लोकनेत्याची मान फासावर लटकू पहात होती. पंजाबची कहाणी केव्हाहि स्मरणात आणा, विक्रम-हरिश्चंद्राच्या कहाण्या तिच्यापुढे फिक्या पडतात. बंगालची उदयोन्मुख निवडक तरूण पिढी तर आज जिवंतपणी मृत्यूचा अनुभव घेत तुरुंगात कुझत पडली आहे. इतर सर्व प्रांतांपेक्षा या दोन प्रांतावरच ग्रहदशेची एवढी करडी नजर कां ? तर

खरा विक्रम बंगाल पंजाब मध्येच आहे.

बाकीचे सारे प्रांत शुद्ध संसारी आहेत. बंगाल पंजाबच्या मानाने त्यांच्या आपल्या म्हणजे दर्यामे खसखस होत. तात्पर्य, जेथे काही विक्रमच नाही, तेथे सामान्य संसारी माणसाला शनीच्या आग्यावेताळ साडेसातीची हवेत खाण्याचीहि जरूर नाही. पट्टीच्या शिकाऱ्या प्रमाणे शनी सुद्धा वाघ सिंहा-शीच झोंबी खेळण्याचा शोकी आहे; शेळ्या मेंढ्या बोकडांची तो कशाला पर्वा करील ? एवढी गोष्ट खरी कीं शनीने जरी सहज लीलेने कोदण्डाचा टणत्कार केला, तरी मानवी बोकडांचे कळपच्या कळप भीतीने उघडून दाही दिशा पळतात आणि त्यांच्या मानाने ही सुद्धा एक भयंकर आपत्तीच होय.

तर या आपत्तीवर काही तरी तोडगा आहे कीं नाही ? पूर्वजन्मार्जित संचिताप्रमाणें भोक्तृत्वाची अंमलबजावणी करायला निसर्गधर्म वेमुर्वत तर खराच; पण त्या प्रारब्धाचे हंटरचे तडाखे थोडे सौम्य सफाईत खाण्याइतकी अक्कल कोठे आणि कशी मिळवावी !

भवितव्यता कोणाला कळत नाही आणि टाळताहि येत नाही. ज्योतिषी जर उत्तम शास्त्रज्ञ असेल तर ग्रहदशेच्या परिणामांची भावी अटकळ चांगलीच करून देतो. त्या प्रमाणे जर आपण आपल्या आचारविचारांत योग्य तो बदल केला, तर भवितव्यतेचा वज्रप्रहार टाळता आला नाही, तरी छाती-वर मर्दाप्रमाणे खास झेलून धरता येणे अगदी शक्य आहे. अपायाला उपाय हा असायचाच. फक्त योजनेचे कौशल्य चालविणारा योजक मात्र पाहिजे. डोक्यावर छत्र्या आणि पायात जोडे वाहणा घालून, उन्हाचा कडाका आणि मुसळधार पावसाचा धडाका आम्हाला ज्या योजना-कौशल्याने जितका टाळता येतो, तसल्याच काहीतरी कौशल्याने आम्हाला सगळ्या ग्रहांच्या दशेचे परिणाम खात्रीने तितक्या सफाईत टाळता येणे सहज शक्य आहे.

ग्रहदशेला तोंड देण्याचे मार्ग दोन आहेत. त्यांच्याशी कुशलतेने मैत्री जोडावी किंवा उघड विरोधाचे शत्रुत्व जोडावे. पहिला मार्ग नेपोलियनने पत्करला आणि दुसरा मार्ग रामदास स्वामींनी चोखाळला. हे दोनहि मार्ग सामान्य संसाऱ्याला साधणे कठीण आहेत. तथापि त्यांची माहिती देणे जरूर आहे. मैत्री जोडायची म्हणजे त्या त्या ग्रहाच्या गुणधर्माची नीट स्पष्ट ओळख करून घेऊन, त्याच्या गुणधर्माशी आपल्या आचार विचारांची बिन-तोड जुळणी करून घ्यायची. उदाहरणार्थ सूर्य घ्या. अंगी प्रकाश उष्णता असणे हा त्याचा गुणधर्म आहे. एप्रिल मे आणि ऑक्टोबर मध्ये उन्हाळा

कडक असतो. एरवी तितका नसतो. खानदेश वऱ्हाड मध्यप्रांताकडे तर हे उन्हाळ्याचे प्रमाण अतिशय भयंकर असते. तिकडच्या रहिवाशाना या उन्हाळ्याच्या प्रखरतेची चांगलीच जाणीव असल्यामुळे, त्यांची घरे धान्याची असतात. कित्येकात तळघरेहि केलेली असतात. उन्हाळा किती का कडक असे ना, तरी खानदेशी 'भाऊ'च्या डोक्यावरचे पागोटे आणि कानशिळ झाकणारी उपरण्याची घट्ट टापशी क्षणमात्र दूर होत नाही. कारण, असला काही बंदोबस्त केला नाही, तर आपल्याला खाडकन् सन्स्ट्रोक होऊन राम म्हणण्याची वेळ येईल, हे त्याला माहीत असते. खानदेशी उन्हाळ्याची माहिती नसलेला, एखादा कोकणपट्टीचा रहिवाशी कामानिमित्त तिकडे गेला, तर त्याच्या अज्ञानाबद्दल सन्स्ट्रोकचे प्रायश्चित्त त्याला भोगावे लागते, अथवा तो उन्हाळा आंगवळणी पाडता पाडता त्याचा जीव शनीच्या साडेसाती प्रमाणे अगदी उठवणीला येतो. परंतु खुद्द खानदेश वऱ्हाडातले लोक खुशाल आपापले व्यवहार बिनधोक चालवीत असतात. त्याना त्या उन्हाळ्याचे काहीच वाटत नाही. कारण त्यानी सूर्याच्या गुणधर्माशी आपल्या राहणीचे आणि वागणुकीचे तंत्र जुळते घेतलेले असते. कोकण्या प्राण्याला त्या प्रखर गुणधर्माची सलामी जन्मात पहिलीच किंवा अपरिचित असल्यामुळे, तो एक सारखा ठणाण तडफडत असतो. याच नियमाप्रमाणे शनीच्या गुणधर्माचे नीट ज्ञान करून घेऊन, त्याच्या साडेसातीच्या हंटरच्या तडाक्यांचा आपल्या जीवनशुद्धीत किती कुशलतेने सदुपयोग करून घेता येईल, याची अटकळ बांधून, आपण आपल्या कर्तव्याची दिशा जर नीट दक्षतेने ठरविली, तर शनीच्या साडेसातीचे दणके टाळता आले नाहीत, तरी खात्रीने बरेच सौम्य करता येतील.

नेपोलियन बोनापार्टने हा मार्ग पत्करला होता. स्वतः उत्तम खगोलज्ञ ज्योतिर्विदाग्रणी असल्यामुळे, ग्रहांच्या अनुकूल हालचालीं प्रमाणे तो आपल्य

सर्व राजकारणांची आणि मोहिमांची सूत्रे हालवून हातखंडा यशवंत होत असे. पण किती झाला तरी नेपोलियन माणूसच. त्याच्या महत्वाकांक्षेने एकदम उचल खाल्ली. नवग्रहांशी मैत्रीने वागता वागता त्यांच्या दशेवरहि कुरघोडी करण्याची त्याला अवदशा सुचली वॉटर्लूच्या दिवशी सायंकाळी ५ वाजता अमूक ग्रहांची प्रतिकूल युति होऊन त्यात आपला कायमचा अधःपात होण्याचा संभव आहे, हे त्याला माहीत होते. पण लष्करी डावपेचांच्या जोरावर ग्रहयुति होण्याच्या आधीच, इंग्रज आणि जर्मन सैन्यांचा फडशा पाडून विजय मिळविण्याचा व्यूह त्याने रचला. सर्व हयातीत अखंड यशवंत होत गेल्यामुळे त्याने आत्मविश्वाच्या जोरावर ग्रहांच्या दशेला पायबंद लावण्याची प्रतिज्ञा केली. "उद्यां संध्याकाळीं ५ वाजता घातवेळ आहे. ठीक आहे. पहाटे ५ वाजता इंग्रेजी सैन्यावर तुटून पडून सकाळीं १० वाजेपर्यंत त्यांचा धुव्वा उडवितो. जर्मन जनरल ब्लुशर १२ वाजेपर्यंत येऊच शकत नाही. तो येण्यापूर्वीच मी

इंग्रेजं गब्रूंचा गठडी वळली.

कीं त्या एवट्याला दुपारी २ च्या आत पाणी पाजून मी मोकळा होतो." असा ठाकठीक बेत नेपोलियनने ठरवून, त्या प्रमाणे सैनिकाना त्याच्या ऑर्डरी सुटल्या. काय वाटेल ते झाले तरी जर्मन आणि इंग्रेज सैन्यांची गट्टी पडून द्यायची नाही; एकेकाला वेगवेगळे ठेंचून काढायचे; आणि ते सुद्धा त्या घातघटकेच्या आधी चांगले तीन तास; हा बेत नक्की झाला, आता पहाटेच्या पाचाचा ठोका पडला कीं एकदम तोफखान्याचे खटारे खडाड खडाड मोर्च्या मोर्च्याच्या जागी धावत जायचे, आणि त्यानी एकदम इंग्रेजी सैन्यावर अग्निवर्षाव करायचा. पण नेपोलियनी सूत्र ईश्वरी सूत्राशी थोडेच जुळते होते? ईश्वर हा विषयच त्याच्या गावी नव्हता!

ते दिवस कडकडीत उन्हाळ्याचे. सारी समरभूमी सुकीठाक आणि ठण-ठणीत. लष्करी हालचालीला कसलाच अडथळा नव्हता. पहाट होऊन पाच वाजले कीं नेपोलियनच्या लष्कराचे आणि तोफखान्याचे शांकरी तांडव. नृत्य सुरू होणार. पण

इतुक्यात काय वर्तली माव ?

चार वाजले असतील नसतील तोंच आकाशात मेघांचा गडगडाट उठून धूम-धार पाऊस कोसळू लागला. केवळ पूर्वसंचिताच्या जोरावर रंकाचा राव बनून हुकमी यशःसिद्धी मिळविणाऱ्या नेपोलियनच्या मानवी महत्वाकांक्षेचा गगन-चुंबित मनोरा आज ढासळून कायमचा जमिनदोस्त होणार, म्हणुन निसर्ग सुद्धा मुसळधार आसवे गाळू लागला. सुक्याठाक युद्धभूमीवर वीतवीतभर चिखलाचा खच पडला. पाऊस फक्त अर्धातासच पडला, पण त्याने नेपो-लियनच्या सर्व कारकीर्दीवर अखेरचे पाणी पाडले. पाहाटे पाच वाजता त्याच्या सैन्याची हालचाल सुरू झाली. पण चिखलातून तोफखान्याचे खटारे रेटीत नेता नेताच सकाळचे दहा वाजले. वेळाचे प्रमाण हुकताच सारा डावच हुकला. नेपोलियनची दिरंगाई शत्रूच्या आयतीच पथ्यावर पडली. जनरल ब्लूशर आणि ड्यूक ऑफ वेलिंग्टन यांच्या सैन्याची गट्टी जुळली आणि दोघांच्या जोडगोळीने अगदी ठरल्या घातघटकेला नेपोलियनच्या चरित्राची इतिश्री झाली ! ग्रहांच्या दशेला जाणूनबुजून चकविण्याच्या हमरी-तुमरीतच नेपोलियन स्वतः चुकला आणि अखेर ईश्वरी सामर्थ्यापुढे मानवी सामर्थ्य किती लंगडे पडते, याचा विचार करता करताच चकित झाला. 'जो जो प्रयत्न रामाविण । तो तो दुःखाशी कारण ।' हेच त्याच्या प्रत्ययाला आले. नेपोलियनात सर्व शक्ती सामावलेल्या होत्या, पण त्याच्यात 'राम'

मात्र मुळीच नव्हता म्हणूनच नवग्रहांशी त्याने कितीहि दोस्ती जोडून साऱ्या जगाशी कुस्ती मारण्याचा चंग बांधला तरी ईश्वरी नेमापुढे त्याला अखेर डोळे उघडे ठेऊन ' राम ' म्हणण्याची पाळी आलीच.

याच्या उलट रामदास स्वामींचे उदाहरण पहा. त्यानी नवग्रहांशी मैत्री न जोडता, जवळ जवळ त्यांचा धिःकारच केला. शनि खवळला आणि राहू चवताळला, तर काय होणार ? संसाराचा चिवडाच ना ? आम्हाला हा असला फुटका तुटका संसारच नको.

शय्या भूमितलं दिशोऽपि वसनं ज्ञानमृतं भोजनम् ।

असल्या वैराग्यशीलाचे हे नवग्रह काय वाकडे करणार ? आपत्तींची आणि संकटांची भीतीच ज्यानी भयाने भेदरवून उधळून दिली, त्याना या जगात कशाचे भय ? संकटे आली तर येवोत, गेली तर जावोत, मेली तर मरोत, कशाचेच सुद्धेर सुतक याना नाही. रामदासानी स्वतः पुरता चूल-चौक्याच! संसार जरी केला नाही, तरी एवढ्या बेदरकार उदासीनतेने अंबध्या महाराष्ट्राचा राष्ट्रसंसार चालवून दाखविला, तो कशाच्या जोरावर ? काही तरी जबरदस्त पाठबळ असल्याशिवाय ते नवग्रहांच्या दशांकडे इतक्या धिःकाराच्या धिटाईने कसे पाहू शकले ? शनि मंगळादि घुंगुरट्यांचीच कथा काय, पण 'या सर्व भूमंडळावर माझ्याकडे वाकड्या नजरेने पाहण्याची कोणाची छाती आहे ? ' या उद्गारांच्या पाठीमागे कोणती शक्ती उभी होती ? जे कार्य नेपोलियन बोनापार्टाच्या अक्षौहिणी कदरबाज लष्करी सेनेला साधले नाही, ते रामदासानी भगव्या छाटीच्या जोरावर बोल बोलता सिद्ध करून दाखविले. त्या भगव्या छाटीत कसली शक्ती धमधमत होती ? बरे, केवळ सात्विक शांत साधुवृत्तीचा हा परिणाम मानावा तर येशू ख्रिस्त काय कमी सात्विक साधू होता ? त्याला शत्रूनी चुटकीसारखा चव्हाटयावर नेऊन

तिकाटण्यावर फाशी दिला. पण रामदासाकडे वाकड्या नजरेने पाहण्याची एका तरी मायच्या पुताची छाती होती काय ? जेथे विक्रम तेथे साडेसाती, हा नियम सनातन मानावा, तर त्याला सुद्धा रामदासानी लाथाळून वाटेवेगळा केला. रामदासांचा विक्रम इतका थोर आणि तेजाळ कीं आज तीन शतके झाली तरी

सह्याद्रीतुनि अझुनहि निघतो प्रतिध्वनी त्याचा.

मग शनि नाही कोठे गेला काधि रामदासांच्या राशीला ? कित्येक प्रसंगी त्यानी प्रत्यक्ष काळाला प्रतिकार करून, निसर्गाला सुद्धा "थांब बेट्या" म्हणून दम भरायला सोडला नाही, तो कशाच्या जोरावर ? एकाच शक्तीच्या: त्यानी थेट खुद्दांच्या दरबारात जाऊन, त्यांच्या कृपेचे कवच प्राप्त करून घेतले, त्यानी **समर्थ** रामाची पाठी मिळविली, आणि तिच्या माहात्म्याच्या जोरावर

समर्थांचिया सेवका वक्र पाहे ।
असा सर्व भूमंडळीं कोण आहे ।
जयाची लिला वर्णिती लोक तीनी ।
नुपेक्षी कदा राम दासाभिमानी ॥

अशी आत्मविश्वासाची त्रिखंडनिनादित भीमगर्जना केली. साधुश्रेष्ठ तुकाराम बुवानी संसार केला. कसा केला ते सर्वश्रुतच आहे; पण केला, सोडला नाही. त्याच्या सर्व आपत्ती शांतपणाने भोगल्या, झाला तो छळ समाधानी वृत्तीने सहन केला. कां ! तर त्यानीहि थेट खुद्दांच्या दरबारातून आपल्या जीवनाची चैतन्यशक्ति मिळविलेली होती. तिच्या जोरावर ते म्हणतात,

प्रारब्ध क्रियमाण । भक्तां संचित नाहीं जाण ॥
अवघा देवचि झाला पाहीं । भरोनिया अंतर्बाहीं ॥
सत्व रज तम बाधा । नव्हे हरीभक्तांसी कदा ॥
देवभक्तपण । तुका म्हणे नाहीं भिन्न ॥

तात्पर्य, ग्रहांशी मैत्री जोडण्याचा उपद्व्याप किंवा विरोधाचा नसता संताप म्हणजे मुख्य राजा वगळून, त्याच्या भालदार चोपदार हुजऱ्यांशी निष्कारण सलगी किंवा हुजत करण्याइतकेच वायफळ होय. त्यापेक्षा त्या सर्वांना गुंडाळून ठेऊन एकदम थेट खुद्दांच्या दरबारात धाव घेतली, तर

हरिचिया भक्ता नाही भय चिंता ।
दुःख निवारिता नारायण ॥
नलगे वाहणे संसार-उद्वेग ।
जडो नेदी पांग देवराव ॥
असो द्यावा धीर सदा समाधान ।
आहे नारायण जवळीच ॥
तुका म्हणे माझा सखा पांडुरंग ।
व्यापियेले जग तेणे एके ॥

हा अनुभव आल्याशिवाय राहणार नाही.

या नंतर असा प्रश्न येतो कीं नास्तिक वृत्तीने किंवा अज्ञानाने शनिग्रहाच्या गुणधर्मांची अटकळ झाली नाही आणि अवचित आपण शनिच्या साडेसातीच्या वावटळीत सापडलो, तर काय करायचे ? आता विचार करायला अवकाश नाही. आचाराचा धरबंध सुटून तोहि सुरुंगा प्रमाणें खडाखड उफलू लागला. चोहो बाजूला एकदम अंधार कोंदाटला. बुद्धीच लंजूर

पडल्यामुळे कुशलतेचा थांगहि लागणे शक्य नाही. जिकडे पहावे तिकडे घनदाट काळाकुट्ट अंधःकार! पाऊल ठेवावे तेथे निसरडे. आशेने धावत जावे तेथे निराशेची थप्पड. अशा वेळी काय करायचे?

समजा, आपण एकटेच जंगलातून प्रवास करीत आहो. अवचित एकदम तुफान उठले. मुसळधार पाऊस कोसळू लागला. दिशा धुंद झाल्या. सर्वत्र अंधार पडला. मोठमोठे वृक्ष कडाड कोसळू लागले. विजांचा कडकडाट चालू झाला. अशा प्रसंगी काय करायचे? **उघड्या मैदानावर श्रीहरीचे नामस्मरण करीत खुशाल फदकल मारून बसायचे.** काय होईल ते होईल. तुफान कितीहि भयंकर असले, तरी ते जगाच्या अंतापर्यंत तर टिकणार नाही ना? मग उगाच धावाधाव करण्यात काय हाशील? एकाद्या बड्या झाडाच्या बुंध्याचा आश्रय घ्यावा आणि तोच कोलमडून आमच्या टाळक्यात पडावा, त्यापेक्षा उघडे मैदान काय वाईट! खुशाल खाली मुंडी घालून स्वस्थ बसावे. तुफान गेले कीं कपडे झटकावे, चांगले पिळावे, ओलेत्याने मार्ग चालू लागावे. तुफान गेल्यावर सूर्यप्रकाश येतोच, हवाहि सुधारते, कपडेहि वाळतात आणि आपणहि शीरसलामत! तुफानाला आपण विरोध तो काय करणार आणि कसा? शीर सलामत तर पगड्या पंचवीस!

" बचेंगे तो औरभी लढेंगे "

हे वीर दत्ताजी शिंद्याचे चिरंजीव वाक्य अखंड नजरेपुढे ठेऊन, पडेल त्या प्रसंगाला कुशलेने तोंड देण्यातच खरा पुरुषार्थ आहे. कुशल नावाडी वारा उलटा वहात असताना, एक तर जहाजाची शिडे उतरून लंगर टाकून ओरवा करतो, नाही तर विशेष कुशलतेने शिडेच किंचित् तिरपी उभारून उलट वाऱ्यावरच सुलट ठराविक दिशेला जहाज नेतो. विवेकी बुद्धीचा, अचल

निश्चयाचा आणि व्यवहार-कुशलतेचा हा सगळा खेळ आहे. केवळ गणिती ठोकताळे, नास्तिक्य बुद्धी किंवा भेदरटपणा यांचा कसल्याहि प्रसंगी टिकाव लागणे शक्य नाही.

चालत्या गाड्याला खीळ घालणे, दौडत धावणाऱ्या कार्याला अटकाव करणे आणि आजूबाजूची सर्व परिस्थिति खाडकन् पालटून मनुष्याला एकदम एकलकोंड्या एकांतवासात नेऊन टाकणे, हे शनिग्रहाच्या दशेचे गुणधर्म आहेत. त्यांचा हेतू समजावून घेतला पाहिजे. निष्कारण निसरड्या परिस्थिती-वर घावाघाव करण्यात अर्थ नाही. कार्यसिद्धी तर होत नाहीच, पण तिचा काळ मात्र दुरावतो. एकांतवासाच्या काळात वेळाला दुष्काळ नसतो. त्या वेळी श्रीहरीचे नामस्मरण, भजन आणि चिंतन करावे. समर्थांच्या

दासबोधाचे मननपूर्वक पारायण करावे.

त्यांचे **मनाचे श्लोक** मनाच्या आणुरेणूत चांगले भिनू द्यावे. हे दोन ग्रंथ साध्या संसाऱ्यापासून तों पट्टीच्या राजकारणी आणि परमहंस नरनारी पर्यंत सर्वांना कामधेनू किंवा कल्पतरू प्रमाणेच तेजदायी व फलदायी आहेत. त्यांची भक्तीपूर्वक पारायणे केली कीं विचारांना शांति येते, एकाग्रतेची उत्तम धार लागते आणि विशेषतः सुखदुःखाच्या लौकिकी फोलकट कल्पनानी कोंदाटलेल्या मनोमंदिरात नित्यानित्य विवेकाचा ज्ञानदीप तेजाळ प्रकाशतो. " आधी केले आणि मग सांगितले " या कीर्तीचे श्रीसमर्थ रामदास दासबोधाबद्दल आत्मविश्वासपूर्वक ग्वाही देतात कीं,

भक्तिचेन योगें देव । निश्चयें पावती मानव ।
ऐसा आहे अभिप्राव । ईये ग्रंथीं ॥ ४ ॥

मुख्य भक्तीचा निश्चयो । शुद्ध ज्ञानाचा निश्चयो ।
आत्मस्थितीचा निश्चयो । बोलिला असे ॥ ५ ॥
नाना किंतु निवारिले । नाना संशयां छेदिले ।
नाना आशंका फेडिले । नाना प्रश्न ॥ १२ ॥
भगवद्वचनी अविश्वासे । ऐसा कोण पतित असे ।
भगवद्वाक्याविरहित नसे । बोलणें येथींचें ॥ २१ ॥
आतां श्रवण केलियाचें फळ । क्रिया पालटे तत्काळ ।
तुटे संशयाचें मूळ । येकसरां ॥ २८-१-१.

संशयाचे मूळ तुटून क्रियेत पालट कशी करावी, एवढा प्रश्न दासबोध आणि मनाचे श्लोक फार कुशलतेने सोडवितात. एकांतवासाच्या एकलकोंड्या काळात हा प्रश्न आपण सोडविला तरी तो काळ कृतार्थ झाला असे समजावे. व्यवहारात आपण कां घसरलो, कसे घसरलो, त्याची कारणे काय; बगैरे तपशीलाची भवति न भवति करायला दासबोधा सारखा वाटाड्या किंवा ज्ञानदीप दुसरा नाही. त्याच्या प्रकाशात आपल्या हिंमतीचा अंदाज घ्यावा, निश्चयाची कसोटी ठरवावी, ध्येयाची रूपरेषा नव्याने आखावी, आणि परिस्थितीची परीक्षा करून, पुढे पाऊल कसे टाकायचे याचा विचार ठरवावा. संकटानी गांगरून जाण्यापेक्षा, त्यांतील ईश्वरी संदेश शोधण्यातच माणसाची माणुसकी आणि वीरांचे वीरत्व आहे. पांडवांनी अज्ञातवासातच पुढील भारतीय युद्धाचे चैतन्य आत्मसात् केले. दिल्ली आग्र्याच्या ९ महिन्याच्या वनवासातच शिवाजीने मऱ्हाठी स्वराज्यस्थापनेचे पाचपेच निश्चित ठरविले. रूसो जपानी युद्धात जनरल टोगो

सहा महिन्यांपुरता ठार मेला

होता. म्हणजे अज्ञानवासात राहून, बाहेर टोगो मरण पावल्याची बातमी उठविली होती. या काळात त्याने युद्धाच्या पाचपेचांचा फक्त अभ्यास केला

आणि जेव्हा रशियाच्या बाल्कन फ्लीटचे मध्यवर्ति निशाणाचे जहाज तोफेच्य टापूत आले, तेव्हा त्याला एकाच शंभर मणी तोफेच्या गोळ्याचा दणका देऊन पालथे पाडले. रशियन लोक जपानी जहाजावर पहातात, तों तेथे जनरल टोगो कृतांत काळा सारखा ताठ उभा ! मेलेला टोगो जिवंत झाला आणि रशियाच्या उरावर बसला.

आईच्या गर्भात असतानाच जर आमच्या मानेभोवती नाळाचा वेढा घट्ट पडलेला असतो, तर आमच्या जन्मानंतर तों मृत्यूच्या क्षणापर्यंत-म्हणजे मृत्यूचा फास पडेपर्यंत—परिस्थितीचे शेकडो फास आमच्या गळ्याला लागले, तर त्यात विशेष नवल कशाचे ? मनुष्य म्हणजे एक प्रकारचा फासेपारधीच म्हटला तरी चालेल. जन्म झाल्याबरोबर नाळाचा फास आई तोडते. पुढच्या आयुष्यातले फास आपले आपण सोडले तोडले पाहिजेत. ते किती हळू आणि कुशलतेने सोडवून तोडावे, याचा धडा आपल्या प्रेमळ मातोश्रीने आपल्या जन्मकाळीच घालून दिलेला असतो. परिस्थितीचे वेढे फोडताना सुद्धा फार कुशलता वापरली पाहिजे. धडाडीहि पाहिजे, पण धांगडधिंगा किंवा घिसाडघाई मात्र मुळीच चालणार नाही. आपल्या आईने आपल नाळ किती कुशलतेने कापून आपल्या गळ्याचा फास सोडविला, याची अखंड स्मृति ज्याला आहे, तो परिस्थितीच्या कसल्याहि पेचाच्या पचनी सहसा पडणार नाही. एवढे मात्र खरे कीं पुष्कळ वेळा शिवाजीसारखे मोठमोठे धोरणी ज्ञानी महापुरुष सुद्धा वेढ्यात सापडले असता दिङ्मूढ बनतात. अशा वेळी

"वेढा फोडून बाहेर पड"

अशा अधिकारी वाणीच्या संदेशाची फार जरूर असते. शिद्दी जोहार आणि फाजलखान यांच्या विजापुरी सैन्याने शिवाजीला पन्हाळा गडावर

कोंडून धरले होंत, त्या मुकाबल्याचा विचार करा. सतत चार महिने वेढा पडला. अवघ्या दख्खनमध्ये नवजीवनाचा धुमाकूळ घालणारा महाराष्ट्राचा नरसिंह शिवाजी मुसलमानाच्या जाळयात पुरा सापडला. शिवाजी सारखा दांडगा दगलबाज मुत्सद्दी, पण दिङ्मूढ होऊन, खुशाल चार महिने सगळया सैन्यासह गडावरच्या धान्याच्या कोठारांचा फडशा पाडीत स्वस्थ बसला. बाहेरचा वेढा पहावा तों वेळी गडाचा दगडी तट सहज फुटेल, पण वेढा फुटणे फार मुष्किल, अशी स्थिति ! वरे, वेढ्यात अडकून तरी किती महिने पडणार ? अशा ऐन आणीबाणीच्या प्रसंगी महाराष्ट्राची चैतन्य-देवता विद्युल्लते प्रमाणे कडाडली. जिजामातेने नेताजी पालकरा बरोबर शिव-रायाला आपला निर्वाणीचा दिव्य संदेश पाठवून, त्याच्या महिरलेल्या मनोवृत्तीत चैतन्याची बिजली सणाणवली. हा

जिजामातेचा दिव्य संदेश

काल्पनीक नव्हे. त्याला ऐतिहासिक आधार आहे. फक्त तो सूत्ररूपात असल्यामुळे मी केवळ तो स्पष्टीकरणाच्या भाषेने येथे देत आहे. प्रत्येक मऱ्हाट्याने तो अखंड चिंतनात ठेवावा. तो संदेश असाः—

" शिवबा, आज चार महिने तू पन्हाळ्यावर अडकून बसला आहेस, हे कोणच्या गावचे राजकारण ? वेढे पडणारच आणि गेल्या अफझुलखानी मुकाबल्या प्रमाणे प्राणावरचे प्रसंगहि येणारच. पण असा प्रत्येक वेढ्याला जर तू चारचार सहासहा महिने हातपाय पोटाशी आवळून स्वस्थ बसू लागलास, तर दहा जन्मात तरी स्वराज्य स्थापन होईल काय ? अडविलेल्या सोंगटीने तू कितीसा डाव खेळणार ? आता बितली खरी. मग जगण्या मरण्याचा प्रश्नच कोठे उरतो ? आणि असा सापळ्यातल्या वाघाप्रमाणे तू अडकून

तरी किती दिवस बसणार ? रडीला आलेला डाव खेळत बसणे हे राजकारण नव्हे. ज्याने अफझुलखाना सारख्या दैत्यावर चिऱ्यासारखी झडप घालून एका पलकात नेस्तनामूद केला, तोच राजा शिवाजी पन्हाळ्यावर अडकून पडावा, ही नामुष्कीची गोष्ट होय. चल ऊठ. माझा निरोप मिळताच कोंडी फोड आणि बाहेर पड. मेलास तर तुझे या जन्मीचे कार्य एवढेच समजून मी समाधान मानीन; आणि विजापुऱ्याना तुडवीत तुडवीत वेढा फोडून बाहेर पडलास, तर तुझी स्वराज्य-स्थापनेची लायकी विशेष ठरेल. गडावर कुझून मरण्यापेक्षा वेढ्यावर तुटून पडून मेलास, तरी माझा कुसवा धन्य झाला असे मी मानीन. चळ ऊठ आणि फोड कोंडी."

शिवाजीला हा संदेश मिळताच अवघ्या २४ तासांच्या आत पन्हाळ-गडचा वेढा फुटला, बाजीप्रभूने घोडखिंडीची पावनखिंड केली, विशाळगडच्या मैदानावर बाजी पासलकराने तलवारीची शर्थ करून धारातीर्थी देह ठेवला आणि महाराष्ट्राचा स्वराज्यसूर्य शिवाजी पुनश्च देदिप्यमान चमकू लागला.

मृत्यु पावता जाशिल स्वर्गा समर जिंकिता साम्राज्य

ही श्रीकृष्ण भगवंताची वाणी अखेर खरी ठरली. ही वाणिच आम्हा मानवांची जिजामाता. तिचा चिरंजिव संदेश श्रीमद्भगवत् गीतेच्या द्वारे अखिल भूतलावर वर्धिष्णु तेजाने अखंड चमकत आहे. परिस्थितीच्या वेढ्यात अडकलेल्या बद्धानी त्या संदेशाचे तेज आपल्या जीवनात समरस करून घेतल्यास त्याना अनेक पन्हाळगडचे वेढे फोडता येतील.

कोणत्याहि परिस्थितीच्या परिणामांचा प्रतिकार करण्याची शक्ती आपल्यात नसली, म्हणजेच आपल्या क्लेशांची वेदना तीव्र होते. शरीरात

काही विशेष तत्वांचा नैसर्गिक पुरवठा कमी पडला, म्हणजेच रोगांचा जोर होऊन मनुष्य आजारी पडतो. अशा वेळी वैद्य किंवा डाक्टर रोग्याच्या देहात त्या लुप्त किंवा सुप्त नैसर्गिक तत्वांचा भरपूर पुरवठा करण्याची औषधयोजना तर करतातच, पण त्याबरोबरच त्या विशेष रोगाच्या जंतूच्या नाशाचीहि तजवीज करतात. थंडीने काकडलेल्या माणसाला ब्रॅन्डीचा एक डोस दिला की तो झटकन शुद्धीवर येऊन सावरतो. भयंकर उन्हाळ्याच्या दिवसात कोल्डाड्रिंक आइस्क्रीम किंवा बीर पिण्यासाठी लोक धडपडतात. शक्य ते उपाय करून अंतर्बाह्य परिस्थितीच्या प्रतिकूळ परिणामाना अटकाव करण्याची मनुष्याची प्रवृत्ति निसर्गसिद्धच असते. अटकावाचे उपाय स्वतःला सुचले नाहीत, तर तो दुसऱ्याची मदत घेतो; आणि यदाकदाचित् कोणी मदतगार मिळाला नाहीच, तर तडफडून मरतो.

शारिरीक क्लेशाना उपाय करणारे वैद्य डाकटर व दवाखाने पुष्कळ असतात; पण मानसिक क्लेशांवर मलमपट्टी लावणारा जडीबुट्टीवाला बाजारात आढळत नाही. केवळ आजूबाजूच्या आप्तमित्रांची ' सहानुभूति ' क्षणमात्र उत्तेजक वाटली, तरी मानसिक दुःखांची तीव्रता कमी करण्याच्या किंवा त्या दुःखाचे मूळच नाहीसे करण्याच्या कामी तिचा कसलाहि उपयोग होत नाही. फार काय, पण अशा प्रसंगी आपल्या पुढ्यात पैशाची रास येऊन पडली, तरी आपल्या मानसिक क्लेशांचा अणुरेणूसुद्धा कमी होऊ शकत नाही. शिवाय, शारिरीक क्लेश पत्करले, पण मानसिक क्लेश परवडत नाहीत. जिवंतपणीच मनुष्य मृत्यूचा प्रत्यक्ष अनुभव घेतो. प्रहदशेचे परिणाम प्रथम मनावर होतात आणि नंतर ते मनुष्याच्या व्यवहारावर उमटतात. प्रथम बुद्धी लंजूर पडते आणि मग सारा व्यवहार, सुकाणू तुटलेल्या गलबता प्रमाणे किंवा स्टियरिंग व्हील (सुकाणूचक्र) सुटलेल्या मोटर प्रमाणे, बेफाम उलटा पालटा भडकतो. अशा वेळीच मनुष्याने आपल्या बुद्धीचे—मनोवृत्तीचे

चक्र नीट सांभाळून धरले पाहिजे. तुफानात सापडलेल्या आगबोटीचा कप्तान जसा सुकाणूच्या चाकाला घट्ट पकडून, शक्य त्या धोरणाने बोट वाचविण्याचा प्राण जाई तों प्रयत्न करतो, तीच प्रयत्नांची शिकस्त मनोवृत्तीचे चक्र सांभाळण्यासाठी करणे आपल्याला प्राप्त आहे. यात जरा ढिलाई झाली कीं आपली जीवन-नौका रसातळाला गेलीच ! पुष्कळ लोक परिस्थितीच्या काचाला कंटाळून आत्महत्त्येचा भ्याड मार्ग पत्करतात, किंवा दारू सारख्या व्यसनात स्वतःला आकंठ बुडवून टाकतात. याचे कारण मनोवृत्तीवर विवेकाचा दाब ठेवण्याची त्याना अक्कल नसते म्हणा, अथवा लहर लागत नाही म्हणा. परिस्थिति बेताल भडकली म्हणून आपणहि कसल्या तरी व्यसनात बेताल भडकायचे, हा आत्महत्त्ये इतकाच भ्याड आत्मघात म्हटला तरी चालेल. तुफान सुटले म्हणून शहाणा कप्तान कधी सुकाणूचे चाक सोडीत नाही. समुद्रावर तुफाने व्हायचींच. त्यावर माणसांचा ताबा किंवा हुकमत काय चालणार ? तुफानात जहाज वाचवील तोच खरा कप्तान. त्याच वेळी त्याच्या अकलेची आणि शक्तियुक्तीची खरी कसोटी आणि तारीफ ! तुफानाच्या प्रसंगीच खऱ्या कप्तानाची शांति दिसते, त्याचे धैर्य दुणावते, त्याची हिकमती बुद्धी वेगाने कसरत करू लागते. परिस्थितीच्या तुफानात ज्याने आपली जीवन-नौका कुशलतेने तारली, तोच मर्द नू तोच खरा वीर. एरवी शांत समुद्रावर साऱ्या जगाची दर्यावर्दी करणारांची त्याच्यापुढे काय किंमत ! शांत तलावात हवा तो रेम्याडोक्या होडी ढकलून सोनकमळे खुडून आणील; पण खवळलेल्या दर्यात उडी घेऊन दुसऱ्याचा-किंवहुना स्वतःचा-जीव वाचविणाराची हिंमत काही औरच होय.

महदशेच्या फेऱ्यात शनीच्या साडेसातीचा तडाखा फार भयंकर. या वेळी तनमनधनावर काय काय विपरीत आणि विलक्षण परिणाम होतील,

त्याचा नेम सांगताच येणे शक्य नाही. एकदा ठिणगी लागली कीं खडा-खड सुरुंगावर सुरुंग फुट्ट लागतात. मोठमोठे आडाखेबाज शहाणे सुद्धा दिङ्मूढ होतात. पिढ्या न् पिढ्याचे लाखाधीश बोलबोलता खाकाधीश बनून भिक्षा मागायलाहि त्याना तोंड शिल्लक उरत नाही. शनिग्रहाचा पाहिला हल्ला बेछुट मनुष्याच्या चित्तवृत्तीवर होतो. मनाच्या मानेचे मणके मोडले कीं मग सारा व्यवहार इतक्या झपाट्याने कोसळू लागतो कीं त्याला सावरण्याचा प्रत्येक प्रयत्न

बुडत्याचा पाय खोलात

या नियमाने हटकून अपयशी ठरत जातो. एकांड्या प्रयत्नवादाचा फोलपणा अशाच प्रसंगी अनुभवाला पटतो. मनावर निराशेचे वैतागाचे इट्टीपणाचे आणि वैरागाचे धडके इतक्या जोराने बसतात कीं त्यांचे दणके सहन करण्यापेक्षा मरण बरे, येथपर्यंत साधारण माणसाची स्थिति होऊन बसते. कारण, ते दणके सहन करण्याची त्यांच्या अंतर्यामी प्रतिकारशक्ति नसते. प्रश्न इतकाच असतो कीं साडेसातीच्या दणक्यांना मला आळा घालता आला नाही, प्रतिबंध करता आला नाही, तरी त्यांची आंच मर्दाप्रमाणे सहन करण्याइतकी माझी आत्मशक्ति तरी मजबूत आणि खंबीर पाहिजे. मी लक्षाधीशाचा भिक्षाधीश झालो तरी मला माझ्या

हृदयाची श्रीमंती कायम राखली पाहिजे.

बाह्य जगातले चैतन्य जर माझ्या उपयोगी पडेनासे झाले असेल, तर मी माझ्या आत्मिक चैतन्याचा स्फुल्लिंग विवेकाचा फुंकर मारून मारून प्रदिप्त करीन आणि त्याच्या जोरावर बाह्य चैतन्याला माझ्या आत्मबळाने कधीना कधी गदगदा हालवीन, असल्या कडव्या निश्चयी वृत्तीचा जोर

आपल्या हृदयात अखंड सणाणत ठेवण्याचा प्रयत्न केला पाहिजे. श्रीमंत होऊन राजवाडे बांधण्याचे काम फार सोपे आहे; पण ग्रहदशा बदलताच त्याच राजवाड्याला व श्रीमंती थाटाला रामराम ठोकून, गरीबीच्या सोपस्कीत चटणी भाकरीच्या पत्रावळीवर हसतमुखाने येऊन बसण्याचे काम मोठे कठीण आहे. त्याला एक विशेष धैर्य लागते. एक विशेष शक्ती लागते. एक विशेष आत्मतेज लागते. त्याच्या जोरावर मनुष्य एकदा निर्भय बनला, कीं मग त्याच्यापुढे ग्रहदशा आणि गृहदशांची मातब्बरी चालत नाही.

भित्यापाठी ब्रह्मराक्षस

किंवा भेदरटांमागे सरकार ! जों जों माणूस विशेष कायदा-भीरू, तों तों सरकारच्या दडपशाहीच्या वरवंटा अधिक जोराचा ! जों जों लोक अधिकाधिक शांतिप्रिय होतात, तों तों राज्यकर्त्यांच्या नाकांना गुलकटांची घाण अधिकाधिक येते ! अशा वेळी सत्याच्या आग्रही वृत्तीने, सात्विक आत्मतेजाने, अंतःकरण निर्भयतेने अपरंपार फुलवून सोडले पाहिजे. ही निर्भयता, आत्मिक तेजाचा हा सात्विक प्रतिकार कसा कमवावा; आकाशस्थ किंवा पृथ्विस्थ दानवी मानवी ग्रहांच्या दशेला मर्दपणाने तोंड कसे द्यावे आणि केवळ एक व्यक्तीनेचसे काय, पण अनेक व्यक्तीनी बनलेल्या राष्ट्राने सुद्धा प्रतिकूळ परिस्थितीत

आत्मिक चैतन्याचीं इलेक्ट्रूसिटी

अंतःकरणात थरथरवून, आत्मोद्धारातच राष्ट्रोद्धार कसा करावा, हे शिकण्याचा धडा समर्थ रामदासानी श्रीमारुती-उपासनेच्या रूपाने अवघ्या महाराष्ट्राला घालून दिलेलाच आहे. वज्रांग ऊर्फ बजरंगबली मारुती हे दैवत राम किंवा रामायण-काळा इतके प्राचीन असले, तरी महाराष्ट्रात श्रीमारुती-उपासनेचा संप्रदाय प्रथम स्थापन करण्याचा अग्रमान श्रीसमर्थ रामदासानीच घेतला.

ती वेळच अशी होती कीं यच्चावत् हिंदु स्त्रीपुरुषांच्या हृदयात आत्मिक प्रतिकाराची काही तरी ज्वलज्जहाल शक्ति निर्माण केल्याशिवाय, स्वराज्य आणि स्वधर्म यांच्या पुनर्घटनेसाठी अगत्य लागणाऱ्या स्वार्थत्यागाला अवघा महाराष्ट्र एकमुखी एकसूत्री तयार होणेंच कठीण होते. भक्तिमार्गा संतजनानी लोकांच्या मनोभूमिका आधीच देवभक्तीच्या एकाग्रतेने चांगल्या नांगरून कुदळून भुसभुशीत करून ठेवल्या होत्या. त्यातच समर्थ रामदासानी आपल्या उज्वल ओजस्वी आणि तडफदार अशा मारुती-उपासनेचे सामर्थ्यवान बीज पेरताच, सारा महाराष्ट्र मारुतीप्रमाणे स्वराज्याचा बुभुःकार करीत खवळून उठला.

चैतन्य, तेज, शक्ति—मग ती आत्मिक असो, मानसिक असो, शारिरीक असो, वा कसलीहि असो, त्याचा मूळ झरा मारुतीच्या तेजाळ चरित्रात आणि चारित्र्यात हटकून आढळायचाच. लहानलहान मुलांमुलीपासून तों थेट वृद्ध स्त्री पुरुषांपर्यंत, प्रत्येकाला, ज्याच्या त्याच्या महत्वाकांक्षे प्रमाणे, स्फूर्तीची हवी ती ठिणगी, उत्साहाचा हवा तो वारा आणि चैतन्याची हवी ती भरारी अथवा तिरमिरी श्रीमारुतीरायाच्या चरित्राच्या अभ्यासाने आणि त्या गदा-पर्वतधारी बजरंग मूर्तीच्या दर्शनाने तेव्हाच प्राप्त होते. हिंदूंच्या देवविषयक कल्पनांच्या अगर भावनांच्या यादीत तेहतीस कोटी देव जरी गचडी करून घुसलेले असले, तरी त्या सर्वांवर मारुतीरायाच्या चरित्राचा महिमा एकाच बुभुःकारात बेछुट मात करतो. वीर्यशाली, धैर्यशाली, बलशाली, बुद्धीशाली, भीमरूपी, महारुद्र, ब्रह्मचारी, वज्रदेही, लोकनायक, जगन्नायक, पुण्यशील, परतोषक, स्वयंसेवक, रामदूत, कपिदळ-सेनापति, इत्यादि इतक्या अनंत तेजाळ व स्फूर्तिदायक अंगोपांगानी मारुतीरायाचे चारित्र्य प्रज्वलित नटलेले आहे कीं जन्म होताच

आरक्त दाखिलें डोळां । गिळीलें सूर्यमण्डळा ।
वाढतां वाढतां वाढे । भेदिलें शून्यमण्डळा ॥

या चमत्कारातील गूढ उकलणे फारसे कठीण जात नाही. ज्याने तेजोनिधी सूर्याचेहि आक्रमण केले, तो अंजनीसुत मारुती आपादमस्तक किती कोटी सूर्यप्रभेने तेजाळ असावा, याचा तेव्हाच उलगडा होतो. प्रश्न व्यक्तीच्या आत्मोन्नतीचा असो, वा राष्ट्रोन्नतीचा असो, त्यासाठी लागणाऱ्या स्फूर्तीचा शक्तीचा आणि प्रकाशाचा कित्ता (मॉडेल) म्हणून श्रीसमर्थ रामदासानी श्रीमारुतीरायाचीच उपासना किती शुभंकरी व विजयदायिनी आहे, याचा इतिहास चिरंजीव करून ठेविला आहे. मारुतीउपासनेचे समर्थांचे स्तोत्र-वाङ्मयच नुसते वाचले, तर त्याच्या प्रत्येक शब्दात अपरंपार शक्ती उसळत असलेली, आजहि अनुभवाला येते. समर्थांचे सगळेच वाङ्मय अचाट सामर्थ्याने नुसते रसरसलेले आहे. त्यातली केवळ १३ 'भीमरूपी स्तोत्रे 'च मननपूर्वक वाचली तर दुःख चिंता निराशा क्लेश यांचे खडाखड निर्दाळण होऊन, वाचकांचा आत्माराम अवर्णनीय उल्हासाने आणि आशावादाने बेफाम फुरफुरू लागतो. एक दोन सवायांचे नमुने पहा:—

रामदूत वायुसूत भीमगर्भ जुत्पती ।
जो नरांत वानरांत भक्ति प्रेम वित्पती ।
दासदक्ष स्वामिपक्ष नीजकाजसारथी ।
वीरजोर शीरजोर धक्कधींग माल्ती ॥ १ ॥

हिंदुस्थानी सवायीचा नमुना किती गडगडाट करणारा आहे, तो पहा. वाचकांनी 'एका दमात वाचण्याचा प्रयत्न करून पहावा, म्हणजे समर्थ काव्यातले दिव्य सामर्थ्य थोडे अनुभवास येईल.

जब हनुमंत जनक-दुहिता शुद्ध लेनेकू
गभार दौर दौर आये है । तब कंठ
गुरगुरगुरित नेत्र गरगरगारित रोम
थरथरथरित पुच्छ झारे । तब लंक
घरघरघरित बनमो दरदरदारित सीताशोक
हरत झरझरझारित बन उफारे । तब कंठ
कुचकुचकुचित इंद्रजीत चकचकचकित रावण
थकथकथकित कर नगर ज्यार ज्यार मखमखमखित
दास लियो जयतु राम मिले तब कपि भुःभुःकारे ॥ २ ॥

मारुतीची उपासना महाराष्ट्रात सर्वत्र रूढ आहे. विशेषतः शन्याळलेले लोक हटकून मारुतीपूजन करीत असतात. शेकडो ९५ लोक भटाभिक्षुकांच्या अडतीने मारुतीपूजन व तज्जन्य साडेसाती निवारणाचा आटारेटा करताना दिसतात. भटाला चवली पावली द्यावी, तेल शेंदराची नरोटी त्याच्या हवाली करावी, त्याने देवळात जाऊन काही पोपटपंची बडबडावी, यजमानाला अंगारा तीर्थ आणून द्यावे आणि त्याने भटजीच्या पायावर डोके घासावे, कीं झाली मारुती उपासना.

उपासना ज्याची त्यानेच स्वतः केली पाहिजे.

भटामार्फत उपासना चालवून, त्याच्या मध्यस्थीने आपली आत्मशक्ति वाढविण्याचा उपद्व्याप, म्हणजे आपल्या बद्धकोष्ठासाठी भटजीला बालदीभर एरंडेल पाजण्या इतकाच मूर्खपणाचा आहे. आपल्या अंतर्यामी ज्ञानदीप उजळायचा, तर त्यासाठी भटाच्या अंतर्यामीची बिजलीची दिवाळी आपल्या कितीशा उपयोगी पडेल ? आपल्या जन्म आणि मृत्यूची जबाबदारी पत्करायला जर कोणी वकील मध्यस्त एजन्ट किंवा प्रॉक्झीवाला नसतो, तर ईश्वरपूजनाच्या बाबतीत तरी भटदलालाची मध्यस्थी कितीशी शहाणपणाची

ठरेल, याचा विवेकी वाचकानी विचार करावा. ज्याचा तो. कोणी कोणा-साठी वकीलपत्र घेऊन जन्मत नाही, लाखो रुपये दक्षिणा दिली तरी आप-ल्यासाठी एकहि भट मध्यस्थीने मरायला तयार होणार नाही. खटला झुंज-विण्याचे वकीलपत्र कज्जेदलाल घेतो, पण अशीलाच्या ऐवजी आपण फाशी जाण्याचे साफ नाकारतो. आत्मोन्नति ज्याची त्यानेच करावी लागते. देव-भक्तीचा ज्ञानदीप आपला आपणच पाजळून, त्याच्या प्रकाशात अंतस्थ आत्मारामाची ओळख पटवून घेतली पाहिजे. त्यासाठी भटजीच्या संस्कृत पोपटपंचीची आवश्यकता मुळीच नाही. देवाची प्रार्थना ह्या त्या बोबड्या बोलाने करा, तो त्या बोलानेच प्रसन्न होतो. जो विश्वंभर श्रीहरी कीटकाचे कुटकुटणेहि कान देऊन ऐकतो, तो काय आमच्या वेड्यावाकड्या प्राकृत बोलांकडे लक्ष देणार नाही ? लहान मुलांच्या रडण्याचाहि अर्थ चटकन् उमगण्याची उपजत बुद्धी ज्या भगवंताने प्रत्येक आईला दिली आहे, ती जगज्जननी काय आमच्या प्रार्थना, भटांच्या मध्यस्थीशिवाय, ऐकण्यास नाखूष असेल ? मुळीच नाही. ईश्वरी उपासनेची पात्रता आणि बुद्धी केवळ मनुष्यमात्रास असते, आणि पशुपक्ष्याना नसते, असे मुळीच नाही. पशुपक्षी सुद्धा व्रते पाळतात व उपासना करतात. कित्येक पाळीव कुत्रे शनिवार

* सोमवार किंवा एकादशीचे उपास करताना मी पाहिले आहेत.

---

* सुमारे ३० वर्षांपूर्वी पनवेल मुक्कामी आमच्या घरी 'बच्चा' नावाचा एक कुत्रा होता. तो सोमवार पाळीत असे. त्या दिवशी तो कडकडीत उपास करीत असे. दूधभात वाढला तरी सुसता हुंगीतहि नसे. सारा दिवस आंगणा-तल्या विरूपाक्षाच्या देवळात बसून राह्यचा. संध्याकाळी कृष्णाळ्या तळ्यात बुचकळी मारून यायचा आणि मग खाणे खायचा. मरते वेळी तो एका भयंकर जखमेनें आजारी पडला होता. मरणकाळी तो एकदम धावत विरूपाक्षाच्या देवळात गेला आणि तेथें शंकराच्या पिंडीजवळ त्याने प्राण सोडला. तो दिवसहि सोमवारच होता.

मारुती म्हणजे शनि नव्हे.

मारुतीची उपासना करणारे शन्याळलेले लोक, मारुतीला शनि कल्पून, त्याची आराधना करतात. ही त्यांची चूक आहे. एकंदर विश्वरचनेत शनीची भूमिका काय आहे, हे ९ व्या प्रकरणात स्पष्ट केलेच आहे. मारुतीचे चरित्र सर्वांगानी इतके उदात्त उज्वल आणि स्फूर्तिदायक आहे की त्याच्या तेजापुढे नवग्रहांच्या परिणामांची गठडीच वळली पाहिजे. परिस्थितीचा हिवाळा पडो, नाहीतर उन्हाळा कडको, मारुतीरायाच्या उपासनेचा ज्ञानदीप हृदयात एकदा चांगला उजळला की मनुष्य त्यांच्या परिणामाना प्रतिकार करायला पूर्ण समर्थ होतो. त्याची सहनशक्ती दुणावते. निग्रही वृत्ति बळावते. आशावाद फोफावतो. वृत्ति स्थिर होते आणि बुद्धीचे कौशल्य पाणीदार बनते. आत्मोद्धाराला आणि राष्ट्रोद्धाराला अवश्य लागणाऱ्या सर्व उत्तम गुणांचे झरे, मारुती–चरित्राच्या उपासनेने आणि अखंड चिंतनाने. भक्ताच्या प्रकृतीत झुळझूळ वाहू लागतात. निराशा उदासीनता खेद आत्मतिरस्कार इत्यादि मनोविकारांची ढगारे मारुतीरायाच्या बुभुःकारापुढे भराभर वितळून उडून जातात. हा प्रश्न ज्याने.त्याने प्रत्यक्ष अनुभवाने सोडवायचा असल्यामुळे, त्यावर चर्चेची लेखनमर्यादाशी विशेष न केलेलीच बरी. रामदासस्वामी सारख्या अक्षरशः समर्थ राम–दासानी मारुती–उपासनेचा दरवाजा सताड उघडून, थेट खुद्दांच्या दरबारात जाण्याचा जो राजमार्ग मोकळा केला, त्याची विशेष माहिती सांगण्याचा, माझ्यासारख्या केवळ प्राकृत संसाऱ्याने प्रयत्न करणे, म्हणजे अधिकाराचे अक्षम्य अतिक्रमणच होय.

स्वधामासि जातां प्रभू रामराजा । हनुमंत तो ठेविला याचि काजा ।
सदां सर्वदा राम–दासासि पावे । खळीं गांजितां ध्यान सोडूनि धावे ॥

हा चमत्कार कसा घडून येतो, याचा अनुभव आणि आत्मविश्वास श्रीराम-दास स्वामींच्या समर्थ वाङ्मयाच्या वाचन-मनन-निदिध्यासानेच प्रत्येकाने कमविला पाहिजे. उपासनेच्या प्रकाशाने हृदयाकाश एकदा का स्वच्छ प्रकाशित झाले, म्हणजे

सदा चक्रवाकांसि मार्तण्ड जैसा ।
उडी घालितो संकटीं स्वामि तैसा ।
हरीभक्तिचा घाव घाली निशाणीं ।
नुपेक्षी कदा राम दासाभिमानी ॥

हे प्रत्यंतर तेव्हाच पटते. समर्थांचे वाङ्मय तुफानी समुद्रासारखे आहे. त्या सर्वांचे आवगाहन जरी झाले नाही, तरी शन्याळलेल्या निराशावाद्यानी निदान समर्थांची तेरा भीमरूपी स्तोत्रे अखंड वाचन-मनन-निदिध्यासात ठेवावी. अशी मी स्वानुभवाची शिफारस करतो.

तेल शेंदराची मिमांसा.

मारुतीला तेल आणि शेंदूर लावतात. तेल म्हणजे स्नेह. आमचे अंतः-करण मारुतीरायाविषयी स्नेहाने-भक्तीने अपरंपार भरून, त्या स्नेहाळ भावनेचा मारुतीला वास्तविक अभिषेक करावा लागतो. शेंदराचा रंग भडक तांबडा. प्रेमाचाहि रंग लालभडकच दर्शविण्यात येतो. उत्कट प्रेम आणि भक्ती यांचा संमिश्र अभिषेक मारुतीवर करून आमची उपासना झाली पाहिजे. हे सर्वांनाच शक्य नाही, म्हणून लौकिकी तेल शेंदराची, सहज-साध्य व सोपी योजना प्रचारात आलेली आहे. शिवाय, तेलशेंदरानें रंग-लेली मूर्ती पहाणाराला उग्र भयानक आणि बलवंत अशी दिसते. अशा भीमभयानक तामसी महारुद्र बजरंगबलीचे उपासनापूर्वक अखंड चिंतन करून करूनच भक्ताच्या हृदयात तेच ध्यान, तेच उग्र रूप, नेच वज्रांगी

वडाडी, तोच महारुद्राचा आवेश, तीच तेजाळ प्रकृति, हलुहळू विकसित होऊ लागते. मारुतीरायाच्या अखंड उपासनेने, त्याचे दिव्य शक्तिमान् चारित्र्य उपासकाच्या देहमनात बिंबू लागले, म्हणजे तो कोणत्याहि प्रकारच्या आधीव्याधींच्या दणक्याना जुमानणार नाही, किंवा परिस्थितीच्या आघातांपुढे वंगणार नाहीं.

'मागे पाय' मारुतीला माहीत नाही


कार्याचा निश्चय झाला कीं मग त्याच्या मुसंडीपुढे प्राणाची तमा नाही, मग संकटांची काय क्षिती ? समर्थ रामदासानी महाराष्ट्राला मारुतीउपासनेची दीक्षा देण्यात सूक्ष्मतम दीर्घदृष्टीचे धोरण लढाविले यात मुळीच शंका नाही १७ व्या शतकात महाराष्ट्र बजरंगबली बनला म्हणून त्याला स्वराज्य दिसले. आजहि महाराष्ट्राला, आणि अखिल हिंदुस्थानाला तामसी बजरंगबली बनल्या शिवाय, त्याच्या पुढचा 'जगावे का मरावे' हा विकट प्रश्न सुटणे शक्य नाही. सत्व आणि रज हे दोन गुण कितीहि गोंडस व गोड असले, तरी तामसिक प्रवृत्तीचा पिंगा प्रबळ पिसाळल्याशिवाय स्वार्थ सापडणार नाही आणि परमार्थ सुद्धा हाताला लागणार नाही. फार काय, पण तमाचे कोदण्डटणत्कार न करील, तर सत्व रजाना सुद्धा निर्बलावस्थेत घोंगडीखाली डोके झाकून आपले प्राण सोडावे लागतील. सात्विक आणि राजसिक प्रकृतीबद्दल हिंदुस्थानचा मोठा लौकिक आहे. या लौकिकाने हिंदूंच्या हातात कसल्या मोक्षाचे खापर पडले आहे, ते सांगणे नको. आता त्या लौकिकाची खातेवही कायमची बंद करून, हिंदु तरुणांनी तामसिक प्रकृतीचा विकास करण्याचे खाते उघडले पाहिजे. संसार मग तो एका व्यक्तीचा असो, समाजाचा असो, वा राष्ट्राचा असो, त्यात तमाचा तापट तामसीपणा सणाणल्या शिवाय, लौकिकी

अगर दैवी आपत्तींचा प्रतिकार करण्याची हिंमत, म्हणजे आत्मशक्ती, त्याला लाभणे अशक्य आहे. यासाठीच समर्थांनी मारुती-उपासनेचा समर्थ संप्रदायाचा विजयी नकाशा अखिल हिंदु तरुणांपुढे, मऱ्हाठि स्वराज्याच्या रूपाने, पसरून ठेवला आहे. 'वन्दे मातरम्' सारख्या सात्विक मुळमुळीत किंचाळणीपेक्षा, जेव्हा अखिल हिंदु भारत

बजरंग बलीकी जय

गर्जनेच्या तेलशेंदरात आपादमस्तक रंगून निघेल, तेव्हा त्याचा आत्माराम जागृत होऊन, तो या पुराणपुरुष भारताच्या जीवनक्रान्तीचा गडगडाट करून, नवमन्वंतराच्या इतिहासाची पाने क्रान्तीच्या देदिप्यमान सोनेरी शाईने लिहून काढील.

ॐ क्रांतिः क्रांतिः क्रांतिः



वाचकाना आग्रहाची विनंती.

आचारात प्रत्यक्ष क्रान्ति घडवून, अखिल महाराष्ट्राला आत्मविकासाचे सामर्थ्य प्राप्त व्हावे, या ध्येराने आपल्या विचाराना धक्का देणाऱ्या अनेक तत्वांची या ग्रंथात मी चर्चा केलेली आहे. वाचकानी: त्याबद्दलचे आपापले चिकित्सक विचार, अभिप्राय आणि अनुभव मला स्पष्ट व सुवाच्य लिहून कळविण्याची तसदी घ्यावी. म्हणजे दुसऱ्या आवृतीच्या वेळी मी त्यांची योग्य ती बंददास्त ठेवीन.

दादर, ता. १७ सप्टेंबर १९२८

केशव सीताराम ठाकरे.

॥ जय.जय रघुवीर समर्थ. ॥

भवाच्या भयें काय भीतोस लंडी ।
धरी रे मना धीर धाकासि सांडी ।
रघूनायका सारिखा स्वामि शीरीं ।
नुपेक्षी कदा कोपल्या दण्डधारी ॥

॥ जय जय रघुवीर समर्थ ॥